[इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेलीं]

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

[शिवकालीन घराणीं.]

(१)

कानदखोरें—मरळ देशमुख.

हें प्रकरण

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, बी. ए.,

ह्यांनीं संशोधून तयार केलें.

तें

मुंबई येथें,

तुकाराम जावजी ह्यांनीं

'निर्णयसागर' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

इ. स. १९१२.

Published by Tukaram Javaji, Proprietor N. S. Press
23, Kolbhat Lane, Bombay.

Printed by B. R. Ghanekar at the Nirnaya-Sagar Press
23, Kolbhat Lane, Bombay.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

कानदखोरें—मरळ देशमुख.

लेखांक १.

श्री.

"करीणा मौजे कारी ता। रोहिडखोरे येथील जेधियाणीं देशमुखीचें वतन मेळवीले ऐसीजेः— वडीलबंधू खेलोजी जेधा व धाकटा भाऊ बाजी नाईक जेधे उभयता बेदरास गेले; पाछायाची चाकरी येकनिष्ठपणे केली. जाबसाल यथास्थित जमेदारी प्रो करून; कामकाजहि तयार ऐसे पाछायें पाहून, खुश होऊन मेहरबान होऊन, देशमुखीच्या वतनाचे फर्मान व वस्त्रे देऊन, खेलोजी नाईक व बाजी नाईक यांची रवानगी केली. पाछाय फर्मान घेऊन बेदराहून निघाले, ते वाटेस येऊन सिरवळीं राहिले. तेथून पुढे त्याजबरावर माहार होता त्यास रवाना केले. तों खोपडीयाची व माहाराची भेट जाली. माहारानी बातमी खोपडीयास सांगितली की, जेधे याजवर पाछाह मेहरवान होऊन, फरमाणे देऊन रवाना केले; आज सिरवळीं राहिले आहेत. उदईक रविवारी येतील. ऐसे बातमीस कळले. यानंतर रवि प्रातःकाळी खोपडे निघोन जाऊन गोडखिंडीस बसले. रविवारी सिरवळचा बाजार भरत असे. तेव्हां खेलोजी नाईक व बाजी नाईक उभयतां निघोन गोडखिंडीस आले. ते खोपडेयाणी पाहून, तयार होऊन जाऊन, खेलोजी नाईक यास मारले. तसे बाजीनाईक यास मारावे, तों बाजी नाईक पळाले. त्याणी आपला जीव वाचविला. पुढे साहा चहू महिन्यानीं बाजीनाईक याने प्रेत्न करून आपल्या पाठराखा आ। १२ मेळऊन, दुधभाताची क्रीया शफत इमान बेलभंडार करून, करार मदार केला की, आगोंधर मुलेमाणसे थाऱ्यास ठेऊन, मग येऊन कामकाज करावे ऐसे बोलून, बारामुलवे व जेधे याणी मुलेमाणसे घेऊन धावडी-बंदरीस गेले. तेथें मुलेमाणसे ठेऊन त्यांचा साहा महिन्याची बेगमी करून तेथून निघाले, ते श्रीराइरेश्वरास येऊन राहिले. विचार करू लागले, पुढे कसें करावें ? खोपडे मारे केलियासिवाय आपला बंदोबस्त होत नाही ह्मणोन विचार करितात, तों दसवमाहला नाहवी याणी बातमी सांगितली की, खोपडियाचे लग्न मौजे

करनवडे येथे निचलाचे घरी आले आहे, तेथे जाऊन कामकाज करावे. ह्मणोन दसमाहला न्हावी व गोडवला यास बातमीस पा. त्याणी बातमी घेऊन आले. परंतु यास विश्वास पुरेना. तेव्हां दसमाहला व गोडवला याजबराबर हटकरी दिल्हा, करारीची बातमी घेऊन या. तेव्हा त्रिवर्गानी जाऊन पकी बातमी घेऊन आले. त्या समयास जाऊन कामकाज करावे ऐसा निश्चय होऊन जावे, तों पुढे आगोधर पाठिंबा केला, याचे समाधान करावे. ह्मणोन देशमुख याणी दुधभात व बेलभंडार याची क्रीया केली की, वतन साधले त्यांत निमे तुमचे बारामुलवे याचे व निमे आमचे जेधियाचे, यांत अंतर करूं नये, ऐसी क्रिया केली. ते समईचे बारामुलवे यांची नावनिसी बितपसिलः—

१ राऊत यास देशमुखाची प्रधानकी दिल्ही होती तो	१ कन्या
१ घोलप सांगवीकर	१ ढेकापा
१ कोढालकर	१ नाईक राभराव
१ गोडवला	१ खोचरा
१ पेटकर	१ मुहुकर
१ वाडकर	१ रोहमण
३ कारकून मंडली लोहकरे कुलकर्णी व सबनीस व देशपांडे परभू एकूण आ ॥ ३	६
९	

सदरहू असामी पंधरा याणी क्रियाशफत केली. त्याजवर लोकास देशमुख ह्मणो लागले की, निंचलाचे घरच्या लग्नावर चला. तेव्हां लोकानी आड घेतली की, आह्मांस कामे वांटून द्याल तरी आह्मी येतो; नाहीं तरी आह्मी येत नाही. तेव्हां बाजी नाईक बोलिले की, कोण कोण काय कामे करिता, तीं वांटून घ्या. तेव्हां पेटकर व लोहकरे व वाडकर याणीं खासे व राऊ सदरचे बसणार यास मारावे ह्मणोन करार केला, व गोडावला याणीं वोवर मारावी व रामाजी नाईक कोढालकर व राऊत व समस्त लोक याणीं मंडप व दरवाजा धरून जो कोणी येईल त्यास मारावे ऐसा करार करून, देशमुख व कृष्णाजी कोढालकर या उभयतास राइरेश्वरीं ठेऊन वरकड लोक उतरून करणवडास आले. तेथे ज्याप्रमाणे करार होता त्याप्रमाणे ज्याची त्याणी कार्यें करून गेले. निचलाचे घरचे लग्न खोपडियाचे मारले. साठ माणूस ठार केले. याप्रमाणे तसनस लग्नाची करून

राइरेश्वरास गेले. पुढें आठा पंधरा रोजांनीं मागतीं करणवडास येऊन श्रीहनुमंताचे गळां चिठी बांधली की, धावडी बंदरीचा पुंड आपली दाद लागत नाही, यास्तव आपण किलियाचे पाइरीवर सीर ठेविले आहे. आपण धणी आहेत. दाद दिल्ही पाहिजे. त्याजवरून किले रोहिडा येथील हकीम शेख आखू रोहिले होते. त्याणी प्रेत्न करू लागले की, धावडी बंदर कोठे आहे ? तिचा ठिकाण कसा लागतो ? मुलुक पुंडावामुळें उजाड जाला, याचा शोध केला पाहिजे. तेव्हां त्याणी प्रेत्न करून धावडीबंदरीस बाजी नाईक याचे व बारामुलवे याचे ठिकाण लाऊन, त्यास रोहिडियास आणून, शेख आखू रोहील्याणीं जेधे व खोपडे याचा मजकूर मनास आणून वतन जेधे व खोपडे यास वांटून दिल्हें. जेधे याजकडे भोर ता॥ च्यार गाव देशमुखीचे वतन दिल्हे. व खोपडे याजकडे उभवली ता॥ च्यार गाव देशमुखी वतन देऊन उभयतांची समजावीस केली. ते वेळेस गाव नावनिसी बितपसिलः–

जेधे याजकड ता। भोर येथील गाव सुमारे ४	खोपडियाकडे ता। उभवली येथील मुलचे गाव सुमार ४
१ मौजे सिरवली	१ मौजे वडगाव
१ मौजे नाव्ही	१ मौजे खानापूर
१ मौजे करणवडे	१ मौजे नेरे
१ मौजे चिखलगाव	१ मौजे पाले
४	४

सदरहू आठ गाव दोनी रोहिडखोरीं त्याची वाटणी येणेप्रो देशमुखीचे वतनाची जाली. त्याजवर कान्होजी बीन भानजी नाईक जेधे देशमुख याचे च्यार गाव मुलचे होते, त्याचे वीस गाव भोर ता।चे केले. ते समई देशमुख व देशपांडे व किल्याचे हकीम व गडकरी लोक व देशक व पाटील परवाडी समस्त मिळोन, मौजे सिरवलीच्या वडाखाली बसोन, च्यार गावचे वीस गाव केले. ते समई वीस गावांपैकी दोन गाव इसापत देशमुख याची व बारा मुलवे याची सेते मौजे कारी व मौजे आंबवड दोन गाव इसापत, त्यापैकी बारा मुलवे यास मौजे कारी दरोबस्त दिल्ही व मौजे आंबवड येथील इसापत देशमुख खुद्द याणी खावी. परंतु काही सेते व घर ठाणे मुलवियास दिल्ही आहेत. व गोडावला यास सेते व घर मौजे नाव्हीस दिल्हे आहे. याप्रो कान्होजी नाईक यास पुत्र सातजण होते. व कान्होजी नाईक ते तो किले रोहिडा येथून वरात जाली की, तुमचे माहालचे ऐवजी च्यार हजार टके पाठऊन देणे ह्मणोन

वरात घेऊन वरातदार आले. ते समई कान्होजी नाईक याणी वरात व वरातदार पाहून राग आला. तेव्हा नाइकानीं वरातदारास व हकीमास आईमाई जेरुबेटी करून वरात माघारी टाकिली. वरातदार निघोन किलियास गेले. किलेयाची श्वारी तयार होऊन आली. ते समई कानोजी नाईक व समस्त लोक मुलामाणसासुधा निघोन कारीस जाऊन राहिले. तेव्हा त्या जामीयास स्वारीचे बल चालेना. ह्मणोन स्वारी फिरोन किलेयास गेली. उपरांतिक आले. चौ रोजानी देखमुखाचे सातजण पुत्र व लोक मिलोन पत बांधोन किलेयास गेले. तेथे जाऊन ह्मणो लागले की, आह्मापासून तकसीर जाली. आपण धणी खावंद आहेत; तकसीर माफ केली पाहिजे. तेव्हा हकीम बोलिले की, तुह्मापासून काय तकसीर जाली? तुह्मी सिव्यागाळी केल्या व नानाप्रकारचे बोलिला की नाही? कसे जाले ते खरे सांगा. त्याजवर देशमुखाचे पुत्र साहजण याणीं साक्ष दिल्ही की, देशमुखानीं वरातदार यासच सिव्यागाळी दिल्या; परंतु हकीमास काही बोलिले नाहीत. ह्मणोन साक्ष दिल्ही. शेवटी सार पाहून, धाकटा नाईकजी नाईक यास पुसो लागले की, कसे जाले ते खरे सांग. तेव्हा नाइकजी नाईक बोलिले की, सत्य असेल ते मी सांगेन. साख चाकर परंतु आपण धणी हकीम ह्मणजे आमचे जमीदाराचे मायबाप. तेव्हा आईस सिवी दिल्ही. तिचा उचार माझे मुखे मी कसा करू? सर्वस्वे मायबाप धणी आहेत. सर्व अपराध माफ केले पो. ते समई हकीम तुष्ट होऊन मेहरबान जाले, आणि बोलिले कीं, सर्व वतनदारी व देशमुखी राखतां हाच राखील. जमीदारीस योग्य माणूस ह्मणोन वडिलापासी सिका होता तो घेऊन धाकटे नाईकजी नाईक याचे स्वाधीन केला. तेव्हांपासोन नाइकजी नाईक देशमुखी करू लागले. पुढे त्याचे वडील बंधू साहजण मिळोन नाइकजीस मारावयास जपो लागले. तेव्हा एके दिवसी साहा जणानीं मिळोन नाइकजी नाईक यास मारले. तेव्हां बारा मुलवे याणी मिळोन, समत करून, सोनजी व भिवजी नाईक जेधे यास मारावे. का की नाईकजीसारिखा माणूस याणी मारला. यास्तव समस्तानी मिळोन सोनजीस व भिवजीस मारावे ऐसा सर्वांचा मनोदय एक होऊन मसलत जाली. आणि रावतास ह्मणो लागले कीं, तुह्मी देशमुखाचे प्रधान, याजकरिता तुह्मी व आह्मी हे कार्य करावे. त्यास राऊत व घोलप ह्मणो लागले की आपण जेधे याजवर हात करणार नाहीं. ते समई सांगवीकर घोलप याचा गोत्रपुरुष जुन्नरदेसीं नांदत होता. त्याणे करार करून समस्त मुलवे मेळवून, सोनजीस व भिवजीस मारले. ते समई रावताची प्रधानकी काढून घोलपास दिल्ही. त्याजवर बारा मुलवे मिळोन हकिमाकडे गेले. नाईकजी नाईक मृत्य पावले. पुढे देशमुखी

कोणी करावी, सिका कोणापासी ठेवावा, त्याची आज्ञा करावी. ते वेळेस मुलवियास आज्ञा केली की, नाईकजीची स्त्री आनसावा आहे, तिणे करावी. आनसावा गरोदर पाच महीनियांची आहे. कदाचित परमेश्वराने कृपा केली, पुत्र जाला, तरी उतम. नाहीतर आनसावाचा जीव आहे तोपरियंत सिका देशमुखी आनसावा करील. ते समई पुढे चौ महिनीयानें आनसावा प्रसूत जाली. पुत्र जाला. तरी त्याचे नाव कानोजी नाईक ठेविलें. त्यास दाईपासी ठेऊन त्याची राखण मुलवियाणीं करून वाढविले. आनसावाचे चौकीस राऊत व घोलप दोघेजण होते. तशामध्ये कान्होजी नाईक याचे पुत्र सातजण, त्यापैकी तिघेजण मृत्य पावले. चोघेजण होते त्याणीं जपणीस लागोन वरसा सा महिन्यानीं याने आनसावा मारिली व तिची कुणबीण व कुणबीणीचे पोर ऐसी तिघे जण मारिली. त्याच्या ध्यानांत काय की, आनसावा व कुणबीण व आनसावाचा पुत्र ऐसी तिघेजणे मारली. ऐसे समजोन राहिले. पुढे आनसावा मृत्य पावल्याने तर दिवाणाची बेमर्जी जाली की, तुह्मी इतबारी लोक, राऊत व घोलप याणी जाबसाल केला कीं वादीयानीं मारली. यास उपाय काय? त्यावरून हकीमानी रावताची जमीन सेत व घोलपाची जमीन सेत होती ती खालीसाखाली घातली. ते वेळेस कानोजी नाईक तावेस पासलकराजवळ होता. त्याचे खसमतीस दस माहला नाह्वी, बाजीराव पासलकर याची कन्या सावित्रीबाई होती ती वधू पाहून लग्न केले. तेरावे वर्शी कारीस आले. पुढे देशमुखीचा हकलाजिमा घेऊन सिका रोखा करू लागले. ते समई समस्त लोकानीं अर्ज केला की, दस माहला याणें आपली खसमत बहुत केली, यांस काही बक्षीस दिल्हे पाहिजे. त्याजवरून दस माहला नाह्वी यास नाईक मेहरबान होऊन, मौजे आंबवडे इसापतीचा गाव त्यास सेत बक्षीस दिल्हे. त्याजवर कृष्णाजी नाइकजी बांदल याणी येऊन, पुंडावे करून हिरडस मावल येथे खून मारे करून, आह्मासी सिवे निमित्य व दाइत्या निमित्य कटकट करून जुंझो लागले. ते समई कृष्णाजी नाईक बांदल याची स्त्री दिपावा याच्या पायात बेडी घालून ठेविली होती. आपण जुंझांत जात होते. तेव्हा कृष्णाजी नाईक साहवे जुंज दिल्हे. परंतु बांदलास येश प्राप्त जाले नाही. पुढे अणिकहि जुंझावयाची मसलत करू लागले. तेव्हा कडतोपंताचे वडील होते. त्यास विचारले की आह्मी साहा वेळ जेधियास जुंझास गेलो, परंतु जेध्याचा मोड जाला नाही. पुढे कसे करावे, ते सांगणे. तेव्हा कडतोपंताचे वडील बोलिले की, दिपावाच्या पायांत बेडी घालून तुह्मी ठेविली तोपर्यंत तुह्मास यश येत नाही. तुह्मी दिपावाची बेडी तोडून सन्मान करणे. दिपावानी तुह्मास व सर्व लोकास वोवाळून लोकास आशीर्वाद दिल्हा ह्मणजे

तुह्मास यश येईल. तेव्हा कृष्णाजी नाईक बांदल बोलिले की, तुह्मी सांगितले त्याप्रमाणे करितो. परंतु सांगितल्याप्रमाणे घडेना तरी कसें करावें? तेव्हा कडतोपंताचे वडील बोलिले. यांत खोटे जाले तरी आह्मास शासन करावे, ऐसे बोलिले. त्याजवरून कृष्णा नाईक याणी दिपावाचे पायाची बेडी काढून, न्हाऊ घालून, पाटाव नेसावयास दिल्हा. दिपावा याणी पाटाव नेसोन, हाती पंचार्ती घेऊन नाइकास ओवाळिले, व सर्व लोकास बोवाळून आसिर्वाद दिल्हा की, तुह्मी जुंझास जाणे. तुह्मास येश येईल. परंतु तुह्मी निरापार न जाणे. निरेचे अलिकडेच जुंझावे. ऐसी दिपावाची आज्ञा घेऊन, कृष्णाजी नाईक बांदल याणीं सर्व लोक जमा करून कासारींखिडीस रणखांब रोऊन, जुंझावयास सोमवारचा करार केला. समागमे साडेबारासे लोक घेऊन कासारखिंडीस आले. ते समंई जेधे याणींहि आपले सर्व लोक सातसे माणूस जमा करून रणखांबाजवळ आले. तेथे जेधे बांदल यांचे युद्ध जाले. त्या युद्धांत जेधे याकडील लोक पडले. त्यांचीं नावनिसी तपसीलवार येणेंप्रमाणें:—

१ राघोजी कोढा व त्याचे साहजण भाऊ जमावासुधा पडले.

१ लुखजी नाईक पेटकर खासे असामी ३ व लोक जमावासुधा पडले.

१ अंतोजी लोहकर व त्याचे भा(ऊ) जमावासुधा पडले.

१ ढवले असामी खास नागोजी व जिवाजी व रायाजी व दसरोजी जमावासुधा पडला.

१ रामजी व पिलाजी तुपा जमावासुधा पडले.

१ वरकड लोक आपलाले जमावासुधा झाडून पडले.

६

१ राजजी सणस जमावासुधा पडले.

१ सिदाजी व बालो राऊत देशमुखाचे प्रधान जमावासुधा पडले.

१ धारराव घोलप नाइकाजवळ सेवेचे बाजेस पळसाचे झाडाखाली बसविले, सबब त्याचे कोण्हीही पडले नाही.

१ दस नाहवी यांस जखमा लागोन जेर आला. तो बांदलानी नेला. जखमा बऱ्या करून लावून दिल्हे.

४

येणेंप्रमाणें लोकांची जुंझांत घरे बुडालीं. गणिती करिता तिनसे माणूस ठार पडले. येके दिवसी तिनसे मुडदे जाले असेत. त्यास जाळावयास घरे मोडून जाती जाती लोक येके जागा जमा करून जाळले. तेव्हापासून जेधे व बांदल यांची

कटकट वारली. बांदलानीं कजिया सोडिला. सेवेचा व दाईत याचा कजिया साध्य जाला नाही. दाईत दिल्हे नाही. कलम १

भोर तर्फेचे मुळचे चार गाव त्याचे वीस जाले. नावनिसी बितपसिल:–

१ का। भोर	१ चिखलावडे
१ जानवले	१ न्हावी
१ वेन्हवडी	१ कारनीट
१ पामरडी	१ पानवाल
१ सिरवली	१ अंबवडे
१ अंबेघर	१ करनवडे
१ कारी	१ रावडी
१ म्हाकोसी	१ तिटेघर
१ वावघर	१ कारले
१ चिखलगाव	१ वडतोबी''

लेखांक २.

श्री.

"करीना ब॥ बावाजी झुंझारराऊ बि॥ नारायणजी झुंझारराऊ मरल देशमुख त॥ कानदखोरे सु॥ खमसैन मया अलफ कारणे करीना व वंशावली लेहून दिल्ही ऐसीजे:– जिवाजी बि॥ तुलबाजी नाईक मरल त॥ मजकूर वृत्तीच्या देशमुखीच्या विभागाकरिता आपणासी कजिया सांगतो जे, आपण तुमचा भाऊ, आणि आपणास वाटा विभागाप्रमाणें वाटा दिल्हा नाहीं, ह्मणोन हुजुर फिर्याद जाला आहे. त्यावरून आपणास हुजूर सातारियाच्या मुकामास बोलाऊन आणून आज्ञा केली जे, जिवाजी नाईक ह्मणतो की तुह्मी वृत्तीच्या विभागाचा वाटा यथास्थित विभागाप्रमाणें दिल्हा नाही, ऐसे ह्मणतो. त्यास हा तुमचे वंसीचा नव्हे. याचा करीना व तुमची वंशावली मूळ पुरुष तुमचा कोण, मूळी देशमुखी कोणत्यानें केली, त्यांपासून वंशावली लेहून देणे ह्मणून आज्ञा केली. ऐसियास जिवाजी मरळ आपले वंसीचा नव्हे. जातीचा मरल आहे. परंतु आपले वंशावलींत नाही त्याजला मौजे दापोडे देशमुखीचा गाव आपल्या वडिलानीं दिल्हा आहे. त्याचा करीना व आपली वंशावली ऐसी असे. आपला मूळ पुरुष रघनाक मरळ देशमुख त्यास पुत्र ३ नावनिसी बि॥:—

१ वडिल परसनाक मरळ देशमुख
१ दुसरा कमलनाक मरळ
१ तिसरा तुकनाक मरळ
३

यासी दुसरा कमलनाक मरळ त्यास संतान नाही दोघांचा वंश आहे बि॥

वडिल परसनाक मरळ देशमुख यांचे पुत्र बाबाजी जुंझारराऊ मरळ एकलाच उरला. याचा मजकूर हकिकतींत येईल. बाबाजीराऊ यास पुत्र कानोजी जुंझारराऊ एक. दुसरा नाहीं. १

तुकनाक मरळ तिसरा याचा वंश कानदकर मरळ त्याचा वंश आहे. १

कानोजी जुंझारराऊ मरळ वडिल देशमुख त्यासी पुत्र ३ त्यांची संतती:—

वडिल बाबाजी जुंझारराऊ त्यासी पुत्र ४ बि॥ नावनिसी

१ वडिल कानोजी जुंझारराऊ.

१ दुसरा बाजीराऊ.

१ तिसरा बहादुरजी राऊ.

दुसरा रायाजी राऊ त्यास पुत्र १ एक अबाजीराऊ. यासी संतान नाही.

तिसरा मलोजी पतंगराऊ ह्मणवीत होते. त्यासी पुत्र १ शाहाजीराऊ देशावरी गेले. त्यास पुत्र किती आहेत कळत नाहीत. १.

वडिल बाबाजी जुंझारराऊ यासी पुत्र ४. त्याचा विस्तार त्याचा झाडा येणेप्रमाणे असे.

वडिल कानोजी जुंझारराऊ यासी पुत्र ३ तिघे.

१ वडिल शंकरराऊ.

१ दुसरे नारायणजीराऊ.

१ तिसरे यसवंतराऊ.

३

कानोजी जुंझारराऊ याचे पुत्र सदरहू तिघे. त्याची न॥ वडिल शंकरराऊ हे, मोगलाई जाली तेव्हां मोगलाचे ठाणे क॥ खेड त॥ खेडबोर येथे मोगल होता, त्याचा कौल त॥ मजकुरास घेतला जे, सारी मोगलाई जाली, कोठे जावयास जागा नाही. ह्मणून कौल घेतला होता. याजकरिता मोगलाने देशमुख पाटील ऐसे वोलीस ठेविले होते, तेथे वोलीस होते. तेथेच मेले. व तिसरे यसवंतराऊ आपमृत्य मेले. एकूण दोघांचे संतान नाही. नारायणजी जुंझारराऊ एकलेच राहिले. त्यासी पुत्र ३ हाली आहेत

१ वडिल बाबाजी जुंझारराऊ

१ दुसरे यसवंतराऊ

१ तिसरे कानोजीराऊ

३

दुसरे बाजीराऊ याचे पुत्र सूर्याराऊ. याचे पुत्र दोघे हाली असेत.

१ वडील मल्हारराऊ.

१ दुसरे यादवराऊ.

१ तिसरे मोरोजीराऊ.

१ चौथे शाहाजीराऊ.

४

चौथा भानजीराऊ. त्यास पुत्र एक वेंकटराऊ. देशावरी आहेत १

एणेंप्रमाणें आपली वंशावल. वरकड मरळ आहेत परंतु आपले वंसीचे नव्हत. कितेक सिपाईपणा करून होते. त्यामधे जिवाजी नाईक मरळ आपले वंसीचा ह्मणून देशमुखीच्या वृत्तीच्या वाटियाचा कजिया सांगतो. त्यास त्याचा वडिल बाजीनाईक मरळ आपल्या वडिलास कार्यास आले. व सूर्याजी नाईक व मालोजी नाईक मरळ ऐसे तिघेहि कामकाजास आले. त्याचा मजकूरः— मुकनाक मरळ आपला तक्षीमदार कानदकर हा, बेदरास तांत्राकडे ता। मजकूरच्या कारभारास परसनाक मरळ देशमुख आमचे वडील सिकियाचे खावंद याणीं पाठविला होता तेथून तो आलियावरि तोच बळावला. परसनाक मरळ आपले वडिल होते. ते मृत्ये पावले. त्यावरि त्याची स्त्री पुतलावा होती. ती गरोदर होती. वडील पुत्र बावाजी जुंझारराऊ वडिल व दुसरा पुत्र त्याजहून लाहान होता. ऐसे दोघे पुत्र होते. त्यास कानदकर मरळ याणीं त्या तिघास मारावे, आणि देशमुखी आपणच करावी ह्मणून विचार केला. आणि गोंधळ आपले घरी आहे ऐसे निमित्य करून, त्या तिघास धानेबास येऊन, तिघासहि वाडियांतून काढून, मार्गावरी वाघवळावीर धानेबांत आहे तेथे आणून, तुलबाजीराऊ याहून लाहाण होता तो व पुतलाई आवा ऐसी दोघे मारिली. त्या दोघावरी गजर जाली. तेव्हा बावाजी-राऊ पळाले. ते श्रीच्या देवळामागें रान उढियाचे होते व गाठीयाचे गवत दाट होते, त्यामधे जाऊन दडाले. पुतलाईआवा व धाकटा पुत्र लाहान होता, तो मारिला. बावाजीराऊ याचा तलास त्याणीं केला, परंतु ते सापडले नाहीत. मग कानदकर मरळ इतके काम करून माघारे कानदास परतोन गेले. पुतलाई आवा व मूल कानदकर मरळ याणी मारिली, ऐसी खबर होनाजी सेडकर यास कळली. तो आसविशई नातलग होता. त्याजकरिता खबरीस तिसरे दिवसी आला. तो पुतलाई आवा व एक मूल मारिला, एक रानात पळोन गेला, ऐसे वर्तमान तह-कीक जाले. त्यावरून तो त्या रानांत जाऊन मी होनाजी सेडकर आलो आहे, कोठे असलास तरी मजपासी येणे ह्मणून बोलिला. मग बावाजीराऊ याणी जाब

वोळखिला ह्मणून त्यांजपासी आले. त्यास घेऊन होनाजी सेडकर गेला. मग जतन कैसा होईल ऐसा विचार पडिला. हे नायकाचे मूल, त्यामधे दावेदार जपणीस लागले आहेत, हे काही आपणास जतन होत नाही. जे नाईक याचे बरोबरीचे असतील तेथे जतन होईल. तरी यासी पासलकर याजपासी नेऊन त्याचे हवाला करावे. ते जोरावर आहेत ते जतन करितील. ह्मणून बावाजी राऊ यास घेऊन निवगणी याकडे मौजे आंबी ता। मोसेखोरे येथें गेला. तेथूनहि तोवेस पासलकराकडे घेऊन गेले. तेथें त्याच्या हवाला बाबाजीराऊ केले. ते जाणते जालियावरी होनाजी सेडकर यासी बोलाऊन नेले, आणि त्यास विचारलें की आमची गत ऐसी जाली, पुढें कैसें करावें, ऐसे त्यास पुसिलें. त्याणी सांगितले कीं तुमचे सिपाई व आणखी उदंड मांग राहिले आहेत. परंतु तुमचें साहित्य पासलकर देशमुख ता। मोसेखोरे याची पाठी आहे. हेहि तुमची मदत करितील. आणि बाजी नाईक मरळ व सूर्याजी नाईक मरळ व मालोजी नाईक मरळ हे तिघे हाताखाले गवसून कार्य करावे. त्यांच्या हातून कार्यसिद्धि होईल. आपणहि साहित्य करून. परंतु त्या तिघास हातीं धरिलें पाहिजे ह्मणोन. ऐसे होनाजीं सेडकर याणे बाबाजीराव यास सांगितले. त्या तिघांचा तलास होनाजी सेडकर याच्या हातून केला, आणि त्यास घेऊन होनाजी सेडकर बाबाजीरायापासीं गेले. त्याचें व बाबाजीराव याचें इमान जाले जे, आपण देशमुखी करूं लागलियावरी तुह्मां तिघास तीन गाव देईन. ऐसी बोली जाली. त्यावरी सेडकर याजपासी घोडी होती त्याचे राऊत व बाजीनाईक मरळ व सूर्याजी नाईक मरळ व मालोजी नाईक मरळ ऐसे त्याखेरीज जमाव करून कानदकरावरी आले. त्यासी त्याचे पारपत्य जे प्रकारें कानदकर मरळ याणी काम केले होते, ते रीतीने त्याचेहि काम केले. जे सापडले त्यास मारिले. ऐसे काम त्या तिघांच्या हातून केले. बाबाजी झुंझारराऊ आपल्या वतनावरी येऊन देशमुखी करावयास लागले. मग मालोजी मरळ यासी वेले बु॥ येथील पाटीलकी दिल्ही व मौजे राजणे नीम सूर्याजी मरळ यास दिल्हे होते. बाजी नाईक मरळ यासी मौजे दापोडे येथील देशमुखीचा हक निमे दिल्हा होता. सेडकर कामास आले. त्यास मौजे दापोडे येथील पाटिलकी दिल्ही. पहिले कारले पाटील होतें. त्याची पाटीलकी सेडेकरास दिल्ही. पुढे बाबाजीराऊ होते तोवरी जे या तिघास दिल्हे होते, ते तिघेहि खाऊन होते. त्यास बाबाजीराऊ हे मेलियावरी कानोजी झुंझारराऊ देशमुखी करू लागले. तेसमई बाजी नाईक व सूर्याजी नाईक मरळ ऐसे दोघे रुसवा करून, किले पुरंधरास राजश्री नरसिंगराऊ होते त्याजकडे गेले. त्याणी राजश्री भानजीपंत पाठविले की, बाजी

नाईक व सूर्याजी नाईक मरळ आह्माकडे तुह्मावरी रुसवा करून आले आहेत. त्यासी बाजी मरळ मौजे दापोडे तो गाव देशमुखीचा आवघाच मागतो. तोच गांव जरी बाजी नाईक यास मौजे दापोडे येथील देशमुखी आवघी घाल तरी याची समजावीस करून. ऐसी बोली भानजीपंत याणी कानोजी जुंझारराऊ यासी केली. यावरून कानोजी जुंझारराऊ मरळ याणी भानजीपंत याच्या बराबरी पाटील वतनदार पुरंधरास पाठविले होते बि ॥ ना ॥

मालोजी चरघा मोकदम मौजे कोलवडी १

पाकोजी सेडकर मोकदम मौजे दापोडे १

परसोजी देवगीरकर चौगुला मौजे विझर १

लिखजी लिह्मण मोकदम मौजे विंझर १

लखजी सेडकर मोकदम मौजे मालवली १

जमानी बीन सेख भाई तुरसदाज मुसलमान १

एकूण साहाजणें त्याच्या सांगाते दिल्ही. त्यासी भानजीपंत घेऊन किले पुरंधरास गेले. ते व अवघे हुजीरमजालसीस बसले होते. त्या हुजूर बाजी मरळ यासी समजावीस करून त्यास दापोडे येथील देशमुखीचा महजर करून दिल्हा. सु ॥ सबा अशर अलफ बतारीख ११ जिल्हेज मुकाम किले पुरंधर हुजीरमजालसी बि ॥ नांवनिसीः—

राजश्री माहादजी जाधवराव नामजाद किले मजकूर

भानजी बनखस मुतालिक राजश्री नरसिंगराव

आपाजी फरजंद बि ॥ मल्हारजी देशमुख प्र ॥ सिरवल १

यसवंतराऊ अटगावकर खोत ता॥ सिवतरखोरे

कानोजी जेधे देशमुख ता॥ भोर ता॥ रोहिडा

यमाजी मोकदम मौजे पुणे प्र॥ पुणे

बाबसेट सेटिया पेठ मुर्तजाबाद ता॥ किले मजकूर नि॥ तागडी १

राजश्री हाणवंतराऊ हरकारी किले मजकूर

तमाजी अनंत मु॥ लबे बहीरदेव १

तुलाजी व जाखोजी देशमुख त॥ खेडेबारे

बाजी हैबतराऊ देशमुख त॥ गुंजण मावळ प्र॥ मुरूमदेव

नरसोजी खोपडे देशमुख त॥ अत्रोली त॥ रोहिडा

आबाजी बांदल मोकदम मौजे अलंदे त॥ हिरडस मावळ

कडदसेट बाधा महाजन पेठ मुर्तजाबाद त॥ किले मजकूर नि॥ तागडी १

सदरहूप्रमाणें गोत व ता॥ मजकूरचे पाटील चौगुले सदरहू सहाजण तेथे गेले होते. त्यांचे साक्षीने बाजीनाईक मरळ यासी दापोडे येथील देशमुखीचा महजर करून दिल्हा आहे. त्याप्रमाणे अजी ता॥ खात आले आहेत. व सूर्याजी नाईक मरळ यासी मौजे राजणेस मळा व गाव दिल्हा व मालोजी मरळ यासहि मौजे वेले बु॥ पाटीलकी व देशमुखी देखील गाव त्यास दिल्हा. ऐसी तिघाची समजावीस केली व आणखी बाराजण सिपाई होते त्यास घर सेत मौजे धानेबांत आहे ते दिल्हे. वरकड रजपूत होते त्यांसहि सेत धानेबांत दिल्हे जे कामकाजास आले त्यास देऊन समजावीस केली. जिवाजी नाईक मरळ याचा काही वडील आपले वंसीचे नव्हे. त्याच्या वडिलानीं कट मेहनत केली. आपल्या वडिलास कार्यास आला. याजकरिता त्याजला गाव त्याच्या वडिलानीं मागितला होता. तोच गाव त्यास दिल्हा. ऐसा जिवाजी मरळ याचा मजकूर आहे. आपले वंसीचा नव्हे हे खरे. आपणावरी वतनामुळे नागवणा पडिला. कानदकर मरळ याणी बलवंतराऊ कोकाटे किले प्रचंडगड होते, त्याजपासी फ़िर्याद होऊन, त्यासी सांगोन, कानोजी जुंझारराऊ याची स्त्री अबई आवा त्यास गडावरी नेऊन, त्याजपासून खुर्दा टके १२०० बारासे टके घेतले. त्याचे हाल इजारेंत इंचू घालून देशमुखी मुळें विपत्य करून, सदरहू बारासे टके नागवण घेतली. त्यावरी महाराज राजश्री सिवाजी महाराज छत्रपति स्वामी सिंहासनारूढ जाले. तेसमई तमाम आवघा महालोमहालच्या वतनदारावरी सिंहासनपटी घातली. तेवेळेस आपणावरी होन १००० एक हजार होनं पटी घातली. याखेरीज मिरासपट्या त्याहि दिल्हे. त्यावरी कानदकर मरळ, महाराज राजश्री कैलासवासी थोरले महाराजस्वामी यासी उभे राहिले, आणि देशमुखीच्या विभागाचा व खुनाचा आमच्या वडिलासी कजिया सांगो लागले. त्यास महाराज राजश्री छत्रपति स्वामीनी कानदकराची व आपली मनसुबी राजश्री अनाजी पंडित यांजकडे दिल्ही. त्याणी कानदकर याचा व आमचा इनसाफ पाहिला. त्यास कानदकर मरळ याणी आमचे खून केले ते गैर केले ह्मणून त्याजला नशहात करून त्याजला एक गाव देवऊन त्याचा आमचा कजिया तोडिला. तेथे अमच्या वडिलास हरखी पडिली. तोहि टका आमच्या वडिलानीं दिल्हा. त्यावरी हजरत अवरंगशाहा पातशाहा याची चाली दक्षणेंवरी जाली. तेसमई किले सिंहगड व राजगड प्रचंडगड ऐसे मोगलानीं घेतले. आपले आजे कानोजी जुंझारराऊ कबिला घेऊन कोकण प्रां। गेले. ताामजकूरचे पाटील व जावजी सेडकर व सोनजी कोढीतकर व आणखी पाटील रयेत देखील वनखल तपियांत हातनली तर्फ

प्रा मौजे निंगडोलीस जाऊन राहिले. पदरीं काही नाही आणि कुटुंब भारी. अन्नाचा मजकूर येऊन पडिला. ते वेळेस हि तुलबाजी नाईक मरळ जिवाजी नाईक मरळ याचे बाप तो हि तेथे होता. त्याचा भाऊ रामाजी नाईक कल्याण प्रा भिवडी नि॥ सोनाल तपियात पहिलाच नांदत होता. त्याणे काही आमच्या वडिलाचा परामृष थोडा बहुत केला. ह्मणून जावजी सेडकर पाटील दापोडे व सोनजी कोढीतकर पाटिल हरपोडी याणी मधेस्ती करून, तुलबाजी नाईक व रामाजी नाईक मरळ यासी लासीरगाव देविला. त्याचे खरेदीखत करून द्यावे त्यास सेरणी पडेल, ह्मणून आपले आजे कानोजी जुंझारराऊ यासी जावजी सेडकर व सोनजी कोढीतकर याणी कितेक विचारें समजाऊन, याची सरपोसी करणे ह्मणून बोली करून, तुलबाजी नाईक यासी लासीरगावचा कागद करून दिल्हा. त्यामधे लेहविले जे, तुझा आजा बाजी नाईक व आपले आजे कानोजी जुंझारराऊ ऐसे साक्षात भाऊ ह्मणून लेहून दिल्हा आहे. अजीतागाईत त्याची फुटी पडो दिल्ही नाही. लासीरगाव जिवाजी मरळ याच्या वडिलास दिल्हे, परंतु काही त्याच्या वडिलास खरेदीखत करून दिल्हे नाही. गाव त्या तागाईत खात आहेत. त्यास जिवाजी नाईक त्याच्या वडिलानीं रास्ती टका देऊन, गावचे खरेदीखत करून आमच्या वडिलापासून घेतले नाही. ऐसे असोन त्याने गांव खादला आहे इतकेहि त्याचे चालविले. परंतु तो कजिया करावयास उठिला. आह्मी काही आपल्यापासून अंतर पडो दिल्हे नाही. आता निदानची गोष्टी तो काही आपले वंसीचा नव्हे. त्याणे काही अजीतागाईत नागवण अगर वतनावरी टका पडिला त्याची तक्षीम दिल्ही असेल, त्याचा कागदपत्र त्याजपासी दिवाणचा अगर आमच्या वडिलाचा असेल, तो त्याणी काढावा. त्यासी नागवणा व खंड पडले. सदरहू पहिले व त्या अलिकडे शामलाने आपले आजे व आपणास कबिला देखील धरून राजपुरीस गेले होते, त्याची खंड खुद जातीचा व जमानगती व खर्च अंतस्त देखील रुपये ७००० सात हजार पडले. व हाबसी याचे वरातदार व स्वारीया येऊन बैसत होत्या. त्यास पोटखर्च गला कैली खंडी ४० चाळीस खंडी लागला. कानोजी जुंझारराऊ राजपुरीस बंदांत सा महिने होते. त्याणीं सा महिने बंद बोढिले. ते तेथेच मरावे, परंतु वतनावरी जीव सांडावा हा हेत त्याचा; ह्मणून निकड करून केवळ मढें ऐसेच ह्मणून उचलून आणिले. घानेबीं आलियावरी ते मेले. तिसरा दिवस गेला नाहीं. जे दिवसी वतनावरी आले त्याचे दुसरे दिवसी मेले. व शंकरराऊ आपले वडील चुलते क॥ खेड ता॥ खेडेबारे येथे मोगलाच्या बंदांत मेले. ऐसे कितेक खून खराबी व पैका टका पडिला सिंहासनपटी व मागे

टका पडला. तेव्हा गोडसे ह्मणून सावकार होते त्याजपासून दोन हजार घेऊन दिल्हे होते. ते अजीपावेतो आपण व्याज देखील फेडिले. ऐसी बहुत खराबी जाली आहे. टका उदंड पडिला. त्यास जिवाजी नाईक याणे अगर त्याच्या वडिलानीं अजी तागाईत एक गाव खात आहेत. याजवरी तक्षीम पडली. त्यामधे एक रुपया अथवा एक पैसा तोहि दिल्हा नाही, आणि वृत्ती खात आहेत. आपल्या वडिला ता॥ टका पैका पडला व आपले खून जाले आहेत. ऐसी खराबी या वतनाकरिता जाली. ऐसी हकीकत असोन, आपणासी जिवाजी मरळ याचे वडील पूर्वज बाजी नाईक मरळ कामाकाजास आला ह्मणून भाऊ मानिला होता. त्याजला आपले वडिल बावाजीराऊ याचे पुत्र थोरले कानोजी जुंझार बाजी काका ऐसे जिवाजी नाईकाच्या वडिलास ह्मणत होते. ऐसे त्याचे दाखले आहेत. कानोजी जुंझारराऊ याणीहि मालुमातीचा कागद लासीरगावचा लेहून दिल्हा आहे. त्यामधे साक्षात भाऊ आपले आजीयाचे भाऊ ह्मणोन लिहिले आहे. परंतु बाजी नाईक मरळ काही आपले वंसीचा नव्हे, हे गोष्टी खरी असे. त्याच्या वडिलास आपल्या वडिलानी प्रगणियांत मातबर गाव सरस होता तो दिल्हा असे. हे गोष्टी दाखलियानसी खरी करून देऊन. अवघे गोष्टीची गोष्टी जिवाजी नाईक मरळ हा काही आमचा नव्हे. आपली वंशावळी सदरहू लिहिली असे. त्यामध्यें जिवाजी नाईक मरळ याचे वडील बाजी नाईक मरळ याचा दाखला आपले वंशावळींत नाही. सार गोष्टीची गोष्टी जिवाजी नाईक मरळ आपणासी कथला वृतीविभागाचा करितो. परंतु तो आपले वंसीचा नव्हे, हे खेरे लिहिलें. सही."

लेखांक ३.

श्री.

"करीणा राजश्री बावाजी जुंझारराव देशमुख तर्फ कानदखोरे करिणा ऐसाजेः—जिवाजी बीन तुळबाजी मरळ याचा वडील मूळ पुरुष बाजी मरळ. यासी आपले वडिल राजश्री बावाजी जुंझारराऊ यानी बाजी मरळास मौजे दापोडे येथील हाक नेमून दिल्हा होता, तो बाजी मरळ खात होते. यास तपसिल कणसारा अडिच टके व माहाल तूप गाव खंडी गला व उडिद कोहल कणसारा येणेप्रमाणे थोरले राव यांचे कारकिर्दीस चालत होते. त्याउपर बाजी मरळ रुसनुका करून, पुरंधरास जाऊन राजश्री नरसिंगराव साहेब पेशवे याचे मुतालिक राजश्री भानजीपंत हे राजश्री कान्होजी जुंझारराव देशमुख याजवळ येऊन वर्तमान विदित केले कीं, "बाजी दापोडाचा हाक मागतात. तो द्याल तर त्यास समजाऊन आणून

विलाइतीचा बंद राहील" ऐसे वर्तमान सांगितले. त्याउपर कबूल करून, जाचती नवे नगद टके ऐसी व गाव खेडी व माहार तकसीम दापोडे पावणेसात सेकार ऐसे देऊन, समजावीस माहाल व पर माहाल याचे इदमाने समजावीस करून, बाजी मरळ पुरंधरीहून समजावीस करून, मौजे दापोडे येथे येऊन राहोन, तेथील हक लाजमा खाऊन होते. त्याउपर करकशा काही जाला नाही. मग राजश्री कान्होजी जुंझारराव आपले आजे यानी तुळबाजी मरळ येकत्र चालू लागले. त्याजवर मौजे दापोडे येथे आपला खासा इनाम होता, तो त्यास साठी रुपयासी दिल्हा. त्याउपर अवरंगशाहा पातशाहा हे स्वार होऊन या प्रांते येऊन, देश दुर्गे आक्रमण करून, राजगड प्रचंडगड व सिंहगड घेतले. आपल्या वडिलास राहावयासी जागा नाही. मग कोकण प्रांते आपले आजे व तीर्थरूप ऐसे निघोनि मौजे निगडौली ता। वनखल येथे कबिलासुद्धा राहिले. त्यास मौजे नादेटन तर्फ सोनाले येथे येसजी बीन जिवाजी नाईक व रामाजी बीन बाळाजी नाईक व सिवजी बीन आबाजी नाईक मौजे दापोडे तेथे होते. तेव्हा तेथून आमचे आजे कान्होजी बावा याचे भेटीस आले. भेट जालिया उपर मौजे निगडवलीचे मुकामी काही खर्चावयाची बेगमी नव्हती. मग यानी बेगमी केली ह्मणोन यासी मौजे लासिरगाऊ तेथील हाक दिल्हा. ते समई यानी भाऊपणीयाचा करकशा केला नाही. मग आपले वडील व त्याचे वडील माहाराज छत्रपति शाहूस्वामी तांब्रारातून स्वार होऊन दक्षण देशास आले. मुलकास कौल जाले. त्या उपरांतिक आपले वडिल व याचे वडिल कबिले घेऊन माहालासी आले. माहालासी येऊन राहिले तेच वरसी शामळानें पाळत करून, आपले आजे कान्होजी बावा व कबिला देखील धरून, भाद्रपद मासीं दंडाराजपुरी इथें सा महिने बंदी ठेविले. त्या उपरातिक दंड करून माथा ठेविला. मग माघ वद्य त्रयोदसी सिवरात्र करावयासी माहालासी पैवस्ती जाली. मग आपल्या आज्याचें वृद्धपण व बंदी राहून शरीरास हागवण प्राप्त जाली होती. तेसमई अंतकाल व्होऊं लागला, मग तुळबाजी मरळ यासी व आपले तीर्थरूप राजश्री नारायणजीबावा यासी आज्ञा केली की, आपला अंतकाल आहे. नारायणजीचे पाठीसी कोण्ही नाही. याकरिता तू शाहाणा माणूस ह्मणोन तुझे हातीं दिल्हे. एकमते चालत जाणे ह्मणोन तुळबाजीस आज्ञा केली. त्यावरून तुळबाजीने क्रिया केली की, नारायणजी जुंझारराव यासी एकमतें एकविचारें चालत जाऊ. ह्मणून श्रीधानेश्वराची क्रिया केली. मग दाहा वीस वरसे सुधामत चालिले. क्रिया केली तिचे विप्रयास

दाखविले नाही. त्यास जे गाव २ दिल्हे ते व दापोडाचा इनाम ऐसे खाऊन सुखे होते. तेथे कोणे गोष्टीची इसकिल नव्हती. भोग भोगवटा त्याचा त्याजकडे चालत आहे. आपणहि त्यासी व आपल्या वडिलाहीं त्यासी काही विक्षोप केला नाही. सलामत चालिले ऐसे असोन आपणापासून अंतर पडले नाही. त्यासी महाराज शाहू छत्रपतिस्वामीनीं राजश्री फत्तेसिंगबावा भोसले व राजश्री बाजीरावपंत प्रधन यांची मोहीम दंडाराजपुरीकडे केली. त्याबराबर किलों किलाचे लोक व सरदार रवाना केले. त्यास किले प्रचंडगड येथील लोक व खंडो-मल्हार नामजाद हे ऐसे राजश्री आनंदराव बहिरव यांबराबर राजश्री सचीवपंत यांनी देऊन रवानगी केली. तेसमई खंडो मल्हार खासनीस किला अंमल करीत होते. त्यासी तुळबाजी मरळ याने अनुसंदान लाविलें कीं, आपल्यास चाकरीचुकरीचा कसाला पडतो, तर तुह्मी आनंदराव बहिरव यासी बोली करून आह्मास इनाम होये ऐसे केले पाहिजे. मग या गोष्टीच्या विचारणांत पडोन रदबदल करू लागले. ते गोष्ट काही आपणास विदित नाही. शामळ मोडून हस्तगस्त राज्य जाले. मग रायगडास माहाराजाचें निशाण गेलें. तेसमई मागती फिरोन सिदी सात हाफसी बळाऊन रायगडास वेढा घातला. त्याउपर माहाराजानीं अवकाट फौजास हुकूम केला. मग सहवर्तमान लस्करें उतरोन कोकण प्रांते जाऊन रायगडाचा वेढा मारून काढिला. पाचाडचा कोट राजश्री सचीवपंत याकडे जाला. तेथे राजश्री आनंदराव बहिरव लोक व सरदार घेऊन बंदोबस्तीस राहिले. ते प्रसंगीं किले प्रचंडगडचे लोक व सरदार व तुळबाजी मरळ याचे लोक ऐसे व खंडो मल्हार नामजाद ऐसे होते. त्याउपर मागती बोली घातली की, आपण पूर्वी अर्ज केला तो सिद्धीस न्यावा. त्यावरून खंडो मल्हार यानीं अगत्य धरून अडचा खंडी रकमेचा गाव करून दिल्हा. मग हे वर्तमान आपणास कळलें. कांहीं उपाय नाहीं. आपले खासनीस खंडो मल्हार यानी ये गोष्टीचा पशेत करावा तो न केला. आपल्यास कोण्ही पुसले नाही. ऐसी वर्तमान परस्परे कळो आलें. मग तीर्थरूप नारायणजीबावा यासी विचारिले की, हे गोष्ट आपण ऐकिली की? गाव तुळबाजी मरळ करून घेतो हे गोष्टीचा विचार काय? तेव्हा आपल्यास बोलिले की लबाड गोष्ट. तेव्हा आपण त्यास फिरोन जाब दिल्हा की, तुळ (बाजी) आह्मासी माव करितो. त्यास ते बोलिले जे माव करीत नाही. तर ये गोष्टीचा विचार काय? तेव्हा त्यानी सांगितले की, किल्याखाली घेऱ्यांत गावचे रान पडले आहे ते घेतो. तेव्हा त्याणी आह्मास पुसिले की तुमच्या विचारे काय? तेव्हा आपण बोलिलो जे, घेऱ्यामधे राण पडले ते दिवाणांत गेले. ते आपल्यास सोडवा-

वयास अवकात नाही. कोण्ही एक मरळ उभा राहोन दिवाणातून सोडऊन घेतले तर ते आपलेच आहे. ऐसी बोली तीर्थरूपासी जाली. ऐसे असता घेराचें राण न घेतां, खासा गाव आपला होता तो घेतला. मग बावास पुसिले हे काय वर्तमान? तेव्हा ते बोलिले की हे आह्मास ठाऊक नाही. त्याउपर स (न) दा ब्राह्मण घरच्या आणून ठेविल्या. त्या काही आपण आज तागाईत पाहिल्या नाहीत. त्यास तुळबाजी मरळ एक दोन वेळा आह्मास निराळ्या वाटेनें विचारू लागला की ब्राह्मणघर दिवाणातून करून घेतले, तर तुह्मी तेथील हाक होईल तो मेला माझे सेतचा सोडा. ह्मणोन बोलू लागला. त्यास आपण जाब दिल्हा की आपण लेकरू, त्यास लेकरू वडिलास विचारून सांगू. मग आपण काही वडिलास विचारिले नाही. दोन चार महिने जाले; मागती पुसो लागले. त्यास आह्मी त्यास सांगितले की बावा जे दिवसी समाधानांत असतील ते समई सांगू. ऐसे करिता करिता वरसे दोन वरसे जाली. त्याउपर मागती आह्मास विचारू लागले की, खंडीभर भात माझे पुत्र जिवाजी मरळ व सिदोजी व माहादजी हे तुह्मी पाठी राखतील, तर तू एवढे करून आह्मास हाक सोडा, आणि आपण पुत्रास सांगून खंडीभर साली देवित जाईन. तेव्हा आपल्या चित्तांत आले की, एक दोन वडिलापासून इनामे व गाऊ करून घेतले, आणि पुढे कोठवर द्यावे, ऐसे आले. मग त्यास सांगितले की, हे गोष्ट कार्याची नाही. आमचे पदरीं उरले काय? त्यांतून द्यावे काय? भाऊपणीयाखाले आणि गाव तुटोन गेले, ऐसे सांगितले. परंतु गोष्ट त्याच्या चित्तांत आली नाही. मग आह्मासी क्रिया करून बोलू लागले की, तुह्मी आमची कटकट नाही; परंतु एवढे देणे तुह्मीं ह्मणून द्या. ऐसी क्रिया धरून मागो लागले. माझे व तुझ्या वडिलाचे क्रियाप्रमाणे चालिले, त्याप्रमाणे पुढेहि चालेल. आह्मी तुह्मासी वाईट नाही. तुझे वाईट केलियाने आमचे बरें नाही. ऐसी एक दोन वेळा जे जे जागा क्रिया केली, त्यास साक्ष परमेश्वर आहे. त्याउपरातिक आपल्या चित्तांत आले कीं, दाढीस धरून पोटांत डोई घालून आंतडी काढितो. ऐसे भास निर्माण जाली. मग आपण तीर्थरूप राजश्री नारायणजीबावास विचारिले, हे गोष्ट तुळबाजी ह्मणतो. ये गोष्टीचा विचार काय? मग त्यानी आह्मास जाब दिल्हा की, याने आह्मासी क्रिया केली ती याने सोडिली. आह्मास गोष्ट हे पुरवत नाही. तेव्हा त्यास विचारिले की, मौजे लासीरगाऊ दिधला आहे याचा अर्थ काय? तेव्हा त्यानीं सांगितले की कोकणांत बावा गेले ते समई दोनसे रुपये घेऊन गाव दिल्हा. तेव्हा त्यास मागती विचारिले की, शामळानें धरून नेले ह्मणून तेचा रकमेचा गाऊ देऊन

कबिला सोडविला; ऐसे असता दोशा रुपयास गाव दिल्हा. त्याचा हिसेबु पाहाता गाव हस्तगत होईल. त्याचा महजर अगर खरिदपत्र जाले नाही. तेथून तुळबाजी मरळ व जिवाजी मरळ एका दो वरसामधें कटकट करू लागला. मागे आपल्या वडिलांचे व त्यांच्या वडिलाची कटकट जाली नाही. हाली खंडो मल्हार यानीं येक दोन वेळा मध्येस्त घातले की, यास बाह्मणघरचा हाक द्यावा. ऐसे नाइकिले. ह्मणून खंडो मल्हार खासनीस यास अभिमान येऊन पडिला की, आमची गोष्ट अमान्य करितात; ह्मणून दूर दराज लाऊन ज्यानगिरी केली. हे गोष्ट खरी आहे. पूर्वापार आहे ऐसे असोन, ये गोष्टींत अभिमान खंडोपंतीं धरून, जिवाजी मरळ उभा करून, त्यास पत्र सचिवपंताचे आणून दिल्हे. त्याउपर जिवाजी मरळ हुजूर गेला. तेथे जाऊन आह्मास मसाला घातला. त्याउपर आह्मी वरातदारास न भेटलो. आपल्या चितात वाद्या खरा करून उठविला. हे खरेसें दिसोन आले. मग त्यानीं आमचा प्रयत्न करून आह्मास बोलाविले. त्यास आह्मास सांगितले कीं, जिवाजी सातारा जाऊन हजार दोनसे रुपये खर्च केला. तो उगाच गोतांत येत नाही. तो गोतांत आलिया उपर तुमचा उपाय आहे. ऐसे ह्मणोन आह्मापासून पाच सातसे रुपये घेऊन गेले. मग जिवाजी मरळ घेऊन आले. बाजीराव पासलकर मोसेखोरे व कर्यात मावळचे देशमुख देशपांडिये यासी आज्ञापत्र आणिले. त्याउपर जिवाजी मरळ याजवळ कर्यातमावळची सनद देऊन आह्मास मोसाखोराची सनद देऊन रवाना केले. त्यास आह्मी व त्यानें सनदा नेऊन लाविल्याउपर गोत मेळऊन इनसाफ करावा, तों चैत्रमासी राजश्री पंतसचिव नेराचे मोकामास मोछाव करावयासी आले. तेथे देसमुख माहालो माहालचे अवघे व्होते. तेथे आह्मापासून व त्याजपासून कागद कतबे व जामीन अमीन घेऊन बारा मावळच्या देसमुखानीं आधार आसरा उभयतांचा पाहाता ऐसे असोन, कोणे गोष्टीचा जिवाजी मरळाचा ठिकाण लागला नाही. गोतानें खोटा केला. त्याउपर मागती चढी देऊन इनसाफ राहाविला."

लेखांक ४.

श्री.

"करीना बाबाजी जुंझारराव मरळ देशमुख ता॥ कानदखोरे करीना ऐसाजेः—भिकाजी बीन भिवजी रेणुसा पाटील मौजे पाबे ता॥ मा॥र याचा बालोजी रेणुसा मौजे मजकुरचे गाव जत्रेचे फळे व रानसावजाचे फळे व दिवा व भागसी देत होता. त्यावरी बालोजी रेणुसा याने बळेंच जत्रेचे फळे व रानसावजाचे फळे ऐसे खाऊ

लागला. त्याउपरी आपले आजे राजश्री कान्होजी बावा जुंझारराव राजश्री कारकीर्द नारो माधव किले राजगडचे मुकामीं होते. तेथे बाळोजी रेणुसा नेऊन इनसाफ पाहिला. तेव्हा तेथें बाळोजी रेणुसा याजकडे इनसाफ लाऊन गुन्हेगारी खंड रुपये घेतले रु॥ ३५ पस्तीस घेतले. गावजत्रेचे फळे व रानसावजाचे फळे देखील डुकराचे सालाबाद चालत आले आहे, त्याप्रमाणें चालवणे ह्मणून खोटा केला, आणि रुपये घेतले. आणि बाळोजीस रजा फर्माविली की, देशमुखाची फळी मागे तीन वरसे खादली, त्याची समजावीस करणे. त्याउप्रातिक समजावीस केली नाही. त्याउपरी भोगवटा आपल्याकडे पडावा, तो राजक्रांत जाला. मग माहाल मुल्क देशदेशावरी गेला. तेथून आलियावरी आपल्यावर शामलाचा खंड पडिला. व आपल्या मातुश्री यास देवआज्ञा जाल्या. व मुलेमाणसे मेली. व कर्जवाम वडिलाचे वेळचे होते, ते कर्जदार येऊन उभे राहिले. याकरितां वृत्तीच्या बाबें व हक लाजिम्याच्या बाबें काही तीर्थरूप राजश्री नारायणजीबावास सुचले नाही. तेणेकरून भोगवटा राहिला. मग आह्मी खंड वारिला व कर्जवामहि वारिले. व तीर्थरूपाची दोन च्यार लग्नं व बहिणीयांचे सातं लग्नं जालीं. त्याउपरी दोन च्यार वरसं स्वस्त जाले. मग रेणुसा यास फलकुटियां विसीं जाजाऊ लागलो. मग त्याणीं फिरोन जाब दिल्हा की, आपण दाहापाच वरसं खात आलो त्याप्रमाणे पुढंहि खाऊ. त्यासी तुह्मी कोणा आधारावरी खाता? ते गोस्टीचा कागदपत्र व दाखला दुखला असेल तो दाखवणे, मग तुह्मी सुखे खाणे. नाहीतरी तुह्मास गरज नाही. मागे तीन वरसं खादले त्याची समजावीस काय केली? पुढे तू खातोसी त्याचे खरेदीपत्र काय असेल ते दाखवणे. मग तू सुखें खाणे. नाहीतरी तुह्मास गरज नाही. ऐसी दोन चार वरसं बोली पडली. तो राजश्री पंतसचिव याणी कामथपटी मुठेखोरें व मोसेखोरे या दोही माहालीं घातली. त्या उप्रांतिक कामथपटी आपले महालीं बैसली. तेव्हा राजश्री खंडोपंतीं आह्मास पटी करावयासी मौजे धानेबचे मुकामीं बोलाविलें. तेथे बोली घातली की, कामथपटी दर माहालीं वसूल जाली. आह्मास काही सुटत नाही. तरी माहालची पटी करून घेणे. दर इसाफत खासगत गाव इनाम पाबे व धानब येथे कामथ पूर्वापार आपण खात आलो आहो त्याची वाट काय? तेव्हा खंडोपंत बोलिले जे, कामथ ह्मणिजे पाटिलाचे पाटिलास देणे. ऐसे उतर निरोत्तर होऊ लागले. परंतु आम्हास निकालस होऊन गोष्टी सांगितली नाही. ते समई आपलेस भास निर्माण जाली. पूर्वी चालत आले आहे आणि हे दिवाणदारीनें मोडितात, तेव्हा काही खासनीस व गाव कुलकर्णी ह्मणून अर्थ आणावा तो न आणिला. रेणुसी याची व आमची कटकट लाऊन

दिल्ही. त्याउपरी रेणुशाचा व आमचा कजिया करारच मांडिला. मागती खंडोपंतास जाऊन पुसिले की, याचा आमचा कजिया लावावा ऐसा नाही. ते गोष्टी मान्य केली नाही. मग राजश्री दाजीपंत व राजश्री सुभेदार नसरापूरचे मुकामी होते, तेथे तीर्थरूप बाबा व आपण गेलो. मग सर्व वर्तमान विदित केले. त्यावरून राजश्री दामाजी कासी व राजश्री रंगोपंत ऐसे त्यार्णी खंडोपंतास सांगितले की तुह्मी खासनीस आहां, देशमुखाचे सर्वप्रकारे चालवावे. ऐसी आज्ञा केली. मग फिरोन आह्मी पुसिले की, आमची वाट काय? त्यासी त्यार्णी सांगितले की खंडोपंतास हे देशमुख व तुह्मी खासनीस ऐसे आहा. यास हिरवे अगर भाजले खाणे. सर्व धंदा तुमचा आहे. त्यावरून कामथाच्या पैकीयाचा निकाल पुसिला की, हे रुपये कोण्ही घ्यावे? त्यासी त्यार्णी सांगितले की रुपये तुह्मी घेणे. कामथ तुमचे पुरातन आहेत तैसेच तुमच आहेत. त्यावरून कामथाचे रुपये दोही गावीच्या आपण दिल्हे आणि खंडोपंतापासून हुजती आणि कामथाचे कागद घेतले. तेथे लिहिले की हुजूरच्या सनदा आणून देऊ सबब गाव इनाम. यास्तव तुमचे कामथ तुह्माकडे व पुरातनहि खात आला आहा. ऐसे आह्मास लिहून दिल्हे असतां, मागती सनदा न देता, रेणुसा यासी बीर दिल्हा. त्याजवरून कर्कशा जाहाला. त्याउपरी सदरहू फलकुटीयाचा कजिया व कामथाचा कजिया एकच जाहाला. तेव्हा गाव जमा करूं लागले. ते समई त्यासी आपले माणूस पाठऊन दिल्हे की जत्रेचे फळे तुह्मी न घेणे, आमचे आह्माकडे पाठविणे, ऐसे दोन चार वेळा पूर्वी सांगितले. परंतु ते गोष्टी तुह्मी नाइकली. तरी हाली जत्रा करिता हे देणे. त्यावरून त्यार्णी टाकला जाब दिल्हा की आपण देत नाही. त्याजवरून आपण दोही दिल्ही. समाकुल पांढर होती. तेव्हा त्यार्णी चित्तात बोली आणिली की, आमच्या फलियास दोही दिल्ही, तेव्हा जत्रेविणे गरज आह्मास काय आहे? ऐसी बोली बोलून बकरें मारिले होते, ते तैसेच कातडीयात फले देखील बांधोन देवलास टांगिले. निवेदास मांस थोडे राहिले ते तैसेच चुलीवरी राहिले. त्याउपरी देवलीहून उठोन गेले. मग गावकरी राहिले. त्यांतून जाखोजी घीघा व बहीरजी चेरे हे आह्माकडे आले. त्याणी सर्व वर्तमान सांगितले. त्यास आपण त्याना सांगितले की देवास निवेद घातला आहे तो देवास दाखवणे, आणि बाल गोपाळ आहेत त्यासी प्रसाद देणे. जत्रेस दोही दुहवी केली नाही. फळकुटियास दोही दिल्ही. त्यावर त्याणी देवदेव केला. मग ते मांस व फळकुटे तैसेच तीन दिवस राहिले. मग रामाजी आपाजी देशपांडे याजकडे माणूस पाठविले. ते येऊन आपले नजरेनें पाहिले. तेव्हा त्यार्णी शब्द लावावयाचा तो लाविला. मग आह्मी येऊन बोलिले जे,

श्रीच्या देवळामध्यें घाण उठिली आहे, ति चा हुकूम काढावयाचा करणे. ऐसे बोलिले. त्यास ते दिवसीं तीर्थरूप बावास सीतजर हागवण प्राप्त जाली. तेधवा त्याणीं हे बोली घातली की, आह्मी काही जत्रेस दोही दुन्हाई दिल्ही नाही. तुह्मी बोली करिता हे अपूर्व वाटत आहे. त्याणें लबाडी करू नये आणि केली तरी हे वेळेस देवळातून घाण काढावी. देवळांत काही जावत नाही. मग फलकुटीयाच्या बोलीचा निकाल करून देऊ. ऐसे रामाजी आपाजी देशपांडे बोलिले. त्यावरून हुकूम केला. मग त्याणीं देवळास जाऊन ते मास व फलकुटे काढिले. मग बोली ती तैसीच राहिली. त्याउपरी बावांची वेथा बळावली. देव धर्म करिता काही ठिकाण लागले नाही. ऐसा सोध करिता पंचाक्षरी देवरुसी आणून, पर माहालेच्या तोंडें रेणुसीयाची लाग ऐसी खरी जाली. मग त्याच्या विद्यमानें श्रीमेंगाई व श्रीजुगाई याणींहि ईनत्या प्रसाद् दिल्हे. तेव्हा चडउतार होऊ लागला. मग ऐसे करितां पौडखोराचा भगत जानाईचा आणून, माहालचे मेंगाई व जुगाईला थला करून बकरे देवळीं द्यावें ऐसे केले. ते देऊन बावास उतार पडिला. तेव्हा दुसरे जत्रे कारणे त्यास सांगितले कीं अजी जत्रा करिता, तरी फळकुटीयाची बोली विल्हास लावणे ह्मणोन सांगोन पाठविले. त्यांस ते बोलिले, हे जत्रेविणे खोळंबा आह्मास काय ? वारंवार बोली होते ह्मणून बोलिलें. त्याजवरून आपल्या चित्तांत आले कीं, मागती मास बांधोन ठेवितील आणि श्रीचा कोप होईल. ऐसे चित्तांत आले. त्याजवरून ते समई सांडी केली. मग तिसरे जत्रेचे वेळेस निकड करून सांगितले. त्यावर बावाचे वेथेस थोडा बहुत उतार होता. तो राजश्री खंडोपंत याजकडे हरनाक माहार जाऊन वर्तमान रेणुसा याविसीं सांगितले. त्याचा मजकूर आपल्या काही ठावका नव्हता. त्याउपरी आह्मी त्याच्या भेटीस गेलो. तो त्याणीं सर्व वर्तमान सांगितले. त्याजवरून आह्मास त्याणीं सांगितले की, हरनाक बोलऊन घेऊन ऐसा ते बोली कार्याची आहे. त्याजवरून हरनाक बीन राघनाक इबिन हकनाक माहार मौजे पाबे ता। कानदखोरे सु॥ इसन्ने अर्बैन मया अलफ कारणे साहेबाचे सेवेसी तकरीर लेहून दिल्हे ऐसीजे, आपला वडिल हकनाक, त्याचा लेक पाकेनाक, गावीचा कारभार करीत होता. त्यासी ते समई दिवाण मलकाची पातशाही होती. तेव्हा गावात पेठ होती. लिंगाईत कारभार चालवित होता. तेव्हा फळकुटे जत्रेचे व पारधीचे देशमुखास आणून देत होते. हाली रेणुसे पाटिलकी करितात. त्याचा वडिल भिकाजी गावीं होता. परंतु पाटीलकीचा डांग त्याजकडे चालत नव्हता. व पाबेकरहि गावीं होता. त्याजकडेहि पाटिलकीचा काइदा चालिला नाही. व रेणुसी याणीं पाटिलकी घेतली अगर देशमुखानीं दिल्ही हे

आपल्यास दाखल नाही. भिवजी रेणुसाहि गावांत होता. परंतु पाटिलकी दिल्हे-याचा कागदपत्र दिवाणचा अगर देशमुखाचा आपल्यास ठावका नाही. याखेरीज रेणुसा याचे मुळे कोण्ही पुरऊन दिल्हे तरी आपण वतनाखेरिज होईन ऐसी तकरीर लेहून दिल्ही. शके १६६३ दुर्मतीनाम संवछरे भाद्रपद सुध शष्टी तेरीख ५ माहे रजब ते दिवसीं लेहून दिल्हे. त्यासी तीन कागद करीन्याचे केले. एक कागद खंडोपंतीं आपल्याजवळ ठेविला. एक कागद देशपांडे याणीं ठेविला. एक कागद आह्माजवळ दिल्हा. त्याउपर भिकाजी रेणुसा यास वर्तमान करिन्यावाब सांगितले. त्याजवरी बापास चड बहुतच जाला. काही केल्या उतार नाही. मग सीतजर हगवणची वेथा कठीण जाली. तेणेकरून भाद्रपद वद्य चतुर्दसीस शके १६६३ मधी देवआज्ञा जाली. मग आपल्यास धास्त निर्माण जाली. तेणेकरून मौजे पाबे येथून जावयासि सिधांत केला. तो घरामधे वेथा पोटदुखीयाची निर्माण जाली. देवधर्म करिता काही ठिकाण लागले नाही. मग दुखणाईत घेऊन धानेवास नांदावयास गेलो. तेथे राजश्री सुभेदार प्रांत मावळे हे मुलुकाचे खंडणी करावयासी आले. ते समई तर्फ मजकूरचे खोत पाटील व किलाचे लोक सरदार होते. तेव्हा त्याणी दुखणियाची अवस्था पाहिली व ऐकिली. राजश्री सुभेदार याणीं आज्ञा केली की, देशमुखाच्या घरामधें वेथा कठिण जाली आहे; तरी तुह्मी माहालकरी व किल्याचे लोक सरदार ऐसे दे श द दे व श्री ग वे स मे ल कुबलजाईस जाऊन बलकटी करणे. ऐसी आज्ञा केली. त्याजवरून श्रीस जाऊन समस्त लोक व राजश्री खंडोपंत व देशपांडे व माहालचे खोत पाटील ऐसे जाऊन देवाच्या नव्या मूर्ति आणिल्या होत्या, त्याची स्वस्थापना ब्राह्मण जोसी ऐसे नेऊन पुजा केली. तेसमई देवास पुसिले. श्रीनें सांगितले की, हे गोष्टी वेथेची काय सांगावी? त्यास सांगितल्याने खरे वाटत नाही. तेव्हा कुल साऱ्यानीं अर्ज केला, गुणास आले तरी आणावा नाहीतरी वाट दाखवावी. याची वेथेमुळे खराबी बहुत जाली. तेसमई श्रीनें सांगितले की रेणुसा याची समजावीस जालियावाचून वेथेस उतार पडत नाही. तेव्हा भिकाजी रेणुसा व महादजी रेणुसा व बावाजी रेणुसा हे ह्मणू लागले की, आह्मी आपल्या पोटापाणियाची बोली करितो; त्यासि देवानीं अघटित सांगितले. हा भोग दुसरा आमचे पाठीं लागला. ऐसे बोलिले. मग आह्मी त्यासी बोलिलो की, तुमचा पदर काही धरिला नाही, अगर गुणास आला नाही. तुह्मी श्रमी व्हावे ऐसे नाही. तुह्मास आह्मासी जीत झगड भांडण करावयाचे ते करणे. मग तेथून येऊन आपल्या वडिलाच्या वेळेचा वाडा बांधावयासि मुहूर्त केला. त्यासी भिंती चहू बाजूच्या पर परूस घातल्या. जो जो

घालितो तो पडत, ऐसा विचार जाहला. याउपरी आपण मौजे अत्रोली येथे श्रीची चोदास जाऊन पाटील बसऊन देवास विचारिले. तेथे देवानें सांगितले की ही लाग रेणुसा याची आहे. तो सिवाजी गंगाधर खासनीस व संभाजी पाटील निह्मणे मौजे विझर त्यांसी हे वर्तमान सांगितले. तैसेच सिवाजी गंगाधर व संभाजी पाटील व विठोजी पाटील राऊत मौजे अत्रोली वगैरे लोक ऐसे घेऊन श्रीसिकाई मौजे सिरकोली येथे जाऊन, सिवाजी पा॥ पडवले व समाकुल पांढर यांच्या विद्यमाने श्रीस प्रसाद लाविले. तेथे सांगितले, हे लिगाड रेणुसा याचे आहे. तेथून मौजे तावे तेथें जाऊन राजश्री गोरखराव पासलकर देशमुख व समाकुल पांढर ऐसे नेऊन श्रीस विचारिले. तेथेहि रेणुसा याचे लिगाड ऐसे खरें करून सांगितले. मग निघोन घरास आलो. त्याजउपरी बरोबर जे पाटील होते ते व आपण खंडोपंतास विदित केले. त्यास एक दोन दिवस जाले. तेव्हा वेथेस उतार न पडे. ह्मणून खंडोपंतास सांगितले की, रेणुसियास आणून जे सांगावयाचे ते सांगणे. तेव्हां ते बोलिलेः—आपण काय सांगावे ? तुह्मी रेणुसियाची समजावीस करणे. त्यावरून आपल्या मनांत विकल्प आला की, आपले वाईट हेच करितात. तेव्हा त्यासी जाब दिल्हा जे, आज तुमचे हाते दिवाणसत्ता आहे, आणि किल्याचे वर्ती माहालचे तुमचे हाती पारपत्य होत आहे; आणि आह्मी तुमचे ऐसे असता मन न घालिता ! तेव्हा विस्वर बरे आमचे करितो, तेथें तुमचा उपाय काय आहे ? त्यावरून आह्मास बोलिले, राजश्री पंताकडे अगर सुभेदाराकडे विदित करणे. मग करिना मनास आणून तुह्मा (स) व रेणुसियास ऐसी थले नेमून व मसीदीचे राजणगाव अगर हरेस्वर ऐसे देतील. तुह्माबराबर कारकून व हुजरे देऊन थल करवितील. ऐसी बोली धानेबच्या घरामागे वृंदावनाजवळ जाली. ऐसा जाब त्यानीं पस्ट दिल्हा. त्याउपरी काय त्याच्या चित्तांत आले. तेव्हां आह्मास सांगितले की, त्यास माणूस पाठऊन भिकाजी रेणुसा यास घेऊन येणे. ऐसे बोलिले. त्यासी आपण बोलिलो, तो आमच्या येत नाही, तुह्मीच त्यास घेऊन येणे. त्यावरून दादजी मल्हार, भिकाजीस आणावयास पाठविला. मग त्याजवळ भिकाजी बोलिला की तेथं मी येत नाही. त्याणीं निघोन यावे. मग आह्मी निघोन हुजूर जाऊ. तेव्हा दादजी मल्हार फिरोन आला. मग खंडोपंतीं दादजी मल्हार व संकराजी ढमाल दि॥ राजश्री पंतसचिव ऐसे घेऊन येणे ह्मणून सांगितले. त्यासी त्यावरून निघोन कोढवले बु॥ येथे आले. तों बावाजी रेणुसा सुताराचे सालेस गेला होता. तो तिकडून येत होता. मग तेथे भेट जालियावरी हरपोडीच्या व पाबेच्या सिवेपावेतो आले. तेथून पळो लागला. तेव्हा

संकराजी ढमाल याणे मार्गावर धरून बांधून खंडोपंताकडे हुजराहुजीर पाठविला. मग हे भिकाजीस आणायासी गेले. तो भिकाजी भेटला नाही. पळोन गेला. त्याजवरी बावजीस खंडोपंतीं निरोप दिल्हा. बोली राहिली. त्याउपरी खासी आह्मास वेथा जाली. हिंवें आली. हुक भरली. काही उपाय चालेना. वाडा बांधीत होतो तेथून उचलोन घरास आणले. तेव्हा दोन च्यार दिवस जाले. मग आह्मास बोध करणारानीं केला की घर बुडवावे ऐसे नाही. त्यावरून त्यास आणून खंडोपंतीं दो बिघीयाचा कागद लेहून दिल्हा. त्यावरी सिका केला. तो बाजेवरी दोघानीं धरून बैसविलें. पाठीस कान्होजी वेणुपराव हंसाजी मरळ याणी नीट बैसऊन सिकीयास शाही लाऊन देशपांडे याणीं हातीं दिल्हा. तेव्हा सिका बाजल्यावर करून दिल्हा. त्यास साक्ष राजश्री खंडोपंत खासनीस व रामाजी आपाजी व निळो आपाजी व भानजी बाजी देशपांडे व राघोजी राऊत प॥ प्रतापराव देशमुख सिलीबकर त॥ गुंजण मावळ यांच्या मोझ्या सिका करून दिल्हा असे. दोन बिघे सेत दिल्हे व त्याचा कतबा घेतला की, आपला आजा बालोजी याउपरी लागला तरी जाब करून देऊ. याउपरी आपली व आपल्या घरांतील वेथा बरी जाली. कोण्हा देवाधर्मास काही दिल्हे नाही. तेणेकरून वडिलांचा वाडा व खर्चवेच तो कामथाविसें रुपये दिल्हे ते उगवले नाही, अगर आह्मीहि घेतले नाही. यामुळे तीर्थरूप मृत पावले. समागम मातुश्रीनें सहगमन केले आणि दोन बिघे सेतहि गेले. येणे प्रमाणे हा करीना असे. आपल्यापासीं त्याची तकरीर हरनाक याणे लेहून दिल्ही होती. त्याची होय नव्हे न करितां, खंडोपंतीं रामजी आपाजी देशपांडे हे पाठऊन घेऊन गेले. मग काही वेथा जाली नाही. त्यावरी दतोजी रेणुसा भिकाजीचा भाऊ सातारीयास जाऊन देवडीकडे लाग करून, सेरी अमानत करविली. सेरकर सेरी मोजावयासी निघाले. तेव्हा कोणी दिवाणचे कारकून नाहीत ह्मणून त्यास ते दिवसीं राहिले. मग तेच पहाटेस भिकाजी रेणुसा याणें फास लाऊन जीव दिल्हा. मग मोजणी राहिली. त्याउपरी माल जो जो फस्त केला होता त्याचे रुपये जाखा करून वारिले. सेरीच्या माथा रुपये ५० पनास दर वरसास ऊस लाऊन द्यावे ऐसा तह केला. त्यासी पाटील सेरी दाखवीत नाहीत. तुफानास येऊन आह्मासी कजिया करीत आहेत. दताजी रेणुसा यानें अदाव घालून आह्माजवळ चाकरीस राहिला. मग सेरीचे लचांड पडेल ह्मणून पळोन गेला. पुढे कितेक गोष्टी आहेत.

बी॥ बापुजी भास्कर देशपांडे त॥ कानदखोरे."

लेखांक ५.

श्री. १५३८ मार्गशीर्ष शुद्ध १३

माहाल किले पुरंधरू बिहुजूर

म॥ ह॥ राजश्री माहादाजी जाधवराऊ ना॥ किले मजकूर

म॥ ह॥ हणवंतराउ हरकारे मु॥ किले मजकूर

भानजी बानखस मु॥ राजश्री नरसिंगराऊ

तमाजी अनंत मु॥ कलवी बहीरदेउ

आपाजी फर्जंद मल्हारजी देसमुख पा॥ सिरवल

तुलजी व जाखोजी देसमुख पा॥ खेडेबोरे

यसवंतराउ आठगाठे खोत ता॥ सिवतर खोरे

बाजी हैबतीराउ देसमुख ता॥ गुंजण मावळ पा॥ मुरऱ्हादेऊ

कान्होजी जेधे देसमुख ता॥ भोर तपे रोहिडा

नरसोजी खोपडा देसमुख तरफ उतराले ता॥ रोहिडा

यमाजी मोकदम मौजे दूर पा॥ पुणा

आबोजी बांदल मोकदम मौजे आल्हे ता॥ हिरडस मावल

बाबासेटी सेटिया पेठ मूर्तजाबाद ना॥ किले मजकूर

कडतसेटी बांधा माहाजन पेठ मूर्तजाबाद ना॥ किले मजकूर

हजीर मजलसी हुजरू द॥ बे॥

कालोजी चोरघा मोकदम मौजे कालवली

लुखो निलींभट मोकदम मौजे विझरे

पाकोजी सेडकर मोकदम मौजे दापोडी

लखजी सेडकर मोकदम कालोली

हरबोजी देवगीरकर चौगला मौजे विझर

जमाजी बिन सेखजीभाई दूसमान मु॥ कान्होजी जुंझारराउ देशमुख

समस्त देसक तर्फ कानदखोरे सु॥ सबा असर अलफ कारणे महजर लिहून दिल्हे ऐसा जेः—बाजी नाईक मरळ देसमुख ता॥ मजकूर यास पेसजी सालाबाद ता॥ मजकुरीं देसमुखीचा हक्क लाजिमा ता॥ कारकीर्दी बाबाजी जुंझारराऊ देसमुख खात होते. त्यावरी कुसूर करून किलेमजकुरास बाजी मरळ आला. यावरी रोज दरोज करकशा करीत होता. त्यावरी आह्मी समस्त खोत पाटील व देसक मिळोन

राजश्री कान्होजी नाईक देसमुख सदरहू मणउनुं त्यावरी देसमुखीबदल कागद बाजी नाईक व सुऱ्याजी नाईक मरळास देउनुं आह्मास किले मजकुरीं पाठविले. त्यावरी हजीरमजालसीं हुजूर पेसजीपासून बाजी वा सुर्याजीचे वा आमचे बलम नाही. हे पाउनुं हजीरमजालसी हुजर बाजी नाइकासी हकलाजिमाची पैवस्ती करून लिहून दिधले असे. लेकराचे लेकरी बाजी नाइकीं खाऊन सुखे असावे. येविसी आह्मामधें हरकोण्ही खोत पाटील फितवा फद्‌डा करू, तरी दिवाणीचे गुन्हेगार, गोताचे अन्याई हो. आपुले लिहिले सही.

मौजे दापोडे

गला खंडी	नख्त
१ गाव खडी	८० गला खंडी १६ दर खंडीस ५ ए॥ टके
१'३।१ कणसरा	१० कणसरा नख्त टके
॥ खरीद खंडी मण	२॥ दसरा बकर नख्त टके
॥३।१	९२॥
उडिद कोहली माहाल तकसीम बा। स्याकार तेरीख ११ जिल्हेजु	माहाल तूप मोचे जाली

लेखांक ६.

१५३९ कार्तिक वद्य ८.

"छ. ई कौलुनामे अज दिवाण मामले समत तळकोकण हवाले बाजी याकूद इस्तबेली हवालदार त॥ कान्होजी जुंझारराऊ अधिकारी तपे कानदखोरे मामले राईर सु॥ समान असर अलफ बादे कौलुनामा ऐसा जेः—तुमचे बाबें रवळोजी मरळ एउनु मालूम केले जे, कान्होजी मजकुरु हुजुरु एउनु आपला मखसूद मालूम करील, ए बाबे तकवेसीचा कौलु मऱ्हामती होए. मालूम जाहाले. बराय मालूमाती खातिरेस आणुनु कौलुनामा सादर केला असे. तू बेसक हौनु देएइजे. तू आपला मकसूद असैल तो मालूम करुनु तुमची दौलतखाई व सरफराजी होईल. कोण्हे बाबे सक मुलाहिजा न धरिजे. पेसजी कारकीर्द एदिलसाही जो गुन्हा केला असेल तो माफ असे. कोण्हे बाबे तालूक आंदेसा न कीजे"

फारसी तेरीख २१ जिलकादी.

लेखांक ७.

त॥ १५४० आषाढ वद्य ९

"ई कौलनामे अज रख्तखाने राजश्री पतंगराऊ दामदौलतहू त॥ कान्होजी जुंझारराऊ देसमुख तपे कानदखोरे मामले राईर बिदानद सु॥ तिसा असर अलफ बाबे कौलनामा ऐसा जेः—तुवा एउनु हुजूर माळूम केले जे, त॥ म॥ साल गु॥ सन समानामध्ये साहेबांस मुकासा अर्जानी जाल्यावरी सेरीकर साहेबांचे बंदगीस एत होतों. तों माहाली उगवणीचा व लावगणाचा हंगाम हे दोन्ही कामें जाली पाहिजेती, याबदल त॥ म॥चे कारकूनीं सेरीकरास माहालीं राहाविले. सदरहू लोकांची सरंजामी करून साहेबांचे बंदगीस आलों. त॥ मजकुरीचा हालहवाल सांगितला. यावरी साहेबीं सेरीकरास पुसिले कीं, तुझे इनामतीचा व हकलाजिमा यांचा कैसा अमल आहे ? तरी आपणास त॥ मजकुरी इसाहती व विस्वा व हकलाजिमा एणेप्रमाणे आहे बित्त॥

इसापती देह २		सेते किते २	
मौजे पाबे	मौजे घानेबू	सेत मौजे	सेत मौजे
१	१	अत्रोळी	विंझर
		उंबरपेढे	मोरटाके
		१	१

विस्वा मार्गी लाजिमा

एणेप्रमाणे सालबाद पिढी दर पिढी चालिले आहे. साहेबांचे कारकून सदरहू बाबें भोगवटेयाचे कागद दाखवा ह्मणताहेत. तरी हजरती साहेबाचे फर्मान बहसिके खास व वजिरांचीं खुर्दखतें होतीं. यावरी खान हैबतखान आदिलशाही तेहीं ते तरफ कबज केली. त॥ म॥ काहीजाती एता आधीं घाला घालून त॥ म॥ लुटून नागऊन तलाफ केले. ते वख्तीं भोगवटेयाचे कागद फर्मान व खुर्दखतें तमाम गेलीं. यावरी त्यांची काहीजाती बैसली. मग सेरीकरास व रयतीस कौल देउनु वसाहती करू लागले. यावरी तपे म॥ आपल्या लोकांस मुकासा गाव वाटून दिधले. आपले इसापती व हकलाजिमे सदरहू पहिलेप्रमाणें चालऊ लागले. तेणेप्रमाणें आपण खातच होतो. त्यावरी साल गु॥ ते तरफ हजरती साहेबांस मुकासां अर्जानी जाला. हजरत साहेबीं अवघीं खोरीं मावळे आगा बाजी याकूद इस्तबेल हवालदार समत तलकोकण याचे हवाला केली. तिही तमाम खोराचे देसमुखास तलबा करून चेउलास नेले. त्याबराबरी सेरीकरासहि नेले. त॥ म॥ हालहवाल मनास आणून सीसाला कौल दिधला. सेरीकराचे इसाहतीचे व

हकलाजिमे यांचे बाबे हमश्याही खोराचे देसमुखाचे मुकाबेले पाहिले. त्याच्याहि इसाहती व हकलाजिमे मालूम जाले. व सेरीकराची तसरुफाती मालूम जाली. यावरून सदरहूप्रमाणे व आपले खुर्द खत लेहोनु दिधले. यावरी सवेंच साहेबांची काहजाती आली. साहेबांचे कारकुनीं रजा फर्माविलीकीं राऊसाहेबांचे खुर्द खत आणून मग तुमचे दुमाला करून. तरी सेरीकर साहेबांचा नफर आहे. साहेबीं आपणास अन्नवस्त्र देउनु, सेरीकरपणाची चाकरी कीर्दमामुरी घेतली पाहिजे. सेरीकरावरी नजर ऐनायत करून, कारकुनासि खुर्द खत व सेरीकरास कौल मऱ्हामत केला पाहिजे. ए तरफेस इनामती ह्मणौनु ह्मणतात. आपले देसाकडे इनामती व इसाहती ह्मणौनु ह्मणताती. सदरहू प्रमाणे अमल असे. बराय मालूमाती खातिरेस आणून, सदरहू पैकी इसाहती देह २ व सेते २ व विस्वा तुझा हकलाजिमा तुझे दुमालां केला असे. ए बाबें ता।। मा।। चे कारकुनास खुर्दखत सादर केले असे. सदरहू इसाहती व हकलाजिमा खाउनु लाठी बल घेउनु तपा तमाम मामूर करणे. सदरहू प्रमाणे तुज कौल असे."

तेरीख २२ रजब

लेखांक ८.

१५४० आश्विन शुद्ध ७

"अज रख्तखाने राजश्री पतंगराऊ राजे दामदौलतहू बजानेबू कृष्णाजी गोविंद हवालदार व कारकून तपे कानदखोरें बिदानद सु।। तिसा अशर अलफ कान्होजी जुंझारराऊ देसमुख ता मा अर्दास पाठविली. तेथें लिहिलें कीं आपले इनामतीचे गांव दोनी व सेतें दोनी याबदल सीरणी टके सतरासें साहेबांस कबूल जालें आहे, त्याची उगवणी करितों. व सालमजकुरीं तपेचे इजारतीची बेरीज आहे त्याचीहि उगवणी करितों. आणि कारकून आपले इनामतीचे गांव व गांवगना हकलाजिमा आहे तो तमाम कमावीस करून घेताती. बंदे कमीनास कांहीं देत नाहीत. तरी आपण काय खांवे? आपला रोजगार कैसा चालेली? आपणास खावया नाही. कारकून तमाम विलायती अमानत कमावीस करून घेताती. आपण रयतीचे कौलाबोलाचे कीर्दी व हरएक बाबें अर्जे करितों, तो मनास आणीत नाहीत. आपली अर्दास आइकत नाही. याचे विसीं आपण ह्मणतों त्यास अदीकच ताकीद करिताती. आपली कांही हुरमती राखत नाहीत. सालाची उगवती आठा महिनियामध्यें करा ह्मणौनु कुणबियासि ह्मणताती. ऐसा आपला हाल आहे. ह्मणौनु रंजीस होउनु बहुत तपसीलें लिहिलें. तरी कान्होजी जुंझारराऊ देसमुख ता मा

एणें इनामतीबदल सीरणी टके सतरासें कबूल केली आहे. त्याचे उगवणीची बेगमी देखौनु याच्या इनामती याच्या दुमाला करणे; व सालमजकुरीं तपेमजकूर इजारती रकमेस इस्तावा आहे तेणेप्रमाणे उगवणीची बेगमी जालेयावरी गावगनाचा हकलाजिमा देसमुखाचे दुमालां करणें; व याची इजती हुरमती राखत जाणे. रयतीचे बाबे व हरएक बाब अर्ज करीत जाईल तो खातिरेस आणून माकुल हाल सरंजाम करीत जाणें. गैरमाकुल न करणे. यास व रयतीस लायनी सीवीगाली व हाणमार न करणे व तशवीस नेदणे. माकुल अमल असेली त्यास एक जरेयाची तऱ्हे नेदणे. गैरमाकुल वर्तत असेली बिलाहरकती करीत असेली व गुन्हेगार असेली, त्यास पाहिजे तैसी ताकीद करणे. रयतीस लायनी एक जरा तशवीस नेदणे. गैरमाकुल अमल हरगीस होव नेदणे. माकुलहाल अमल करीत जाणें. अवघे रकमेची उगवणी आठा महिनेयामध्यें करा ह्मणौनु ह्मणता, तरी हंगामीचे हंगामीं उगवणी करणें. व देसमुखमजकुरें अर्दास लिहिले कीं, कारकून सालगुदस्ताचे कागद पुसताती, तरी सालगुदस्तांचा इस्तावा बेरीज टके ९०००. आणि उगवणी बेरीज महसूल टके ९६६० ८१०॥ ऐसी उगवणी जाली. तरी सालगुदस्ता नव हजार टके जमे आहेती. टके ६६० ८१०॥ जमा नाहीत. हा कैसा अमल आहे ते बखैर हुजूर लिहिणे."

तेरीख ५ सौवालु माहे सौवालु

लेखांक ९.

१५४२ श्रावण शुद्ध ९

"छ विठल गणपती हवाले ता॥ कानदखोरे मालूम दानद सु॥ इहिदे असरीन अलफ. ता॥ मजकुरीचा देशमुख हुजूर एउनु मालूम केले जें, साहेबीं नजर अनायत करुनु आपला हकलाजिमा व इसाफती सालाबादप्रमाणे देविले पाहिजे ह्मणौनु. तरी ता॥ मजकुरीच्या देसमुखाचा हकलाजिमा व इसाफति दुंमाला केले असे. बा॥ सालाबाद प्रमाणे देविजे."

तेरीख ७ माहे रमजान.

लेखांक १०.

१५४५ आश्विन वद्य ११

"छ अज जानीब म॥ अंबर ता॥ सिदी अंबर अबदुल वाहद हवालदार व साबाजी नारायण सबनिवीस किलें कोंढाणा मालूम दानद सु॥ अर्बा इशरैन अलफ.

अर्जदास्त छ ११ जिलकार्दी र॥ छ २ जिल्हेज मजमून कान्होजी जुंझारराऊ देसमुख त॥ कानदखोरे मु॥ वजारतमाब पतंगराऊ राजे तो नफर साहेबाचा आहे. त्याचा हकलाजिमा राऊ अजमाचे कारकून तहसील करुन नेताती ह्मणौनु बयानवार लिहिले. तरी ए बाबें हुजरून राऊ मस्यारुनइलेचे हेजिबास फर्माविले असे. मोर्तब सुद.

तेरीख २४ रुजू सुरु
जिल्हेजू निवीस
बार सुद सुरु सुद

पे॥ छ १३ माहे सफर पाठविली * * * तिमाजी रायदेऊ नायकवाडी किले मजकूर."

लेखांक ११.

१५४६ ज्येष्ट शुद्ध १

"अज दिवाण ठाणें मामले राएर व बारा मावळे हवाले खान इमराईम खान हवालदार व कारकून मामले मजकूर त॥ कान्होजी जुंझारराऊ देसमुख तपे कानदखोरे मामले मजकूर सु॥ अर्बा इसरीन अलफ. हुजरु मालूम केले जे, साहेबास ह॥ साहेबीं हवाला देऊन पाठविले; साहेब सलामत माहालास पैवस्ता जाले; साहेबीं आपणियासी मसलती बदल लोक फर्माविले; तरी आपली इसाहती व इनामती हकलाजिमा विस्वा सालाबाद आपले दुमाला आहे. हाल सालीं तो तरी साहेबास माहाल अर्जानी जाला आहे. तरी साहेबांचे खुर्द खत होए. मालूम जाले. तरी तू हिकविहाल होउनु असणे. तुमची इनामती व इसाहती व विस्वा तुमचे दुमाला केला असे. सालाबाद जैसे चालिले असे, तेणेप्रमाणे इनामती व इसाहती व विस्वा हकलाजिमा दुमाला केला असे. मोर्तब सुद."

तेरी २९ माहे रजबू
रजबू

लेखांक १२.

त॥ १५४७ माघ वद्य ४

"अज रख्तखाने खुदायवंद मलिक शर्के मलिक मलिक अंबर खूलिदयामदौलतहू बजानेब कारकुनानि मामले राईर व बारा मावळे बिदानद सु॥ सीत इशरैन अलफ.

हेजीब जुंझार मरळ देसमुख त॥ कानदखोरे मामले म॥ हुजूर मालूम केले जे, देशमुख मजकुरास इसाहती देह २ मौजे पाबे देह १ व मौजे धानेब देह १ व सेते २ इनामती त॥ सेत मौजे अत्रोळी उंबरपेढे १ सेते मौजे विंझर मोरटाके १ व विस्वा व हकलाजिमा सालाबाद कारकीर्द दरकारकीर्द भोगवटा चालतो. बा॥ खु॥ खाने अजम हैबतखान व वजिरानी भोगवटा चालतो. हाली देसमुख म॥ म॥ साबाजीपंताबराबरी जमते लोक से ३०० तीन चाकरी करितो. देसमुखमज-कुराचा बाप कान्होजी जुंझारराऊ मसलतीमध्ये खर्चला. तरी साहेबीं नजर एनायती फर्माउनु ताजे खुर्द खत होए. मालूम जाले. तरी देसमुख म॥ इसाहती देह २ मौजे पाबे देह १ व मौजे धानेब देह १ व इनामती सेते २ मौजे अत्रोळी सेत उंबरपेढे १ व मौजे विंझर सेत मोरटाके १ व विस्वा व हकलाजिमा सालाबाद कारकीर्दी दर कारकीर्द भोगवटा चालतो. बा॥ खु॥ खाने अजम हैबतखान व वजिरानि भोगवटा चालतो. हाली देसमुखमजकुराचा वालीद मसलतीस खर्चला आहे ह्मणौनु इसाहती व इनामती व विस्वा व हकलाजिमा बा॥ भोगवटा तसरुफाती चालेले असेल तेणेप्रमाणें चालविणें. तालीक घेउनु असल फिराउनु दिजे.''

तेरीख १७ माहे
जमादिलावेल

लेखांक १३.

त॥ १४४९ पौष शुद्ध १०

"अज रख्तखाने खुदायवंद सिदी अजम सिदी याकूद खूलीदयाम दौलतहू बजानेबु कारकुनानि हाल व हस्तकबाल देसमुखानि ता। कानदखोरे बिदानद सु॥ समान इशरीन अलफ. बाबाजी जुंझारराऊ देसमुख त॥ म॥ हुजूर एउनु मालूम केले जे, आपणास तप म॥ इसाहती व विस्ला व हकलाजिमा एणेप्रमाणे आहे बित॥

देह १ त॥	सेते २ त॥	विस्वा व हकलाजिमा
१ मौजे पाबे	१ मौजे अत्रौळी उंबरपेढे	
१ धानेब	१ मौजे विंझर सेत मोरटाके	
२	२	

एणे प्रा। चालिले आहे. ता। मा। साहेबास मुकासा अर्जानी जाला. माहाली कारकून ताजे खुर्द खताचा उजूर करिताति इ. इ. इ.''

तेरीख छ ८ जमादिलोवल.

लेखांक १४.

ता। १५५० श्रावण वद्य ३०

''अज रख्तखाने खुदायवंद खाने अजम खुदावंदखान खूलीदयामदौलतहू बजानेबु कारकुनानि ता। कानदखोरे बिदानद सु॥ तिसा इशरैन अलफ देशमुख ता। मा। यास पाबे व घानेबु इ. इ. इ.''

तेरीख २८ जिल्हेजु

लेखांक १५.

१५५१ कार्तिक शुद्ध १४

''अज रख्तखाने खुदायवंद खा। खुदावदखान खूलीदयामदौलतहू बजानेबू बाबाजी जुंझारराऊ देसमुख ता। कानदखोरे बिदानद सु॥ सलासैन अलफ अर्दास छ ३ रा। छ ८ रबिलोवल लिहिले की, किलेकरी ता॥ मजकुरास तोसीस लाविली आहे, गाऊ मारिताती व मौजे सणवडीची गुरे वळुनु नेली आहेती ह्मणौनु लिहिलें, तरी बअमल दिवाणचे बंदगीस मालूम करुनु फर्मान लिहविला. सिके विले लाविला आहे; तोवरी सिदी अंबर अबदूर साहेब हवालदार किल कोंढाणा त्यास किताबती पाठविली आहे जे, त्यास घेउनु सरंजाम करुनु घेणे. तोवरी फर्मानास सिका होउनु फर्मानहि पाठवितो तुवा मर्दाना होउनु दिवाणकाम चालवणे. काही शक न धरणे. अवघी सरंजामी करुनु फर्मान पाठवितो. मोर्तब सुद रुजू सुरुनिवीस तेरीख १२ माहे रबिलोवल.''

लेखांक १६.

१५५२ मार्गशीर्ष वद्य ५

''अज रख्तखाने खुदायवंद खा। खुदावदखान खूलीदयामदौलतहू बजानेबु बाबाजी जुंझारराऊ देसमुख ता। कानदखोरे बिदानद सु॥ सलासैन अलफ अर्दास छ ११ जमादिलोवल रा। छ १२ जा। लिहिले कीं, साहेबीं तकवेतीचे खुर्दखत सादर केले ते सिरीं धरिले, सरफराज जालो, तेथे रजा फर्माविली कीं, ता। मा।चे तसविसीबदल सिदी अजमास किताबती पाठविली आहे? त्यावरुनु

सरंजामी होईल ते खबर हुजूर लिहिणे. ह्मणौनु रजा. तरी मौजे काळवडी ता। म॥ तेथील प्रजा कामसेटी काटकर बकाल व लुखोजी लिह्मण साल गु॥ त॥ खेडाबाराहून आणौनु मौजे म॥ निमे त्यास देउनु मामूर केले होते. त्याच्या घरावरी बलवंतरायें माणुसे से सवासे पाठउनु घर जाळिले. घरामधे वित जळाले. त॥

बैल गाडे व हुणम १०

ह्मैसी १० .

ह्मैसीची वासरे ८

जोरी ४ च्यार मण कुपे २

सदरहू जाळीले व दोघे कुणबी जखमी केले. ते जेर आहेती व अवरत माना ४ जखमी केलिया आहेती. त्या हि जेर आहेती. याखेरीज गला व वस्तभाऊ मोबलग जळाली. याकरिता मौजे म॥ व आणीकहि कितेक गौऊ बेदिल जाले आहेती. ऐसी खराबी होते. व साहेबाची किताबती माहालास पैवस्ता जाली, ते कारकुनानजिक पाठविलीयावरी त्यावरी कमीनास माहालदार पाठउनु किलेकराची गुरे मागत होते. त्यावरी कमीने बा॥ जाबिता माहालदाराचे हवाला गुरे केली. ते गुरे व हे गुरे सिदी अजमें आपले निसबती ठेविली. त्यावरी किलेमजकुरास माहालदार पाठउनु रयतेची गुरे किलेकरापासुनु आणविली. गुरे सुमार ११४ बाकी किलेकरी निवडुनु ठेविली. गुरे सुमार १०२. ए बाबे तकवा देउनु सिदी बोलिले आहेती कीं, गुरे राहिली आहेती ते आणौनु व रयतीची रयतीस देउनु आणि मग किलेकराची गुरे किलेकरास देउनु. व सिवेचे बाबे माहालीच्या कारकुनास किताबती लिहिली आहे कीं, दो चौ रोजामधे एउनु निवाडा करुनु ह्मणौनु बोलिले आहेती. त्याची तालीक बंदगीस पाठविली आहे. त्यावरून रोसन होईल. व एदिलशाही लोकी एउनु प॥ शिरवळ कबज केले आहे. कोठी बलकटी केली आहे. त्यापासीं घोडी हजार २००० एउनु बैसले आहेती. तेही कमीनास खुर्दखत सादर केले आहे. ते ऐन खुर्दखत बंदगीस पाठविले आहे. त्यावरुनु रोसन होईल. व ता॥ म॥ किलाचे तसविसी बा॥ तजावजु जाले आहे व कितेक गावीच्या प्रजा जागा जागा जाउनु राहिले आहेती. आजी संचणीचा वख्त आहे. रयतीस लुगडी पाठविली पाहिजेती. व तकवा दिलदारी पाठवणे. जागा जागा प्रजा गेलिया आहेती त्याहि एतील. ए बाबे दिरंग न करणे ह्मणौनु लिहिले. मालूम जाले. सिदी अंबरास किताबती पेसजी पाठविली होती. त्यावरून तेही कामावरी एउनु बहुतेक तह केला आहे. काही होणे आहे याबदल हाली किताबती पाठविली आहे त्यावरुनु अवघी सरंजामी होईल. पेस्तर तुह्मी आपले तरफेन कुसूर

हो नेदणें. एदिलशाही लोकांचे बाबे लिहिले. तरी तेही सिकस्ती खादली. तुह्मास मालूम जाली असेल. हाली आपले तरफेची नामजादी विजापूर पावेतोवरी गेली आहे. तुह्मी काही त्याची शक न धरणे. तू दौलतखा आहेसि. दौलतखाईस तकदीर केली नाही. हाली लावणीचा वख्त आहे. दिल घालुनु लावणी करून साल दरसाल कीर्दीमामूरी होन दस्तास माहाल ए ऐसे करणे. तुज हुजरून लुगडी पाठविलीं आहेती. हे घेउनु आपला खातिरजमा करणे. मोर्तब सुद."

रुजु सुरु निवीस

तेरीख १९ माहे जमादिलोवल

लेखांक १७.

१५५३ पौष शुद्ध १२

"अज रख्तखाने खुदायवंद ख॥ खुदावंद ख॥ खूलीदयामदौलतहू बजामीबु बाबाजी झुंझारराऊ देसमुख तपे कानदखोरे बिदानद सु॥ इहिदे सलासैन अलफ. अर्दास छ १९ जमादिलावल र॥ छ ३० मिनहू एदिलशाहाचे काही जातीचे बाबें बयानवार तपसिले लिहिले व किलेकरीयाची खबर बयानवार लिहिली, मालूम जाली. किलेकरी तपे म॥ कबज केले ते एथीले हुकुमे नाही. मुलुकगिरी-बदल कोरे सिकियाचे फर्मान हुजरून त्यानजीक पेसजी पाठविले आहेत, त्यापैकी दरम्यान च त॥ म॥ नाव घालुनु ऐसा अमल केला असेली. हाली हेजीब पंडितीं हुजुरतीचे बंदगीस मालूम करून, ताजा ताकीद फर्मान घेऊनु पाठविला आहे. व हजरती साहेब बहुत गरम जाले की, बगर रजा ऐसी कामे करितो. वख्त गेला. हाली याचा याबदल तहमुली केला. अमल जालयावरी याचा नतीजा यास पावेल. तू दौलतखा नफर आहेस. किलेकरियास बाहेर घालून, रयती लोकांचा दिलासा करून, माहालीची उगवणी करून रसद हुजूर पाठविणे. किलेकरी जोरी करितील तरी तुवा लोक मेळउनु संगीनाती करुनु सर्तीसी जाब देणे. मुलाहिजा न धरणे. जेणेकरून तुझी सरफराजी होए ऐसा अमल करणे. किलेकरी जे उचापती केली असेली ते फिराऊन घेणे. ए बाबे फर्मान हि पाठविला आहे. मोर्तब सुद."

तेरीख १० माहे जमादिलाखर

लेखांक १८.

१५५६ कार्तिक वद्य १२.

"अज रख्तखाने खुदायवंद सिदी अजम सिदी अंबर अंबर हवालदार किले

कोंढाणा खुलीदयाददौलतहू बजानेबू कारकुनानि ता। कानदखोरे बिदानद सु॥ खमस सलासीन अलफ बाबाजी कान्होजी झुंझारराऊ देशमुख ता॥ मा॥ यासी इसाफती अजराम-हामतीबद्दल निवाले दिधला असे. मवाजे दोनी २ एकून बेरीज टके ८५९॥१०॥

मौजे विहीर अज रकम टके ३०९॥.

मौजे अत्रोळी अज रकम टके ६१९ पैकीं पेसजी इसाफती रुजू दस्तमल बा॥ सेत उंबरपेढ ए॥ टके ६८॥।१॥ बाकी हाली अजराम-हामती देह सदरहू दिधला असे. ए॥ बेरीज टके ५५०।१०॥

एकुनु सदरहू मवाजे देहे २ अजराम-हामती दिधले असती. बाब महसुलेसी देखील बाजे बाबा कुलबाब कुलकानू दिधले असे. दुमाला कीजे. दर हर साल ताजे खुर्द खताचा उजूर न कीजे. तालीक घेउनु असली फिराउनु दीजे. मोर्तबु"

तेरीख २५
जमादिलोवल

लेखांक १९.

१५६० मार्गशीर्ष शुद्ध ६.

"अज रख्त राजश्री बाबाजी झुंझारराऊ देशमुख तर्फे कानदखोरे दा॥ बे॥ रुद्राजी त्रिमल कुलकर्नी ता॥ मा॥ सु॥ तिसा सलासीन अलफ. कारने साहेबाचे बंदगीस कतबा दिधला ऐसाजे. कुलकर्नाचे करकसा गोजोवा व बाजी यामधी अपनांत लागले होते. ते साहेबी तिसरे तकसीम मा॥ टके १२० पैकी यारीदियाचा बा॥ टके २० देऊन बाकी टके १०० खाऊन व पाबाचे सेत मा॥ पैकी निमे व धानेबीचा पा + + तिसरी तकसीम खाऊन असने व दिवान तसरीफ तिसरी तकसीम घेऊन असने. त्यास हरकती करी तरी साहेबाचा गुन्हेगार व पडिझडी तिसरे तकसीमेसीस कबूल असे. हा कतबा सही पेसजी निवाडियाचे कागद असतील ते रद कतबा सही."

बिकलमु

गोही

बापूजी बापदेऊ अंताजी

खासनीस देशमुख ता। मा। गोही काळजी त्रिंबक
रेखोजी सरखो मु। बोपाजी सर्जाराऊ
मौजे वाजल देसमुख का। मावल
पा। पुने

तेरीख ४ माहे साबानु.

लेखांक २०.

१५६७ पौष शुद्ध ४.

"अज दिवाण मसरुल हजरती राजश्री दादाजी कोंडदेऊ सुभेदार नामजाद किले कोंढाणा व माहालानिहाय ता। बाबाजी जुंझारराऊ देशमुख ता। कानदखोरे सु॥ सीत अर्बैन अलफ. तुवा एउन आह्मापासी सांगितले जे, आपले इनाम सेत सालाबाद मौजे अतुरलीस होते; ते अतुरली इनामती सरदेशमुखीस दिल्ही. त्या खाले ते सेत दिल्हे. ते सेत इनाम आपणास सालाबाद चालिले आहे. आपणास नफराई पडते. साहेबी मेहरबान होऊन, त्या सेताचा मुबदला आपणास सेत मौजे दापोडा देविले पाहिजे, ह्मणोन सांगितलें. तरी आह्मी तरफ मजकुरच्या तरफदारास लिहिले आहे जे, त्यास सेत अतुरलीस इनाम किती होते ते मनास आणौन, त्या दस्तेदस्त यास मौजे दापोडा एक सेत इनाम देणे ऐसे लिहिले आहे. ते देतील. ते सेत कीर्दी करून खाणे. तेरीख २ जिलकादी."

लेखांक २१.

श्री १५७९ वैशाख वद्य १२.

"राजश्री बाबाजी जुंझारराव मरळ देशमुख खंडो सजणाजी देशपांडे ता। कानदखोरे गो। यांसि.

श्रो। गोविंद सामराज नामजाद सुभा प्रांत मावळ आसिर्वाद. सु॥ सन सबा खमसैन मया अलफ ता। मजकूरची रयत तजावजा जाहाली ह्मणून वर्तमान विदित जाहले. त्यास, तुह्मी जमीदार असतां मुलुकची संचणी करीत नाही हे गोष्टी कार्याची नाही. तुह्मास दस्त भरून द्यावे लागेल. मुलुकचे संचणी करावयास अंतर केलिया कार्यास येणार नाही. तरी तुह्मी रयत तजावजा होऊन न देणे. माहालिची संचणी करणे. राजश्री माणको पिलदेव याजकडे जाऊन, बोलीचाली करून रयतीस मशागतीस लावणे. या गोष्टीस हैगैवर न घालणे. जाणिजे छ २५ रजब या कामास हिरोजी सोनवणी पाठविला. यासी रुपये १० एक देणे. छ मजकूर."

लेखांक २२.

१५८८ माघ शुद्ध १०.

"महजरनामा सके १५८८ पराभवनाव सवछरे माहा सुध दसमी वार गुरुवार तदिनी हाजीर मजालसी गोत व मातुश्री आवाजी स्थल मुकाम सो धानीब ता कानदखोरे.

मातुश्री आउसाहेब

वेदमूर्ति भानभट व नारायण भट सातपुते सो धानीब

श्रीपति जोसी वृतीवंत मामले राईर

देसकुलकर्णी ता मजकूर

विसाजी गोज प्रभु

तिमाजी रुद्राजी प्रभु

तान भट उपाधे मामले राईर

दतो बापुजी व त्रिंबक रंगनाथ खासनिस दा॥ देसमुख ता॥ मजकूर

गिरमाजी नाईक व मुरारजी नाईक गोडसे सो तुपे

मालोजी नाईक मरळ तकसीमदार

सोनजी मरळ तकसीमदार

जिवाजी नाईक मरळ तकसीमदार

बाबाजी नाईक मरळ तकसीमदार

रामाजी व रेखोजी सरखोतु ता॥ मजकूर

येसलिंग व बाललिंग मठपति

काब ठाकूर ता॥ मजकूर

भिवसेटी सेटिया ता॥ मजकूर

बालसेटी झिरंग महाजन ता॥ मजकूर

बकाजी नाईक मरळ रजपूत

रुपाजी कडू मोकदम मौजे धानीब

हरजी रेणुसा मोकदम मौजे पाबे

बनदुजी राउत मोकदम व गणोजी सुपेकर चौगुला मौजे अंत्रोली

अंबाजी व सोनजी पिलाणा माकदम मौजे कातवडी

बाबाजी व होनाजी सेडकर मोकदम व कोंडाजी चापाजी डफाला चौगुला मौजे दापोडे

विठोजी गायकवाड व भिकाजी दाहीगावा मोकदम मौजे खांबोडे

+ + + व भिवजी चोरघा मोकदम मौजे कोलवडी

जावजी व कोंडाजी अधवडा मोकदम मौजे लासीरगाउ

जावजी व रामाजी सेडकर मोकदम मौजे मालोवली

+ + + व पिलाजी लिह्मण मोकदम मौजे विझर

हरजी व मल्हारजी पायगुडा मोकदम मौजे खांबोडे
गोंदजी धिउला मोकदम मौजे गिहर
सोनजी कारला मोकदम मौजे खैरव
नागोजी व हर्जोजी दारवटकर मोकदम मौजे कोडिगाऊ
कान्होजी भगत कोळी
तुकोजी लिह्याणईदार मौजे धानीब
एसजी तेली मेहतरिया ता॥ मजकूर
रूप माहला न्हावी मेहतरिया ता॥ मा॥
कृष्णजोगी मठपति तर्फ मजकूर
पिलाजी व कान्होजी दारवटकर मोकदम मौजे राजणे
साबाजी ठोसर मोकदम कोढवले तुपे
गोदजी सिलामकर मोकदम मौजे विहर
सुऱ्याजी व बावजी डांगा मोकदम मौजे बाह्मणघर
माललिंग रजपूत
एसदरणा गुरव मेहेतरीया ता॥ मा॥
येमसालवी व आबासालवी कुंभार मेहतरिया ता॥ मा॥
गोदवरटा व चापवरटा परीट मेहतरिया ता॥ मा॥
बापनाक व भिकनाक माहार वृत्तीकर मौजे धानीब

खंडनाक व भिवनाक वरगण ता॥ मजकूर

सदरहू गोत बैसोन, बाबाजी झुंझारराव देसमुख तर्फ कानदखोरे याचे भाऊ मलोजी पतंगराव या हरदो जणामध्यें वृत्तीचा कथळा होत होता. त्याबद्दल सदरहू गोत बैसोन हरदो जणाचे वाटे केले व घरातून वेगले निघाले. ते वख्ती घरी जे कांहीं गुरढोर व पैके व गला व बाजे जिनस जे होते, ते कुल वाटून दिधले. कांहीं एक जरा उबार ठेविला नाहीं. या खेरीज वृत्तीचा वाटा मलोजी पतंगराव यासि बाबाजी झुंझारराव देसमुख यापासून वाटा देवविला. टके २५० अडिचशे टके यासि जागा.

हक तपेसमधें पैकीं देहाये २ एकूण एक टके

मौजे लासरगाव कास खंडी १२ यासि वजा सोडी खंडी ३ बाकी खंडी ९ एकून हक ४५ लाजिमा दर खंडीस टके ५ऽ एा॥
२।· तूप मापी ऽऽ॥ एकूण
२ऽ दसरा बकरे
·।· कोंबडे १ एा॥
ऽ६ कोहले एा॥

मौजे वेले खुर्दकास खडी ८ एकून हक टके ४० लाजिमा टके
१॥ दसरा बकरे ·।· कोंबडे १ एा॥
ऽ६ कोहले १ एा॥
२ऽ तूप मापी ऽऽ४ एकूण
२ऽ रावणूक ना॥ माहार रोज १२
४ऽ मोचेजाली

३७ रावणूक ना। माहार रोज १८ टके	२७ शाकार व पाणभारे
४॥· मोचे जाली	३३७ गला कैली खंडी १७ गांवखंडी
॥६ शाकार व पाणभारे	०॥१॥२ वानवला
३४॥८ गला खंडी	७१॥१ उडीद हवरे
	१॥३
१७ गाव खंडी	दर मण टका १
·॥३७२ वानवला	
७१॥ उडिद हवरे	
१॥४॥२	८४॥।६
दर मण टका १	तेरीख
	९४७८
	८४॥।६
९४७८	१७९७२

इनामती पैकी सेत २

एकूण टके

७०॥।१०

सेत धनमाल मौजे दापोडे रकम पैकी टके ४०७	सेत धानीब पैकी बीनाम नाखती पैकी व किरकोळ टके १२॥·
याखेरिज ऐवज हकदार आलाहिदा ऐवज	सेत कोलवडी टके १८।१०

एकूण टके २५०७ अडिचसे देवविले. तेणेप्रमाणे मलोजी पतंगराव याणी मान्य करून तकसीम घेतली. पुढे बाबाजी जुंझारराव यासि व मलोजी पतंगराव यासि मिरासीच्या कथलियाचे बाबे अर्था अर्थी समंध नाही व घरामधे हि जे काहीं वस्तभाव गला व पैका व बाजे जिनस होते, ते गोताने वाटून देवविले. तेहि मलोजी पतंगराव यानी मान्य करून तकसीम घेतली. पुढे काही हिला हरकती हरएक बाब करावयास गरज नाहीं. लेकराचे लेकरी मिरासीचा व वस्तभाव गला व पैका व बाजे जिनस जो होता त्याचा कथला तुटला असे. यांसि हरदो जणामधे जो कोण्ही इस्किल करील तो देवाचा व दिवाणीचा खोटा व तपेसमधे हरदो गाव दिधले आहेत. तेथील देसमुखीचा भोगवटा खवस टका व गावटका व पाटास व वऱ्हाडास दरएकास रुपये ·।· सालाबाद चालिले आहे ते बाबाजी जुंझा-

रराव याणीच घ्यावे. मलोजी पतंगराव यास काहीं समंध नाही. हा महजर सही. सुा सबा सितैन अलफ छ ९ साबान. व हर दो गावीं जकातीचा हसील होईल. त्यास जो विश्वा देसमुखीचा हक होईल, तो बाबाजी जुंझारराव याणीच घ्यावा मलोजी पतंगराव यासि काही समंध नाही. गावटका व खवसटका व वऱ्हाडास व पाटास रुपये ·।· एकूण बाबी च्यारी बाबाजी जुंझारराव याणी घ्यावे. वरकड किरकोल कमाविसी हक मलोजी पतंगराव याणी घ्यावे."

लेखांक २३.

(फारसी मजकूर) १५८९ मार्गशीर्ष शुद्ध १४.

"कौलनामा बेस्मी बाबाजी जुंझारराव देसमुख ताा कानदखोरे सुा समान सितैन सन १०७७ कारने कौलनामा लिहून दिधला ऐसा जे. नाा मजकुराने एऊन जाहीर केले जे, आपन सिवाजीच्या दहशती करून पळून साहेबासी आलो आहे. तर साहेबी मेहरबानी करून गडाखालिया राहावयां जागा दिधली पाहिजे. व कौल दिधला पाहिजे की, खातिरजमा करून लेंकरबाळासी साहेबा कदमासी राहून. यावर साहेबी त्याची अर्ज खातिरेस आनऊन गरीबीवर नजर देऊन, सोनमेटी राहावयास जागा दिधली असे की, तुह्मी आपले भाऊबंदासी खातिरजमा राखोन जागा मजकूरवर राहोन कोन्हे बाबे मुलाहिजा न धरने. माा हा कौल सही माा"

तेरीख १२ जमादिलाखर

सन १०७७

लेखांक २४.

१६०४ श्रावण वद्य २.

"राजश्री कान्होजी जुंझारराऊ देसमुख ,

ताा कानदखोरें साहेबाचे सेवेसीः—

विनंति सेवक विठोजी प्रभु देसकुळकर्णी ताा मजकूर जोहार विनंति. सुा सलास समानीन व अलफ उपर आपण व आपला तकसीमदार विसाजी गोज प्रभु ऐसे ह्मा बटाई पासुन सात पांच साले चाकरी गेलो. मागे तिमाजी मादाजी यानी गावकुळकर्णी खादली. त्यावर सन इहिदे समानीनामध्यें विसाजी गोजप्रभु वतनावर आले. त्यावरी आपनास एणे लागले. देसकुळकर्णी गावकुळकर्णी चालविली. सन इसने तिमाजी प्रभुकडे गेले. साल मजकुरी देसकुळकर्णी गावकुळकर्णी आपले सांभाळी विसाजीने एक साल केली. ऐसियासि आपले ह्मातारपण ह्मणुउनु साला

जावास न पुरवे ह्मणौउनु साहेबास वर्तमान सांगितले. त्यावर साहेबीं मनास आनुनु आमच्या राजीपणे विसाजी गोजप्रभुचा तह करून, कारभार एकमते करावा. आपण केले ते विसाजीने केले व विसाजीने केले ते आपण केले. ऐसा तह साहेबीं आमच्या राजीपणे केला. हक उत्पनाची विल्हे ता।

देसकुलकर्णी हक टके १५२	गांवकुळकर्णी १६ ता।
यासि ता।	१२ विसा
१०२ विसाजी प्रभु	४ विठोजी
५० विठोजी प्रभु	१६
१५२	

लिहिनियासि आपला
मूल दादाजी फडी
हाताखाली ठेवावा.

एणे प्रों विल्हे केली. यासि परसपरे मनामधे किंत जरी करील त्यास श्रीची आण व साहेबाच्या पायाची आण असे लिहिले.

सही छ १५ साबान हे विनंति

गोही

त्रिंबक रंगनाथ खासनीस

देवजी पाटील बाहीर

अजहती देसमुख ता। मा।

\+ + + + +
\+ + + + +

गोजाजी लिह्मण

महालिंग जंगम
मठपति ता। मा।

लेखांक २५.

श्री. १६०४.

"राजश्री राउसाहेव देसमुख तर्फ कानदखोरे
साहेबाचे सेवेसी.

सेवक विसाजी गोज प्रभु देशकुळकर्णी तर्फ मजकूर सेवेसी विनंती सु॥ सलास समानैन व अलफ उपरी ई॥ दाटाई पासून आपण चाकरीस गेलो. त्यावरी सन इहिदे समानीनामध्ये मिरासीस आलो. त्यावरी मागे तिमाजी व गदाजी तकसिमदार इही देसकुळकर्ण व गावकुलकर्ण हक उत्पन्न खादले होते. ऐसियासि आपण आलियावरी इहिदेचे साले, देशकुळकर्ण चालवावयास साहेबाच्या मते कारबार

सेवकाचे स्वाधीन केला. आपण आपला जोगजोड असावा ह्मणून, आपला भाऊ आवजी प्रभु राजश्री आबाजी प्रभु कुलकर्णी तर्फ चाडवे याचे येथे होता, त्यासी बोलाविले व राजश्री विठोजीकाका तर्फ मोसेखोरा होते त्यास हि बोलाऊ पाठविले. त्यावरी राजश्री विठोजी काका आलियांवरी कारकिर्दी राजश्री केशोराम हवालदार व राजश्री गदाजी प्रभु मजमुदार ठाणे मुा मोजे विंझर येथे चाहुडीस साहेबा हुजूर आपण दो हि रुमाल एक देशकुलकर्णाचा व एक गावकुलकर्णाचा ऐसे दो हि रुमाल विठोजीकाकापुढे ठेविले की, तुह्मास चालेल तो एक रुमाल आपणास्वाधीन करून घेणे. त्यावरी विठोजीकाका इही दो हि रुमाल सेवकाच आधीन केले, आणि जे तुह्मी द्याल ते घेऊन ह्मणवून उतर दिल्हे. इतकियांत ते साल गुदरले. इसने तिमाजी प्रभूकडे लागले. हाली सालमजकूर सनसलासाकारणे सेवक साहेबास साक्ष करून गावकुलकर्णे १६ सोला व देसकुलकर्ण ऐसें दोही हि राजश्री विठोजीकाका स्वाधीन केली. त्यावरी राजश्री विठोजीकाका इही साहेबा हुजूर कथळा केला कीं, देसकुलकर्णाचा मुशाहिरा १५३.. एकसे त्रीपन पैकी तिही द्यावे टके ५७ *"

लेखांक २६.

१६१० ज्येष्ठ शुा। १२.

(फारशी मजकुर)

"कौलनामा ता संकराजी जुंझारराऊ देसमुख ताा कानदखोरे सु॥ सन हजार १०९८ कारणे बादे कौलनामा ऐसाजे तुवा बापूजी मोकदम मौजे पावे ताा मजकूर याणे मालूम केले जे, देसमुख माा गणीमाचे ताा होता. हाली मुलकात येउनु आपले ताा देहबदेह लावणी करील, मुलूक वसाहती करील, आणि हजूर रुजू होईल, ह्मणउनु मालूम केले. बाा मालूमाति खातीरेस आणून, तुज कौल सादर केला असे. तर तुवा आपली खातीरजमा राखोन सुखें येउनु, आपले ताा अबदानी करणे. आणि हुजूर येउनु रुजू होणे. ताा माा अबादानी वसाहती करणे. अबादानी केलियाने तुझा मजुरा होईल. तर तुवा सुखे आपली खातीरजमा राखोन येणे. कोन्हे बाबे शक अदेशा न धरणे. बेशक होउनु सुखे येणे दरीं बाब कौल असे. मोर्तब सुद."

तेरीख १०
साबान.

---

* पुढें एक बंद गहाळ.

लेखांक २७.

श्री १६१२ आषाढ शुद्ध ८.

"मा। राजश्री कान्होजी जुंझारराऊ देसमुख ता। कानदखोरे यासि रामचंद्र नीलकंठ सु॥. इहिदे तिसैन अलफ तुह्मी विनंतिपत्र पाठविले + + + + न वर्तमान कळों आले. आपण प्रचंडगडीचे बाबे खटपट करून, गड हस्तगत करून दिल्हा. कापत गनीम गडावरी आला होता. ते समईहि कस्त करावयाची ते केली; ह्मणून कितेक तपसिलें लिहिलें. त्यावरून मुजरा जाला. कष्ट मेहनत केलीया गोमटेंच होईल. आपणास गनीमानें धरून नेलें होतें, परंतु हर इलाज करून प्रचंडगडास आलों. किहीम गडी च होता. आपण एकनिष्ट ह्मणोन. तरी तुह्मी एकनिष्ट, ए गोष्टींचा भरंवसा आहे. पुढें कितेक कार्य-प्रयोजनें होणें आहेत. राजगड सिंहगड हे किले हस्तगत जाले पाहिजेत. तरी एविशींहि खटपट तरतूद करून हस्तगत होत तें करणें, आणि आपले विशत्कारे गोमटें व मुजरा होए ते करून दाखविणें. ए विशे भरोसे तुमचे मानिले आहेत. त्याचे सारिखी वर्तणूक करावयास आळस न करणें. हरएकविसी आपला दिलासा असों देणें. जाणिजे छ ६ सौवाल."

लेखांक २८.

श्री. १६१२ आश्विन शुद्ध १५.

"राजश्री हवालदार व कारकून ता। कानदखोरे गोसावियासिः—

॥ ६ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक

माहादाजी सामराज सुभेदार व कारकून महालानिहाय प्रांत मावळ नमस्कार. सु॥ इहिदे तिसैन अलफ. मोगलांचे धामधूम आपल्या राज्यांत आज तीस वरसे होत आहे. यामुळें मुलूक वैरान जाला. साल गुदस्ता मोंगलास रायगड कबज जाला. मुलकांत मोगलाईचा अमल चालिला. हाली श्रीकृपेनें आपल्या राज्याचा मामला थाटत चालिला. ऐसियासि देशमुख व देशकुलकर्णी व मोकदम त॥ म॥ सुभा एऊन अर्ज केला कीं, आपण वतनदार राजश्री साहेबाच्या पायासी एकनिष्ठ आहों. राजश्री कैलासवासी स्वामींचे वेळेस आपलीं वतनें अमानत करून हकाच्या मोईनी करून देत असेत. सांप्रत गनीमाचे धामधुमेकरितां व दुकाळाकरितां रयती गेली, मेली. रुईजुई राहिली. त्यास खावयास व वाहावयासी नाहीं. ए जातीचा रयतीचा विचार जाला आहे. रयतीचा बहुत वजा दिलासा करून, कीर्दी मामुरी करऊन साहेबांच्या किल्या कोटाची मदती करावी लागते. तरी साहेवीं आह्मां वतनदारावरी कृपादृष्टीनें पाहोन, आमची वतनें इनामती व इसा-

फती हकलाजिमे जे आहेत, ते आमचे आमचे दुमाला केली पाहिजे, ह्मणून अर्ज केला. त्यावरून हकीकत मनास आणून पाहातां, वतनदारांचीं वतनें वतनदारांच्या दुमाला केल्या विरहित पोटतिडीक लागोन मुलूक मामूर होत नाहीं, व मुलकाचा जफ्त रफ्त होत नाहीं, ऐसे कळों आलें. त्यावरून देशमुख व देशकुलकर्णी व मोकदम व बाजे मिरासदार यांचीं वतनें व इनामती व इसापती व हकलाजिमे इनामतीची सेतें, सेरिया याची याचे दुमाला केली असेती. तरी तुह्मी सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणे. तालीक लेहून घेऊन असल परतोन यांजपासीं देणें. जाणिजे. छ १२ मोहरम मोर्तब सुद."

लेखांक २९.

श्री. १६१४ मार्गशीर्ष शुद्ध १.

राजेश्वरीभगवती

राजश्री बाबाजी जुझारराउ देसमुख
तर्फ कानदखोरे साहेबाचे सेवेसीः—

राजश्री भानभट

अर्दास राजश्री

सेवक तिमाजी रुद्रा प्रभु देसकुलकरणी तर्फ मजकूर सेवेसीं. अर्ज सुा. *सलासीतैन अलफ सेवेसीं अर्ज ऐसा जे, साहेबीं आपल्या वडिलास इनाम गांवीं सेत मौजे पावे नजीक सीव मौजे दापोडी तर्फ मजकूर येथील सेत देऊन, चाकरी घेतली आहे. ऐसियासि हाल्ली आपणापासून चाकरीस अंतर पडिलें. ह्मनऊन साहेबीं सेत सालेदा अमानत करविले होते. त्यावरी आपण साहेबांची चाकरी जैसी कांहीं आपल्या वडिली केली आहे तेच रवेसीनं करावयासी रुजू जालों. ये बाबे साहेबांस मालुम केलें. बितपसिलः—

वेदमूरति दतो बापुजी हेजीब
गनोजी सुपेकर चौगुला मौजे अगौली
सोनजी बीन रतनोजी सेडकर मोकदम मौजे दापोडा

कृष्णाजी मरल
रेखोजी ढरखोली तर्फ मजकूर
सोनजी हिराजी
जाउजी आधवडा मोकदम मौजे लासीरगाव
साबाजी ठोसर मोकदम मौजे कोढवल
बावाजी डागी मोकदम मौजे बाह्मनघर

* सलास तिसैन असें पाहिजे.

आपले बाबे मालूम केले, त्यावरून साहेब मेहरवान होऊन, आपले सेत मि॥ टक्के ५० पैकीं तकसीम विसाजी गोज प्रभु निमे टके २५ त्याचे दुमाले केले. बाकी टके २५ आपली तकसीम आपले दुमाले केली. तरी आपनहि जैसी कांही आपले वडिलीं साहेबाची चाकरी केली आहे. तेन्हेच प्रमाणा पुढेहि एकतारीने चाकरी करून, एबाबे साहेबांच्या पायापासीं आपल्या वडिलानी जे काही क्रिया इमान करून, चाकिरी केली आहे, तेन च प्रमान आह्मी हि करून सेवेसीं अर्ज.

बीकलाम तीमजी रुद्र प्रभु

तेरीख २८ रबिलोवल."

अर्ज

लेखांक ३०.

१६१४ माघ शुद्ध २.

"राजमान्ये राजश्री (राव) साहेबु देसमुख कानदखोरे स्वामि यांचे सेवेसीं:-

॥ ७९ अर्जदास्त दर बंदगी हजरती राजाधिराज माहाराज या मंडित उदंड अविश हो. राजमान्ये राजश्री सेवक गदाजी प्रभु देसकुलकर्णी तर्फ कानदखोरे जोहार विनंती त॥ छ १ माहे जमादिलावल साहेबांचे कृपादृष्टी करून सेवकार्चे वर्तमान यथास्तित असे.

द॥ सेवकास साहेबांची रजा व कागद बराबरी तीर्थरूप राजश्री दत्तोपंतदादा या बराबरी पत्र पाठविलें कीं, दोघा विचारें पूर्वी कारभार होतेस तैसे करीत जाणें ह्मणउनु रजा. तरी रजे बरहुकूम तर्पे मजकुरास आलों. तों येथें आमच्या समंधी दाज प्रभु व विठ प्रभु यांनीं कथला केला आहे जे, देसमुखाबराबरी बाहेर पडिलेस देसमुखाचे वतन गेले. त्याबराबरी तुह्मी हि मिरासीस तुटलेस. ह्मणउनु वेव्हार सांगत आहेती. ऐसियास राजश्री साहेबापासीं उभे राहिलों. तेथें साहेबांपासीं सांगितलें कीं, देसमुख व तिम प्रभु व गदाजी ऐसे मोंगलासीं मिलोन, बाहेर पडोन मारा केला आहे. ऐसियास साहेबें आह्मांस पुसिलें कीं, कीं, देसमुखांनीं मारा केला. खरें कां काय? त्यास आपण जाब दिधला कीं, देसमुखापासून हे घडनार नाहीं. देसमुख वतनदार. आपल्या वतनावरी जेव्हां

ऐसे करितील, तो हें घडत नाहीं. ऐसियास साहेबु धनी आहेती. साहेबांच्या पायापासीं येतील, ते वख्ती आपली पखी देतील. ऐसा जाब दिधला. त्यावरि राइरीप्रत गेलों. तेथें पेसवे व राजश्री मजूमदार ऐसे होते. तेथे आपले वर्तमान हर दो जनानीं सांगितलें. त्यास, सेवकास निरोप दिधला जे, आपले साल खाणें. आनगावास आलों. छ १२ माहे रबिलाखर वर्तमान अइकिला कीं, हवलदार व मजूमदार यांची दोन च्यारसे कांहीं उचापति केली, ते सेवके पैलीच हटकिलें. त्यास राइरीउनु आलों तों छ मजकुरी समाचार आइकिला कीं, वाजी जाली, ह्मणउनु तुमच्या नांवें टके २६४ आदा चढिला. ह्मणउनु समाचार आइकिला. तो समाचार आह्मी राजश्री दत्तोपंतास हटकिलें कीं, हें खरें कां खोटें? त्यास, आह्मास त्याहीं सांगितलें कीं; कातबा देतात. त्या(स), आह्मी राजश्री दत्तोपंतास बोलिलों कीं, कतबियावरी काय मदार आहे? आज माहाली दोन अडिच हजार तहसील जाली असतां, कतबा काय करावा? अजी सेखाडी रोकडी आले, तरी त्यास पाठउनु अजी मराडीचा दिवस आहे ह्मणउनु बोलिला. त्यास पंतीं काय बोलिले तें आपनास कलत नाही. व मागते कारकून नेदीतसे जाले. हेहि कळत नाहीं. त्यास आह्मी मागते बोलिलों कीं, न पावेतां लिहिलें अन काय ह्मणउनु नेदा? तरी पेशवियापासीं मागेण ऐसें बोलिलों. त्यास सेवकाचे पाठी वेव्हार लागला आहे. तें काय वर्तमान जाले तेंहि कळलें नाहीं. ऐसियास हा समाचार राजश्री वेदमूर्ति नारायणभटास दखल आहे. साहेबांस कैसा कागद आला असे, तोहि कलत नाहीं. कारभारहि आपनास कळत नाहीं. हा कागद साहेबीं जतण करून ठेविला पाहिजे. याचा मोझ्या होईल. सेवकाची खराबी जाली ते काय ह्मणउनु ल्याहावी? वेव्हार निरमाण जाला आहे. त्यास सेवट काय होउनु येईल, तें कळत नाहीं. साहेबाबराबरी बाहेर पडिलों, ह्मणउनु बदलामी आली. माहालीं कारकुनी त्याची पटी राहिली आहे. कांहीं विचार राजश्री दत्तोपंतास पुसावा, तोहि सांगत नाहीं. ऐसा बाहेर पडलियाचा भोग जाला. कारभारहि सुर्त होईल. आपण खोता पाटिलासि बोलिलो की, देसमुखास पटयात्रा तोहि प्रभारें रेखोजी गोही आहे. आज तुह्मापासीं काय लेहोन आले असे, ते साहेबास कलो येईल. टका पैके उचापती होईल. एकएकाचे गुजारतीने होवा, तोहि कलत नाहीं. जालें वर्तमान सेवेसीं पटउनु सुर्त होय हे अर्दास."

अर्दा

लेखांक ३१.

श्री. १६१७.

"दसकत बेस्री बालोजी बीन हरजी रेणुसा मोकदम मौजे पाबे इनामती देसमुख तर्फ कानदखोरें सुा सीत तिसैन व अलफ कतबा लिहून दिल्हा ऐसाजे.— मौजे मजकुरीची गांवजात्रेंफळीं व रानसावजाची फळी देखील डुकराचे कुले व विवबा देसमुखी सालाबाद भोगवटा खादला असोन, आपण दरम्यान इस्कील केली होती. ह्मणून साहेबीं हुजूर आणून, देशमुखाचे गुजारतीनें गुन्हा शाबीत करून, गुन्हेगारी दंड रुपये ३५ पचतीस करून वसूल घेतला; आणि रजा फर्माविली कीं, इतकियाउपरी देसमुखांचा जो भोगवटा सालाबाद आहे, तेणेंप्रमाणें देसमुख मशारनिलेचे दुमाले केले असोन, तुवा हरकत केली. ह्मणून तुज गुन्हेगारि घेतली. तरी येथून पुढें गांवजात्रेची फळी व रानसावजाची फळी व डुकराची विवा देखील फळें देसमुखास देत जाणें. हरकत इस्कील करिसील ह्मणिजे तुझा उबार राहणार नाही. ह्मणून हुकूम केला. तेरी आपण गावजात्रेची फळी व रानसावजाची फळी व डुकराची विवा देखील फळें देसमुखास देईन. यास एकजरा इस्किल हरकत फितवा करीन तरी दिवाणाचा गुन्हेगार साहेब जे शास्त्र अथवा गुन्हेगारी घेतील, ते आपण कबूल असे. गांवीची संचणी लावणी करीन व मागें तीन वरसें फळी खादली आहेत, त्याची समजावीस देसमुखाचे पाय धरून करीन. हा कतबा सही*"

लेखांक ३२.

श्री. १६१८ फाल्गुन शुद्ध ८.

"छ मा। अनाम कान्होजी जुंझारराव देसमुख ता। कानदखोरे यासि भिकाजी शंकर आसिर्वाद सुा सन सबा तिसैन अलफ मा। सोनाजी जाधव मोघम चाकर रा। याचा सरिक येसजी खरवदकर पाबीयास आहे. तर त्यास वेठ बेगारीच कांहीं तगादा लावीत नव जाणे. सुखरूप राहोन किर्दी मामुरी करी तें करणें. येविसी बोभाट येऊ न देणें. छ ६ जिलकाद."

लेखांक ३३.

श्री. १६१९ वैशाख वद्य १३.

"छ मा। अनाम देशमुख व देशकुलकर्णी ता। मोसेखोरे यासि शंकराजी नारायण सचिव सुा सबा तिसैन अलफ संताजी नाईक जाधव ठाणे ता। मा। यानें

---

* पाठीला कागद चिकटविल्यामुळें तेरीख बुजून गेली.

हुजूर येऊन विदित केलें कीं, ता॥ मारी ठाणे नाइकीचें वतन आपलें आहे. ऐसियास आपण चाकरी करीत असतां, त्यास मुशाहिरा व हकलाजिमा न पावावया काय गरज आहे? हाली हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी नफर मजकुरापासून सेवा घेऊन, पेसजी ता॥ मारास आज्ञापत्र सादर आहे. त्याप्रमाणें हकलाजिमा व मुशाहिरा पावित जाणें. छ२६ सवाल पा॥ हुजूर."

सुरुसुद.

लेखांक ३४.

श्री. १६२० माघ शुद्ध १०.

"छ मा॥ अनाम राजश्री कान्होजी जुंझारराऊ देशमुख व देशकुलकर्णी ता॥ कानदखोरे यांसः—नारो यादव आसिर्वाद सु॥ तिसा तिसैन अलफ संभाजी पवार याकडे मिरासपटीची सेरणी तुह्मी आठ रुपयाची घातली होती. तो ऐवज माची पदमावतीस यात्रेबदल दिल्हा होता. यानिमित्य किलाच्या कारकुनानीं वसुलास माणूस पाठविला होता. त्यास तुह्मी तो ऐवज उडविला, आणि माणूस माघार पाठविले. तरी आज दसरियाचा दिवस, श्रीची यात्रा व्होवी, त्यास तुह्मी विक्षेप केला. ऐसा गैरमाकुल. याउपर देखत आज्ञापत्र सदरहू आठ रुपये तुह्मी खुद निसबती देणें. दिरंग न लावणें. या कामास लोक सुभानजी कवडे नामजाद माची पदमावती पा॥ आहेती. यास दविणें रुपये २ दोन रुपये रास खुद नि॥ आदा करणें. छ ८ रबिलावल."

लेखांक ३५.

श्री. १६२२ कार्तिक वद्य ३.

"छ म॥ अनाम कानोजी जुंझारराऊ देशमुख ता॥ कानदखोरें यासः—रामचंद्र नीळकंठ अमात्य सु॥ इहिदे मया अलफ. कोंकणांत हबसियानें बहुत वळवळ मांडिलियाकारणें त्यास बरा नतीजा पावावयाबदल राजश्री मलारराऊ यास सात हजार फौजेनसी आजी कुंभारली घाटे उतरोन चिपळुणास आले. त्यास सामील व्हावयाबदल आह्मी हशम घेऊन स्वार होऊन गेलों. अशास हें पत्र तुह्मास पावेल तें क्षणीं, आपला अवघा जमाव एक माणूस टाको न देतां, सारा जमाव घेऊन, बहुत सीताबीनें एऊन, आह्मास सामील होणें. एक घटिकेचा उजूर न करणें. आजिचे प्रसंगी जो मसलत चुकावील, तो मणजे गनीमादाखल असें समजोन, बहुत सीताबीने एणें. उजूर केलिया सारी मसलतेची बदनामी तुह्मावरी एईल. हें समजोन लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. छ १६ जमादिलाखर निदेश समक्ष."

लेखांक ३६.

१६२९ श्रावण वद्य ३०.

हू

"ई कौलनामा अज रख्तखाने कोट जंजिरे दंडाराजपुरी ताहा देसमुखांनी व देसपांडियानी व मुकदमानी व पटेलानी व रयायानी ता॥ कानदखोरे सु॥ आसर मिया व अलफ बादे कौलनामा ऐसा जेः— तुमचे बाबे बाजीराऊ पासलकर व तानाजी नाईक कडु देसमुख ता॥ मोसेखोरे येही अर्जे केला कीं, साहेब मेह्-रवान् होऊन ता॥ मजकूरचे रयेतीस कौल मन्हामत केला, तर गावगना रयत येऊन वस्ति करून कीर्द अबादानी होईल; ह्मणऊन मालुमाती केली. बराय मालुमाती खातिरेस आणोन मामुरिवरी नजर देऊन, तुह्मास कौल मन्हामत केला आहे. तरी तपे मजकूरचे गावगना येऊन, वस्ती करून कीर्द अबादानी करणें. आणि चौथाईचा मुकरर असे तेण्हेप्रमाणे सरकारी वसूल देणे. वसूल दिल्हा नाहीं तर कौल नसे. तर सदरहू मुकररी मोजीब वसूल देऊन, खुसी असणें. कोण्हे बाबे शक अंदेशा ना धरणें. दरीबाब कौल असे. पाा हु॥ राा अ-लिखजमतगार जबानी येसजी टक्या अफराद रा॥ छ २८ माहे जमादिलाखर सन ३ जलुस."

रुजू सुरु सुद.

लेखांक ३७.

श्री. १६३० आषाढ वद्य १४.

फारसी मजकूर

"छ २७ माहे रबिलाखर सन ३ जुलुसवाला सुाा तिसा मियां व अलफ बेाा बाजी वलद बापूजी एसवंतराऊ पासलकर देशमुख तर्फ मोसेखोरे नौकर सरकार लेहून दिल्हा कतबा ऐसा जे, कानोजी वा॥ बावाजी झुंझारराव देशमुख तर्फ कानदखोरे याचा खुद कबिला व मौजे धानेब व मौजे एलें एथील रयत अ॥ ५२ दस्तगीर स्वारी सेख याकूब सुभेदार बंद आणून जंजिरियांत कैदेंत ठेविले. त्यास, खंड ऐन व भत्ता व कोतवाली रुपये ४२१५ एकूण च्यार हजार दोनसे पंधरा करार करून, जामिना बाबे हुकूम केला. त्यावरून आपण माल जामीन असों. ता॥ छ म॥ पासून सदरहू रुपये एका वरसाने सरकारी वसूल देऊं. हें लेहून दिल्हे. सही म्रा॥ हु॥ रा॥ बहादूर जबानी गंगाजी कडू अफराद."

लेखांक ३८.

श्री. १६३२ चैत्र शुद्ध ९.

"कौलनामा अज सुभा राजश्री शामजी हरी नामजाद सुभा मावळ ताहा मोकदम व रयानी देहाय गावगना ता॥ कानदखोरे सु॥ असर मया अलफ बादे कौलनामा ऐसा जे, देशमुख व देशकुलकर्णी सुभा एऊन विनंति केली कीं, ऐंदा सुभाची स्वारी होऊन, माहालीची पाहणी केली. त्यास रयतीस पीक जालें नाही. यामुळें व पाहणीनें रयतीस दम नाहीं. यामुळें पेस्तर सालीची कीर्दी करावयासी रयत उमेद धरीत नाहींत. ह्मणुन विदित केलें. त्यावरून रयतीस कौल सादर केला असे. कोण्हे बाबे शक न धरितां, पेस्तर सालींची कीर्दी करणें. तुमची उगवणी जीवनमाफीक करून घेऊन, दरीं बाब कौल. असे. छ ७ सफर मोर्तब सुद."

लेखांक ३९.

१६३५ ज्येष्ठ वद्य १३.

(फारशी मजकूर.)

"छ २६ माहे जमादिलावल सन २ जुलुसवाला सुहूर सन अर्बा असर मया व अलफ बा॥ साबाजी व॥ तुलाजी येसवंतराऊ पासलकर देशमुख तर्फ मोसे खोरे व संभाजी मराळ बरादर नारायणजी झुंझारराव देशमुख तर्फ कानदखोरे व त्रिंबकजी करजवणा देशमुख तर्फ कर्यात मावळ लेहून दिल्हा कतबा ऐसा जे, मौजे चापेवाडी तर्फ मजकूर येथील रयत वगैरा दस्तगीर स्वारी सेख याकुब सुभेदार बंद आणून, जंजिरीयांत कैदेंत ठेविलें. त्यास ऐन खंड व भता व कोतवाली नगद रुपये ८८९॥ एकूण खुद टके सोडून ह्यांसी करार करून जामीनाबाबे हुकूम केला. त्यावरून आपण मालजामीन असो. ई॥ छ मजकुरापासून एका वरसानी सरकारी वसूल देऊं. हें लेहून दिल्हे. सही प्र॥ हु॥र रा॥ खुसमहमद जबानी रूपाजी कडू अफराद."

लेखांक ४०.

श्री. १६३९ माघ शुद्ध ३.

"निवाडपत्र शके १६३९ हेमलंबी नाम संवछरें माघ शुद्ध त्रितीया गुरुवार हजीर मज्यालसी मुकाम किले सिंहगड..

दिवाणमुद्रा.

राजश्री संताजी सोमवंसी हवालदार

राजश्री राघो बाबाजी मुतालिक सबनिसी

अंताजी पवार हुजरी नामजाद किले मार

राजश्री बालकृष्ण भैरव सुभेदार किले मार.

राजश्री अंताजी विठल कारखानिवीस

गोत भले लोक.

खंडोजी ना॥ थोपटे सरनाईक किले मजकूर.

बाजीराव पासलकर देशमुख ता॥ मोसे खोरें

रामाजीराव पासलकर देशमुख ता॥ मोसे खोरें

खंडोजी करजवणें व त्र्यंबकजी करजवणे देशमुख ता॥ कर्यात मावळ.

संताजी जवलकर मोकदम मौजे खानापूर.

रामाजी इतबारराव सरन॥ घेरा किले मार.

तान्हाजी ना॥ कडू नि॥ देशमुख ता॥ मोसे खोरें.

मालजी ना॥ कडू नि॥दार देशमुख ता॥ मोसे खोरें.

बाजी बिन कान्होजी पायगुडे देशमुख ता॥ कर्यात मावळ

माहादाजी ना॥ थोपटे पंचसहस्री नामजाद किले मार.

सुहुर सन समान असर मया अलफ. यांच्या विद्यमानें नारायणजी झुंझारराव देशमुख ता॥ कानदखोरें व उदमी व वाणी व गोळक व तेली वगैरे पेंठ घेरा किलें प्रचंडगड यांचा निवाडा केला ऐसाजे, पेशजी हपशी याची स्वारी संन तिस्सा मयांमध्यें जाली होती. ते समई बंद धरून नेला होता. त्याचा खंड रुपये ४२०० च्यार हजार दोनसें केला होता. त्याचें नावनिसी वाटणीचा कथळा वाढवला होता. त्याचा निवाडा करावयाबदल राजश्री मालजी भोसलें हवालदार व कारकून किले प्रचंडगड यार्णी किलें मजकुरास देशमुख व उदमी पाठविले. त्याची कुल हकीकत मनास आणून, तकरीरा व राजीनामें लेहून घेऊन देशमुखांस जमान रामाजीराव पासलकर देशमुख ता॥ मोसेखोरें व उदमियांस जमान कोंवजी ना॥ जोरकर नाईकवाडी घेरा किले मजकूर जमान घेऊन राजपुरीच्या मुकामीचे खंडांचें कुलारग मनास आणून, आडसवा करून देशमुखाच्या व उदमियाच्या राजीपणें खंड नावनिसीवार करार केला असे."

बितपसील रुपये

१८७५ नारायणजी जुंझारराव देशमुख
३१२॥ गोंदजी भुरुक
५०० खंडोजी सोनार
३१२॥ बकाजी तेली व सखोजी तेली व भानजी तेली
१२५ तान्ही तेलीन कोम बालोजी तेली
१२५ जावजी कडू
१०० जयाजी कासार
१०० बाळलिंग गोसावी
१२५ कृष्णाजी तेली

४२०० (?)

एकूण च्यार हजार दोन सें वसूल देणें. याखेरीज दरबारखर्च दर संदे रु॥ २१। सवा एकवीस एकूण रुपये ८९२॥ आठसें साडे ब्याणव ज्याचे बेरजेवरी जें बसेल तें देणें. देशमुखांजवळ कागद होते ते घेऊन रद केले असेत. याउपरि पुढें जो कोण्ही वेव्हार करील व कथळा वाढवील, तो दिवाणचा गुन्हेगार व गोताचा खोटा छ २ रबिलावल."

लेखांक ४१.

ई १६४२.

"हिसेबु कान्होजी जुंझारराऊ देसमुख ता। कानदखोरे खुर्द खंडी अज जामीनी खंडी कुले ता। मा। व चांदेवाडी सु॥ इहिदे असरीन मिया व अलफ खंड बाकी साल गु॥ जमा रुपये ११८३।-

ता।

खुर्द खंडी कानोजी जुंझारराऊ देसमुख ता। मा। रु॥

१५०५॥≡॥

ता।

ऐन खंड रु॥ १५००

कोतवाली आदमी २० दर खु॥ टके १७ दे॥ खुर्द टके २० दर रुपयास टके ३॥ ए॥ रुपये ५॥≡॥

जामीनी खंड कुळे ता। मा। व चांदेवाडी आदमी सुमार ५ ए॥ म॥ खंडी पैकी नि॥ देसमुख रु॥ २७७॥-॥

ता।

हवली गज गला खंडकरी ता। मा।र
आदमी २ मा।

खंड पैकी बाकी नि।। देसमुख सबब देसमुखाचे घरचें देव पूजितो, ह्मणोन त्याचें खंड पैकी बाकी देसमुखानीं आपलेकडे घेतली असे. नकद रुपये ६७।।।-

राधी रंडकी खंडकरीण चांदेवाडी
आदमी २ मा।

खंड पैकी बाकी तीस द्यावयासी अवकात नाहीं, सबब तिचा बेटा देसमुखानें आपले घरीं चाकर ठेऊन म।। खंड पैकी बाकी देसमुख रुपये ७०।।≡

जावजी कंडू खंडकरी ता। मा। आदमी १ मोकदम मौजे धानेव गाव इनाम देसमुख ता। मा। जावजी मा। फौत जाला, त्याचे औरतेस वसूल द्यावयाची अवकात नाही. वतनदार सबब मा। खंड पैकी बाकी नि।। देसमुख रु।। १३९ऽ-।।

ता।
६७।।।-
७०।।≡
१३९ऽ-।।

२७७।।-।।

तेरीज एकंदर रुपये
१५०५।।≡।। देसमुख
२७७।।-।। जामीन कुळे

१७८३।-

वसूल रुपये
१६२३।।।।

ता।

ऐन वसूल माहाली जाला रु।। ३१५।-।
ता।
१८७।।। देसमुख खुद रु।।
१२७।।-। जामिनी खंड कुळे म।। रु।। २७७।।-।। पैकी रुपये

३१५।-।

बा। परवाना बनाम देसमुख ता। मा। छ ७ माहे सवाल सन इहिदे राजश्री कानोजी आंगरे सरखेल याचे ऐवजी खर्च घालून देसमुखास मजुरा दिधले आहेत. नकद रुपये
१३१७।।।≡।।

तेरीज वसूल रुपये.

	खुद देसमुख	जामीनी
ऐन वसूल	१८७॥	१२७॥-।
मा॥ रु॥ ३१५।-।		
पैकी रु॥		
सरखेलचे ऐवजी		
खर्च रु॥	१३१७॥≈॥	०
	१५०५॥≈॥	१२७॥-।

बाकी नि॥ देसमुख यानीं माहाली वसूल द्यावयाचे करार केले असे."
रुपये— १५०ꣳ

लेखांक ४२.

हू १६४२ माघ शुद्ध १.

"इजतमाव नारायणजी झुंझारराव मरळ देसमुख व देसपांडे ता। कानदखोरे मालूम दानद सुहूर सन इहिदे अशरिन मया अलफ़. सन सीत ता। सन मजकुरापासोन चौथाई मराठे यांचे ऐवजी हुजरून यास पडत असे. त्यास, ऐवज देणें तो हुजुरून देविला जाईल. तर पेस्तर साल सन इसने अशरिनापासोन चौथाई सरकारी वसूल घ्यावयासी करार केले असे. तर सन इसन्ने अशरामध्यें सनद सादर असे. ते मोजिब जमाबंदी जे सालीं जे होईल ते गोपाळ बजाजी मजमदारसी महाल याचे मारुफतीनें रुजुवात करून वसूल देत जाणे. वसुलास हैगै सुस्ती न करणें. खूब ताकिद समजणें. वसुलास हैगै केली, तर मुलाइजा होणार नाहीं. ताकीद समजणें, व सिंहिगडचे दिमतीचे गावाची चौथाईची बाकी बहुत असे

गाव दिमत सिंहगड. गाव दिमत राघो बलाळ

रुपये ४६२८- रुपये ४३५॥=

येणेप्रमाणे बाकी पेसजी चौथाई पैकी पडित असे. ते हाली मराठे यांचे ऐवजी लिहिणें. ह्मणैन अमलदारास फर्माविले असे. तर मराठे याचे ऐवजी सदरहू बाकी वसूल करणे. अगर ते कबूल न करीत तर सरकारी वसल घेतला जाईल. तर खूब ताकीद समजोन सदरहू बाकीची विल्हे करणें. व पेस्तर साल सन इसन्ने अशरीनपासोन, जे जमाबंदी चौकस करणें. जे साली जे जमाबंदी होईल, त्याची कुल चौथाई सरकारी वसूल देणे. हैगै न करणे. ताकीद समजणें. रा। हुजूर रा। बहादूर जबानी गंगाजी जाधव अफराद रा। छ ३० माहे रबिलावल मोर्तफ सुद."

लेखांक ४३.

इ १६४३ चैत्र वद्य ९.

"ई कौलनामे अज रस्तखाने क़ोट जंजिरे दंडाराजपुरी ताा रयानि तपे कानदखोरे सुाा इहिदे असरैन मियाव अलफ. बादे कौलनामा ऐसा जेः— सीमाहाल मावळची रयतीने धासत खाऊन परागंदा होत असे. तर रयतीस कौल सादर करावा ह्मणऊन, गोपाळ बजाजी मजमूदार सीमाहाल याण्हे अर्जदास्त पाठविली. त्यावरून तपे मजकूरच्या रयतीस कौल सादर केला असे. सरकारतर्फेने तुह्मास तसवीस लागणार नाहीं. तरी बेशक होऊन आपले गांवचे गांवीं एऊन वसाहत करून कीर्द आबादानी करणे. आण तुह्मी असणें. कोण्हे बाबे शक अंदेसा न धरणें. दरीं बाब कौल असे. पाा हूाा राा बहादूर जबानी भिकाजी नाईक बोरकर अफराद राा छ २२ माहे जमादिलाखर मोर्तब सुद."

लेखांक ४४.

श्री. १६४३ माघ वद्य ३.

"आज्ञापत्र समस्त-राजकार्य-धुरंधर विस्वासनिधी ताा सेरी करेपठार काा सिवापूर सुाा सन इसने असरीन मया अलफ. मौजे पाबे तर्फ कानदखोरे हा गांव देशमुखांचा इनाम आहे. तेथें तुह्मी दिवाणाची सेरी करून ह्मणून येऊन गांवांमधें दहशत घालितां, तरी मौजे मजकुरी पेशजी सेरी होती. त्यास गांव देशमुखाचा इनाम, देशमुखाचे दुमाला केला असे. याउपरी तुह्मी मौजे मजकुरी सेरीचा कथला न करणें. खालिसा गांवीं सेरी पुरातन असेल तें करणें. इनामामधें कथळा करीत नव जाणे. जाणिजे छ १६ रबिलाखर."

सुरु सुद.

लेखांक ४५.

श्री. १६४३ माघ वद्य ७.

"मा अनाम कमाविसदार सेरी खेडेबारे यासि दताजी सिवदेव सुाा इसने असरीन मया अलफ. मौजे पाबे ताा कानदखोरे हा गांव देशमुख ताा याचा इनाम आहे. त्यास पूर्वी गाव अमानत केला होता, ते समई दिवाण सेरी जमीन सात बिघे केली होती. हाली इनाम गाव देशमुखास आहे. तेथील सेरी करावी ऐसी नाहीं. तरी तुह्मी सेरीविसीं कथला एकदर न करणें. या कागदाचे प्रति घेऊन असल देशमुखापासी देणे छ २० रबिलाखर."

सुरु सुद.

लेखांक ४६.

श्री. १६४६ चैत्र वद्य १४.

"राजश्री नारायणजी जुंझारराव देशमुख
ता। कानदखोरे गोसावी यांसः—

६ अखंडित-लक्ष्मी-आलंकृत-राजमान्य-स्नों रंगोजी इंदलकर हवलदार व कारकून किले प्रचंडगड जोहार व आसिर्वाद सु॥ अर्बा असरैन मया अलफ. बाळोजी रेणुसा व गोदजी रेणुसा ऐसे हरदो जण नेरीपासी राजश्री पंतसचिवाकडे गेले होते. त्यानी हर दो जणाचा करीना लेहून घेऊन, किले मजकुरां पाठविले आहेत. या हर दो जणाचा कजया वारावा लागतो. तरी तुह्मी देखत कागद गडास येणें. बहुत काय लिहिणें छ २७ रजब हे विनंती."

लेखांक ४७.

ह्र १६४८ चैत्र शुद्ध ६.

"ई कौलनामे अज रख्तखाने कोट जंजिरे दंडाराजपुरी ता। देशमुख व देशपांडियानि व मोकदमानि व रयानि ता। कानदखोरे सु॥ सीत असरीन मिया व अलफ. बादे कौलनामा ऐसा जेः—कुंवरजी सिरका याणें ता। पौड खोरे एथें जमाव करून, कसबे पालीची पेठ मारून नेली. ह्मणौन तुह्मीं धाशत खादलीत की, जंजिरे तरफेन स्वारी मावळांत होईल. ऐसी धाशत घेऊन, परागंदा होऊं लागलेत. सबब गोपाळ बजाजी मजमदार सीमाहाल मावळे हुजूर एऊन तुमची हकीकत जाहीर करून, कौलाबाबें अर्ज केला. बराय अर्ज खातरेस आणौन तुह्मावर मेहरवान होऊन. कौल सादर केला असे. तर तुह्मी बेशक होऊन माहालीं एऊन, कीर्द आबादानी करून, सरकारचे कामकाज चालऊन सरकारचे अमलदारासी रुजू असत जाणे. कोणें बाबें शक अंदेशा न धरणें. दरीं बाब कौल असे. प्रा॥ हु॥ रा॥ खुश मं॥ जबानी रामजी रायवड अफराद रा॥ छ ४ माहे साबान मोर्तब सुद."

लेखांक ४८.

श्री. १६४८ ज्येष्ठ शुद्ध १४.

"आज्ञापत्र राजश्री लक्ष्मण त्र्यंबक तांबे मोकदम मौजे पाबे ता। कानदखोरें सु॥ समान अशरीन मया अलफ. मौजे मजकूर देशमुख याजकडे इनाम आहे. त्यासी वतनसमंधें तुजपासून सेरणी घेतली आहे. त्याचा दोनी तकसिमा

ऐवज बाकी राहिला आहे. तो देशमुख मागत असतां देत नाहींस; ह्मणौन हुजूर विदित जाले. तरी सेरणी दिवाणांत भरून घेतली. त्याचा ऐवजास खलेल करावयास प्रयोजन काये ? याउपरी दोन तकसिमा ऐवज राहिला, तो देशमुखाकडे देणे. फिरोन बोभाट येऊं न देणें. बोभाट आलिया मुलाहिजा होणार नाहीं. ऐसे पस्ट समजोन वर्तणुक करणे. छ १२ सवाल."

लेखांक ४९.

श्री. १६४८ आश्विन वद्य ११.

"छ मा अनाम देशमुख व देशकुलकर्णी ता कानदखोररे यांसी नारो शंकर सचिव सुहूर सन सबा अशरैन मया अलफ. बालोजी रेणुसा मोकदम मौजे पाबे ता मार याचे घर व ह्मैस १ एक यास पाळक देणे. ह्मणून पेशजी तुह्मास एक दोन आज्ञापत्रें सादर केली होती. ऐसे असता, तुह्मी बालोजीस वणी घरटकीयाचा तगादा लाविला आहे. ह्मणून हुजूर विदित जालें. त्यावरून हें पत्र तुह्मास सादर केलें असे. तरी तुह्मास पेशजी पत्र सादर केले असता बालोजीस तगादा लावावयास गरज काय ? याउपर बालोजीस घर व ह्मैस १ एक पाळक देविले असे. तुह्मी सदरहू प्रो यास पालक देत जाणे. सदरहूचा तगादा लावित न जाणे. जाणिजे छ १४ सफर पा हुजुर."

लेखांक ५०.

श्री. १६४८ कार्तिक शुद्ध ८.

तालिक

"माअनाम देशमुख देशकुलकरणी ता कानदखोरें यास नारो शंकर सचिव सुा सबा अशरीन मया अलफ. महादजी बीन बालोजी रेणुसा मोकदम मौजे पाबे ता मा याचा बाप बालोजी रेणुसा यांणें साताराचे मुकामीं हुजूर येऊन विदित केलें की, आपल्यास दोघे पुत्र आहेत. वडिल भिवजी व धाकटा माहादजी. त्यास मोक़दमीच्या वतनामुळे घर ह्मैस पुरातन पालक आहे, ते भिवजीचे वाटणीस दिल्हे. धाकटा माहादजी यास पालक चालत नाही. व आपल्यासहि वतनाकरितां शेवा पडते. तरी स्वामीनीं कृपाळु होऊन महादजीस पालक दिल्हा पाहिजे ह्मणऊन विनंती केली. त्यावरून मनास आणितां.यास वतनैसमंधे सेवा बहुत पडते. याकरितां माहादजी रेणुसा यास मौजे पाबे ता मार येथे घर १ एक व ह्मैस १ एक पालक दिल्ही असे. तरी तुह्मी सदरहूप्रमाणे पालक यास व (या)च्या पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणे. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न

करणे. या पत्राची प्रति लेहून घेऊन असल पत्र भोगवटियास महादजीजवळ परतोनं देणे छ १६ रबिलावल."

लेखांक ५१.

श्री. १६४८ पौष शुद्ध ११.

फारसी मजकूर

"अज दिवाण रा खास बजानेबु देसमुखानि तपे कानदखोरें मामले राएर बिदानद सु॥ सबा इसरीन अलफ. हेजीब वा मा पतंगराऊ बंदगी हजरती मालूम केले जे, म॥ इलेस मुकासा तपे कानदखोरें मामले राएर व महाल तपे मजकूर मुकासा बा॥ हुजती बाहसिके खास व बा॥ हुजती म॥ सादर आहे. तेथे तेजी भेटी व उलफेपटी सिस्त केली आहे. म॥ फर्माउनु दुमाला व मा फर्मान होए मालूम जाले. बा॥ इशारती दिवाण अला बा॥ इ॥ म॥ बा॥ मुकासा तपे मजकूर आहे. तेथील तेजीभेटी व उलफेपटी माइलेचे दुंबाला कीजे. मोर्तब सुद."

तेरीख ९ माहे रुजू रुजमुश्रीफ रुजू सुरुनिवीस
जमादिलोवल
पा हुजुरु.

लेखांक ५२.

श्री. १६५० वैशाख शुद्ध १२.

"आज्ञापत्र समस्त-राजकार्य–धुरंधर–विश्वासनिधी–राजमान्य-राजश्री नारोपंडित सचिव ता॥ मोकदम मौजे पाबे ता॥ कानदखोरे सुहूर सन समान अशरैन मया अलफ. मौजे मजकूर देशमुख ता॥ मज़कूर याकडे इनाम आहे. ऐशास मौजे मजकुरीं कामथ खाचरे दिवाणांत अमानत होतीं, त्याविशीं नारायणजी जुंझारराव देशमुख ता॥ मजकूर यार्णी दिवाणांत रदबदली करून, आपणाकडे करून घेतली. त्याची पत्रें हुजूरचीं व जिल्हेकडील त्याजवळ असतां तुह्मी कटकट करितां; खांचरे त्याजकडे सुरळीत चालवीत नाही ह्मणोन हुजूर विदित जाले. ऐशास दिवाणांतून खांचरे नारायणजी जुंझारराव यांचे दुमाले केली असतां, तुह्मास कथला करावयास संमध काय? हाली हे आज्ञापत्र सादर केले असे. तरी याउपरी तुह्मी नारायणजी जुंझारराव् याजपासी खांचराविसी कथला न करणें. येविशीचा फिरोन बोभाट हुजूर आलिया ताकीद होईल; हें बरे समजोन वर्तणूक करणें. जाणिजे. छ १० सवाल पा॥ हुजूर."

सुरुसुद.

लेखांक ५३.

श्री. १६५० वैशाख शुद्ध. १४.

"आज्ञापत्र राजश्री लक्ष्मण त्रिंबक तांवे मोकदम मौजे पावे ता। कानदखोरें सु॥ समान अशरीन मया अलफ. मौजे मजकूर राजश्री नारायणजी जुंझारराउ देशमुख ता॥ मा॥ यांकडे मौजे मजकूर इनाम गाव आहे. ऐसियासी मौजे मजकूरची खाचरें दिवाणांत अमानत राहिली होती. याकरितां नारायणजी जुंझारराउ यांणी दिवाणांत रदबदल करून, राजश्री स्वामींची पत्रें व जिल्हेची पत्रें करून खाचरें आपले दुमाला करून घेतली. ऐसे असतां तूं खाचराविसी यांसी कटकट करितोस ह्मणोन विदित जालें. याउपरी खाचरासीं कटकट न करणें. फिरोन बोभाट येऊ न देणे. बोभाट आलिया मुलाहिजा होणार नाही. ऐसे पस्ट समजोन वर्तणूक करणें. छ १२ सवाल."

लेखांक ५४.

श्री. १६५० फाल्गुन वद्य ९.

"॥छ मा॥ अनाम नारायणजी जुंझारराऊ मरळ देसमुख ता॥ कानदखोरे यास नारो शंकर सचिव सु॥ सन तिसा अशरैन मया अलफ साखराई मरळीमा तुमची चुलती इने मौजे मसुरे येथील मुकामी आपले वर्तमान विदित केले. त्यावरून तुह्मास सांगावयाचे तें सांगितले. परंतु तुह्मी त्याचे चालवावे, ते चालवीत नाही. ह्मणऊन हुजूर वर्तमान विदित जाले. त्यावरून साखराई मरळ याची तकसीम व इला गावगना इनामतीपैकी तकसीम असेल ते, याचे स्वाधीन करावयाची आज्ञा केली असे. तर करणें. फिरोन बोभाट येऊ न देणे. गाव इनाम व गावगना इनामे असतील, त्याची तकसीम प्रो देणे. याउपर तिची तकसीन न दिल्ही तर हुजरून मसाला होईल, ऐसे समजोन वर्तणें. छ २२ साबान."

सुरुसुद.

लेखांक ५५.

श्री धनेश्वर प्र॥ १६५६ फाल्गुन शुद्ध ५.

तालीक

"महजरनामा शके १६५६ आनंद नाम संवछरे फालगुण शुद्ध पंचमी इंदुवासरे सु॥ खमस सलासीन मया अलफ बतारीख छ २ माहे रमजान हजीर गोत ता॥ कानदखोरे बित॥

नारायणजी झुंजारराव देशमुख ता।। मार

भानजी तुकोजी देसपांडे ता।। मार

जिवाजी नाईक मरळ ह।। देशमुख मौजे दापोडे ता।। मार

साबाजी मरळ देशमुख मौजे कानद.

रखमाजी बिन होनाजी धरफळे सरखोत.

मोकदम.

खंडोजी बिन रूपाजी गांयकवंडा व जावजी बिन होनाजी दाहीगावे मोकदम मौजे खांबवडी.

सावजी व नावजी दारवटकर मोकदम मौजे राजणे निमे व तुकोजी बाधा निमे पाटील.

होनाजी बिन रखमाजी व रायाजी बिन सखोजी धरफळा मोकदम मौजे वांजळे.

गोंदजी व मल्हारजी दारवटकर मोकदम मौजे कोंडगाव.

विठोजी बिन आबाजी व राघोजी बिन मालजी राऊत मोकदम मौजे अंत्रौली.

साबाजी पायगुडा व पुतळाजी तोडकरी मोकदम मौजे खांबगाव.

कृष्णाजी बिन बावाजी व मल्हारजी बिन खंडोजी सेडकर मोकदम मौ।। दापोडे.

एसजी बिन बाबाजी व सिवजी बिन कृष्णाजी चौरंघा मोकदम मौजे कोळवडी.

भीवजी बिन बाळोजी व गोंदजी बिन सूर्याजी रेणुसा मोकदम मौजे पाबे.

एसजी बिन रायाजी लिम्हाण मोकदम मौजे विंझार.

गोंदजी बिन कान्होजी आधावडा मोकदम मौजे लासीरगांव.

खंडोजी बिन वाकोजी पिलाणा मोकदम मौजे कातवडी.

विजोजी बिन चांदजी व कृष्णाजी

सूर्याजी बिन कान्होजी व दादजी

बिन एसजी धिंउला मोकदम मौजे गींबर.

चांदजी बिन बापूजी मरळ मोकदम मौजे चपेठे.

धोंडजी बिन बावाजी डांग्या मोकदम मौजे बाह्मणेघेर.

बाकाजी बिन सताजी दुळा मोकदम मौजे कोळंबी.

सोनजी बिन हरजी भुरुक मोकदम मौजे सेनवडी.

लखमोजी बिन गोंदजी व एसजी बिन सोनजी कोढीतकर मौ॥ हीरपोडी

भावजी बिन रूपाजी गोऱ्हे मोकदम मौजे निवी.

वाघोजी बिन नाईकजी धिंडक निमे मोकदम मोजे धानेब.

कावजी बिन गोंदजी सणस मोकदम मौजे खोडप.

त्रिन एसजी सिलमकर मोकदम मौजे विहीर.

सताजी बिन राजजी कारळा व सुभानजी बिन चापाजी सिंदा पाटील मौजे खरीवे.

घारोजी बिन धावजी दुळा मोकदम मौजे पासळी.

रामजी बिन एसजी ठोंसर मोकदम मौजे कोंढवळे खुर्द.

मावजी व सुभानजी करंजकर मोकदम मौजे कोढवली.

चांदजी बिन दादजी पंवार मोकदम दोन तक्षीमा व शंकराजी बिन संभाजी गायखा पाटील तिसरी तक्षीम मौजे वेळे बु॥.

सूर्याजी बिन रामाजी माहादूणकर निमे पाटील मौजे माळवली.

चौगुले.

चापाजी बिन लखमोजी डेफाला चौगुला मौजे दापोडे.

रामजी कारीम व सयाजी रसाटा चोगुला मौजे विंझार.

रामजी बिन धारोजी जाधव चौगुला मौजे माळवली.

सोनजी बिन बाळोजी वेणुपरा चौगुला मौजे पाबे.

माहादजी कान्हेरकर चौगुला मौजे कोलवडी.

दादजी बिन तान्हाजी कानगुडा चौगुला मौजे वाजळे.

कृष्णाजी ताखती चौगुला मौजे धानेब.

एमाजी जोगडा चौगुला मौजे निवी.

रामजी बिन हसाजी भावकुला चौगुला मौजे *

सुभानजी बेन्हेकर चौगुला मौजे ब्राह्मणेघेर.

बाजे वतनदार.

बाळलिंग सतलिंग मठपति ता। मा।र

तुकोजी बिन बापूजी बाधा पाणसारा ता। मा।र

बाळ साळवी बिन राम साळवी कुंभार मेहतऱ्या ता। मा।र

धोंडजी किरवा तेली मेहतऱ्या पेठ मौजे विंझार.

एसा बिन माला व लखा बिन कान वरटे परीट मेहतऱ्या ता। मा।र

मल्हारजी बिन गणेसेट सोनार सेट्या ता। मा।र

रूपाजी बिन गोंदजी सुतार.

दाद माळी गोम माळी मेहतऱ्या मौजे विंझार

मोरोजी व कान्होजी नगीना तेली मेहतऱ्या मौजे वेळ बु।।

रायाजी परीट माळवली व विंझार.

चांभार.

जाना चांभार मौजे कानद.

सोना चांभार मौजे धानेब.

देक नाक ठाणगा
ता। मा।

महार तर्फ मजकूर.

राधा माहार मौजे कानद

घाका माहार मौजे वेळ बु।।

मोरा माहार मौजे दापोडे

बळनाक बिन कमनाक माहार मौजे माळवली व विंझार

सदव माहार मौजे वेळ खुर्द

विठा माहार मौजे अत्रौळी

सानका माहार मौजे धानेब

एसा माहार मौजे खांबगाव

कोंडा माहार मौजे कोळवडी

संभा बिन नरसा मांग

ता। मा।र

सदरहू गोताच्या विद्यमानें गोतमहजर करून दिल्हा ऐसा जेः— बे।। बावाजी बिन जावजी सेडकर पाटील चौथी तक्षीम मौजे माळवली ता। मजकूर सबब जे मौजे मजकूरची मोकदमी कदीम बे।। कान्होजी बिन रामजी सेडकर याची होती, त्यास मावळें प्रांतें ताम्राची धामधूम जाली. तेणेकरून मुलूक वैरान जाला. तेव्हां कान्होजी मजकूर याचे वडील परागंदा जाले. त्याचे ठिकाण कोठें नाहीं. आणि राजक्रांत निवारल्या उपरि ता। मा।ची लावणी करावी असे जाले. ते वेळेस कान्होजी मजकूर याचे कोण्ही गांवावरी आले नाहीं; अथवा कोण्हास ही आढळले नाहीं. याजकरितां बाबाजी बिन बाजी माहादुणेकर यांस, गावीची वसाहत जाली पाहिजे व लावणीहि जाली पाहिजे, याजकरितां कीर्दीची पाटिलकी करून दिल्ही. गांवीची वसाहत महादुणेकर यांणी केली. त्याजवरी कान्होजी सेडकर गावावरी नांदावयासी आला. इ. इ. इ.''

लेखांक ५६.

श्री. १६५९ मार्गशीर्ष वद्य २.

''राजश्री नारायणजी झुंझारराऊ मरळ देसमुख ता। कानदखोरे गोसावी यासः—

।।छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्ने।। रामाजी आपाजी व भानजी तुकाजी प्रभु देशपांडे ता। मजकूर सु।। समान सलासीन मया अलफ. कारणे सवादपत्र तुह्मास लेहोन दिधले ऐसे जे, मौजे पाबे व धानेब ता। मा। हे दोन गाव देशमुखीचे इनाम आहेत. त्यास मौजेमजकूरच्या हकाचा कजिया तुमचा व आमचा होता. तुह्मास व आह्मास किले सिंहगडच्या मुकामी राजश्री पंतसचिव स्वामीनीं आणून, कतबे दोघांचेहि घेतले. ऐसीयास तुह्मी व आह्मी परस्थळीं जाऊन वाद सांगावा हे विहित नाही. त्याजकरितां आपले संतोसें आपण समजलों. बि।।

मौजे पाबे येथील देशकुलकर्णाचा हक व सावोत्रा आपण घ्यावा व देशमुखीचा व सरदेशमुखीचा हक तुह्मी घ्यावा. ऐसा तह केला कलम १.

धानेबचा तह देशमुखी सरदेशमुखी व सावोत्रा देखील देशकुलकर्णाचा हक तुह्मी घ्यावा. कलम १.

गावगना इनामें तुमची व आमची आहेत. त्यास तुमच्या इनामावरी

आह्मास तुह्मी सावोत्रा व देशकुलकर्णाचा हक द्यावा व आमच्या इनामावरी तुह्मास आह्मी सरदेशमुखीचा हक द्यावा. कलम १.

एणेप्रमाणे तिही कलमांचा तह केला आहे. तेणेप्रमाणे तुह्मी व आह्मी परस्परे आपले वतन अनभवावे. जो कोणी आपले वौसीचा होत असतां ए गोष्टीस हिलाहरकत करील, तो दिवाणचा गुन्हेगार. गोताचा अन्याई. शक १६५९ पिंगलनाम संवत्सरे मार्गसीर वद्य द्वितीया इंदुवासरे. हे सवादपत्र लेहोन दिल्हे. सही छ १५ साबान."

विकलम रामाजी आपाजी देशपांडे ता॥ मजकूर

साक्ष.

देसक तर्फ मोसेखोरे		देसक तर्फ मुठेखोरे	
बाजी साबाजी एसवंतराव पासलकर देसमुख तर्फ मा॥	सताजी बिन बकाजीराव पासलकर देसमुख ता॥ दार तर्फ मा॥	भिवजी बिन रुमाजी गंभीरराव मारणे देशमुख तर्फ मा॥	चाहूजी बिन साबाजी गंभीरराव मारणे देशमुख तर्फ मा॥
प्रतापराव पासलकर तर्फदार देसमुख ता॥ मा॥	तुळाजी बिन साबाजीराव तर्फदार देसमुख तर्फ मा॥	माधवराव जनार्दन देशपांडेए तर्फ मा॥	बाबूराव सजणाजी देसपांडे तर्फ मा॥
मालजी बिन आबाजी ना॥ कड देसमुख तर्फदार तर्फ मजकूर	खेळोजी बिन बकाजी ना॥ जिवगणे तर्फदार देसमुख तर्फ मा॥	त्र्यंबकजी पाटिल मारणे मौजे आंबेगाऊ तर्फ मा॥	रामजी पाटिल मारणे मौजे मुरवडे तर्फ मा॥
एसाजी नरसिंह देसपांडे तर्फ मा॥	मोरो गोविंद देशपांडे तर्फ मा॥		
त्रिंबक वासुदेव	भास्कर मोरेस्वर		

देसपांडे ता॥	देसपांडे ता॥
मा॥	मा॥
संताजी भूकर	हरजी जिवगणा
मोकदम मौजे	मोकदम मौजे
वडघर ता॥	कसेळी ता॥
मा॥	मा॥

लेखांक ५७.

श्रीधनेश्वर १६६१ चैत्र वद्य १३.

"महजरनामा शके १६६१सिधार्थी नाम संवत्छरे चैत्र बहुल त्रयोदसी भौमवासरे बतारीख २६ माहे मोहरम बिहूजूर गोत

ता॥ मोसे खोरे व ता॥ कानदखोरे

(गोतांचीं नावें दिलीं आहेत. तीं महत्वाचीं नसल्यामुळें येथें लिहीत नाहीं.)

सु॥ तिसा सलासईन मया अलफ शिवजी गंगाधर व खंडो मल्हार उपनाम दिवाकर खासनीस दि॥ देशमुख ता॥ मा॥र यासी महजर करून दिल्हा ऐसा जे, तुमची खासनिसी पुरातन वतनी आहे. ऐसीयासी खासनिसीचा हक ता॥ मजकुरी चालत नव्हता कीं, पुरातन हकजाबीते होते. ते सार्वभौम या प्रांतें आला होता, त्याच्या राजिकांत कोण्हाजवळ राहिले नाहींत. त्यास मनास आणितां खासनिसीस हकाचा तह आहे. याजकरितां तुह्मास हक ता॥ मा॥री करून दिल्हा असे."

रकमी खंडकीस उगवणी टके ६०ʖ साटी टके आहे. त्यास दर रु॥ बस्तन टके २॥ अडीच प्रमाणे रु॥ २४ चोवीस रुपये होतात. ऐसीयास महालची नख्ती खंडणी जाहाली तर दर खंडी रु॥ २४. चोवीस रु॥ प्र॥ खंडकीया आकाराव्या, त्यास दर खंडकीसें हक.

रु॥ ʖ—गला कैली ʖʖ२

पाहाणी माहालची जाहाली तरी दिवाणचा आकार कैली मापें खंडी १ʖ एक उगवेल, त्यास हक.

खुर्दा टके	गला कैली
ʖ६	ʖʖ१।

१ म. इ. सा.

एणे प्रमाणे रकमी खंडकीस रु॥ दुवल व गला कैली दोन पाइली व पाहणीचे खंडकीस रुके साहा व गला कैली सवा पाइली हक करार सदरहू देशमुख व देशपांडे व मोकदम देहाय ता॥ मा॥ याचें विचारें सदरहू हक तुह्मास खासनिसीचा करून दिल्हा, आणि श्रीमंत राजश्री चिमणाजी पंडित सचिव यांसी विनंति क॥ अंबोणे ता॥ गुंजण मावळ एथील मु॥ देशमुख व देशपांडे ता॥ मा॥ याणी अर्ज करून, तुह्मास सदरहू खासनिसीच्या हकाचीं पत्रें भोगोटियासी करून देविली आहेत. छ २० माहे मजकूरची पत्रें अलाहिदा आहेत. तरी तुह्मी व तुमचे पुत्रपौत्र वंशपरंपरेनें हक तह प्रो घेत जाणें. व दर माहारास रावणूक रोज २ दोन रोज नेमून दिल्हे असेत. या प्रो माहारापासून रावती घेत जाणें. हा महजर लिहिला. सही मोर्तब असे.”

लेखांक ५८.

श्रीगेवंढे प्रा १/२ शक १७०१ वैशाख वद्य ५.

“बिदाणे इनाम राजश्री बावाजी बिन नारायणजी जुंझारराव मरळ देशमुख ता॥ कानदखोरे यांचे इनाम मौजे गेवंढे ता॥ म॥ एथें आहे, त्याची बिदाणे श्रीचा आंगारा बादनाक व मातनाक बिन धाकनाक व धारनाक बिन राधनाक माहार मौजे म॥ यांणीं सत्य स्मरोन सांगितले. शके १७०१ प्लवनाम संवछरे वैशाख वद्य पंचमी शनवार सन इहिदे समानीन मया व अलफ.

राईचे पूर्वेस कानदजी सींव धुर गवंडावर खडक आहे, त्याचे पुढे सींव पावेतो राईच्या खालता धुर गवंडकड्यावरी आहे. त्याच गवंडाने गोवंडावर नांदुरखीचे झाड त्याचे खालता गोवंड तो खाली उत्तरेस राईच्या खाली घलईच्या कड्यापासून वागजाईच्या उत्तरेस केलाचे झाड, त्या खाली सुमारे कड्यासी सींव गेली आहे.

कानदचे सींवेने काळंबीची सींवधारेस दक्षणेस गेळेगाणीची वाहाळ.

एणे प्रो बिदाणे पूर्वापार होती. त्या प्रा माहार मौजे मजकूर यांणीं दाखविली असेत. छ १८ जमादिलावल.”

लेखांक ५९.

श्रीशंकर.

"राजश्री बावाजीराव देशमुख ता। कानदखोरे गोसावी यांसीः–

ॐ अखंडित–लक्ष्मी–अलंकृत—राजमान्य श्रो॥ जैसिंगराजे सिरके रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे. विशेषः—आपणाकडील सविस्तर वर्तमान कळत नाही तरी सदैव लिहित असावे. यानंतरी श्रीचा मोहछाव आहे. तरी आपण आले पाहिजे. बहुत काय लिहिणे. हे विनंती."

लेखांक ६०.

श्री.

"राजश्री बावाजी झुंझारराव मरळ देशमुख ता। कानदखोरे गोसावी यांसीः—

॥ॐ श्रो गोविंद सामराव नामजाद सुभा प्रा मावळे आसिर्वाद सु॥ सबा खमसैन मया अलफ. तुमचा व जिवाजी ना। मरळ यांचा कजिया लागला होता. त्याचा निवाडा हुजूर राजश्री पंतीं केला. तुह्मी खरे जाला. जिवाजी नाइक खोटे जाले. त्याजबदल तुह्माकडे हरकी सेरणी रुपये करार केलेः–

१००० ऐन

२०० नजर

१२००

ए॥ तेरासे रुपये. राजश्री सिवाजीपंत मजमदार यांचे विद्यमानें सुभा वसूल करून हुजूर दिल्हे. ते पावले असेती. जाणिजे. छ १२ सफर मो सुद."

बार.

लेखांक ६१.

श्री.

"राजश्री नारायणजी झुंझारराव देशमुख ता। कानदखोरे गोसावी यांसीः–

॥ॐ अखंडितलक्ष्मी–अलंकृत–राजमान्य श्रो रखमाजी अढलराऊ देशमुख ता। वेलवंडखोरे रामराम विनती. येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लेखन करीत गेले पाहिजे. विशेष—आपण देशकुलकर्ण विशीई लिहिलें. त्यास आह्मी कासियावरून सडीं पाठवावी की, तुह्मी अद्यापी राजश्री पंताकडे गेले नाही, आणि समुख बसणेहि जाले नाही. आणि आह्मी कासियावरून सडी

घ्यावीं अथवा राजश्री पंताची आज्ञाहि नाही. त्यास, तुह्मी राजश्री पंताची भेटी घेणे. आणि तुह्मी आपले पुरातन जइसे असल ते सांगणे. मग राजश्री पंत माहालीचा देशमुखाची सडीची आज्ञा करितील. मग आह्मी पुरातन जे वर्तले असेल, ते आह्मी लेहून पाठऊन देऊं. तोवरी आह्मास सडी देता न ये. कळले पाहिजे. व गुंजणमावलचे देशमुखहि त्याचीहि सडी आणवावी. दूर माहाल आहेती. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती."

लेखांक ६२.

श्री.

"राजश्री बावाजी जुंझारराव देसमुख ता। कानदखोरे साहेबाचे सेवेसीः—

दा। बे॥ भिकाजी रेणुसे मोकदम मौजे पाबे ता। कानदखोरे सु॥ इसने अर्बैन मया अलफ. कारणे साहेबांचे सेवेसी कतबा लेहोन दिल्हा ऐसाजे, आपला आजा बालोजी रेणुसे छ १२ मोहरम पासोन पुडे उपद्रव तुह्मास थली पर—थली आपणाकडे शाबूत जाला, तरी याचा जाब आपण करून. हा कतबा लिहिला. सही छ मजकूर."

निशाणी.

(नांगर)

राघोजी बीन मालजी राऊत पा। अत्रोली घोडजी हिगा बा। रा। प्रतापराव सीलमकर देशमुख तर्फ मावळ.

तुकाजी बसापा राजपा कृष्णाजी लाड चौ। प्रचंडगड मोरोजी गोळक पेटा वेलवंडी.

लेखांक ६३.

श्री.

"श्रीमत् माहाराज मातुश्री आईसाहेब यांणीं बावाजी मरळ ता। कानदखोरे यासी आज्ञा केली ऐसीजे, मौजे पाबे ता। मजकूर येथे सरकारची सेरी पुरातन आहे. त्यास, तुह्मी इजारा सेरीचा रुपये ५० पनास सालाबाद देत असता. हालीं हुजूरचे कमाविसदाराकडे देत नाही. ह्मणून हुजूर विदित जहालें. एो यास सेरीचा ऐवजास खलेल करावयास गरज काय? याउपरी देखत आज्ञापत्र सदरहू ऐवज हुजूर पाठवणे. उजूर जालिया कार्यास येणार नाही. या कामास सिदोजी मुलिक पा। आहे. यासी मसाला रुपये १ देणे. जाणिजे. छ ४ माहे जिल्हेज सु॥ अर्बा खमसैन लेखनावधी." बार.

लेखांक ६४.

श्री.

"राजश्री बाजी सांबाजी यसवंतराउ पासलकर देशमुख
ता॥ मोसेखोरे गोसावी यांसीः–

॥ॐ अखंडित–लक्ष्मी–अलंकृत–राजमान्य श्रो नारायणजी जुंझारराऊ देशमुख ता॥ कानदखोरे सु॥ समान सलासैन मया अलफ कारणे तुह्मास सवादपत्र लेहून दिल्हे ऐसेंजे, देशकुलकर्णी ता॥ मा॥ याचा व आमचा इनाम गाव पाबी व धानब हे दोन्ही गाव ता॥ मा॥ आहेत. तेथील हकाचा कजिया होता. त्यास, राजश्री पंतसचीव स्वामीनीं किले सिंहगडचे मुकामीं आणून दोघांचेहि कतबे घेतले. आणि त्याणीं व आपण परस्तली भांडत जावे ऐसें नाहीं. ह्मणोन देशपांडे व आह्मी समजोन त्याणीं आह्मास कागद लेहून दिल्हा व आह्मी त्यासी कागद लेहून दिल्हा आहे. त्याप्रमाणें वर्तावे. ह्मणऊन राजश्री पंतस्वामीनी आज्ञा केली की, वर्तावयास जामीन देणें. ह्मणऊन आपण तुह्मास दिवाणांत वर्तावयास जामीन दिल्हे असे. तरी जेणेप्रमाणे आह्मी देशपांडियास कागद लेहून दिल्हा आहे, त्याप्रमाणे वर्तोन. जरी तहप्रमाणे न वर्तोन आणि नवदिगर करून त्यामुळें तुह्मास आमचा निसबत लागेल. त्याचा जाब आपण करून. छ १६ साबान. हे सवादपत्र लेहून दिल्हे सही."

लेखांक ६५.

श्री.

"राजश्री बावाजी मरल जुंझारराऊ देशमुख ता॥ कानदखोरें गोसावी यांसी—

श्रे॥ आबाजी रघुनाथ कमावीसदार का॥ खेड सिवापूर दि॥ दरुनी–माहाल· वाडा पहिला रामराम सु॥ सबां अबैन मयां अलफ. मौजे पाबे येथें सेरी सरकारची आहे. ते तुह्मी किर्दी करून खाता. दिवाणचा राजभाग देत नाहीं. ह्मणून आह्मांस हुजुरून पत्र सादर जालें आहे. तेथें आज्ञा कीं, सेरी सरकारांत ठेऊन, तेथील कुल ऐवज जप्त करून, हालीं जो गला मालिस्त जाला असेल, त्याचा राजभाग सरकारांत जमा करणें. देशमुखाकडे एक दाणा न देणें. ह्मणून आज्ञा जाली आहे. त्यावरून रतोजी पवार व लोक हुजरे पाठविले आहेत. तरी तेथील ऐवज मालिवज जमा जाहाला असेल, त्याचा राजभाग यांचे दुमाला करणें. जाणिजे. छ ४ जिलकाद हे विनंती.

या कामास बयाजी जाधव व मानाजी सुरवेसी पा॥ आहेत. यांस मसाला रुपये १ एक आदा करणे. जाणिजे. छ मजकूर."

लेखांक ६६.

श्री.

तालीक.

"यादी कर्ज नि॥ देशमुख ता॥ कानदखोरे इ॥ कज्या जिवाजी नाईक मरळ ता॥ निवाडा खर्च पडला एकूण हिसेब रुपये.

२

	अज रु॥	मुदल	व्याज
गु॥ खंडो मल्हार व भानजी तुकाजी रवानगी सातारा तेव्हां दिल्हे प्रा॥ ६०० मु॥ शके १६६ दुदुभि नाम संवछरे ३०० जावजी वाघ. ३०० खंडोजी हुरफळे. ६०० २७३६ व्याज इ॥ ता॥ १६७६ इस्वर नाम संवछरे ए॥ वरसे १६ यास व्याज दर महा दर सदे २ प्रा॥ व्याज वरसास १४४ ए॥ ३३३६	३३३६	६००	२७३६
मु॥ नरे गु॥ आपाजी नऱ्हेर खासनीस शके १६७५ रुधिरोद्गारी नाम संवछरे ता॥ शके १६८९ ए॥ ७०० मुदल ३०२४ व्याज वरसे १५ ए॥ दर माहा दर सदे दुवोत्रा ३७२४	३७२४	७००	३०२४

शके १६६५ रक्ताक्षी संवछरे राजश्री गोविंद सामराज यास दिल्हे रुपये ३०० मु॥ गु॥ खंडोपंत ह॥ मल्हारजी मोगल १२२४ व्याज वरसे चौदा दर माहा दर सदे रु॥ २ प्र॥ ——— १६२४	१३०४	३००	१००४
वि॥ राजश्री दाजीपंत गु॥ खंडोपंत १००० मुदल २८८० व्याज शक १६६८ क्षय नाम संवछरे ए॥ वरसे १२ ए॥ ——— ३८८०	३८८०	१०००	२८८०
पोटखर्च मु॥ भोर ५०० मुदल ४८० व्याज शके १६७५ ए॥ वरसे ४ ए॥ ——— ९८०	९८०	५००	४८०
किती चाकर लोक असामी ३ ए॥ वरसे १२०० मु॥ इ॥ शके १६६४ २५९२ ता॥ शके ७१ वरसे ९ ए॥ व्याज ——— ३७९२	३७९२	१२००	२५९२
शके १६७८ धाता नाम संवछरे	९५००	८०००	१५००

८००० मुद्दल १५०० व्याज रु॥ २००० पैकी वसुल ५०० बाकी ——— ९५००			
गोडशा बद्दल शके १६६६ रक्ताक्षी नाम संवछरे गु॥ शिवजी गंगाधर व संभाजी पाटील नि॥ ह॥ २७७ मुद्दल २०७ ६९३ व्याज वरसे १४ ——— ९००	९००	२०७	६९२
कि॥ चाकर असामी तीन ए॥ दर ५० प्र॥ ए॥ वरसास रु॥ १५० व्याज वरसे	१२००	१२००	०
	२९७५५	१४१८२	१५५७३

लेखांक ६७.

श्री.

जाबता हक देशमुख ता। कानदखोरे अज बेरीज
हक निमे समंधे गावगना अज देहे ३४

ता।

मौजे ३३ मजरे केणिग जमा मौजे कोलगड १

एकूण रकम कास खंडी ३००
यासि वजा खंडी
७॥। किले हद्द
२४ ॥३ सोडी
४५ ॒।१ इनामती
१२ मौजे अंत्रोळी इनाम सरदेसमुखी
देहे १ ए॥ रकम खंडी

३३७१ देशमुखी
१२ धानेब देह १ ए॥
१६ मौजे पावे देहे १ ए॥
२८
२७४ शेत मोरटके विंझर पैकी
१७३ शेत धनमाळ मौजे दापोड पैकी
१॥३७ शेत खार मौजे काढावले बु॥ पैकी
३३
४५
७७॥३
बाकी खालीसा बेरीज रकम खंडी २२२॥२
ए॥ बेरीज हक टके २३३०॥१०
त॥
१२३६७८ देह ३० ए॥
१०५४॥। प्रा॥ देहे २८ दर खंडीस टके ८।४
१८१।८ प्रा॥ देहे २ ए॥
१२३६७८
८६१॥६ किरकोळ हक देशमुखी गांव खंडी
६०० गाव खंडी दर गांवास खंडी १
ए॥ खंडी ३० दर मणास टके १
ए॥
२६१॥६ किरकोळ हक
८६१॥६
२०९७॥२
४५७॥३ किरकोळ हक बाजारविश्वा
सुधा टके व सेव पसकई ए॥
२५२५।५
इनामती देहे २ व सेते ए॥
९६४७ = मौजे पावें देहे १ ए॥ रकम खंडी १६ ए॥
७७२१॥।३ मौजे धानेब देहे १ ए॥ रकम खंडी १२ ए॥
१३० शेत मोरटके खंडी २७४ ए॥
१०० शेत खार रकम १॥३ ए॥
६८॥।१॥ शेत धनमाळ खंडी १७३ ए॥
१९८४॥।८॥

२३२॥।८ हक
११२॥२ पाबे
९१॥।६ धानेब
११॥।६ सेत मोरटके
७॥ सेत धनमाळ
९ ʖ ६ सेत खाकर
२३२॥।८

२२१७॥४॥
ए॥ हक बेरीज टके
२५५५।५ तपेसमंधी
२२१७॥४॥ इनामती
४७७२॥।९॥

यासि तह धारा र॥ पंतप्रधान दस्त बटाई सन समान तिसैन बटाई केली. संन तिसा मधें पाहणी करून, कुली कीर्दी नाकीर्दी मनास आणून धारियाचा तह दिल्हा. ए॥ बेरीज देह २ ए॥

मौजे धानेब यास खंडी १२ एकून
दर खंडीस खंडी ६
एकून खंडी ७२
हक वावेली ९ ॥।·॥।·
रकम खंडी १ ॥१॥
दर खंडीस
खंडी ६॥ ए॥
८१॥।·॥।·
यासि दस्त सालमजकुरी सन इसने
गला खंडी कैली ५४ʖ
नख्त वणी घरटका ए॥
ए॥ रकम खंडी ५ʖ=
दर खंडीस खंडी ६
ए॥ धारा खंडी ३०।·

मौजे पाबे रकम खंडी १६
ए॥ धारा खंडी ९६ ए॥
वावेली रकम ८॥३
खंडी ११॥·॥।
ए॥ १०४॥३
यासि दस्त साल मजकुरी खंडी
गला खंडी ८५॥
नख्त वण घरटका ए॥

यासि दस्त अलाहिदा गांव नेहटणीस जमा केले नाही, सबब राहनीकाजकीर्दी माहादाजी अनंत सुभेदार प्रा॥ मावळ हाहि एकंदर गांव खाले जमा करविले, तेणे प्रो चालू असे सबब; अलाहिदा जमा नाही.”

लेखांक ६८.

श्री.

"राजश्री नारायणजी जुंझारराव मरळ देशमुख ता॥ कानदखोरे गोसावियासी— ॥५ श्रे॥ आनंदराऊ बहिरव आशिर्वाद सु॥ सन अर्बा सलासैन मया अलफ तुह्मी एथे राजपुरीचे मोहिमेस चाकरीस बावाजीराव मरळ पाठविले होते. , त्यास, ते रजा घेऊन गेले. ते समई त्यार्णी बावजी ऐणपुरे ठेऊन गेले. त्यानीं आजीपावेतो चाकरी केली. त्याचे मुबदले त्र्यंबकजी सिंदे पाठविले. त्यापासीं सेवा घेऊन बावजीस निरोप द्यावा, तो त्र्यंबकजीस वेथा जाली. याकरितां बावजी ठेऊन घेतला. तो चाकरी करीत असता, त्यास हि वेथा होऊन आजी छ मजकुरीं मृत्यु पावला. बावजीनें एकनिष्ठेने चाकरी केली आहे. याचे अगत्य चालवावे लागते. याकरितां हे पत्र तुह्मास लिहिले आहे. बावजीच्या मुलामाणसांचे चालवावयासी अंतर न करणे. *आह्मी तिकडे आलियावरी त्याचे मुलाबाळास कांहीं इनाम दिवाणांतून काढून देऊ. चोखट माणूस गेला. उपाय नाही. छ ५ जमादिलाखर. हे विनंति."

लेखांक ६९.

श्री.

"यादी सु॥ पावे खर्च देशमुखाची मनसुफी

जिनस सामान

	तांदूळ	कणीक	दाळ
बुधवारी	꠴॥२	꠴॥१	꠴.
गुरुवारी	꠴॥।१	꠵१।	꠴।१
शुक्रवारी	꠵१	꠵१॥	꠴।१
शनवारी	꠵१	꠵१॥	꠴।१
रविवारी	꠵१	꠵१॥	꠴।१

बाण सवदा वजन

	मिरे	हळद	खोबरें	जिरे
बुधवारी	꠶॥.	꠶॥.	꠶॥.	꠶॥.
गुरुवारी	०	०	०	०
शुक्रवारी	꠶॥.,	꠶॥.	꠶॥.	०
शनवारी	꠶१	꠶१	꠶१	०
रविवारी	꠶१	꠶१	꠶॥	०

* हस्ताक्षर खाशाचें.

पीठे साकर	गूळ	तूप	तेल	मिरची
७॥	७	७७१	७७७	७७॥
७१	०	७७२	७७६	७७॥
७॥१	७७७	७७३	७७५	७७॥
७१	७७६	७७३	७७६	७७॥
७१।	७७६	७७३	७७७	७७॥

पान	सुपारी	तमाखू
२००	७७॥	७७१
२००	७७॥	७७१॥
१५०	७७।	७७१
३००	७७॥	७७२
२००	७७॥	७७१

लेखांक ७०.

श्री.

तालिक

"आज्ञापत्र राजश्री पंत सचिव ता। महादजी बीन बालोजी रेणुसा मोकदम मौजे पाबे ता। कानदखोरे सुहूर सन इसने सलासीन मया अलफ. तुजला घर ह्मैस पाळक करून देऊन तुजपासून सेरणीं रुपये ५० पन्नास हुजूर घेतले. त्याच्या दोन तक्षिमा देशमुखास दिल्हे नाहींत ह्मणोन हुजूर वर्तमान विदित जाले. या उपरी देखत आज्ञापत्र सदरहू दोन तक्षिमाचा ऐवज रुपये १००. एकसे नारायणजी झुंझारराऊ देशमुख याजकडे वसूल देणें. उजूर न करणें. छ २४ साबान."

लेखांक ७१.

श्री.

"राजश्री बावाजी झुंझारराऊ देशमुख ता। कानदखोरे गोसावि यासीः—

॥५ अखंडित—लक्ष्मी—आलंकृत—राजमान्य श्नो सुर्याजी भोसले हवालदार व कारकून किले सुधागड रामराम व आसिर्वाद सु॥ सलास खमसैन मया अलफ तुह्मी पत्र पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान कळले. मौजे पाबे येथील पाटील रेणुसे याजकडील भुते आह्माकडे पडोन, नाष जाला आहे. इकडील थले उतरली आहेत. याचा विचार करावा लागतो. तरी श्रीस प्रसाद लाऊन, काये

उतर येते ते लेहून पाठवावे ह्मणोन लिहिले. त्यावरून श्रीस प्रसाद लाविला. श्रीनें रेणुसा याकडील भुते खरी आहेत, ह्मणून प्रसाद दिल्हा. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे. रा छ १ साबान हे विनंती."

लेखांक ७२.

श्री.

"आज्ञापत्र राजश्री पंतसचिव ता। मोकदम मौजे पाबे ता। कानदखोरें सु॥ सलास खमसैन मया अलफ. मौजे मारीं रान देशमुखानीं पेशजीपासून राखीले आहे, ते तुह्मी गावकरी रांन तोडितां ह्मणून हुजूर वर्तमान विदित जाले; तरी याउपरी रान न तोडणें. कब्याखाली रान जे तोडिले असेल, तरी ते न जालवणे. देशमुख सांगतील त्याप्रमाणे वर्तणुक करणे. उजूर केलिया मुलाहिजा होणार नाही. ऐसे पष्ट समजोन वर्तणुक करणें. जाणिजे. छ १३ जमादिलाखर पा। हुजूर."

सुरुसुद

लेखांक ७३.

श्री.

"बि हुजूर राजश्री जुझारराऊ दा। बो।

दतो बापुजी लेहोनु दिधले की देसमुख व पांच जे सांगतील ते आइकोन. जरी पांचाचे न आइको तरी गोताचा खोटा.	त्रिंबक रंगनाथ लेहोनु दिल्हे की देसमुख व पांच जे सांगतील ते आइकोन. जर पांचाचे न आइको तरी गोताचा खोटा."

लेखांक ७४.

श्री.

"अज स्वारी राजश्री बाबूराव दत्तो नामजाद सुभा किले हाय ता। मोकदम मौजे पाबे ता। कानदखोरे सु खमस खमसैन मया व अलफ. मौजे मजकुरी परभीकीचे सेत आहे. ते सरकारांत अनामत ठेविले आहे. त्याची लावणी जाली पाहिजे. त्यास तुह्मी गावातील कुळें लाऊन कीर्द करवणे. ज्याप्रमाणे सरकतीची बोली करून लावणी कराल, त्याप्रमाणे उगवणी होईल. तरी कुळें लाऊन लावणी करणे. बोली प्रो चालविले जाईल. जाजती अजार लागणार नाही. जाणिजे छ १० माहे सवाल."

लेखांक ७५.

"मा। जमाल महमद ढालाईत स्वारी राजश्री पंतसचिव यास खंडो मल्हार नामजाद किले प्रचंडगड सु॥ समान सलासैन मया व अलफ तुजला. येथून देशमुखाकडील पैकियाबदल पाठविले. ऐसियास देशमुख पैकियाचा निशा करितील. जर काही निशा न होये, तर विठोजी पा। अत्राले व संभाजी पाटील विझर हे जमान आहेत. त्यांचे घरी बैसोन पैकियाचा निकाल करून घेणे. येविसीं राजश्री पंताचीहि आज्ञा तुजला आहे. तरी रुपये बेमुरवत वसूल करून येणे. रा। छ १५ जिल्हेज सदरहू दोघा पाटिलाकडून बेमुरवत करून पैके घेणे. देशमुखास त्वष्ट न लावणे. सदरहू देशमुखापासून रुपये १०० येकसे घेणे. जाजती तगादा न लावणे जाणिजे."

लेखांक ७६.

श्री.

"विनंती उपरी (मा)तुश्री आईसाहेब सिंहीगडास येत्यात ह्मणऊन राजश्री पंत सुभेदार यांणीं गावगण सिस्त करून, वेठ व माहार आणविले. त्यास, पाबे व धानब येथील वेठ माहार आणविले आहे. किलाची अलगहाद सेकार आनविला. येथून सेकार आणीत होते. त्यास सुभाच्या वरातदाराणें निकड केली. सिहिगडास गेले. ह्मणजे सेकार बेजार नाही. तर गोसावी याणी तकूबचिटी आणविली पाहिजे हे विनंती."

लेखांक ७७.

श्री.

"वंशावली राजश्री देशमुख जुंझारराव ता। कानदखोरे मूळ पुरुष राघनाईक त्याचे पुत्र ३

वडिल परसोजी नाईक. त्याचा लेक बावाजी जुंझारराव. त्याचा लेक कान्होजी जुंझारराव. त्याचा लेक मागती बावाजी जुंझारराव. त्याचा लेक मागती कान्होजी जुंझारराव. त्याचा नारायणजी जुंझारराव. त्याचा लेक बावाजी जुंझारराव

दुसरा तुला नाईक. त्याची वंशावली कानदकर.

तिसरा मुकलोजी त्याचे संतान बुडत बुडत आले. हाली कोणी नाहीं."

लेखांक ७८.

श्री.

फारसी मजकूर

"मकसूदनामा कान्होजी झुंझारराऊ आदिकारी तपे कानदखोरे मामले राईर मकसूद किले तोरणा वसऊ नव्हता. दुसमानाच्या लोकी मुलाहिजा केला जे हसम व जकीरा वाढउनु किले मजा़ काबीज करावें. हे खबर बादे कमीने आइकौनु साहेबाची नफराई केली, किले मजा़ काबीज करुनु निगा वर्जोरीसी केलि. मकसूदु

हसम नफर १०० यासि	पेसजी दाभोळेची मसलत
++ २ माहा १५ रोज	फते इन मलिका बराबरी
इा छ१५ माहे रविलाखर	मसादती झगडा केला ++
ता़ माहे जमादिलाखरु यासि	ही हुजुरु मऱ्हामती
तैनाती व बैगारी ना़ १००	पालक व छत्री व दिवटी
यासि अढैच सेरी बंदे	यासि तैनाती मौजे दापोडे
कमीने कर्ज करुनु दिल्हे	ता़ मा़ मऱ्हामती केले.

(पुढें गहाळ.)

लेखांक ७९.

श्री.

"राजश्री नारायणजी झुंझारराऊ देसमुख ता़ कानदखोरें गोसावी यांसि

॥ ५ श्रो अनंदराऊ बहिरक आसिर्वाद सु़ा इसने सलासीन मया अलफ. तुह्मी पत्र पाठविलें, ते प्रविष्ट जाले. रा़ खंडोपंत याबरोबर मुखोद्गात कितेक वर्तमान सांगोन पाठविले. त्यावरून आद्यंत कळलें. ऐसियास तूर्त तुह्मास येथे बोलवावे तरी दंगा बहुत आहे. त्यास कार्तिकमासी राजश्री पंताची स्वारी किले सिंहगडास होणार आहे. ते समई तुह्मास बोलाऊन, काय ते वर्तमान मनास आणून निर्वाह केला जाईल. कदाचित् राजश्री पंताची स्वारी नव्हे तरी आह्मास तो खामखा यावे लागतें. मग तुमचें कार्य विल्हे लावून दिल्हे जाईल. तुह्मी कांही चिंता न करणें. येथील वर्तमान रा़ खंडोपंत सांगतील कळेल. रा़ छ ७ माहे रविलाखर."

लेखांक ८०.

.श्री.

"राजश्री नारायणजी झुंझारराऊ देसमुख ता। कानदखोरे गो:-

"छ अखंडित-लक्ष्मी-आलंकृत-राजमान्य श्री पिलाजी जाधव रामराम येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणे. यानंतर पत्र पाठविले. लि। की, शामलाने जागडे वतनदार पाठविले. तुह्माकडील आश्रा कळोन रुपयाचा भरवसा त्यास जाला आहे. ह्मणून कितेक लिहिले. ऐसियास कितेक वर्तमान कृष्णाजी जाधव याजपासी सांगितले आहे. आह्मी दसरा जालियावरी दहा पंधरा दिवसां कूच करून मुलुकगिरीस जाऊन, तेव्हां एक जण एका बसऊन आह्माबरोबर पाठवणें. मग लष्करांत कळेल तैसा निकाल काढून, से दोन से जे होतील ते करून देऊ. येथे कांही रुपयाची अनुकुलता होणार नाहीं. याजकरितां आह्मी विचार काढिला आहे. तजविजेनेच शामलाचे रुा वारेत ऐसे करून. कांही फिकीर न करणे जाणिजे. रा। छ ४ माहे सफर बहुत काय लिहिणे हे विनंती."

लेखांक ८१.

श्री.

नकल.

"छ॥ म॥ अनाम नारायणजी झुंझारराव देशमुख व देशपांडे त॥ कानदखोरे यांसी नारो शंकर सचिव सु॥ अर्बा सलासैन मया व अलफ. तुमचे पुत्र बावाजी झुंझारराऊ व जिवाजी बिन तुलबाजी मरळ या उभयतानीं राजापुरीचे मुकामीं विनंती केली की, शामलावरी मोहीम राजश्री स्वामीनीं केली. फौज देऊन राजश्री फत्तेसिंग भोसले व राजश्री बाजीराव पंडित प्रधान ऐसे एकंदर वैशाखमासीं रवाना केले. पदाती जमाव मावळप्रांतीचा स्वार समागमे जाऊन स्वामिकार्य करणे ह्मणून आज्ञा केली. व राजश्री आनंदराऊ बहिरव यासमागमे आपण जमाव-निसी मोहिमेस आलो. कष्ट मेहनत जे करावयाचे ते उभयतासमागमे हुकुमाप्रमाणे केली. खोकरी राजापुरी कुल देशदुर्ग रायगडिसहवर्तमान हस्तगत जालिया खुशालीच्या प्रसंगीं मावळप्रांतीच्या जमीदाराचे बरें करावें; इसाफतीच्या गांवास मोगलाई बैसली आहे, ते माफ करून सोडावी; व स्वराज्यपैकी बाबती वसूल घेताती व ऐन दस्त पैकी तिजाई घेतात, त्यास ऐवज दस्त बाबती स्वराज्याची बेरीज एक करून तिजाईमात्र........बाबती घेऊ नेंये; ह्मणून विनंती केली. त्याप्रमाणे तह करून सनद सादर केली असे. गावगना बितपसिल."

तुमचे इनामाचे गांव
१ मौजे धानेब
१ मौजे पावे
२

सदरहू देहे दोन येथील पाहाणीप्रमाणें जो आकार होईल, त्यापैकीं दोन तक्षिमा व स्वराज्य व एक तक्षीम मोगलाईपैकीं मोगलाई माफ केली असे. दोन तक्षिमा स्वराज्यपैकीं तिसरी तक्षीम घ्यावी. कलम १

इनामसेत गाव गना
१ दापोडे
१ लासीरगाव
२

सदरहू गावगना सेत आहेत. त्यास मोगलाई पडते, ते तहप्रमाणें माफ करून स्वराज्याची तिजाई घ्यावी कलम १

वावेली मोकदमाची व बळोतियाची व माराची माहरिक पेसजी सुदामत आहेत. त्यास, मोगलाई माफ केली आहे. स्वराज्याच्या आकाराची इनाम तिजाई घ्यावी. कलम १

वणी घरटका नख्त बाब आकार होईल, त्यास राजपटी व दाहिजे बसताती. ते देखील आकार करून तिजाई घ्यावी. दोन तक्षिमा तुह्मास दिल्या असेत. कलम १

देशमुख देशपांडे याचे इनामगावी खंड गुन्हेगारी कमाविस होईल, त्याची तिजाई दिवाणांत घ्यावी. दोन तक्षिमा दिल्हा असत व निपुत्रिकाचा बैतल कमाविस गौरा जो वसूल जमा होईल, त्यापैकी तिजाई घेतली जाईल. कलम १

येणेप्रमाणें तह केला असे. या तहबरहुकूम तुमचें चालविलें जाईल. कदाचित् माहालसिरिस्तियानें पाहाणी होती ते न जाली, खंडणीच जाली, तरी आकार होईल त्यापैकीं मोगलाई वजा करून, त्याची तिसरी तक्षिम टका आकारेल तो वसुल घेतला जाईल. याखेरीज किरकोळी पटीयाचा तगादा लागणार नाही. जाणिजे. छ १० रबिलावल मोर्तब असे.”

लेखांक ८२.

श्री.

“॥७ म॥ अमाम देशमुख व देशपांडे त॥ कानदखोरे यांस नारो शंकर सचिव सु॥ सन अर्बा सलासैन मया अलफ. रायगडचे मदतीस लोक मावळप्रांती-

हून हशमाचा जमाव वतनदार चाकरलोक आहेत, त्यापैकी एक हजार लोक रवाना करणें ह्मणून राजश्री स्वामीनीं आज्ञा केली आहे. त्यावरून हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी तुह्मीं लोक १५ पंधरा मर्दाने माणूस पाहून, बा। एक सरदार नावाचा माणूस देऊन, लोकांची रवानगी राजश्री आनंदराऊ याजकडे रवानगी करणे. हे काम बदलामीचे आहे ऐसे स्पष्ट जाणून लोक रवाना करणे. लोकास तूर्त खर्चास राजश्री रंगो रघुनाथ बा। स्वारी याजबा। रुपये देऊन पाठविले आहेत. त्यास, मा।रनिले सदरहू रु। तुह्मास देतील. ते लोकाचे पदरीं घालून, आधी लोक रवाना करणे. मा।रनिले तुह्मास लोकांचेविशीं सांगतील, ते स्वमुखीची गोष्टी जाणून लोकांचेविशीं ढील न करणे. या कामास सेख मदारी व करीमखान हुजरात पा। यास रुपये १ एक रास देविला असे. अदा करणे. छ ९ रमजान पा। हुजुर."

सुरु सुद बार.

लेखांक ८३.

श्री.

"।।छ मा। अनाम देशमुख व देशपांडे ता। कानदखोरे यांस नारो शंकर सचिव सु।। सन अर्बा सलासीन मया अलफ. राजश्री स्वामीनीं पाचाडचे ठाणे स्वाधीन करून, राजश्री आनंदराऊ बहिरव पाठविले आहेत. यासमागमें मावळ प्रांतेचा व गडकिलाचा जमाव नेहमीं नेमणुक केली आहे, त्यापैकी तर्फमजकुरावरी तुह्माकडे लोक ५ पाच नेमणूक करून दिल्ही आहे. त्यापैकी बरकंदाज १ अढा व पंचरूढ हतेरी च्यार असामी नेमिले असेती. सदरहू पैकी पाचाडचे ठाणियांत लोक आहेत. त्यास, दोन अडिच महिने होऊन गेले; याउपर ते लोक तेथे राहाणार नाहीत. याकरिता हें आज्ञापत्र तुह्मास सादर केलें असे. तरी सदरहूप्रमाणे लोकांची नेमणूक करून भादवापर्यंत नेहमी लोक पाचाडच्या ठाणियास पाठऊन देणे. कदाचित् लोक तिकडून न आलेच, तरी दुसरे मुबदले वरच्यावरी रवाना करणें. छ १७ जिल्हेज पा। हुजूर."

लेखांक ८४.

श्री.

"अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री खंडो मल्हार गोसावी यांसिः—

सेवक चिमणाजी नारायण सचिव नमस्कार सु।। सन सबा सलासैन मया व

अलफ. नारायणजी झुंझारराऊ देशमुख ता। कानदखोरे यासी पत्र लिहिलें, तेंच वजिनस तुह्मांकडे आलाहिदा पाठविलें आहे. त्यावरून अभिप्राय कळेल. तर तुह्मी व जिवाजी मरळ त्याकडे जाऊन वतनावरीं घेऊन येणें. ये गोष्टीस विलंब न लावणें. देशमुखाची रवानगी करून, तुह्मी पुढें मसलतीस जाणें. त्याच्या चित्तांत संकल्पविकल्प त्याचे परिमार्जन तुह्मी करून घेऊन येणें. येविशई स्वमुखें तुह्मांस सिंहगडचे मुकामीं आज्ञा करणे ते केलीच आहे. या उपरं विलंबावरी न घालितां झुंझारराव माहालांत येत तें करणे. छ १ सफर पा। हुजूर."

लेखांक ८५.

श्री.

"आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री चिमणाजी पंडित सचिव ता। मोकदम मौजे धानेब ता। कानदखोरें सु॥ समान सलासीन मया अलफ दिल्हें वतनपत्र ऐसे जे, तुझे बाबें देशमुख व देशकुलकर्णी ता। मजकूर यांणी पेसजी हुजूर नेराचे मुकामीं येऊन विनंति केली कीं, ता। मजकूरचे गावगनाचे कामथ आहेत. तीं सेतें खोतीकडे रकमेस वावेलीयाखालें वोढत आहेत. त्यास गावगनाच्या मोकदमास वतनसंमंधें कसाला पडतो व मोकदमीच्या वावेलीयाची व कामथसेताची तिजाई रकमप्रमाणें सालदरसाल पाटिलास वसूल पडतो. परंतु कामथ सेत पाटिलाच्या दुमाला पडत नाहीं. याकरितां स्वामीनीं मनास आणून, कामथ सेत मोकदमाच्या दुमाला करून, याचे जीवनमाफिक सेरणी करार करून, भोगवटियास वतनपत्रें सादर केलीं पाहिजेत. ह्मणऊन विदित केलें. त्यावरून मनास आणितां, देहाये मजकूरच्या मोकदमास वतनामुळें कसाला जबर पडतो, आणि कामथसेत मोकदमाच्या दुमाला पडत नाहीत, हे गोष्टी खरीच आहे. याकरितां तुजवरी कृपाळु होऊन मौजे मजकूरचे खोतीला कामथसेत रकम कास मण ·।१ साहा मण, पैकी वजा देशमुख मण ०३ तीन मण, बाकी तीन मण तुझे दुमाला केले असे. तरी सदरहू कामथ सेत पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेने अनभऊन सुखरूप राहाणे. ये बाबें तुझे माथा सेरणी जीवनमाफिक दुतर्फा देखील बाबती रुपये ३६०= छेतीस रु॥ चवल करार केले असेत. सदरहूची उगवणी करून पावलियाचा हुजत घेणे. तेणेप्रमाणें मजुरा असेत. छ १० मोहरम पा। हुजूर."

बार सुरु सुद बार.

लेखांक ८६.

श्री.

"छ म॥ अनाम देसमुख ता॥ कानदखोरे यांस चिमणाजी नारायण सचिव सु॥ तिसा सलासीन मया अलफ. ता॥ मजकुरीं मसलत तासगाव लोक २५ पंचवीस नेमिले आहेत. ते आपणास पाठविले नाहीत. हाली देखत आज्ञापत्र पंचवीस माणसें घेऊन, किले सिंहगडचे मुकामीं येणे. विलंब जाहलिया मुलाहिजा होणार नाही. या कामास जानोजी किवला दि॥ लबे बा॥ स्वारी पा॥ असेत. यास महसल रु॥ २ दोन देविले असेत. आदा करणें रा॥ छ २५ रा॥ लावल"

बार सुरु सुद.

लेखांक ८७.

श्री.

"छ म॥ अनाम देशमुख व देशपांडे ता॥ कानदखोरे यांसि सदासिव चिमणाजी सचिव सु॥ इसने समानीन मया व अलफ. ता॥ मजकूर येथें शामलाकडील चोरटे येऊन उपद्रव केला आहे. किल्ह्याखालील पेठेस येऊन दंगा करितात. ह्मणोन हुजूर विदित जालें. त्यावरून हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी तर्फ मजकूरचे इसाफतीचे लोक असामी ५० पंनास राजश्री माधवराव भिकाजी यांजकडे देविले असेत. तरी देऊन घाटाचा बंदोबस्त करणे. पोटास सिरस्तेप्रमाणें मा॥रनिलेकडून देविलें असे. जाणिजे. छ १८ रमजान पा॥ हुजूर."

समाप्त.

[इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेलीं]

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

खंड १७ वा.

[शिवकालीन घराणीं]

मुरुमखोरें—सिलिमकर देशमुख.

हें प्रकरण

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, बी. ए.

ह्यांनीं संशोधून तयार केलें.

तें

मुंबई येथें,

तुकाराम जावजी ह्यांनीं

'निर्णयसागर' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

इ. स. १९१३.

Published by Tukaram Javaji, Proprietor N. S. Press
23, Kolbhat Lane, Bombay.

Printed by R. Y. Shedge at the Nirnaya-Sagar Press
23, Kolbhat Lane, Bombay.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

मुरुमखोरें—सिलिमकर देशमुख.

लेखांक १.

श्री.

(नकलेची नकल.)

महजरनामा अज करार ब तारीख छ १३ रोज ते दिवसी कान्होजी वलद शाहाजीराव निंबाळकर माहाले स॥ प॥ कराड यासि जानकाई कोम रत्नोजी व॥ शाहाजी इबिन गोविंदराव काळे कासार देशमुख त॥ वेळवंडखोरे सु॥ सन ७३७ सुभे खुजस्तेबुनियाद कारणे महजर लेहून दिल्हा ऐसा जे, देहाय त॥ म॥ ची लावणी उगवणी पडली आपण त॥ म॥ चा कारभार करीत असता. लावणी उगवणीची सरफरास न होए आणि प्रांत मजकुरी कितेक कसाल बार लि॥ चें पडलें. काही हाल राहिला नाही. त्यावर वतनाचे सिरी कर्ज बहुत जाले. मामला आफ्तर जाला. एके रोजीचे खावयास नाहीसे जाले. आजि सबब आपला भर्तार रत्नोजीराव फौत जाहला. आपले पोटीं पुत्रसंतान नाही आपणामधी काही ताकत राहिली नाही. जागीरदार याणी आपणास गावची लावणीबदल बैतल मालाचे टके वगैरे महलग टका सिरी जाला त्यास द्यावयास जागा नाहीसी जाली. त्याजबदल आपण मिनतमाना करून त॥ म॥ ची देशमुखी आपली आपण खुश रजावंदीनें कबालतीने फरोख्त करून दिल्ही. बकिमत महलग टके होन सुमार ५०१ पांचसे एक रास भरणा घेतला असे: तमाम माल घेऊन फरोख्त केली असे. गावगना तपसीलवार देहाय

१	एल्हवंड	१	नऱ्हे
१	पसूरे	१	माजगाव
१	म्हलवडी	१	आसगवडी
१	बारे	१	करंदी
१	जैतपाड	१	कामरें
५		५	

एकूण गाव दाहा याची रकमीना जमीन टके सुमार २२५ सवा दोन से मोकरार करून दिल्ही असे. नांव नागर सिरपाव मानपान पुढे घेत जावा. निमे इनाम बाजे वतन फरोख्त करून आपले स्वसंतोषे दिधले आहे. मी (अपूर्ण)

बे॥ रुमाजी वा॥ हैबतराव मारणे देशमुख त॥ कानदखोरे
बे॥ हरजी वा॥ कृष्णाजीराव सिंदे देशमुख ता॥ पोन मावळ
बे॥ भवानी बाजी देशपांडे
बे॥ गोविंदराव शिर्के राजे
बे॥ भिकाजी वा॥ देवजीराव निगडे देशमुख ता॥ सिरवळ
बे॥ फुलाजी दिवाकर देशपांडे गु॥
बे॥ चापजी वा॥ हबाजी खोपडे देशमुख त॥ रोहिडखोरे
बे॥ दाजी नरसी देशपांडे
बे॥ नारायण व॥ कानजी कानडे

देशमुख ता॥ मुठे खोरे
बे॥ भवानी भास्कर देशपांडे
बे॥ आपाजी बलाळ देशपांडे
बे॥ खंडेराव वा॥ यशवंतराव पवार देशमुख ता॥ नाणेमावळ
बे॥ आपाजी हरि देशपांडे
बे॥ फुलाजी वा॥ देवजी कालभर देशमुख ता॥ पुणें
बे॥ अंताजी हरि देशपांडे
बे॥ महिपतराव वा॥ चंदरराव मोरे जावळखोरे
बे॥ कोंडो तिमाजी देशपांडे
बे॥ शाहाजी वा॥ जाखोजी राजे देशमुख सुभे खुजस्तेबुनियाद*

लेखांक २.

श्री. १७१८ भाद्रपद शुद्ध २

नकल असल बमोजीब

करीणा सुभानराव विन खंडेराव सिंदे सिलिमकर देशमुख ता॥ गुंजणमावळ सु॥ सबा तिसैन मया व अलफ करीणा लेहून दिल्हा ऐसा जे, आमचा मूळपुरुष शाहाजी शिंदे रविराव मुकाम बेसवडा हे निघोन पायेनडास येऊन नजिक बलवंड व तोरणाल आहे; त्यास बलवंडे येथील रजपूत दलसिंग मोहिते व तोरणाल येथील यशवंतराव चोरघे ऐसे उभयतास बराबर घेऊन ता॥ मुरुमखोरे

---

* हा महजर नकलेची नकल आहे. अपूर्ण आहे. भाषा तत्कालीन नाहीं. ह्यावर माझा विश्वास बसावयाला असल कागद सांपडला पाहिजे किंवा इतर प्रत्यंतर पुरावा पाहिजे. बनावट असल्यास, बनावट करणाऱ्याची पुरातन कल्पना काय होती तें कळतें. तत्कालीन देशमुख देशपांडे कोण असावेत त्यासंबंधीं बनावटकाराचें मत काय होतें तें कळण्यास हा कागद साधन आहे. बनावटकाराचेहि डोक्यांत कांहीं खरी माहिती असावी.

येथे मौजे हतवे बु॥ येथे येऊन उतरले. तो त॥ मजकूरची देशमुखीण कचाई कोम रतनोजी बिन शाहाजी उपनाम काले कासार सरदेशमुख याचे नकल जाले होते, तिणे शाहाजी सिंदे यास मौजे हतवे बु॥ येथील पाटिलकी देऊन याचे पुत्र उभयता सितोजी व खापरोजी पैकी खापरोजीस कचावा इणे आपल्या हाताखाली ठेऊन देशमुखीचा कारभार त्यापासून करवीत होती आणि यशवंतराव चोरघे हे देशमुखीचा दिवाणकारभार करीत होते. त्यास काही एक वर्षे जाली. तो यशवंतराव चोरघे वारले. त्याचे पुत्र रामराव दिवाणकारभारास सरकारात गेले. मागे कचाई आवाचा काल होऊ लागला. तेव्हा तिणे आपली देशमुखी त॥ मारची सितोजी व खापरोजी यास देऊन आपण मृत्य पावली. त्यावरी रामराव चोरघे दिवाणात गेले होते ते घरास आले. तो कचाईचा काल जाला. आणि सितोजी व खापरोजी देशमुखीचा कारभार करितात. त्याणी मौजे बोराळे येथील पाटिलकी दलसिंग मोहिते याचे पुत्र अजपालसिंग यास देऊन त्याची समजूत काढून आणि चोरघे यास काही दिल्हे नाही. त्यावरून चोरघे याणी रुसवा केला. तेव्हा सितोजी व खापरोजी चोरघे यास पाच गाव पाटिलकीचे देत होते, परंतु चोरघे समजले नाहीत. तेव्हांपासून चोरघीयाचा व देशमुखीयाचा वाद लागला. त्यावरी सितोजीचे नकल जाले. बाकी खापरोजीस पुत्र सिवाजी व प्रतापजी. पैकी सिवाजीच्या पुत्राचे नकल जाले. प्रतापजी व बाबाजी व जावजीस पुत्र दशरोजी पावेतो चोरघियाचा व शिंदे देशमुख याची झुझे दरडोईस होऊन वाद सांगतच होते. तो दशरोजीनें कुरंगवाडी इसापत दिवाणातून करून घेऊन आपण कुरंगवाडीस नांदत होता. त्यावरी चोरघे याचे वंसीचे उदाजी व त्याचे पुत्र येसाजी यानीं दसरोजीवर चढाई करून कुरंगवडीच्या मागें माळावरी झुंझ करून दसरोजीस मारिला. मग दसरोजीचा पुत्र कान्होजी याणीं मौजे कुरंगवडीस महकलासा मागें वाडा बांधोन देशमुखी करीत होता. त्याचा पुत्र येसाजी यानीं मार्गआसनीस वाडा बांधोन मार्ग चालता केला. त्याचा पुत्र चाहूजी याणे गुंजवणियांत मुकाईच्या माळावरी वाडा बांधोन देशमुखी करीत होता. त्यास पुत्र दोन पुनाजी व भिवजी. हे देशमुखी करीत होते. चाहुजी म्हातारा जाला त्याची बहीण सामावा. कानोजी कोंडे देशमुख त॥ खेडेबारे यांचे पुत्र दोन बापोजी व जाखोजी. त्यास बापोजी कोंडे यास सामावा दिल्ही होती. तेव्हां त्याचे पुत्र हरजी वडील जीवन लहान ह्मणून सामावा याणी चाहूजी सिंदे आणून त्याजपासून सिक्याचा कारभार करवीत होती. त्यावरी तिचा दीर जाखोजी यास व चाहूजीस पटेना. सबब जाखोजी मा॥र याणे सामाई सवतीचा भाऊ चाहुजी ऐसे जिवे मारिले. तेव्हा सामाईचे पुत्र पुनाजी व भिवजी

ऐसे बेदरास जाऊन वाद सांगू लागले. तेव्हां पातशाहानीं जाखोजी कोंडे याचे वतनवाव्यापैकी गाव च्यार घेऊन या दोघास बितपशील उंबरे व निगडे हे दोन गांव सामावाच्या खुनाबदल तिचे पुत्र हरजी व तुळजी यांस दिल्हे व निधान सांगवी हे दोन गाव चाहूजीचे पुत्र पुनाजी व भिवजी सिंदे देशमुख ता। गुंजणमावळ यास चाहूजीच्या खुनाबदल दिल्हे. त्यावरी भिवजी सिंदे बेदरास कामाकाजामुळे गेला त्यास तेथे दोन च्यार वर्षे लागली. तो चोरघियाचा वाद पहिलाच होतां त्यास त्याणी पुनाजी एकटा आहे ऐसी संदी पाहून, उदाजी व एसाजी याचे वौसीचे बाजी व भिवजी याणी जुंजावरी जुंजे करून पुनाजीस पळव केला. तेव्हां पुनाजीने विचार करून हवजी व रुद्राजी व भिवजी सिलिमकर पाटील मौजे सिलिंबे ता। पवनमावळ यास पाच गांव पाटिलकीचे देऊ करून, पुनाजीने आपले मदतीस आणिले आणि मौजे बोराळे येथील आपल्या वाड्यांत आणून चोरघे याच्या तोंडावरी ठेविले. त्यावरी चोरघे काहीच बदले नाहींत. त्यावरी पुनाजीसी व या त्रिवर्गासी सिलिंबकराची समक्ष भेटी जाली. तेव्हां सिलिंबकर याणी पुनाजीस विचारले जे आह्मास तुह्मी का आणिले? मग पुनाजी बोलिला की, आमचा व चोरघा याचा वाद बहुत दिवस आहे, त्यास आमचा भाऊ भिवजी बेदरास जाऊन तीन चार वर्षे जाली, मागे मी एकटा. चोरघे तरी आपल्यास चैन पडू देईनात. याजकरितां तुह्मास आह्मी मदतीस आणिले. तुह्मी व आह्मी मिळोन चोरघीयास नतिजा पोहचऊ. याबदल तुह्मांस पाच गाव पाटिलकीचे देऊ. ऐसे पुनाजी बोलिला. तेव्हा हे त्रिवर्ग बोलिले जे, आम्हास निमे देशमुखी देसील तरी आह्मी राहून काज काम करितो. नाही तरी माघारे जातो. ऐसे ते पष्ट बोलिलें. तेव्हा पुनाजीने साल जाब केला जे, तुह्मास पाच गाव पाटिलकीचे घेऊन काजकाम करावयाचे पुर्वत असिले तरी राहाणे; नाही तरी सुखरूप माघारें आपले सिलींबास जाणे. ऐसे पष्ट बोलोन पुनाजी आपले घरास गुंजवणीयास गेला. त्यावरी महिनापंधरा दिवस जाहलेयावरी सिलीमकर याणी येऊन गुंजवणियास जाऊन पुनाजीस व उभयताच्या बाइकास व मुलास मारामार करून कापून घर लुटून कागद वतनाचे होते ते नेले, आणि घर खाणून जाळिले. तो सवेच मलिकअंबर विजापुराहून पुणियास आले. त्याजकडे हे त्रिवर्ग सिलीमकर जाऊन त्यास आपले तऱ्हेने समजाऊन निमे देशमुखी करून घेतली. त्याजवरी काहीएक दिवसी भिवजी आमचा वडिल बेदराहून थोरले सुपेयास आला. तो इकडील वर्तमान पुनाजीचे आवघेच कळले. मग भिवजीने द्वितीयसमंध केला. त्यास पुत्र दोघे फुलाजी व बाजी ऐसे जाले. आपले मुलाकतीस

आले. तो भिवजी मा तेथेच वारला. मग दादाजी कोंडदेव याचे कारकिर्दीस फुलाजी व बाजी मौजे भिडमावणे निमे ता॥ म॥ येथें उतरले. तो सिलीमकर आवघे पळोन गेले. त्यावरी फुलाजी नाईक याणे दादाजीपंताकडे जाऊन आपले आवघे वर्तमान विदित केले जे, सिलीमकर याणी माझे वडिलाचा मारा करून माझे वतन घेतले आहे, ते त्यापासून देविले पाहिजे. तेव्हां दादाजीपंतानी सिलीमकर यास बोलाऊन आणून चौकसी केली. माहालो माहालच्या साक्षी पाहिल्या. तो सगळेच वतन हे खरे. तेव्हा दादाजीपंतानी फुलाजीस विचारिले जे, सिलिमकर व तुह्मी ऐसे निमे निमे वतन खाणे. तुमच्या वाटणी करून देतो. तेव्हा फुलाजी ह्मणाला कीं, त्यास सुईच्या आग्रावरील मृतिका देत नाही. तेव्हां दादाजीपंतानी मध्यस्त घालून फुलाजीस कितेक प्रकारचे सांगितले; परंतु फुलाजी ऐकेना. तेव्हां फुलाजीने दादाजीपंताचे न ऐकतां माघारा का केतकवणियास आला. उपरांतिक सिलिमकर याणी दादाजीपंतास गैरवाका समजाऊन लांच दिल्हा. त्यावरून दादाजीपंती सिलिमकर याचे आगत्य धरून फुलाजीस नेऊन बासाचा मार देऊन जीवे मारिले. त्याचे प्रेत माघारे घरास हेमाजी दिघा व कालोजी फदाम घेऊन आले. तो त्याचा भाऊ बाजी याने फुलाजीचे प्रेत पाहून आपणहि आपली जीभ आसडून तोहि मेला. मग दोघाचे सार्थक सेजारीच करून बाजीचा पुत्र आबाजी चौ महिन्याचा होता, तेव्हा फुलाजीचा खानाजाद तुळाजी व मडाजी ऐसे होते त्याणी आबाजीस पळऊन ता॥ मोसेखोरे येथे मौजे वरसगावास नेले. मागे दादाजीपंती सिलीमकराचा पक्ष धरून आह्मी हाजीर नसता सिलीमकर याणी सांगितले त्याप्रमाणे पत्रं करून दिल्ही आणि वतन जबरदस्तीने खाऊ लागले. त्यास आबाजी वीस पंचवीस वर्षाचा होय तोपर्यंत मौजे वरस गावी तुळाजी व मडाजी खानेजाद याणे तेथे राहून पालग्रहण आबाजीचे केले. त्याजवरी आबाजी आपले उमेदीत आलियावरी ता॥ म॥ देशमुखी करावयास आले. तो तेव्हा सिलीमकर याचा बेटवळा फार जमला होता, वाद सांगावा तो आबाजी वाद सांगावयास एकटा व नातवानी होती, तेव्हा काही उपाय नाही. त्याजवरी सिलीमकर यास पुसिले की, आह्मास काही वतनाची वृत्ती द्यावयाची आहे किंवा नाही? त्याजवरी सिलीमकर याणी सांगितले की तुह्मी प्रस्तुत पाच गावचा हक व मौजे विरवडी इसापत ऐसी खाऊन राहाणे. त्यास आपण सगळ्या वतनाचा जाबसाल पुसोन वाद सांगावा तो प्रस्तुत वाद सांगावयास समर्थ नाही. याजकरिता कामावरी नजर देऊन वतनाचा उपभोग जितका हातास आला तितका अनभऊन घेत आलो. तो इतकियांत पुढे राजक्रांत जाली.

तेसमई आबाजी नाईक मौजे मोहडे खुर्द त॥ हिरडसमावळ येथे भाणोस-दरियांत राहिले. त्याजवरी संताजी नाइक बांदल देशमुख त॥ हिरडसमावळ याणी आबाजी नाईक यास वतनाची हकिकत पुसिली. तेव्हा आबाजी नाइकानी वतनाचा मजकूर सांगितला. त्यास संताजी नाईक याणी जाबसाल केला की, तुह्मास नेऊन श्रीमंत कैलासवासी शंकराजी नारायण याजपासी नेऊन भेटविले आणि आबाजी नाईक याचे वतनाची हकीकत जाहीर केली की, त॥ म॥ येथील देशमुखीचे वतन आमचे सगळे असता सिलीमकर याणी मारे करून वतन घेऊन खात आहेत. त्यास साहेबी कृपाळु होऊन माझे वतन देविले पाहिजे. त्यास श्रीमंत साहेब याणी आज्ञा केली जे, तुह्मी आपल्या वतनावरी जाणे आणि जो वतनाचा उपभोग घेत असाल तो घेणे आणि पुढे तुमचा वतनाची चौकसी पाहून चौघा गोतमते निवाडा करून तुमचे वतन तुह्मास देविले जाईल. त्याजवरी राजक्रांत निवारल्यानंतर आबाजी नाईक वीरवाडीस येऊन वतन अनभवू लागले. पुढे आबाजी नाईक याणी सगळ्या वतनाचा वाद सांगावा ऐसे ध्यानात आणिले, तो त्याचा काल जाहाला. तो भिकाजी नाईक याची उमर लहान होती, तेव्हा वाद दाहावीस वरीस जाला नाही, मग वाद अमृतराव याणीं उभा केला श्रीमंत कैलासवासी आनंदराव साहेब याजकडे भांडण भाडत सिलीमकरासी पुणियास गेले. तेव्हा सिलिमकर श्रीमंतापासी बोलिले की, आमचा भाऊ आह्मी आपला घरी समजावितो. त्यास आह्मास घरास घेऊन आले आणि महालचे पाटील जमा करून माहालो माहालचे देशमुख यास बोलाऊ गेले. आणि पंचाईत करून समजाविसी करावी तो माहालचे देशमुख याणी सांगितले त्यास अमृतराव ऐकेनात. सरकारात रागे रागे उठोन जाऊ लागले. त्यास सिलीमकर याणी गुंजणमावळचे पाटील यास मध्यस्ती घातले कीं, तुह्मी सरकारात न जाणे आता आगोटीचे दिवस आले, पाऊस लागला, पंचाइतीस महिनापंधरा दिवस लागतील. त्यास माहालो माहालचे देशमुख यास व पाटिल यास जाणियाची निकड, आगोट नजिक आली. त्याजवरी अमृतराव याणी पाटिलासी उत्तर केले की, चौ महीनीयाचा अवकाश देतो, परंतु कागद लेहून द्यावा की तुमची वतनाची समजाविसी चौ महिन्यानी पंचाईत मेळऊन करितो. त्यास सिलिमकर याणी मान्य करून कागद लेहून दिल्हा कीं, विजयादशमीस तुमचा वाद तोडून तुमचा वतनाचा औंश असेल तो देतो, म्हणून सिक्याचा कागद लेहून दिल्हा. त्याजवरी आमचा वतनाचा उलगडा करून दिल्हा नाही. सबब आम्ही वतनाच्या जसी साहेबापासून करवित आलो. त्याजवरी हाली साहेबी कृपाळू होऊन जेजूरीच्या मुकामी सिलिमकराचा

व आमचा इनसाफ गोतमतें करावयास आज्ञा केली. त्यास सिलिमकराचा व आमचा वतनाचा लढा तोडणार धणी समर्थ आहेत, हा करीणा लेहून दिल्हा सही शके १७१८ नलनाम संवत्सरे भाद्रपद शु॥ २ मु॥ जेजुरी.

छ १ रा॥वल.

लेखांक ३.

(फारसी मजकूर)

छ इजतमाआब बापूजी हैबतराऊ देसमुख तपे गुंजनमावल अजी रणदुलाखान सलाम बादज सलाम मकसुद अर्दास पाठविली की आपण उमेदवार आहो. जमेती स्वार २० चाकरी करून ऐसे उमेद धरितो. बापूजी पंडित हेजीब पाठविले आहेती. कौल मऱ्हामती केले पाहिजे म्हणौउनु. तरी घर तुमचे आहे. अलबता येणे. काही मुलाहिजा न करणे. येथे आलियावरी त्याख हाल सरंजामी होईल. कौल असे. हुकेरीस मेजवानी बदल जातो तरी छ १ रबिलौवल आम्हा नजिक एणे.

फारसी
तेरीख २७
सफर

लेखांक ४.

तकरीर केली ऐसीजे, आपला मूल पुरुस रुद्राजी नाईक हे पे॥ मुरुमदेऊ तो॥ गुंजनमावळ येथील देशमुखी करीत होते. यावर हजरती अलमपन्हा साहेबी हा मुलक एदिलशाही हैबतखान यासि दिधला. यासि मुलुक जालियाउपर पे॥ किलियावर हवालदार होता तो आपला आजा बाजी हैबतराऊ यासि बोलिला की, पादशाही किला आहे तुह्मी पा॥ दिवाण नफर आह्मा किला जधुनु आहे तर तुह्मी मिरासी नफर आहा तर तुह्मी किला राखणे. आह्मी हुजूर जातो. यावर आपला आजा बाजी हैबतराऊ किलेयावर गेला. किलियावर जाताच बाजी हैबतराऊ याचा बाप रुद्राजी नाईक हे तो॥ मजकुरीची देशमुखी करीत होते. यासि बोलले की, आह्मी किलियावर दटौनु आलो आहो याकरिता दिवाण नामजादे होतील याकरिता तुह्मी किलियावर येणे. यासी एक दोनु वेला बोलिले, परत किलेयावर जात नाही. मग बाजी हैबतराऊ खाली येऊनु आपला बाप रुद्राजी नाईकास किलियावर घेउनु गेलियावर किलियासी वेढा हैबतखान याचा नामजादी मीर येउनु बारा मावळीचे देशमुख घेउनु येउनु किलियासी वेढा घातला.

यावर बाजी हैबतराऊ आपला आजा याही हजरतो मलिकअंबर साहेबास लिहिले की, येदीलशाही येउनु कीलियासी वेडा घातला आहे, तर साहेब रजा देतील तर किला त्यास देउनु यावर साहेबी रजा फर्माविली की मुलुक त्यास दिधला आहे तर किला त्याचे हवाले करणे ह्मणौनु रजा फर्माविली. यावर बा॥ रजा मलिक साहेब किला त्याचे हवाले करुनु आपण खाली उतरले. यावर आपले पणजें रुद्राजी नाईक देसमुखी करीत होते. यावर आपला आजा बाजी हैबतराऊ यासी बोलले कीं, आपले ह्मातारपण आहे, तुह्मी देशमुखी चालवीत जाणे. यावर रुद्राजी नाईक पुणियासि येउनु हजरती मीरसाहेबास बोलले की, आपले ह्मातारपण आहे, तरी आपला बेटा वडील बाजी आहे त्याचे हाते देसमुखीचा कारभार घेत जाणे. यावर हजरती मीरसाहेबाचे हुजूर त्यास बोलाउनु देसमुखीचे सिके त्याचे गला घालुनु पाने व लुगडी देउनु कारभार करू लागले. त्यावर हजरती मीरसाहेबी आपला कौल दिधला की, तुवा सुखे देशमुखी करुनु दिवाण नफराई करीत जाणे. यावर हजरती मलिकसाहेबाचा मुलुक मलिक साहेबास जाला. यावर राउतराऊ यासी मुकासा पो गुंजणखोरे दिधले यावर बाबाजी व त्याची आजी तेजाई आवा हे हर दोजणे हुजूर गेलियावर हजरती मलिकसाहेबानजिक उभे राहिलियावर अर्ज केला की, आपला मरद हा बाजी हैबतरायाने मारिला. देसमुखी वरसे १० दाहा खात आहे ह्मणौनु मालूम केले. यावर हजरती म॥ साहेबी त्यासि तलब केलियावर त्यास मालूम जाले की, हुजुरुनु तलब येते. यावर तलब माहाली आली नसता आपला आजा बाजी हैबतराऊ हुजूर गेले. याउपर बाबाजी मजकूर राजश्री राऊतराऊ मुकासी यासी लुसकती दिधली. घोडी १ व फिरंग १ देउनु माहाली येयाची रजा घेउनु माहाली आला. याउपर आपलिया माया २ दोघीजणी व आऊबाई मावळन व चुलते सुन्याजीबावा व दमाई आईजी हे माहाली ठेउनु आमचे आजे बाजी नाईक हे हुजूर मलिकापासी गेले होते. यावर बावाजी एउनु माणुसे घरामधोनु बाहेर काडिली व उदंड जाजती करिता तकसीर केली नाही. यावर आपली मावळन आऊबाई होती तिणे आमचा कूली समाचार जो जाला तो त्यास लिहिला की, तुमचे मागे बावाजीने ऐसी ज्याजती केली म्हणौनु तपसिले लिहिले. याउपर आपला आजा बाजी हैबतराऊ याही मलिकापासी जाऊन अर्ज केला कीं, साहेबी नफर मजकुरास तलब केली. हे आइकौनु सेरीकर साहेबाचे बांदगीस आला आणि मागे बावाजी यावरी बाजी मलिका हुजूर उभा राहिला की, माघे मुलालेकरासमान साहेबाची तलब जाहाली ह्मणउनी आइकिताच तलब

माहालासी आली नसता साहेबा हुजूर आलो. यावरी बावाजीने मुलाबाळास हाडाहाड केलियावरी, मलिक्रानी राउतराऊ मोकासी त्याचा हेजिब रुद्राजीपंत बोलाविला की, तुह्मी ये कायबदल करिता? यावरी त्या हेजिबाने राउतरायासी आपला हाते रोखा लिहिला की तुह्मी हे कायवदल करिता? बाजीच्या एरिदियास हुजूर तूर्त पाठविजे; नाहीतरी तुज ताकीद होईल. यावरी राउतराऊ माहालासी येऊनी बावाजीस हुजूर रवाना केलेयावरी मलिकाचे दादनीस बैसोन दोघाचे वादे उभे केले. यावरी हरदो जनाची मनुसिभी पाहून आमचा आजा बाजी नाईक याही खुर्दखत देउनी देसमुखी देऊन रवाना केले. बावाजी मजकुरास दूर केले. बाजी सालासी येऊन देऊन देसमुखी चालऊ लागला. बावाजी बेटा केला होता. तो माघे एक वरीस राहून मालुमातीचे खुर्दखत काढिले. नागोजी भास्कर याने काढून दिल्हे. ते खुर्दखत घेऊन दरबारा बाहीर आले. यावरी आपला बाप कान्होजी हैबतराऊ तेथे होते. त्यानी बावाजीस पदरी घरिले की, तू मालुमातीचे खुर्दखत कैसे नेतो? तुवा आह्मी मागत्यान वाद सांगावा. यावरी नागोजीने मलिकाचा माहालदार थोताडे आनून याचा पदर सोडविला. मग तो माहालासी आला. यावरी आमचा आजा बाजी हैबतराऊ मागत्यान हुजूर गेले. हुजूर जाताच मुल्ला नबीब यास दिवान बारा मावळे दिल्ही. त्याचा सुभेदार रायाराऊ मुलकाला आले. आपल्या बराबरी बाजी हैबतराऊ घेउनी आले की, तुझा पेसजी जो काय निवाडा जाहला असेल तेणेप्रमाणे तुझा निवाडा करून. ह्मणउनी घेउनि आले. यावरी बावाजी हि यास भेटला. मग रायाराऊ ह्मणो लागला जे, तुह्मा हरदोजणाची मुनसिभी करितो. याउपरी बालाजीस रजा दिल्ही. यावरी बालाजी नाईक कारबारास ठेवुनि बावाजी पुने घरावरी गेला. यावरी नीलकंठ राऊ यासी व रायाराऊ यासी कलहो लागला. यावरी गडासी वेढा घातला. यावरी मलिक साहेबाच्या खुर्दखतावरून आमच्या वडिलाचे हावाला देसमुखी केली. देसमुखी करिता आपला आजा मेला. यावरी रायाराऊ साहेबी काढिला यावरी मलिक साहेबाचे हवालदार काजी सेक साला येउनी मलिक साहेबासी लेहून या हरदो जणासी तलब करून बावाजी वा कान्होजी हैबतराऊ आपला बाप हुजूर घेऊन गेले. गेलियावरी आपला बाप वा बावाजी मुनसीभीस उभे केले. दोघानी आपला खुर्तखत पुढे ठेविला. मलिकसाहेबी पुसी केला की, दोही कागद कोन्हाचे? आपले बाप बोलिला जे साहेबाचे कागद आहे. याउपरी बावाजीला पुसिले हा कागद कोणाचा आहे? यानी जबाब दिल्हा की, साहेबाचा कागद आहे. मलिक बोलिला की मलिक दोग की एक? याउपरी कारकुनासी पुसी केली. यावेरी कारकून मजालसी खंडो कृष्ण व नागोजी भास्कर व मजालसी कारकून यास पुसिले. ते बोलिले की मलिक एक

व सिका एक. यावेरी मलिक बोलिले की, अवलका निवाडा आपण केला आहे. हाली आपली अमल चोरोनु मालुमातीचे खुर्दखत करून कोण्ही दिल्हे आहे ? यावेरी कारकून कोण्ही बोलेतीनात. मग मलिकसाहेबास कळों आले की, कारकूनी हा अमल केला. मग खंडो कृष्ण यास ताकीद फर्माविली. मार केला. होनु हजार एक लाविले. व नागोजी भास्करास ताकीद करून दरबार मुतलबा केला. मार केला. टांगेस धरून बोढून टाकिला व बावाजीसहि ताकीद करून मार केला. बोढून टाकून अदबखाना दिल्हे. यावेरी आपल्या आपणासी खुर्दखत देसमुखीचे देउनु माहालास पाठविले. यावेरी देसमुखी करीत होते. यावेरी मलिकसाहेबी सोलापुरास वेढा घातला होता ! तेथें मेले. यावेरी पातशाहीमधे खलेल जाला. यावेरी बावाजी कृष्णाजी बादल याचेथें जाउनुं पुंडावे करून विलायतीत खलेल केले. याउपरी आपले बाप कान्होजी हैबतराऊ हे हुजूर अलमपन्हा पातशाहापासी गेले. तेथें अर्ज केला की, बावाजी विन हबाजी येणे कारकिर्दी म॥ म॥ मलिकअंबर देसमुखी ब॥ आपणास करकर करून हुजूर आलो यावरी हुजुरून आपणासी मुनसफी करून बाबाजी दूरी करून आपल्यास करार करून हक्क लाजिमा व इसापती गहदम सालाबाद प्रमाणे दुमाल करून निवाडीयाची खुर्दखते ३ कि॥ खुर्दखत सन इशरैन अलफ बनाम आपला व खु॥ बाजी व किते २ सन अर्बा इशरैन अलफ बनाम आपले कि॥ दिधले आहेती, तेणेप्रमाणे आपण देसमुखी करितो. यावेरी माहाली कारकून फर्मानाचा उजूर करितात. दरींबाब फर्मान सादर होये. मालूम जाले. ब॥ इशारती दिवाणताला कान्होजी हैबतराऊ करीत आहे. देसमुख ता॥ गुंजणखोरे यासी वा बाबाजी बिन हबाजी येणे क॥ म॥ म॥ मलिक अंबर देसमुखी ब॥ करकर करीत होतां. यावेरी मलिक अजमे हरदो जणाची मुनसुफी करून कान्होजी देसमुख करार करून हकलाजिमा व इसापती गहदम सा॥ प्रमाणे देउनु निवाडियाची खु॥ सदरहू दिल्ही तेणेप्रमाणे कदीम अजा जैसे चालिले तेणेप्रमाणे चालवीत जाणे. फर्मान घेउनु माहालास आले. देसमुखी करू लागले. यावेरी बालाजी बांदलांचेथें होते. त्यास कृष्णाजी नाईक बोलिले की ते पातशाहाचे फर्मान यापासी आहेती. दिवाण आपणास ताकिद करितील. तुह्मी येउनु जा ह्मणौनु बावाजीस दवडिले. यावेरी निजामशा मोगलानी नेलेयावेरी बावाजी कोकणांत गेले. जाउनु दावे करू लागले. धाकोजी सरपला मोकदम मौजे सोंडे व कर्जवणाच्या मोकदमाची बाईल ही जिवेच मारिली व डेराचे माहार तोडिले. ऐसे दावे पुंडावियाने केले. (अपूर्ण)"

लेखांक ५.

१४९८ पौष शुद्ध १०.

"अज रख्तखाने राजश्री अंकुसराऊ राजे गोसावी बजानेब्रू कारकुनानी तपे खेडबारे बिदानद सु॥ सीत सबैन व तिसा मया देसमुखानी तपे मजकूर व इनामती व हकलाजिमा व बाजे इनामती व सेते संभुजी व बावरोजी व देसकु तपे मजकूर बा॥ भोगवटे तसरफाती वजिरानी कारकिर्दी दर कारकिर्दी पेसजी ता॥ मलिक सर्क मलिक कामन मुलूक चालिले आहे तैसे चालवणे. ऐसी खुर्दखताची रजा होए. मालूम जाहाले देसमुखाची इसावती व इनामती व हकलाजिमा व बाजे इनामती व सेत संभुजी व बावरोजी व देसकु तपे मजकूर बा॥ कौल भोगवटे तसरफती ता॥ कारकिर्दी पेसजी वजिरानी चालिले आहे तेणेप्रमाणे चालविजे. असेली खुर्दखत देसमुखापासी असो दीजे. तालिक लिहून घेईजे. मोर्तब.
तेरीख ८ माहे सौवाल सलास."

लेखांक ६.

श्री

"हजरत साहेबाचे

खाने अजम अकरम नवाब

साहेब दाईम दौलतहू

अर्जदास्त अर्ज दर बांदगी सेरीकर महीपाजी हैबतराऊ देशमुख ता॥ गुंजणमावळ बांदगीस अर्ज ता॥ छ ११ जमादिलाव्वल साहेबाचे नेक नजरेकरून सेरीकराची बखैर सलावत असे.

दर्या साहेबाचे * * * * ता॥ साहेबाचे * * * लक्षीत राहिलो आहो. रावसाहेब ह्मणतील की * * * * * नाहीस तरी पायाची आपले वडिलानी एखतारी धरून खिजमती बहुतच केली; त्यामुळे या राज्यांत आपले वडीलास तलबखाने व कितेक प्रकारे खराबी जाली. आपले दादे हैबतराव तोरणे गडावर बंदखानी कितेक दिवस कुदलो. अखेर खंडदंड देऊन जीवमात्र सुटलो. काही उबरं राहिला नाहीं. हाली साहेबाचे बांदगीस कागदपत्र पाठविला नाहीं. तुर्त आपले शरीरीं आजार आहे ह्मणून बांदगीस यावयास अनुकूल पडिले नाहीं. आपले भाऊ बांदगीस आले आहेती. आमचे तख्त ते जागा साहेब आहेती ते आह्मांस जागा आहेती. आपली सर्फराजी करावयासी धणी मायबाप आहेती. बांदगीस रोशन होए हे अर्जदास्त."

लेखांक ७.

१५५९ माघ वद्य ७.

"मसुरल हजरती राजश्री दादाजी कोंडदेऊ सुभेदार
नामजाद व कारकून किले कोंढाणा व माहाला निहाय
देसमुख व देसक

तपे खेडेबारे
देसमुख
तुळजी कानजी

ता॥ मोसेखोर
बालाजी यसवंतराऊ
देसमुख ता॥ म॥
देसक व कुळकर्णी.

बापूजी मुदगल.
देसकुलकर्णी.

भानजी नाईक.
पासलकर.

बापूजी जीवगण.
ता॥ आंबी.

नागोजी नावडिकर.
अजहती देसमुख

गोजो सोमनाथ.
देसकुलकर्णी
ता॥ म॥ विकलमऊ

ता॥ कानदखोरे
बाबाजी
झुझारराऊ देसमुख
ता॥ म॥

गोजप्रभु
देसकुलकर्णी
ता॥ म॥

देसक ता॥ गुंजण मावळ
येसजी व बाब-
जी मोकदम मौजे
वागिणी

होमाजी मोकदम
मौजे–

सोनजी मोकदम.
कोलवडी.
गवाजी व रामाजी अ॥
देसकुलकर्णी ता॥ म॥

तुलाजी मोकदम.
मौजे जांबुली.
बालाजी जनार्दन.
खासनिस

सु॥ समान सलासीन अलफ कारणे हजीर मजालसी महजर केला ऐसा जे, बाहूजी बिन कान्होजी हैबतराऊ व हबाजी बिन बाबाजी हैबतराऊ, व बाळाजी बिन रुद्राजी हे ता॥ गुंजण मावलाचे देशमुखीबदल भांडत होते. यावरी साहेब व गोत मिलोनु येणेप्रमाणे निवाड केला. बालोजी मूळपुरुष. त्यासी दोग पुत्र. वडिलाचे नांव हउजी हैबतराऊ आण धाकटा रुद्राजी. यावरी बालोजी वडिल देसमुखी करीत होता. तो मेलियावरी हऊजी हैबतराऊ वडिल पुत्र तो देसमुखी करू निघाला. तो हऊजी हैबतराऊ पुणा हवालदारी मारिला! हउजी हैबतराऊ मारिले यावरी बाळाजी बिन हऊजी हैबतराऊ तो देसमुखी करू

लागला. त्यावरी कोंडे देशमुख ता॥ खेडेबारे त्यासि झगडावयासी आला. तो झगडा पडिला. त्यावरी त्याची माय सीताई दुखे दादलाहि पडिला व लेकहि पडिला या दुगे आगी निघो लागली. मग तिचा दीर रुद्राजी तो ह्मणौ लागला जे, बाई तू आगी निघो नको. आपले दोघे लेक आहेती. वडिल बाजी धाकटा हउजी हैबतराऊ लेक हा तुज तूते दिधला आहे. सुखे तू देसमुखी चालउनु असणे. यावरी हउजी हैबतराऊ देशमुख ह्मणौनु त्याचे नाव ठेउनु सकल कारबार रुद्राजी करीत आहेती. यावरी रुद्राजीची बाईल मेलियावरी दुसरी धाकटी बाईल रुद्राजीस होती तीस बालाजी पुत्र जाला. सीताईस पुत्र दिधला तो देखील रुद्राजीचे तिघे पुत्र सीताईस हऊजी हैबतराऊ देसमुखीचे नाव ठेऊनु दिधला होता. तो गोत्रजी मारिला. त्यासी बाबाजी हैबतराऊ लेक होता. तो बाबाजीमधे व रुद्राजीचा वडिल लेक बाजी त्या त्या मधें देसमुखीची करकर लागली. बाजी ह्मणो लागला जे, आपण रुद्राजीचा वडिल पुत्र असतां, तुज देसमुखीची निसबती नसतां, तू देसमुखी चालवावयासी कोण? असे ह्मणौनु रुद्राजी जिता असता बाजीने रुद्राजीपासूनु सिका घेउनु देसमुखी आपण चालऊ लागला. बाजीने देसमुखी केली. बाजी मेलियावरी बाजीचा लेक कान्होजीने देसमुखी केली. पर याचा निवाडा जाला नाहीं. करकर याची दिवाणामध्यें व गोतांत होतच असे. बाबाजी मालुमातीची खुर्दखते आणि दर देसमुखीचा निवाडा जाला नाहीं. कान्होजी देसमुखी करीतच असे. यावरी बाबाजी मुरुंबदेवी झगडा पडिला व कान्होजी कोंढाणा सिदीने मारिला. यावरी कारकिर्दी घोरपडे तिही ता॥ मा॥ चे गावाचे तकसिमा च्यारी केलिया. पैकी बाहुजी बिन कान्होजी हैबतराऊ यासी वडिलपणाची तकसिम एक व वाढियाची एक तकसिम एकून तकसिमा २ गाव निमे दिधले. तकसिमा दोन उरलिया, त्यांत एक तकसिमा बाबाजी हैबतराऊ एक तकसिम १ व बालाजी माइकास एक तकसिम ऐसा दोनी तकसिमा गाव निमे दोघास दिल्हे. गाऊ समीन निमीन पाहोनु वाटिले नव्हते व कागदहि केला नव्हता व नांगराचा निवाडा जाला नव्हता. याकरिता करकरींतच आहेती. याकरिता तपाहि लागला नव्हता. मग हाली हे आणौनु याचा याचा येणेप्रमाणें निवाडा केला. अज देह देखील मजरे व इनामती देह ८१ एकीयासी व मजरे २ गावाचे गांवाखाले लिहिले आहेती. याकरिता देह येकीयासीच ता॥ बालाजी मूलपुरुष त्याचा धाकटा भाऊ चाहूजी त्याचे बुडीच फुलाजी व बाजी त्यासी समाईक देह पैकीं देह देखील इनाम ५ तपसिलः—

१ मौजे कतकवणे देह १ ता॥	१ हतवे बु॥
·।। निमे इनाम	१ हतवे खुर्द
·।। निमे देसमुखीचा हक	१ निधान
१ निमे गाव	१ सांगवी खुर्द
१	४

येथील निमे गाव इनाम व साडेच्यारी गाव देशमुखीच्ये. येथील इनाम व देसमुखीचा कुल हकलाजिमा हेहि खावा. बालाजी हैबतराऊ व हबाजी हैबतराऊ व बालाजी यासि काही या गावाच्या हकलाजिमे यास व इनामतीस काही समंध नाही. रुद्राजीचा भाऊ भिऊजी त्याचे वंसीचा तुलाजी व साऊजी त्यासि एक गाव मौजे कोदलवडी हेही तेथील देसमुखीचा हक कुल दिधला असे. त्याणे तो गाव खाउनु सुखी असणे. बाकी देह १५ राहिले तपसिल;–

हकलाजिमाचे देह	इनाम देह
११	४

याची वाटणी ब॥ कारकिर्दी घोरपडे गावाच्या तकसिमा च्यारी केल्या होत्या. पैकी बाळुजी बिन कान्होजी हैबतराऊ वडिलपणाची एक तकसिम व वाटियाची एक तकसिम एकून तकसिमा २ गाव निमे दिधले. ता॥ २ उरलिया त्यांत एक हबाजी हैबतराऊ एक १ बालाजी नाईक ऐसे ता॥ २ गाव दोघास दिल्हे. येणेप्रमाणे तकसिमा केलिया होति. यापरी गाव नेमून वाटिले नव्हते. हाली येणेप्रमाणे वाटिले. तपसिलः–

तरफ बाऊजी बिन कान्होजी हैबतराऊ

इनाम देह

१ पाली बु॥

·।। चिंचले खुर्द निमे

·।। कुरगोडी निमे उण सेते टके ५० आहे.

२

या खेरीज सेते इनाम ३ आहेती ती दोठाई व विस्वाघाट निमे

तरफ हबाजी बिन बाबाजी हैबतराऊ व बालाजी बिन रुद्राजी हे दोघे तकसिमदार याचे दोघाचे दोनी तकसिमा याचे गाव.

इनामती देह

१ बोपे

·।। कुरगौडी निमे फाजिल सेते टके ५०

·।। चिंचले खुर्द

२

या खेरीज सेते ३ इनाम आहेती ती दो ठाई व विस्वा निमे.

हकलाजिमेयाचे देह		हकलाजिमाचे देह	
१ कासुर्डी	१ दिडघर	१ वेलवडी	॥ जांबली नीम
१ मोहरी बु॥	१ सांगवी बु॥	१ कोलवडी	१ पारवडी दे॥ म-
॥ वागिणी निमे	॥ जांबली निमे	॥ वागिणी निमे	जरा आंबेदरी
१ ताभाड	१ चिंचले बु॥	१ केतकवणे दे॥	१ कर्जवणे
१ सोंडे सरफला	१ सोनवडी	मजरा इसानदेऊ	१ कामर खुर्द
१ सोंडे हिरो	१ सोंडे माथणा	१ मांगदरी	१ निगुडे खु॥
१ सुरवाड	१ आडउली	१ देउगौ	१ सोंडे कारला
१ असकवडी	१ मेरंवणे	१ इसान देऊ	१ आसनी मणजा
१ चिरमोडी	१ घावर	१ भागिनघर	१ आसनी दामगुडा
१ लव्ही खु॥	१ लव्ही बु॥	१ साखर	१ पिपरी
१ पाली बु॥	१ वाजेघर खु॥	१ फणसी	१
१ गुगुलसी	१ एकलगौ	१ वाजेघर बु॥	१ हरपुर
१ पिसवी	१ वरोती बु॥	१ पंगारी	१ भोर्डी
॥ कर्णवडी निमे	१ माजगौ	१ सिंगापूर	१ वरोती खु॥
१ केळद	१ चांदवणे	॥ कर्णवडी निम	१ निगुडे बु॥
१ डेरे	१ भुतोंडे	१ खुलसी	१ गुहिनी
१ भांडरवली	१ कामेरे बु॥	१ वालवडी	१ कुरंजी
१ मळ	॥ बोराळे निमे	१ कुंबळ	१ बोराळे नीम
॥ अंबवणे निम	१ गुंजवणे	१ मोहरी खु॥	१ आसनी मार्ग
१७॥	१८	॥ आंबोण निम	१ पाली
	१७॥	१७॥	
	३५॥		

एणेप्रमाणे बाउजी बिन कान्होजी हैबतराऊ येणे आपली देसमुखीची तरफ खावी. दुसरी तरफ हबाजी हैबतराऊ बिन बाबाजी हैबतराऊ व बालाजी बिन रुद्राजी या दोघीजण देसमुखीची एकीतरफ खावी. नागर बाउजीने आपले तरफेस करावा दुसरा नागर हबाजी बिन बाबाजी हैबतराऊ याणी आपली ता॥ व बालाजीची तकसीम दोन्ही तकसिमा मिलोनु एक तरफ केली आहे, ते तरफेस बाबाजीने करावा. पाने लुगडी दिवाणातुनु अनावा. हरएक जागाहुनु देतील ती आधी बाऊजी बिन कान्होजी हैबतराऊ याणे घ्यावी. याउपरी हबाजी बिन

बाबाजी हैबतराऊ याणे घ्यावी. त्याउपरी बालाजी बिन रुद्राजी त्याणे घ्यावी. या तिघाजणासी पाने लुगडी उलीने देतील ते उलीस फुलाजीस व बाजीस यासि पाने लुगडी द्यावयासी समंधु नाही. देसकास जेधवा पाने लुगडी देतील तें उलीस आधी फुलाजीस व बाजीस द्यावी. त्यामागून खोतासी व मोकदमासी द्यावी. तरफा आपलालेया लावावेया. येरयेराचे तरफेस कांहीं निसबती नाही व पटीहि दुमाल करणे पडले तरी दोनी तरफा लिहिणे आणि दफाती ह्मणौनु फुलाजी व बाजीचे गाव ल्याहावे. सदरी लिहिले आहेती ते व तुलजी व साऊजीचा गाव ऐसे ल्याहावे. एणेप्रमाणे आपले तरफाचे गाव लाउनु सुखे निवडिलेप्रमाणे वर्तणूक करणे. एणेप्रमाणे लेकराचे लेकुरी खाउनु सुखी असणे. निवडिलिया कामास जो कोण्ही हिलाहरकती करील त्याणे दिवाणांत पाच सिसे व पाच हजार होनु देणे. व मिरासी वेगला हक हजर सही मोर्तब सुद. पेसजीचे जे कागद ज्यापासी असेतील ते रद असेती. मोर्तब सुद. पेसजीचे कागद बाप-भावकीचे भाउपणाचे असतील ते रद असेती मोर्तब सुद. फारसी

तेरीख २० माहे रमजान"

रमजानु

लेखांक ८.

"फर्मान बमय मुनशरफ सदुरयाफत के विठोजी हैबतराऊ देसाई किले मुरंबगड आंके अज शहूर सन सी व अलिफ दर्रीविला सैद अबदुला बिन सैद महमद देसाई किले रोहिडे बदरगाह ज्याहापनाह इलतमास केली कीं मुलक निजामशाह व बाजे विलायत सिवा मलाऊननामे आपल्या दरकबजेंत आणून दस्त दराजी करितो, तर आपण मिरासदार कदीमी नजर येनायत फर्माउनि इनामात व दस्तुर देसाई मा।रास सरफराज करून कौल येनायत फर्माविला पाहिजे कीं जमियत शायस्ता पैदा करून सिवा मलउंनाने मुलक काबीज केला आहे तो दर कबज पातशाहजीच्या आणिल त्यावरून खातीर मुबारकेस आणौन इनाम वगैरा दस्तुर बित॥ जे

मौजे तांभारे १	मौजे जांबली १	मौजे हाटवे १
मौजे मोहरी १	वगैरे	

व बाजे किले मजकूर बमोजीब कबिला अवलाद व अफलाद मोकरर मरहमत फर्माउनु कौल दिधला आहे, तरी हरभांतेनें खातीरजमा जाणौन कितेक जमियत पैदा करून विलायत जे कांही मलाऊन कबज केली आहे ते दर कबज बुलंद

दौलतेचे आणून दाखवणे. दौलतख्वाही व नेकखिदमती करून दाखवणे व बादज दौलतख्वाही पुरापुर हाल बटा इस्तकामत मरहमत करून सरफराज फर्माविले जाईल. दरीं बाब कौल असे. ता॥ आबाद बरहुकम फर्मान अशरफ अकदस बमय मून अली रवद तेरीख अल मजकूर दुयम शहर जमादिलौवल सन १५.

लेखांक ९.

श्री. तालिक १५७२.

"अज रख्तखाने राजश्री सिवाजीराजे दामदौलतहू बजानेबू कारकुनानी हाल व इस्तकबाल ता॥ गुंजनमावल बिदानद सु॥ इहिदे खमसैन अलफ बापूजी हैबतराव व हाबाजी हैबतराव व बाळाजी नाईक सिलींबकर देशमुख ता॥ म॥ हे गलबल्यामध्यें आपले जमेतीनसी साहेबाचे मसलतेस येऊन एकतारी केली, त्यावरून देशमुखावर मेहरवान होऊन आजरामऱ्हामती इनाम मौजे चिचले बु॥ देहे १ एक आज मोजा तक्षीमा ३ तीन तपसिल

बापूजी हैबतराव	हाबाजी हैबतराव	बाळाजी नाईक
तक्षिम १	तक्षिंम १	तक्षिम १

खेरीज नख्तयाती व महसूल व बाजे बाब कुलबाब इनाम दिधले. असे दुमालें करणे. अवलाद व अफलाद चालविणे. दर हर साल ताज्या खुर्दखताचा उजूर न करणें तालिक घेऊन असली खुर्दखत देसमुखापासी फिराऊन देणे सदरहू देह रकम नख्त टके १६६८४ व ऐन जिनस तूप ८८४ व ताग वजन ८१२॥ एकूण मख्ता खेरीज टके १६० एकसे साठी दिधले. असे दुमाला करणें मोर्तब असे."

शके १५७२ विकृतीनाम संवत्सरे सन १०५१.

लेखांक १०.

१५७९ चैत्र वद्य २

"महजर ब तेरीख १५ माहे जमादिलाखर बिहुजूर हाजीरमजालसी सदर राजश्री सिवाजी राजे साहेबु मुकाम कसबे पुणा
काजी अबदुला बिन काजी महमुद हकीमशरा व काजी
नायब काजी पा॥ पुणा

(फारसी सही)

रख्तखाना

म॥ हजरती राजश्री सामराज निळकंठ राजश्री वासुदेव बालकृष्ण मजमूदार पेशवे र॥ ई॥

राजश्री सोनाजी विस्वनाथ डबीर
राजश्री बालाजी नाइक पुंडे मजालसी
माणकोजी दाहातोंडे सरनोबत
रा। ई।
नूरबेग सरनोबत पाऊलोक

राजश्री माहादाजी सामराज सुरनिस
राजश्री बाबाजी हरी मजालसी
राजश्री रघुनाथ बलाळ सरसबनिवीस
रा। ई।
राजश्री सामराज पद्मनाभी सबनीस
पाऊलोक

राजश्री आबाजी माहादेऊ हेजिबु
माहालानिहाय

दफाते

प्र। पुणा

कारकून

राजश्री सिवाजी किटो नामजाद
त। हवेली
देसमुख

केसो आनंराऊ मजमूदार

मल्हारजी येसवंतराऊ निगडे देसमुख

महादाजी राम देसकुळकर्णी

मालोजी नरसिंग राऊ सीतोले
विठोजी नाईक सीतोले
विठल मोरदेऊ व गोविंदराम व मुकुंद मायदेऊ देसकुलकर्णी
विठल मोरदेऊ देसकुलकर्णी

प। सिरवल

त। खेडेबारे
देसमुख

बापूजी बिन तुलजी नाईक कोंडे
कानजी नाईक कोंडे
नारो बापूजी देसकुलकर्णी

त। हिरडस मावल

रायाजी बिन बाजी नाईक बांदल देसमुख
फुलाजी व बाजी प्रभु देसकुलकर्णी

प। पुणे

त। हाय उर्फ पौड

रामाजी राऊतराऊ देसमुख ढमाले
मल्हारजी साबाजी प्रभु देसकुलकर्णी

ता। मोसेखोरें

तुलाजी येसवंतराऊ देसमुख
माल प्रभु देसकुलकर्णी

ता। कानदखोरें

बाबाजी झुझारराऊ देसमुख
गोज प्रभु व तिम प्रभु देसकुलकर्णी

ता। मुठेखोरें

चाहुजी गंभीरराऊ मारणे देसमुख
विस प्रभु देसकुलकर्णी

ता। वेलहवंडखोरें

बाबाजी अढलराऊ देसमुख
मोरो विठल देसकुलकर्णी

ता। गुजणमावल

गोमाजी श्रीपती देसकुलकर्णी	नागोजी बलाल दत्फरखास नि॥ देसमुख ता। मजकूर
बालोजी बिन येसजी चोरघे सरखोत	कसबे अंबोणे मोकदम बिन पिलाजी सुर्याजी
	तलेकर तलेकर
होनाजी व जागोजी सरफले मोकदम सोंडे	तुलाजी तलेकर माऊजी तलेकर
	सोनजी फदाला मोकदम कोळवडी
राज पाटील मोकदम मोहरी बु॥	राघोजी व येसजी भिंडे मोकदम मौजे कोदलवडी
गोंदजी इंगुलकर मोकदम मौजे अडउली	देऊसेटी चौगुला मौजे बोराले
नागोजी लिह्मण मोकदम मौजे पारवडी	

सु॥ सवा खमसैन अलफा कारणें महजर केला ऐसा जे

बापूजी बिन कान्होजी हैबतराऊ सिलंबकर	हबाजी बिन बावाजी हैबतराऊ सिळंबकर
बाळाजी बिन रुद्राजी नाईक सिलंबकर	

देसमुख तपे गुंजणमावल तपे मजकूरीचे देसमुखीबदल तिघेजण आपण आपणांमध्यें भांडत राजश्री साहेबांपासीं आले. साहेबीं हुजूर मुनसुफी खातिरेसी आणितां, तिघां वर्गांचा मूळपुरुष बाळोजी सिलंबकर. त्याचे दोघे पुत्रः— वडिल पुत्राचे नाव बापूजी हैबतराऊ धाकुटा पुत्र रुद्राजी बाळोजी देसमुखी करीत होता. तो मयत जालिया उपरी बापूजी हैबतराऊ वडिल पुत्र तो देसमुखी करूं निघाला. तो बापूजी हैबतराऊ पुणां हवालदारीं मारिला. तो मारिल्यावरी बावाजी बिन बापूजी हैबतराऊ देसमुखी करूं लागला. याउपरी कोंडे देसमुख तपे खेडेबारें यांसीं झगडावयासी आला. तो झगडा पडिला. त्यावरी त्याची माय सीताई, दादला पडिला व लेंकहि पडिला त्यादुखे आपण आगी निघेन ह्मणौनु ह्मणो लागली. मग तिचा दीर दादल्याचा धाकुटा भाऊ रुद्राजी ह्मणो लागला जे, बाई तूं आगी निघों नको. आपले दोघे लेंक आहेती. वडील बाजी धाकुटा लेंक हबाजी हैबतराऊ हा तुज आपण दिधला आहे. सुखें तपे मजकूरीची देसमुखी चालउनु असणे. त्यावेरी हउजी हैबतराऊ देसमुख ह्मणौनु त्याचें नाव ठेउनु सकल कारबार रुद्राजी करीत असे. यावरी रुद्राजीची बाईल मेली ह्मणौनु रुद्राजीने दुसरी बाईल केली. तीस बाळाजी पुत्र जाला. सीताईस पुत्र दिधला त्याचें नाव हउजी हैबतराऊ देसमुखीचें नाव ठेउनु दिधला होता. तो गोत्रजानी मारिला! त्यासी एक लेक बाबाजी होता. त्यांमधें व रुद्राजीचा वडील

लेंक बाजी हरदो जणांमधें तपेमजकूरीचे देसमुखीची करकर लागली. बाजी ह्मणो लंगला जे, आपण रुद्राजीचा वडील पुत्र असतां तू आपला धाकुटा भाऊ असतां वडिले हाती दिधला आहेस, एव्हडियाच वरून वडीलपण करूं पाहतोस कीं काय? ऐसे बोलोनु रुद्राजीस व बाबाजी हैबतराऊ यासि दस्त करून किले मुरूंबदेवावरी राखोनु सिका हिरोनु घेतला, आण आपण देसमुखी करूं लागला. यावेरी रुद्राजी ह्मातारा होता तो मयत जालियावेरी कारकिर्दी मलिक अंबर हुजूर जाउनु आपला हाल हवाल तमाम मालूम करून, तपेमजकूरीची देसमुखी आपल्या नावे मोकरर करून खूर्दखत घेउनु माहालास आला आणि तपे मजकुरीची देसमुखी करूं लागला. त्यावेरी कारकिर्दी मुल्ला महमद बाजी हैबतराऊ मयत जाला. यावेरी कान्होजी फर्जंद बाजी हैबतराऊ मलिक अजमापासीं जाउनु बाबाजी फर्जंद हबाजी हैबतराऊ यासि तलब करून हुजूर नेलें. यावेरी हुजूर मालूम केले जे, वडिले घरीचा आपण बाबाजी आपल्या धाकुट्या चुलत्याचा लेंक ऐसें मालूम करून आपल्या नावें देसमुखीचें खुर्दखत घेतलें. आपला चुलता हबाजी वडिले घरीं दिधला होता हें जाहीर केलें नाही, आणि खुर्दखत घेउनु माहालासी आला; देसमुखी करूं लागला. ऐसे आपणांमध्यें आपण खलेल करून विलातीमध्यें धिंगाई देसमुखी करीत मलिक अजमाचे थोर दरबार जे वख्ती ज्याचा रास दिवाणांतु पडे तेवख्तीं रीघ करून आपल्या नावें खुर्दखतें मालुमातीचीं आणौनु देसमुखी करीत दर बरहक निवाडा जाला नाही. यावेरी बाबाजी फर्जंद हबाजी हैबतराऊ किल्ले मुरुंबदेवीं दिवाणीचे मसलतीस झगडा पडिला. कान्होजी फर्जंद बाजी हैबतराऊ किल्ले कोंढाणां सिदी अंबरें मारिला यावेरी तपे मजकूर माहाराज साहेबांस मुकासा अर्जानी जाला, तेवख्तीं राजश्री दादाजी कोंडदेऊ सुभेदार नामजाद किल्ले कोंढाणा व माहालानिहाय इहीं मनास आणौनु तकसीमा करून देहाये मजकूरीचा हक लाजिमा व इनामती व इसावती व कुल उत्पन्न वाटणी करून दिधली. तकसिमा च्यारी केलीया तपसिलः—

बापूजी बिन कान्होजी हैबतराऊ	नांगराची वडीलपणाची तकसिम
तकसिम एक १	एक १

सदरहू तकसिमा केलिया व नांगर बापूजी बिन कान्होजी हैबतराऊ येणें एकी आपल्या वाटियाची तकसिम व नागंर वडिलपणाची तकसिम एकी एकूण तरफ एकी यावेरी बापूजीने नांगर करावा दुसरी तरफ हबाजी बिन बाबाजी हैबतराऊ याची वांटियाची तकसिम एकी व बालाजी बिन रुद्राजी याची तकसिम एकी एकूण तरफ एकी यावेरी हबाजी बिन बाबाजी हैबतराऊ एणें

नांगर करावा ऐसा निवाडा केला. नांगराची वडिलपणाची तकसिम काढिली ते बापूजीस दिधली. अंजी सबब नांगर दोघानी करावे आणि नांगराची तकसिम बापूजीस दिधली होती ह्मणौनु हवाजी विन बावाजी हैबतराऊ भांडत हुजूर आले. यावेरी हजीरमजालसीस साहेब व गोत बैसोनु पहिलें पासुनु हकीकती मनास आणिली. वडिलपणांची रद्‌बदल व मलिकअंबराच्या खुर्दखतांतील मकसुद कुल बरे रीती मनास आणौनु, समजौनु, राजश्री दादाजी पंडित सुभेदार इहीं निवाडियाचा महजर केला होता तो मनास आणौनु पाहातां, तींही दोनी देसमुखीचे नांगर व दोनी तरफा केलिया आहेती तें बरेच केलें आहे. आमा दोनी च्यारी मुनसुफीयांचे पेंची राजश्री दादाजीपंतांची नजर पडिली नाही कीं, बाळाजी नाइक दोघांचा धाकुटा भाऊ असोनु याचे तकसिमेचे सारे गाऊ हवाजीच्या सिक्याखालीं असावे याची काय गरज? जेव्हा अरधे गाऊ बापूजीच्या सिक्याखालीं व आरधे गाऊ हवाजीच्या सिक्याखालीं ऐसें दादाजीपंतांचे महजरांत असावें तें नाही, तेव्हा तिसरा भाऊ बाळाजी नाइक यासि वांटाच नाही ऐसें दिसते. जरी बालाजी नाइकास तिसरी तकसिम दिधली आहे हें नजरेन पाहावें, तरी नांगराचा हवाजी हैवतरायाचे तरफेस आरधा वांटा नाही. नुसताच नांगर ऐसें दिसों आलें. याबदल साहेब व गोतानें मनास आणिलें कीं, हवाजी वडिले घरीं दिधला आहे म्हणौनु वडिल बाजी रुद्राजीचा वडील लेंक म्हणौनु वडील ऐसी दोघांस वडिलपणांची निसबती आहे व करकसा हि तीन पिढियां लागला आहे; त्याबदल साहेब व गोतपतीने बरवे रीती विचारून ऐसा तह दिधला कीं, वडिलपणांची तकसिम दोघांस बराबरी व पाने व लुगडीं दोघांस बराबरी वडिलपणांचे तकसीमेचे गाऊ दोघांस बराबरी ऐसा तह दिधला व बालाजी नाइक तिसरा भाऊ तो दोघांचाहि धाकुटा भाऊ याबदल याचे तरफेचे गांवींचा हकलाजिमा व इनामती व इसावती उत्पन्न बालाजीने खाणें आणि दोघांच्या सिकियाखालें बालाजी नाइकाचे तकसिमेचे गांऊपटीस बराबरी दोघांखालीं लिहिणें ऐसा तह दिधला. त्याचा निवाडा एणेप्रमाणे केला. बितपसिल तपे मजकूर अज देह मौजे, व मजरे ८३ पैकी मजरे दोनी गांवाचे गांवाखाली लिहिले आहेती म्हणौनु वजा केले २ बाकी देह ८१

खालिसा देह १४॥	इसाबती देह ६॥	
	सरदेसमुख	देसमुख ता॥
	देह १	मजकूर देह ५॥

एकूण कास खंडी १११३ यासि बाद इसाबती सरदेसमुख देह मौजे वागिणी १ एकूण कास खंडी ३२ बाकी देह ८० एकूण कास खंडी १०८१ यासि बाद खंडी ३८॥. ता

कौलु बाद सोडी कारकिर्दी
हैबतखान मौजे करजवणे
कास खंडी ६
इनामती खंडी
४।२॥ देसकुलकर्णी त॥
मजकूर महसूल
५०ʃ निगडे बु॥
५० बोराळे
१०० दर खंडीस
टके २३ एकूण
१ʃ नागदे भट सो
अंबोणे महसूल
टके २४ एकूण
.॥३॥ गोपाल भट मौजे
बोराळें टके १५
एकूण
१॥ सेटिया त॥ मजकूर
सेत सांगवी बु॥
महसूल टके ४०
एकूण
२।२॥ मसीद मुकाम कसबे
अंबोणे महसूल
टके ५५ एकूण
१०ʃ३॥।

सिवार गयाल जमीन ऐन
जिनस बाद
१९ घाटाखाली गयाल
कर्णवडी अटगाव्या
खाली सींव वरिली
१।२॥ किले मुरुंब देवाखाले
सिंवार गेला मौजे दुभणे
टके ३२ एकूण
२ʃ३॥। किले तोरणियाखाले
सिवार गेला मौजे
पालदेऊ
महसूल टके ५० एकूण
दर खंडीस टके २३
ʃ
२२॥१।

बाकी जमीन कास खंडी १०४२।

खालिसाती देह ७४॥
एकूण कासखंडी ९४३॥।

इसाबती व इनामती खंडी ९८॥
इसाबती देह ५॥ एकूण खंडी
इनामती सेते महसूल टके

४४	कुरंगवडी	६०	बोराले
११	वोप	६०	सांगवी बु॥
१५	पाली बु॥	५३	अंबोणे
४	चिंचले खुर्द	१७३	दर खंडीस
१२	केतकवणे निमे		टके २३
५	चिंचळे बु॥		७खंडी
९१			७॥

वजा देह २ व सेत १ एकूण खंडी ४६॥ त॥ बाळोजी मूळपुरुष
त्याचा धाकटा भाऊ चाहूजी त्याचे बुढीचे फुलाजी व बाजी
यासि पहिलें बाळोजी यापासुनु चाहुजी खात होता व
चाहुजीचे लेकहि खात होते.

केतकवणे देह १ — गावखंडिया गावगना गला खंडी ५

खालिसाती निमे गाऊ .॥. — इसाबती निमे गाऊ .॥. — हातवे बु॥ खंडी १ — हातवे खुर्द खंडी १७.

तेथील देसमुखीचा हक खात असे — निधान खंडी १ — सांगवी खुर्द १

तपे निसबती हक टके २००७. — जांवली खंडी १७.

सदरहू खात आलेयावेरी कारकिर्दी राजश्री दादाजी कोंडदेऊ
सुभेदार इही समजावीस करून निवडिले होते त॥
मजकूरीचे देह पैकी समाइक देह ५

कतकवणे १ — हातवे बु॥ १

खालिसा निमे .॥. इसाबती निमे .॥. — हातवे खुर्द १

निधान १ — सागवी खुर्द १

सदरहूप्रमाणें निमे गाऊ इसाबती व देसमुखीच्या हकलाजिम्याचे गाऊ ४॥ दिधले होते. यावेरी हालीं मनास आणितां पुरातन बालोजीपासुनु त्यांचा वाटा तुटला आहे तेणेप्रमाणें चालत होते. दरम्यान दादाजीपंती बदल समजावीस समाइक देह ५ पांच दिधले होते ते हालीं हजीरमजालसीस फुलाजीस व बाजीस पुसतां तिहीं पेसजीचा भोगवटा सांगितला जें पेसजी आपले वडिल देह १ मौजे कतकवणे

निमे इसाबती .॥. — निमे खालिसाती हकलाजिमा देसमुख .॥.

व पांचा गावीच्या गावखंडिया पांच व तपे निसबती टके २०० दोनीसें ऐसें तिहीं सांगितले. यावरुनु हजीरमजालसीस कळो आले जें, यांचा वांटा पूर्वी वडिला-

पासुनु तुटला आहे. ऐसें असोनु दादाजीपंती देखील इसावती पांच गाऊ देउनु समजावीस केली होती. हालीं बापूजी हैवतराऊ व हबाजी हैवतराऊ व बालाजी नाईक हुजूर उभे राहिले जें, याचा वांटा वडिलांपासुनु तुटला असोनु दरम्यान नवा कुसूर जाला आहे, तो दूरी करुनु पेसर्जी जैसा वांटा खात होते तैसा यांचे दुमालां करून साहेबीं आपणा हुजूर महजर केला पाहिजे. यावेरी हजीरमजालसीस मनास आणौनु पेसजीप्रमाणे त्यांचे दुमालां केले.

देह १ मौजे केतकवणे

निमे इसावती .॥.

निमे देसमुखीच्या हकलाजिम्याचे .॥.

पांचागावीच्या गावखंडिया पांच

हातवे बु॥ खंडी १

हातवे खुर्द खंडी १

निधान खंडी १

सांगवी खुर्द खंडी १

जांबली खंडी १

एकूण कासखंडी २४

तपे निसबती हक टके २००ऽ.

सदरहूप्रमाणे इही खाणे. जाजती देह ४ च्यारी खात होते ते तिर्वीजणी तकसिमप्रमाणें खाणें. बापूजी हैवतराऊ व हबाजी हैवतराऊ व बालाजी नाइक इही खाणे

रुद्राजीचा भाऊ दुसरे बाइलेचा लेक भिउजी त्याचे वंसीचे तुलाजी व सांउजी यास देह १ मौजे कोदलवडी व इनामती सेत कसबे अंबोणे एकूण खंडी २२॥

मौजे कोंदलवडी देह १ एकूण खंडी २२ तेथीलं देसमुखीचें हकलाजिमा उत्पन्न कुलीं खाणें

इनामती सेत कसबे अंबोणे महसुली मा॥ टके ५३ पैकी टके १२॥ एकूण कास मण .॥.

बाकी देह ७८ एकूण खंडी ९९५|॥.

खालीसाती देह ७३ एकूण कास खंडी ९०९|॥.

इसावती व इनामती खंडी ८६

इसावती खंडी देह ५ एकूण खंडी ७९ ता॥

कुरंगवडी खंडी ४४

बोपे ११

चिंचले खुर्द ४ खंडी ५

चिंचले बु॥ खंडी ७

इनामती सेते महसूल टके १७३ वजा निसबती तुलाजी व साउजी टके १२॥ बाकी टके १६०॥ एकूण कास

पाली बु॥ गडा-
खालें मोडिली
आहे तिचा
मुबादला दिधला
खंडी १५
बोराले पैकी   तांभाड पैकीं
खंडी ३।॥   खंडी ११।

याच्या तकसिमा च्यारी ४

ऐन तकसिमा ३   नांगर व वडिलपणाची तकसीम १

यासि तपसिल

बापूजी बिन कान्होजी हैवतराऊ
तकसिम दीढ १॥ एकूण कासखंडी
३४१ ३१॥ खालिसा
२९॥२॥ इसाबती
२॥२॥ इनामती
३७३।३ १॥

हवाजी बिन बावाजी हैवतराऊ
तकसिम दीढ १॥ एकूण कासखंडी
३४१ ३१॥ खालिसा
२९॥२॥ इसाबती
२॥२॥ इनामती
३७३।३ १॥

ता।

ऐनवांटा खंडी
२२७। ३।॥ खालिसाती
१९।॥ इसाबती
१।॥ सेते इनामती
२४८।॥३।॥

वडिलपण कासखंडी
११३ ॥४। १॥ खालिसा
९।॥२॥ इसाबती
।॥२॥ इनामती सेते
१२४।४।१॥

ऐनवांटा खंडी
२२७। ३।॥ खालिसा
१९।॥ इसबाती
१।॥ सेते इनामती
२४८।॥३।॥

वडिलपण कासखंडी
११३॥ ४।१॥ खालिसा
९।॥२॥ इसाबती
।॥२॥ इनामती सेते
१२४।४।१॥

बालाजी बिन रुद्राजी नाइक तकसिम
वांटा १ एकूण कास खंडी
२२७। ३।॥ खालिसा
१९।॥ इसाबती
१।॥ इनामती सेते
२४८।॥३।॥

याखेरीज विस्ताघाट तकसिमप्रमाणे तिघीजणी खाणे. बापूजी हैबतराऊ देह २९। एकूण

कासखंडी

३४१ʃ३ʃ१॥	खालिसा देह २७।
२९॥२॥	इसावती
२॥२॥	इनामती सेते
३७३।३ʃ१॥	

ऐनवांटा खंडी

२२७।३॥।	खालिसाती
१९॥.	इसाबती
१॥.	इनामती सेते
२४८॥३॥	

वडिलपण कासखंडी

११३॥४।१॥	खालिसाती
९॥२॥	इसाबती
.॥२॥	इनामती सेते
१२४।४।१॥	

खालिसाती कासखंडी ३४१ʃ३ʃ१॥.

ऐनवाटा कासखंडी

२२७।३॥

ता॥

४६	तांभाड
३	भांडरवली १
६	मेरवणे १
३	एकलगाव १
१२	सोडे हिरोजी १
४	चांदवणे १
१२	डेरे १
७॥१।	पालदेऊ १
१८	कासुरडी १
९	घावर १
१५	चिरमोडी १
४॥	बिडघर १
९	वरोती बु॥ १
७	कोलद १
२४	अडउली १
९	असकवडी १

वडिलपणाचा वांटा खंडी

११३॥४।१॥

ता॥

१६	मोहरी बु॥ निमे ॥.
१२	सोनवडी १
१९॥२॥	सागवी बु १
७ʃ	सुरवाड १
५	माजीगौ १
८	लव्ही बु॥ १
७॥२॥	गुंजवणे १
१०	जाबली चवथाई .।.
४।१॥।१॥	अंबोणे चवथाई .।.
३॥२॥	बोराले चवथाई .।.
२।	कर्णवडी चवथाई.।.
२।	वाजेघर खुर्द निमे .॥.
१६	हतवे बु॥ निमे गाऊ एकूण खंडी १८ पैकीं वाटियाखाले खंडी २ बाकी
११३॥४।१॥	

१८ कामेरें बु॥ १
११ सोडें माथणा १
२ हतवे बु॥ निमे
गाऊ एकूण खंडी
१८ पैकीं
७ɔ२॥ सांगवी खुर्द खंडी १५
पैकी नि॥ बालाजी नाइक
खंडी ४ बाकी खंडी ८ वजा
हैबतराऊ ॰।॥ २॥ बाकी
२२७।३।॥

इनामती व इसाबती खंडी ३२।

इसाबती
१९।॥ ऐन वाटा
९।॥२॥ बाबती वडिलपण
२९॥२॥

ता॥
११। तांभाड सुबदला पाली बु॥
१॥ चिंचले खुर्द
१।॥२॥ चिंचले बु॥
१५ कुरंगवडी पैकी
२९॥२॥

इनामती सेते
१।॥ ऐन वाटा
।॥२॥ वडिलपण
२॥२॥

ता॥
बोराले महसूल टके २२॥ एकूण महसूल ॰।॥४॥
सांगवी बु॥ महसूल टके २२॥
ɔ
महसूल ।॥४॥
अंबोणे महसूल टके १५ɔ९
एकूण कास ॥३॥

हबाजी हैबतराऊ देह २९। एकूण खंडी
३४१ ɔ३ ɔ१॥ खालिसाती देह २७।
२९॥ २॥ इसाबती
२॥ २॥ इनामती
३७३।३ɔ १॥

ऐनवांटा खंडी
२२७। ३।।। खालिसाती
१९।।। इसावती
१।।। सेते इनामती
२४८।।।३।।।.

वडीलपण कासखंडी
११३।।४।१।। खालिसा
९।।।२।। इसावती
.।।।२।। सेते इनामती
१२४।४।१।।

खालिसाती कासखंडी ३४१ं३ं१।।

ऐनवांटा खंडी २२७।३।।।.

ता।

२२ आसनी मार्ग १
१५ केतकवणे देखील मजरा इसान देऊ १
३ कुबर्ले १
२० कुरंजी
२४ करजवणे १
६ भागिनघर १
९ गुहिणी १
७ खुलसी १
१२ तेलवडी १
६ दादलवडी १
४ निगडे खुर्द १
६ पिपरी १
३ पागारी १
१० फुणसी १
९ वाजेघर बु।। १
७ इसानदेऊ १
३।।२।। घोराले चवथाई .।
४।१।।।१।। अंबोणे चवथाई .।
२० जांबली निमे .।।
१९।।।२।।।१।। निगडे बु।। खंडी २४।।।२। वजा ता। चवथाई बालाजी नाईक खंडी ४।।।४।१।। बाकी ता। तीन .।।।

वडिलपणाची ता। खंडी ११३।।४।१।।

ता।

१६ मोहरी बु।। निमे .।।
१३ सोंडे सरफुल १
२४ मळे १
८ भुतोडे १
६ लव्ही खुर्द १
३ पिसवी १
३ गुगलसी १
१० जांबली चवथाई .।.
४।१।।।१।। अंबोणे चवथाई .।.
३।।२।। घोराले चवथाई .।.
२।. कर्णवडी चवथाई .।.
२।. वाजेघर खुर्द निमे .।।.
१।२।। हतवे बु।। निमे गाऊ खंडी १८ पैकी वाटिया-खाले जमा १६।।२।। बाकी
१६ हतवे खुर्द
.।।।२।। सांगवी खुर्द पैकी
११३।।४।१।।

१६॥२॥ हतवे बु॥ निमे गाऊ
मा खंडी १८ पैकी

२२७।३॥।

इसावती व इनामती कासखंडी ३२।.

इसावती खंडी	इनामती सेते
१९॥। बा वाटा	१॥। ऐनवाटा
९॥।२॥ वडिलपण	.॥।२॥ वडिलपण
२९॥२॥	२॥२॥

ता	ता	
३॥। बोराले पैकी बा मुबादला पाली बु॥	बोराले महसूल टके २२॥ एकूण कास मण ॥।४॥	सांगवी बु॥ महसूल टके २२॥ एकूण मणं ॥।४॥
१॥. चिंचले खुर्द	अंबोणे महसूल टके १५७९	यापैकी मुबदला बोपाचे तकसिमेचे
१॥।२॥ चिंचले बु॥	९ मण .॥३॥	पोटी बालाजी नाइकास दिल्हे टके १५ पंधरा
. ११॥ कुरंगवडीपैकी		
११ बोपे		
२९॥२॥		

बाळाजी नाइक देह १९॥ एकूण खंडी २४८॥।३॥।

खालिसाती खंडी २२७।३॥।

इसावती व इनामती खंडी २१॥.

इसावती खंडी	इनामती खंडी
१९॥।	१॥।.

खालिसाती कासखंडी २२७।३॥। ता

९ असनी मउजा १	१२ कामरे खुर्द १
१५ असनी दामगुडा १	१३ दोडगौ १
६ कोलवडी १	३२ पारवडी देखील मजरा आंबे दरा १
८ पाली खुर्द.	
१० भोर्डी १	
१३ मांगदरी १	९ बालवडी १
१९ साखर १	२४ मोहरी खुर्द १
५ बरपुड १	१६ सोंडे कारला १
३॥२॥ बोराले चवथाई .।.	३ सिंगापूर १

४॥ कर्णवडी निमे .॥.
१६ निधान १
९९ा२॥

६ वरोती खुर्द १
४।१।॥१॥ अंबोणे चवथाई .।.
४॥४।१॥ निगडे बु॥ चवथाई ।
४ा सांगवी खुर्द तकसिम तिसरी महसूल खंडी १२ पैकी
१२८।१।.

इसावती व इनामती कासखंडी २१॥

इसावती खंडी १९॥।
ता॥
१ा चिंचले खुर्द चवथाई
१। चिंचले बु॥ चवथाई मा॥ खंडी ५ पैकी
१७॥ कुरंगवडी व सा॥ सांगवी बु॥ बा॥ ऐवज बोपचे सांगवीस दिल्हे .॥३ सेत सांगवी बु॥ पुरवणी बोपे
१६॥।९ कुरंगवडी
१७॥
१९॥।

इनामती सा॥ खंडी १॥।
बोराले महसूल
१५ एकूण कास मण .॥.३।
अंबोणे महसूल टके १०ा६ मण .।३॥
सांगवी बु॥ महसूल टके १५ एकूण मण .॥३।

सदरहूप्रमाणें निवाडा केला असे. एणेंप्रमाणें तकसिमा आपलालिया खाउनु दिवाणकाम चालवणे. याखेरीज विस्वाघाट व बाजे हक उत्पन्न समाइक जे होईल तें तिघीजणी तकसिमप्रमाणें खाणें. बालाजीचे गांऊ दोघांखालीं लेहोनु दोनी पटिया तपामध्यें लेहोनु आपलाले पटीवरी जागा करणें. पाने व लुगडीं दिवाणांतून बरावरी घेणें. मागें पुढें न घणें. दोघांजणांसी पाने व लुगडीं देतील त्यामागें बालाजी बिन रुद्राजी यासि देणें. तिघांजणांसी पाने व लुगडीं वोळीने देतील ते वोळीस फुलाजीस व बाजी व तुलाजी व सांउजी यांसि पाने व लुगडीं देतील ते वोळीस आर्धी फुलाजीस व बाजीस व तुलाजी व सांउजीस देणें. त्यामागून खोतांस व मोकदमांस देणें. तरफा आपलालिया लावाविया. एकाने एकाचे तरफेस मन घालावयासि निसबती नाही. फुलाजी व बाजी यांणी मौजे केतकवणे निमे इसाबती व निमे खालिसातीचा तेथील देशमुखीचा हक व पांचां गावीच्या गांवखंडीया खंडीं पांच व तपे निसबती टके २०० दोनिसे एणेप्रमाणें खाउनु असणें.

वरकडास कांहीं समंध नाही. तुळाजी व सांउजी त्यांसी मौजे कोदलवाडी देह १ तेथील देशमुखीचा हक व लाजिमा व इनामती सेत कसबे अंबोणे महसूल टके १२॥ साडेबारा खाणें एणेप्रमाणे तपे मजकूरीचे देशमुखीचा निवाडा हुजरूनु करून दिधला असे. बापूजी बिन कान्होजी हैबतराऊ तकसिम दीड १॥ वाटियाची एकी वडिलपण नागराची निमे ·॥· हवाजी बिन बाबाजी हैबतराऊ तकसिम दीड १॥ बाबती वाटियाची एकी व नागर वडिलपण निमे ·॥· बालाजी बिन रुद्राजी नाइक वाटियाची तंकसिम एकी एणेप्रमाणे आपलाल्या तरफा लावणी उगवणी करून, दिवाण काम चालऊनु, आपले पिढी दर पिढी लेकराचे लेकुरीं सदरहू निवाडेप्रमाणें खाणें. यासि निवडिल्या अमलास जो कोण्ही हिला हरकती करील तो दिवाणाचा गुन्हेगार व गोताचा अन्याई. ब॥ हजर सही श्री सके १५७९ हेमलंबी संवछरे. पेसजीचे कागद निवाडियाचे दादाजीपंताचे महजर व मलिकांची खुर्दखतें ज्यापाशीं असतील ते रद असेती." (फारसी)
तेरीख १५ माहे जमादिलाखर सुरुसुद.

लेखांक ११.

१५८१

फारसी

"अज सरसुभे खान आलिशान एकबालनिशान सिपेहसालार दौरानी बादज तारीफ खान अफजल खान महमदशाही बुलंद आयाम दौलत हू ता॥ विठोजी हैबतराऊ देसमुख ता॥ गुंजन माउल मालूम दाद सु॥ सितैन अलफ दरींविले तुमचे बाबें रा॥ कृष्णाजी भास्कर दा॥ पा॥ वाई येहीं बहुत वजानें तारीफ करून मालूम केलें, त्यावरून खातिरेसी आलें. तुह्मी लोक कामाचे नामोसी असां. हा वख्त कामाचा आहे. कोणेबाबें जरा अंदेशा न करितां खातीरजमा राखून जाउलेजवळी आपुले लोक दे॥ येउनु जैसे कांहीं फर्मावितील ते ब॥ मसलहतेस दिल जाब सुशरिक होउनु नेकखोही जाहीर करणें. पाहिजैसे मुजरा व सरफराजी होईल ये कि॥ जाणिजे." फारसी

लेखांक १२.

१५८७ श्रावण वद्य १

"महजरनामा हजीरमजालसी बिहुजूर देसमुख व देसकुलकर्णी व देसक ता॥ गुंजणमावळ बि तेरीख माहे १४ माहे सफर बिहुजूर देसमुख व देसक ता॥ गुंजणमावळ ता॥

बाळाजी नाईक देसमुख ता॥ म॥

फारसी

गोमाजी श्रीपति व त्रिंबक श्रीपति देसकुलकर्णी ता॥ म॥

देसक

धाकजी बिन येसजी चोरघे सरखोत , ता॥ म॥

धाउजी बिन राजजी लेकवळे मोकदम मौजे मोहरी बु॥

सुर्याजी नाखती व बापुजी बिन दादजी थिटा मोकदम हतवे बु॥

नरसोजी चौगुला मौजे बोरले

चिमणाजी तानदेऊ खासनीस दि॥ देसमुख ता॥ मा॥र

माणको नारायण हेजीब ता॥ मा॥

कोंडाजी व मातजी लिम्हण मौजे पारवडी

चांदजी व मंबाजी डिवळ मौजे निगडे बु॥

एसजी बिन विठोजी सोंडकर मौजे तांभाड

सोनजी फुदाला मौजे कोलवड

माहादजी व रामाजी कारले मो॥ मौजे सोंडे

सूर्याजी व कोंडाजी व सोनजी सरफुले मो॥ मौजें सोंडे

बाजी पिलाणा खोत सोंडे हिरोजी

माहानाक वा॥ गणा ता॥ मा॥

तुलाजी तळेकर मोकदम क॥ आंबोणे ता॥ मा॥

काटरागा माहार मौजे वडगाव

नांगर

त्रिंबकभट पुरोहित ता॥ मा॥ निशाण पातडे

सु॥ सीत सीतैन अलफ श्री सके १५८४ नंदन नाव संवछरे तेदिनी बकाजी बिन येसजी झांजा मोकदम मौजे वडगाव ता॥ मा॥ मौजे वडगावीची मोकदमीस कोन्ही मिरासदार नाही, तेथील मोकदमी देसमुख ता॥ मा॥ याची मिरासी होती, आपले खुसीने बकाजी बिन येसजी झांजा यासि मोकदमी मिरासी करुनु दिधली ते आपले लेकराचे लेकरी सुखें खाणे. , मोकदमीचा इनाम व पासोडी व झाड आंबा आपले लेकराचे लेकरी व पालनुक टिला विडा कुल खाउनु कीर्दमामुरी करणे. यासि कोन्ही हिला हरकती करील त्यास आपण निवारुनु व आपले वंसीचा कोन्ही होईल त्याणें झांजियाचे चालवावें. यासि आन करील त्यास अमृतेस्वराची आण असे. मौजे वडगावीची मोकदमी मिरासी करुनु दिधली ते आपले लेकराचे लेकरी खाणें. हा महजर सही."

लेखांक १३.

फारसी १५९० वैशाख शुद्ध ४

"ई कौलनामा राजश्री जिजाबाई साहेब दामदौलत हू ता। विठोजी हैबतराऊ देसमुख ता। गुंजनमावल बिदानद सु॥ समान सितेन अलफ दादे कौलनामा ऐसा जे, हैबतराऊ व बालाजी नाईक देसमुख ता। म॥ यानी कागद लेहून आपला मुदा मकसुद पाठविला जे, आपण आपल्या जिवाचे दहसतीकरिता तोंडें चुकाऊन बाहेर गेले आहे. हाली आपला मुतालिक पाठऊन देऊन त्याच्या हाते देसगतीचे काम घेतलें पाहिजे ह्मणौऊन मुदा रा॥ मोरोपंत पेसवे यांपासी लेहून पाठविला. त्यावरून आह्मी त्यासहि कौल पाठविला आहे. ते आपला मुतालिक पाठऊन देतील. तरी तुह्मीहि आपला एक मुतालिक पाठऊन देणे. त्याच्या हातें तुमचे देसगतीचे काम घेऊन तुमचा हक सालाबादप्रमाणे दुमाले करून पेस्तर तुमचा खातीरजमा वाटेल तेव्हा तुह्मीहि सुखी येऊन आपली देसगती चालवणे. आमचे तर्फेनें तुमचे वाईट सर्वथा होणार नाही. हाली आपला मुतालिक पाठऊन देणें. कोण्हेबाबें अनमान न करणे. कौल असे. फारशी तेरीख २ जिलकाद."

लेखांक १४.

१५९० वैशाख वद्य ६

"कौलनामे अजरख्तखाने राजश्री शिवाजी राजेसाहेब दामदौलत हू ता। विठोजी सिलंबकर देसमुख ता। गुंजनमावल सुहूर सन समान सितैन अलफ बादे कौलनामा ऐसाजे, तुमचे बाबे मा। गोमाजी नायक एहीं मालूम केलें जे, विठोजी सिलंबकर साहेबांचे कौलाचे उमेदवार आहेती; साहेबीं कौल मरहमत केलिया गांवावरी येउनु असतील म्हणून मालूम केले. तरी बिनाबरा मालूमात मनास आणून तुम्हांस कौल मरहमत केला आहे व तुमचेविसीं गोमाजी नाइकाचे डोईवरी हात ठेविला आहे. तुम्हीं कोणेविसीं कांहीं शक न धरितां गांवास येउनु सुखे असणें. कौल असे."

तेरीख १९ जिलकाद सुरुसुद

लेखांक १५.

१५९० ज्येष्ठ शुद्ध ३

"॥ मसरुल अनाम राजश्री विठोजी हैबतराऊ सिलींबकर देसमुख ता। गुंजनमावल यासि नारो त्रिमळ सु॥ समान सितैन अलफ. तुह्मी जिवाची दहशत धरून

बाहेर पडिले आहा. त्यास मागती कौल जालिया वतनावरी येउनु. ह्मणौनु तुमचे बाबे हवालदार ता॥ म॥ मालूम केले जे, देसमुख म॥ इळे धास्ती धरून परागंदा जाले आहेती. यांच्या पोटाची विले जालिया वतनावरी येतील. येबाबे कौल दिल्हा पाहिजे ह्मणौनु मालूम केले. तरी तुह्मास राजश्री साहेबाचा कौल पहिलेच पाठविला आहे. तो पावला असेल. हाली आमचाहि कौल असे. तुह्मीं कविहाल होऊन आपल्या वतनावरी येणे. वरकड मिरासीदाराची विले जाली आहे, ते च रवेसीने तुमचीहि विले करून तुह्मी बेशक होउनु आमचे भेटीस येणे. येथे आलियावरी राजश्री साहेबाच्या पायावरी घालुनु तुमचा बरेपणाच होये ऐसे करून. तरी तुह्मी कविहाल होउनु येणे. कौल असे. छ. १ जिल्हेज पा॥ हुजूर."

लेखांक १६.

१५९० फाल्गुन वद्य ९

"अज रख्तखान राजश्री जिजाबाईसाहेब दाईमदौलत हू ता॥ विठोजी हैबतराऊ सिलंबकर देसमुख ता॥ गुंजनमावल सु॥ तिसा सितैन अलफ. तुम्ही व राजश्री गोमाजी नाईक सोईरे जालेती. तुमची कण्या मा॥ इलेच्या लेकास दिधली. ऐसियास लग्नसिधी करावयाकारणें तुम्हांस व तुमचे मातेस हुजूर बोलाविले. त्यावरून तुम्हीं हुजूर येउनु अर्ज केला जे, सांप्रत आपलियास रोजीचे खावयास नाही. आनी लग्नसिधी कैसी होईल म्हणउनु आपला हवाल सागितला. त्यावरून तुम्हांवरी मेहरवानी करून लग्नसिधीकारणें तुम्हांस बकसिस दिधले असे. बिता॥ आम्ही आपलियापासुनु हजरून

लुगड्याबदल होनु २५ृ. सामग्री ऐन जिनस लागेल ते

पांचाशा माणसाची जेवणाची सामान

सदरहूप्रमाणे होनु पंचवीस व ऐन जिनस सामान पांचाशा माणसाचा ऐसे दिधले असे. तुम्हीं सुखे घेउनु अलबता लग्नसिध करणे. कोन्हेबाबे शक न धरणे. पा॥ हुजूर"

तेरीख २२ सौवाल.

लेखांक १७.

श्री. १६०० फाल्गुन शुद्ध ११

"स्वस्ति श्री राज्याभिषेकशक ५ कालयुक्त नाम संवत्सरे फाल्गुन शुध एकादसी भौमवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपति यांणीं राजश्री कोनेर रुद्र

देशाधिकारी प्रांत मावळ यासी आज्ञा केली ऐसी जे, विठोजी सेलमकर देशमुख गुंजणमावळ याला तपे मजकुरीं इसापत पैकी व हक गेले वरीस तागाईत चालिले आहे तेण्हेप्रमाणे ऐंदांहि चालविले व शिवपट्टणाखाले गोमाजी नाईकाचे सनदेचे जे चालिले आहे तेण्हेप्रमाणे तेहि चालवणे. गेले वरिसीं जे चालिले असेल तें च ऐंदां पाववणे. अधिक उणे न करणे. लेखनालंकार."

सुरू सूद

लेखांक १८.

श्री. १६१० वैसाख शुद्ध १४

नकलेची नकल

"राजश्री रायाजी तोडकरी हवालदार व कारकून किले प्रचंडगड गोसावी यांसीः—

॥छ अखंडित-लक्ष्मी-अलंकृत-राजमान्य श्रो शंकराजी नारायण सचिव आसिर्वाद नमस्कार सु॥ समान तिसैन अलफ. राजश्री विसाजी माणकेश्वर मुतालिक सबनिस किले मा॥र याणी विनंती केली की, देवपाल व पाल बु॥ व बालवडी या तिन्ही गावच्या सिवार घेरियामध्ये आहे. त्यास गुंजणमावळचे वतनदार कथला करितात. तरी घेराचा निर्वाह करून माहालीच्या वतनदारास आज्ञा केली पाहिजे म्हणून विनंती केली. त्यावरून संताजी सिलीमकर देशमुख व देशकुलकर्णी ता॥ गुंजणमावळ यासि हुजूर आणऊन व मालोजी इतबारराव सरनाइक घेरा व चाहुजी ना॥ देवगिरकर घेरा किले मा॥र यास आणून, घेराचे वर्तमान मनास आणून हाली हुजूरून घेराची हद घातली आहे बि॥ तह राजश्री कैलासवासी स्वामीः—

मौजे पाल बु॥ इनामती देशमुख या गावीच्या सिवाराची हद ब्राह्मण खिंडीवरता त्याच्या सुमारे मार्गावरी गोवडानजिक आंबा आहे, त्या पुढे आडल्या गवंडाने वंगजाईपावेतो त्याच्या सुमारें आडल्या गोवंडाने तांबकड्याचा माथा, त्यापुढें पाच आंबे गोवंडा खाली आहेत त्याच गोवंड्याच्या सुमारे भणगवाह्याळे पावेतो मौजे देव-पालीचे रान भणंग वाहळे-पासून दागेराची माठाडी आहे ती घेरियाकडे देविली. माथा धारेस टोंग-राळे रास आहे ती घेरियांत देविली. तळ जमीन माहालाकडे देविली आहे. १ मौजे बलवडीची हद धारेपासूनआड व माथा पाउदमापासून मालवीर त्यापासून माहरीके नजिक तलई तेथून पुढे मिठकणापावेतो हद घातली आहे त्याचे

हृद घातली आहे. या ब॥ खालते रान माहालाकडे देविले आहे. हृदवरते रान घेरियाकडे देविले असे. तह १	वरता घेरा त्याखाले उरली जमीन माहालाकडे दिल्ही आहे. १

एणेप्रमाणें घेराची हृद घातली आहे. यावरता घेरा. हृदेखालता जमीन महालाकडे दिल्ही आहे, त्याप्रमाणे घेराची चौकसी करणे. येविसी ता॥ मारच्या देशमुख व देशकुलकर्णी यांसी आलाहिदा आज्ञापत्र सादर केले असे. याउपरी तेहि कथला करणार नाहीत. छ १२ रजब."

लेखांक १९.

श्री. १६९० आषाढ शुद्ध ६

"अभयपत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री शंकराजी पंडित सचिव ता॥ संताजी बिन विठोजी हैबतराऊ सिलिंबकर देशमुख ता॥ गुंजणमावळ सु॥ तिसा तिसैन अलफ दिल्हे अभयपत्र ऐसे जेः– तुह्मी हुजूर एउनु विदित केले की, मौजे पाली बु॥ ता॥ मजकूर आपले इसाफतीचा गाव पूर्वीपासून कास जमीन जुमला खंडी १५ पंधरा आहे त्यापैकी दिवाणांत जमीन एणेप्रमाणे पडिली आहे कास खंडी ११।.

ब॥ कमाविस शिवापट्टण कास खंडी ४	घेरा किले प्रचंडगड कास खंडी ७।.

एणेप्रमाणे जमीन इसाफती मौजे मजकूर पैकी आलाहिदा जाली आहे. याकरिता राजश्री कैलासवासी स्वामीने मौजेमजकूरचा मुबदला खालिसा जमीन पैकी एणेप्रमाणे देविले कास खंडी १५

मौजे बोराळे ता॥ मजकूर पैकी कास खंडी ३॥।	मौजे तांभाड ता॥ मजकूर पैकी कास खंडी ११।.

एणेप्रमाणे पंधरा खंडी कास खालिसा जमीन पैकी देविले होते. ऐसीयास मौजे बोराळे ता॥ मजकूर पाउणे च्यार खंडी कास देविली आहे ते मौजे पाली बु॥ * * * करून व गडच्या घेरियाखाले व बाग दिवाणीचा आहे त्याची जमीन सवा अकरा खंडी कास मौजे तांभाड एथे मुबदला करार करून सनद सादर करावया आज्ञा केली पाहिजे ह्मणउनु विदित केले. त्यास मनास आणितां, मौजे पाली बु॥ ता॥ मजकूर हा गाव इसाफती देशमुख ता॥ मजकूर याचा आहे. तेथील जमीन किले प्रचंडगडच्या घेरियाकडे व दिवाणांत बाग केला आहे त्याचा अगदी गावचा मुबदला राजश्री कैलासवासी स्वामीने सदरहू प्रमाणे देविले आहे. ऐसियास मौजे पाली बु॥ एथील जमीन दिवाणीच्या बागाखाले व

प्रचंडगडच्या घेरियाकडे बाद पडोन, जमीन बाकी राहिली आहे ते देशमुख याकडे करार केली असे. किलाच्या घेरियाकडे व दिवाणीच्या बागाकडें जमीन आहे त्याचा मुबदलां तुह्मास मौजे तांभाड त॥ मजकूर एथे एणेप्रमाणे देविले कास खंडी ११।.

ब॥ बाग कमावीस शिवापट्टण यांचा मुबदला मौजे मजकूर थळ कामथ कास खंडी ४

ब॥ घराकिले प्रचंडगड याचा मुबदला मौजे मजकुरी धुरगवडापासून वरते कास खंडी ७।.

एणेप्रमाणे सवा अकरा खंडी कास सरस निरस जमीन महसूल व कुलबाब कुलकानू व बाजे पटिया देखील झाडझाडोरा तुमचे दुमाले केले असे. आणि रकमेस बाद देविलेयाची सनद आलाहिदा माहालीच्या कारकुनाच्या नावे बनाम राघो एसाजी सुभेदार प्रा॥ मावळ त॥ रायगड यास सादर केले असे. त्याप्रमाणे तुह्मी सदरहू भोगवटा लेकराचे लेकरीं वंशपरंपरेने अनुभवणे. अभय असे. छ ४ रमजान. मौजे बोराळे एथे पावणे च्यार खंडी पालीचा मुबदला हावजी हैबतराऊ देशमुख त॥ मजकूर यास देविला होता, तो दूर करून हली मौजे पालीस करार केले असे. ऐसियास, विठोजी हैबतराऊ तुमचे बाप याणी हवाजीराऊ यास सदरहू पावणे चौ खंडियाचा मुबदला आपले तकसिमेपैकी मौजे मजकूर गवंड त॥ मजकूर एथे देविले आहेत. या बदल तुह्माकडे मौजे पालिची जमीन पाउणे च्यार खंडी करार केले असे. वंशपरंपरेनें भोगवरा अनुभवणे. संदेश समक्ष."

लेखांक २०.

श्री. १६१२ वैशाख शुद्ध ८

"अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य राजश्री हैबतराऊ सिळंबकर देशमुख ता॥ गुंजनमावळ यांसि रामचंद्र नीलकंठ आसिरवाद सु॥ तिसैन्न अलफ. आह्मी स्वारी करून वाईस आलों. वाईचा कोट रगडून घेतला. प्रतापगड आदिकरून किले हस्तगत केले. याउपरी मावळांचा मामला सुरळित होउनु देशाची मामुरी व्हावी व तुह्मां लोकाची गोमटी करावी हे गोष्टी मनीं धरून, राजश्री माहादाजी सामराज यांस सुभा ते प्रांतीचा सांगोन पाठविले आहेत. यांस देशाचे लावणी संचणीविशई सांगितले आहे व तुह्मां लोकांच्या चालवण्याविशई सांगितले आहे. तरी तुह्मीं म॥निलेचे भेटीस येणे. देशास कौल बोल हे देतील त्याप्रमाणे देशाची मामुरी करणे. कदीम सेवेचे लोक आहेत ते कुल जमाव म॥ निले यांजवळी पाठऊन देणे. त्याखेरीज तुह्मीं नवा जमाव करून सुभेदार म॥निलेजवळी राहणे. पोख्तीया जमावें स्वारी सिकारी करून जे गड गनिमाने घेतले आहेत ते फिरा-

ऊन हस्तगत करणे. गनिमाची ठाणी जागां जागां असतील ते कूल मारून काढणे. पूर्वीपासून जसे या राज्याचे ठाई पोटागी धरीत होतेस त्याप्रमाणे च हालींहि वर्तनुक करणे. तुमचा हक्क लाजिमा इनामती येवावें सुभेदार म॥निलेस आज्ञा केली आहे. हे जेणेप्रमाणे तह करून देतील त्याप्रमाणे हुजूरूनहि चालऊन. तरी कोण्हेविशई अनमान न करिता तुमचा हांते स्वामीकार्य होउनु तुमचा मजुरा होये ते गोष्टी करणे. छ ६ सावान. सुरु सुद बार."

लेखांक २१.

श्री. १६१२ आश्विन शुद्ध १४

नकल

"॥ ७ म॥ अनाम राजश्री हवालदार व कारकून हाल व इस्तकबाल त॥ गुंजनखोरे ॥ गो खंडेराऊ पानसंबाल सु॥ इहिदे तिसैन अलफ. आज तीस वर्षें आपल्या राज्यांत मोगलाची धामधूम होत आहे, यामुळे मुलुक वैराण जाले. साल गु॥ किले रायगड मोगलास कबज जाला यामुळे मुलकांत मोगलाई अमल चालिला. हाली श्रीकृपेने आपल्या राज्यांत मामला थाटत चालिला. ऐसियास देशमुख व देशकुलकर्णी व हेजिब खासनीस मुतालिक मोकदम चौगुले व बाजे वतनदार हुजूर येऊन अर्ज केला की, आपण वतनदार राजश्री साहेब पायापासीं एकनिष्ठ आहो. राजश्री कैलासवासी स्वामीचे वेळेस आपली वतने आमानत करून हकाची मोईन करून देत होते. सांप्रत गनीमाचे धामधुम करितां व मुकामे करिता रयत गेली मेली! जुजबी राहिली, त्यास खावयासी व रहावयासी नाही. येजातीचा रयतीचा विचार जाला आहे. रयतीचा बहुतवजा दिलासा करून, किर्दी माहमुरी करून साहेबाचे या किलियासी व कामास मदती करावी लागते; तरी साहेबी आज्ञा वतनदारावरी कृपाळु होऊन आमची वतने व इनामती इसाफती हकलाजिमा इनामती सेते आमचे हवाली केले पाहिजे ह्मणौन अर्ज केला. तो साहेबी हकिकती मनास आणून पाहतां, वतनदाराची वतने दुमाळी केलिया विरहित पोट तिडिक लागत नाही ऐसें कळो आले. यावरून देशमुख व देशकुलकर्णी व मुतालिक खासनीस हेजिब मोकदम चौगुले बाजे वतनदार याची वतने इनामती व इसाफती व हकलाजिमा व सेत सेरिया व हकलाजिमा यांची यांचे दुमाला केली असेत. तरी तुह्मी सदरहूप्रमाणे वर्तणुक करणे. तालिक लिहून घेणे आणि असल फिराऊन देणे. छ १२ मोहरम. पा॥ हुजूर मोर्तब असे. सुरुसुद."

लेखांक २२.

श्री. १६२२ चैत्र शुद्ध ८

"राजश्री देशमुख व देशकुलकर्णी ता। गुंजणमावळ गोसावि यांसिः—

॥ ७ अखंडित लक्षुमी अलंकृत राजमान्य स्ने॥ राघो शंकर हवालदार व कारकून ता। म॥ आशिर्वाद अनुक्रमे नमस्कार सु ॥ मया व अलफ ब ॥ सनद सुभा मावळ ता। राजगड सनद छ २५ रजब पैवस्त छ ६ साबान. तेथे आज्ञा की, संताजीराऊ सिलिंबकर देशमुख ता। मा। या॥ीं स्वामिसंनिध विनंति केली की आपले भाऊ सुभानजीराऊ सिलिंबकर हे किले पुरंधरीचे धारेस भांडणीं पडिले, त्याचे अस्त्री व मुले लाहाण आहेत. त्यांचा योगक्षेम चालावयासी काही अवकात नाही. तरी साहेबी मेहेरवान होऊन मुलालेंकरास वंशपरंपरेने अन्न दिल्हे पाहिजे ह्मणौन. त्यावरून मनास आणितां सुभानजीराऊ सिलिंबकर स्वामिकार्यावरी पडिले. याचे मुलालेकराचे चालविलियाने पुढेहि स्वामिकार्यावरी माणूस मन वाढवील; याकरिता याजवरी स्वामी कृपाळ होऊन सुभानजी सिलिंबकर याचे स्त्रीस मुलास नूतन इनाम मौजे सोनवडी त ॥ गुंजण मावळ या गावपैकी वरकस जमीन कास खंडी रास १ एक कुलबाब कुलकानू खेरीज हकदार करून दिल्हे असे. तरी पूर्वील धारियाप्रमाणे जमीन पड पैकी कास खंडी १ एक रास याचे दुमाले करून इनाम यासि व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे. साल दर साल ताजे सनदेचा उजूर न करणे ह्मणौन आज्ञा. आज्ञेप्रमाणे मौजे सोनवडी तं॥ म॥ एथे पड जमीन कास खंडी १ एक सरस निरस ठिकान थल

खंडी १ देविले असे. तरी याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे. नूतन पत्राचा आक्षेप न करणे. असल सनदेची तालिक लेहोन घेऊन असल परतोन भोगवटियासि देणे. जाणिजे. र॥ छ ६ माहे सौवाल मोर्तब सुद."

लेखांक २३.

श्री. १६२५ मार्गशीर्ष वद्य ७.

"स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३० सुभानु संवत्सरे मार्गशीर्ष बहुल सप्तमी रविवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति याणी संताजीराव सिलंबकर व महीपतराव सिलंबकर देशमुख त॥ गुंजणमावळ यासि आज्ञा केली ऐसी जे, अवरंगजेब किले राजगडास बिलगला आहे. मोर्चे चालऊन यालगार * * * करितो. परंतु तुह्मी त्यांचा हिसाव न धरितां शर्तींनसी नतीजा पाववितां ह्मणून * * * * * * * शंकराजी पंडित सचिव याणी

लिहिलें व सांप्रत तुमचे मर्दानगीचे वर्तमान राजश्री सोनजी फर्जंद यांणीं लिहिले त्यावरून कळो आले. तुमचे सेवेचा मजुरा जाला. तरी तुह्मी स्वामीचे एकनिष्ठ सेवक तरवारेचे आहा. पुढेहि एकच रीतीने अवरंगेजबास नतीजा पावऊन फतेचे वर्तमान लिहून पाठवणे. स्वामी तुमची सर्फराजी करितील. स्वामिकार्याविसी मशारनिलेचे आज्ञेप्रमाणे * * * * * * तेणेप्रमाणे करीत जाणे. निदेश समक्ष."

लेखांक २४.

श्री. १६२५ मार्गशीर्ष वद्य १०

"॥ ७ म॥ अनाम प्रतापराऊ सिलंबकर देशमुख त॥ गुंजणमावळ यांस शंकराजी नारायण सचिव आशिर्वाद सुहुरसन अर्बा मया अलफ. म॥ संताजीराऊ सिलंबकर तुमचे बाप राजगडीं सुवेळेस खासा मोर्च्यास होते. त्यास, औरंगजेबाच्या पादशाही मोर्च्याकडून त्यास गोळी लागोन स्वामिकार्यावरी पडिले. हे वर्तमान आजीच राजगडीहून आले. अशास संताजीराऊ थोर कामाचे मर्दाने एकनिष्ट होते. त्यानी आपला पुरुशार्थच संपादून घेतला. याकरिता तुमचे सर्व प्रकारें चालवणे अगत्य आहे. तरी आपले माईचे बहुता रीतीं समाधान करून सांगणे. प्रस्तुत खर्चास बराबरी नरसप्रभु रुपये ४० च्याळीस व तुह्मास मंदिल व तुमचे मातेस पातळ जरी व चोळी पाठविले आहे हे घेणे. पुढेहि वरचेवरी कबिल्याचा परामर्श तो केला जाईल. तुह्मास इनाम गांव देण्याचा तह केला आहे, तरी बारा दिवस जालियाउपरी मकाजी सिलंबकर यास पाठऊन देणे. त्या बराबरी कोणता गाव इनाम द्यावा तो सांगोन पाठवणे. त्याप्रमाणे सनद करून दिल्ही जाईल. तुह्मी आपला दिलासा सर्व प्रकारे असो देणे. छ १२ (२३) साबान सुरु सूद."

लेखांक २५.

श्री. १६२५ पौष शुद्ध १५

"राजश्री प्रतापराऊ सिलमकर सेनापंचसहश्री गोसावियांसिः—

॥७ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित शंकराजी नारायण सचिव आशिर्वाद सु॥ अर्बा मया अलफ. पेशजी तुह्मांस हशमाची पंचहजारी होती. हाली कामाचे मर्दाने तरवारेचे स्वामिकार्यास एकनिष्ठ देखोन तुह्मास सेनापंचहजारी सांगितली असे. तरी तुह्मी जमाव करून स्वामिकार्य एकनिष्ठपणे करीत जाणे. तुह्मांस वेतन सालीना होन पातशाही देखील चाकर होन १५०० दीडहजार होन वेतन करार केले असे. इ॥ सनद–पैवस्तगीपासून वजावाटाव दंडकप्रमाणे

वजा करून उरले वेतन माहे दर माहे घेत जाणे. चाकर हजीर होतील ते दिवसापासून चाकराचा हक घेणे. पूर्वील सेवेचे फाजिल असेल ते हाली हकांत वजा करणें. तुह्मास जमाव कानोजी जुझांरराऊ देसमुख त॥ कानदखोरे घेतले असे. छ १३ रमजान सुरू सूद बार."

लेखांक २६.

श्री. १६२५ पौष शुद्ध १५.

"राजश्री प्रतापजी हैबतराऊ सिलींबकर सेनापंचसहश्री गोसावियांसीः—

॥छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रे॥ शंकराजी नारायण सचिव आशिर्वाद सु॥ अर्बा मया अलफ. तुमचे सेनापंचसहश्रीचें भरतीस म॥ पदाजी राऊ सिलिंबकर पेशजी उमेदवार होते. हाली कामाचे मर्दाने तरवारेचे देखोन यासि जुमला सांगितला असे. यासि वेतन सालीना होनु प॥ देखिल चाकर ३०० तीनसे होन वेतन करार केले असे. इ॥ सनद पैवस्तगीपासून वजावाटाव दंडकप्रो वजा करून, उरले वेतन माहे दर माहे पावीत जाणे. मोईनप्रमाणे चाकर हजीर करितील त्या दिवसापासून चाकराचा हक देणे. यांसि जमान पंचसहश्रीमजकुरी घेणे. छ० १३ रमजान सुरु सूद बार."

लेखांक २७.

श्री. १६२५ पौष शुद्ध १५.

"आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री शंकराजी पंडित सचिव ताहा मोकदमानि देहाय त॥ गुंजनमावळ सुहुरसन अर्बा मया अलफ. म॥ संताजीराऊ सिलंबकर देशमुख त॥ मजकूर यास वतनमुळें राजगड नामजाद ठेविले होते. त्यास पादशाही मोर्च्यावरी सुवेळेस स्वामिकार्यावरी खर्च जाले. त्याचे पुत्र प्रतापजी हैबतराऊ सिलबकर आहेत. त्याचे वय लाहान आहे. पोख्ते होती तोवरी संताजीराऊ याची स्त्री गोदाबाई देशमुखीचा कारभार करितील; तरी तुह्मी त्यांचे आज्ञेत राहोन वर्तत जाणे: छ १३ रमजान सुरू सूद."

लेखांक २८.

श्री. १६२५ पौष शुद्ध १५.

"अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री शामजी हरी

नामजाद व कारकून वर्तमान व भावी सुभा मावळ गोसावीयासिः—

सेवक शंकराजी नारायण सचिव नमस्कार सुहुरसन अर्बा मया व अलफ म॥

संताजीराऊ सिलंबकर देशमुख ता॥ गुंजणमावळ यास राजगडी वतनामुळे ठेविले होते. त्यास पातशाही मोर्च्यांवरी सुवेळेस स्वामिकार्यावरी खर्च जाले. अशास त्यांची स्त्री गोदाबाई यांची साडीचोळी चालिली पाहिजे. याकरितां यांस साडीचोळीची मोईन सालीना होन प॥ १०० एकसे रास केले असेत. जोपर्यंत गोदाबाई जिवंत आहे तोपर्यंत साल दरसाल पावीत जाणे. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे. या पत्राची तालिक लेहोन घेऊन असल पत्र गोदाबाईजवळी भोगवटियासि फिराऊन देणे. छ १३ रमजान सुरूसुद बार पे॥ छा॥ २१ मिनहू."

लेखांक २९.

श्री. १६२५ पौष शुद्ध १५.

"राजश्री शामजी हरी नामजाद व कारकून
वर्तमान भावी प्रांत मावल गोसावी यासिः—

७९ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक शंकराजी नारायण सचिव नमस्कार सु॥ सन अर्बा मया व अलफ. म॥ प्रतापजी हैबतराऊ सिलंबकर देशमुख ता॥ गुंजनमावल याचे बाप संताजीराऊ सिलंबकर वतनामुळे राजगड नामजाद ठेविले होते. अशास किले मजकुरास औरंगजेबाचा परीध आला. खासा मोर्चा माची सुवेला किले मजकूर येथे तटानजिक भिडला आणि लगट केला. ते समई संताजीराव यार्णी हिमत धरून गनीमासी युद्धप्रसंग शर्तीनसी करून गनीम मारून काढिला. तों अकस्मात गनिमाकडील भांडियाचा गोळा येऊन लागतांच स्वामिकार्यावरी ठार जाले. संताजीराऊ याणी शर्ती करावयाची तैसी केली. गनीम मारून काढिला. मशारनुले स्वामिकार्यावरी खर्च जाले. अशासइनामाची तिजाई व हकाची चौथाई देशमुखापासून दिवाणांत वसूल घ्यावयाचा तह आहे, त्यास प्रस्तुत संताजीराऊ स्वामीकार्यावरी खर्च जाले याकरितां प्रतापराव सिलंबकर देशमुख ता॥ मजकूर यास इनामाची तिजाई व हकाची चौथाई माफ केली असे. तरी सदरहूचे तोष्ट साल दरसाल लावित नव जाणे. प्रतिवर्शी नूतनपत्राचा आक्षेप न करणे. या पत्राची तालिक लेहोन घेऊन असल पत्र भोगवटीयास फिराऊन देणे. छ १३ रमजान सुरुसुद बार पो॥ छ २१ मिनहू."

लेखांक ३०.

श्री. १६२५ पौष वद्य २.

"॥ ७९ मा॥ अनाम प्रतापजी हैबतराऊ सिलिंबकर देशमुख ता॥ गुंजणमावळ यास शंकराजी नारायण सचिव आशिर्वाद सुहुरसन अर्बा मया अलफ. तुमचे

बाप मा संताजी हैबतराऊ वतनमुळें किले राजगडी नामजाद ठेविले होते. अशास किले मजकुरास सालमजकुरी औरंगजेबाने परिघ घातला. खासा पादशाही मोर्चा माची सुवेळेच्या तटा खाले भीडला. गनीमानें लगट केला, ते समई मशारनिले याणीं हिमत धरून गनीमासी युद्धप्रसंग केला. गनीम मारून काढिला. तरवारेची शर्त करावयाची ते केली! ते प्रसंगी भांड्याचा गोळा गनीमाचा लागोन, स्वामिकार्यावरी ठार जाले. त्यावर तुह्मी हुजूर येऊन विनंति केली की, राऊ मशारनिले आपले बाप याणीं स्वामिकार्यावरी देह दिल्हा आहे. आपलें कुटुंब थोर, अन्नवस्त्र चालिले पाहिजे. आपले देशमुखीचा हक आहे. त्यास आपल्यास वारिसदार बहुत आहेत. याकरिता आपले तक्षिमेस हक एतो तेणेकरून आपला योगक्षेम चालत नाही. तरी आपल्यास कदीम हक आहे त्याखेरीज जाजती नूतन हक रयत निार्नें करून दिल्हा तरी तेणेकरून आपला योगक्षेम चालेल. आपले बाप स्वामिकार्यावरी पडिले आहेत. आपणहि स्वामिकार्यावरी एकनिष्ठपणे आहों. ह्मणून हुजूर विदित केले. एसियास तुमचे बाप स्वामिकार्यावरी पडिले, तुमचा योगक्षेम चालिला पाहिजे, याजकरिता तुह्मास नूतन हक रयतेनिार्नें कदीम हक व तुमचे वारीसदार खेरीज करून जाजती हक दर गांवास मोईन करून दिल्ही असे. अज देह ८१ वजा इनाम देह ६॥ बाकी खालिसा देह ७४॥ साडे चवऱ्याहातर देह यास दर गावास हक मोईन गला कैली माहालमापे ५ २ दोन मण व नख्त टके ५ ५ पांच एणेंप्रमाणे नूतन हक ज्याजती मोईन करून दिल्ही असें. तुह्मी व तुह्मो आपले पुत्रपौत्रादि वौशपरंपरेने सदरहू नूतन हक अनुभवीत जाणे. या नूतन हकास वरकड तुमचे वारीसदारास समंध नाही. छ १५ रमजान पा॥ हुजूर."

बार सुरू सूद बार.

लेखांक ३१.

श्री. १६२५ पौष वद्य ७.

"पत्र वेतन मकाजी सिलिंबकर हजारी पंचहजारी सुलतानजी हैबतराऊ सिलिंबकर हशम पावलोक सुहूरसन अर्बा मया अलफ. मानिलेस पूर्वी हशमाचा जुमला होता. कामाचे देखोन राजश्री पंत सचिव याणी प्रचंडगडचे मुकामी हशमाची हजारी सांगितली. यास वेतन सालीना दे॥ चाकर होन पा॥

३००

एकूण तीन से होन पा॥ रास.

कदीम तैनाती होन पा।   जाजती सरंजामी होन पा।
२००   १००

एणेप्रमाणे तीनसे होन पा। सरंजामी केली असे. वजावांटाव दंडकप्रमाणे वजा करून उरले वेतन पावले. कदीम वेतन छ मजकूरपावेतो पावले. छ मजकूरापासून कदीम व जाजती मिळोन पावेल. चाकर जाजती वेतनाचे मोईन प्रो हजीर होतील त्या तेरिखेपासून चाकराचा हक पावेल पा। हुजूर."

तेरीख २० सवाल

"सवाल. "

बार सुरू सूद बार

लेखांक ३२.

श्री.   १६२५ पौष वद्य ८.

"राजश्री हवालदार व कारकून वर्तमान व भावी
तां गुंजनमावल गोसावी यासिः—

।।छ सेवक शामजी हरि सभासद नामजाद व कारकून सुभा मावळ नमस्कार सु।। अर्बा मया अलफ बा। सनद राजश्री पंतसचिव छ १३ रमजान पो छ २१ मिनहू सादर जाले. तेथे आज्ञा जे, मां प्रतापजी हैबतराऊ सिलिंबकर देशमुख ता। गुंजणमावल याचे बाप मां संताजी हैबतराऊ सिलिंबकर वतनामुळे राजगडी नामजाद ठेविले होते. ऐसीयासि किलेमजकुरास औरंगजेबाचा परीघ आला. खासा मोर्चा माची सुवेला किलेमजकूर येथे तटानजिक भिडला आणि लगट केला. ते समई संताजीराऊ यानीं हिंमत धरून गनिमासी युद्धप्रसंग शर्तीनसी करून गनीम मारून काढिला. तो अकस्मात गनिमाकडील भांडियाचा गोळा येऊन लागतांच स्वामिकार्यावरी ठार जाले. संताजीराऊ यानी शर्ती करावयाची तैसी केली. गनीम मारून काढिला. मानिले श्वामिकार्यावरी खर्च जाले. याकरितां त्याचे पुत्र प्रतापजीराऊ सिलिंबकर देशमुख ता। मजकूर यास मौजे ताम्हड ता। मजकूर अज रकम खंडी ४६ सेतालीस पैकी मुबादला जमीन मौजे पाली ता। मजकूर देशमुख मजकूरास इनाम आहे त्यापैकी जमीन किले प्रचंडगडच्या घेरियांत व बाग सिवापटणाकडे लागली, एकूण रकम कास खंडी ११। सवा अकरा पेसजी इनाम जमीन देशमुख मजकूरास दिली आहे. बाकी रकम जमीन खंडी ३४।।। पावणे पसतीस एकूण इनाम गाऊ एक देशमुखमजकूरास दिला असे. खेरीज इनामदार कुलबाव कुलकानु जिराईत बागाईत झाडझाडोरा नदीनाला

इनाम मौजे मजकूर करून दिला असे. तरी तुह्मी प्रांत मजकुरी मौजे मजकूर रकमालीयास बाव देऊन प्रतापजी सिलींबकर देशमुख याचे दुमाला करणे. मानिले वौशपरंपरेने अनभवित जातील ह्मणून आज्ञापत्र सादर जाले. आज्ञेप्रमाणे सदरहू गाव मौजे ताह्मडी ता मजकूर प्रतापराऊ सिलींवकर देशमुख यास इनाम रकम सदरहूप्रमाणे दुमाले केले असे. तरी तुह्मी सदरहूप्रमाणे माईलेचे गाव दुमाले करून गाव रकमालीयास बाद देणे. प्रतिवरशी नूतनपत्राचा आक्षेप न करणे, या पत्राची तालिक लेहून घेऊन असल पत्र परतून देणे. छ २१ रमजान."

लेखांक ३३.

श्री. १६२५ माघ वद्य ६.

"पत्र वेतन म॥ सुलतानराऊ बिन सुभानराऊ सिलिंवकर पदाती पंचसहश्री सुहुरसन अर्बा मया अलफ. मानिले उमेदवार होते. स्वामिकार्याचे देखोन राजश्री पंतसचिव यांणी किले प्रचंडगडचे मुकामी हशमाची पंचहजारी सांगितली. यांस वेतन सालीना देखील चाकर

होन पा

५००

एकूण पांच से होन पा रास

एणेप्रमाणे पांचसे होन प॥ सरंजामी केली असे. इ॥ छ मजकुरापासून वजावांटाव दंडकप्रमाणें वजा करून उरले वेतन पावेल. चाकर मोईनप्रमाणे हजीर होतील तेरिखे पासून चाकराचा हक पावेल. जमान संभाजी गायकवाड देशमुख त॥ बीरवाडी यांस घेतले असे प॥ हुजूर"

तेरीख १९ सौवाल

सौवाल बार सुरू सूद बार

लेखांक ३४.

श्री. १६२९ मार्गशीर्ष वद्य १.

"राजश्री विष्णु विश्वनाथ हवालदार व कारकून वर्तमान
व भावी प्रांत गुंजनमावळ गोसावी यांसिः—

॥छ सेवक शामजी हरी नामजाद व कारकून सुभा प्रांत मावळ त॥ राजगड नमस्कार सु॥ सन समान मया अलफ ब॥ स॥ राजश्री छत्रपतीस्वामी छ ५ रमजान तेथे आज्ञा कीं प्रतापजी सिलिंबकर याचे बाप संताजीराऊ सिलींबकर हे किले

राजगडी नामजाद होते. त्यास ताम्राचा वेढा राजगडास पडिला, ते समई स्वामी-कार्यप्रसंगी जखम लागोन भांडणीं पडिले. त्यांचे लेक प्रतापजी सिलींबकर स्वामीची सेवा करावी ऐसी उमेद धरून सेवा करीत आहे, परंतु मुलामाणसांचे चाले ऐसा एक गाव इनाम करून दिल्हा पाहिजे, ह्मणून राजश्री शंकराजी पंडित सचिव मदारुल माहाम याणी हुजूर विनंतिपत्र पाठविले. त्यावरून स्वामी प्रतापजी सिलींबकर यावरी कृपाळु होऊन यांस नूतन इनाम मौजे तांभाड ता। गुंजनमावल हा गाव कुलबाब कुलकानु दे॥ हालीपटी व पेस्तरपटी खेरीज हकदार व इनामदार करून देह इनाम अजरामऱ्हामत करून दिल्हा असे. तरी तुह्मीं मौजे मा।र पूर्व मर्यादेप्रमाणें याच्या दुमाला करून इनाम यासीं व याचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेने चालवणे. साल दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणे. या सनदेची तालिक लेहून घेऊन असल सनद भोगवटीयास परतोन देणे. ह्मणून आज्ञा. तरी तुह्मी मौजे सदरहू प्रमाणे इनाम चालवणे. प्रतिवर्शी ताजे सनदेचा उजूर न करणे. या सनदेची तालिक लेहून असल सनद भोगवटीयास प्रतोन म॥ नुलेजवळ देणे जाणिजे. छ १४ रमजान मोर्तब सुद."

लेखांक ३५.

श्री. १६३१ पौष वद्य १२.

"राजश्री विष्णु विस्वनाथ हवलदार दुमाहाल
ता। गुंजनमावळ गोसावी यासिः—

सेवक शामजी हरी नामजाद व कारकून सुभा मावल नमस्कार सुहूर सन असर मया अलफ म॥ प्रताबजी बिन संताजी हैबतराव सिलींबकर देशमुख ता। मजकूर याच्या इनामतीची तिजाई व हकाची चौथाई राजश्री पंतसचिव स्वामिनीं माफ करून सनदा दिल्या आहेत. ऐसियास, म॥ निलेच्या हकाची चौथाई व इसाफती पाली हा गाव इनामती आहे त्याची तिजाईचा तगादा न लावणे जाणिजे. छ २५ जिलकाद मोर्तब सुद."

लेखांक ३६.

श्री. १६४८ ज्येष्ठ वद्य ३०.

"आज्ञापत्र राजश्री पंतसचिव ता। येसजी झांज्या मोकदम मौजे वडगांव ता। गुंजण मावळ सु॥ सन सबा असरैन मया अलफ. मौजे मजकूरची मोकदमीबदल सेरणी श्वराज्य व मोगलाई देखील सरदेशमुखी व सावोत्रा रुपये २०० दोनसे करार केले. त्याचा वसूल राजश्री दामाजी कासी याचे विद्यमाने हुजूर हुजत सुद पोता जमा असेत. जाणिजे. छ २९ सावान प॥ हुजूर बार सुरु सुद बार."

लेखांक ३७.

श्री. १६४९ चैत्र वद्य १२.

"राजश्री सामजी हरी नामजाद व कारकून वर्तमान
व भावी प्रांत मावळे गोसावी यांसीः—

॥छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य सेवक नारो शंकर सचिव नमस्कार सु॥ सन सबा अशरैन मया अलफ. एसजी बिन रायाजी झांजा मोकदम मौजे वडगांव ता॥ गुंजणमावळ यास मसाला करून हुजूर आणिले आणि मौजे मा॥रचे मोकदमीचा करीना कैसा आहे तो दखल करणें ह्मणून आज्ञा केली. त्यावरून येसजी झांजा याणे विदित केले कीं, राजश्री थोरले कैलासवासी स्वामी किले राजगडी होते ते प्रसंगी मौजे मजकूरास मोकदम कोण्ही नव्हता. याकरिता आपला आजा बकाजी यास मौजे मजकूरचे मोकदमीचे वतन देशमुख व देशकुलकर्णी ता॥ मा॥र यांणीं करून दिल्ले आहे. आपल्या आज्याने मोकदमीचे वतन अनभविलें. त्यावरी आपला बाप रायाजी पाटीलकी करीत असतां मोगलांची धामधूम जाली. शाबदीखान पुणियास येऊन राहिला. त्याचा धावण्या मावळांत होऊ लागल्या. याकरिता गाव खराब जाला. आपला (बाप) देशावरी गेला. त्यावरी चालीसा वर्षानीं आपण या प्रांतास गावावरी आलो आणि मोकदमीचे वतन अनभवित आहो. नवे वतन आपण घेतले नाही. ह्मणून विदित केलें. त्यावरून देशमुख व देशपांडे ता॥ मा॥र यांस आणून, ये गोष्टीचा करीना पुसिला. त्यांणीं सांगितले की, वतनाची पत्रें आपणाजवळ नाहीत व सेरणी दिल्ही की नाही हे दखल नाही ह्मणून सांगितले. त्याप्रमाणें तुवाहि विदित केले. त्यावरून ऐसे दिसोन आले कीं, वतनदार होऊन सेरणी दिल्ही नाही. याउपर सेरणी देऊन मोकदमीचे वतन आपल्या दुमाले करून घेणें ह्मणून येसजीस आज्ञा केली. त्यावरून त्याचे विशई देशमुख देशपांडे यांणीं विनंति केली की, येसाजी बेमवसर आहे. जीवनमाफिक सेरणी करार करावी ह्मणून विनंती केली. त्यावरून मौजे मा॥रच्या मोकदमीचे वतन याचे दुमाला करून, याजकडे वतन समंधे सेरणी स्वराज्य व मोगलाई रुपये करार करून, हुजूर वसूल घेतला असे. तरी मौजे मा॥रचे मोकदमीचे, वतन यास व याच्या पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे. या पत्राची प्रति लेहून घेऊन असल पत्र याजवल भोगवटीयास परतोन देणें. छ २५ साबान पा॥ हुजूर. बार सुरु सुद बार."

लेखांक ३८.

श्री.

"॥छ म॥ अनाम देशमुख व देशपांडे त॥ गुजण मावळ यांसी नारो शंकर सचिव सु॥ इहिदे सलासीन मया अलफ. किले राजगडचे लोक हुजूर कसबे उंबरजेच्या मुकामास विशाळगडच्या मोहिमेस आणिले होते. त्यांणी विदित केलें की, वतनदार हक बेमहलग वसूल आह्मापासून घेतात, त्याचा तह करून दिल्हा तरी आपण किलाचाकरी करून, नाहीतरी आपण किला शेवा करीत नाहीं ह्मणून विनंती केली. त्यावरून हे पत्र तुह्मांस सादर केले असे. तरी तुमच्या हकाची मोईन असतां बे–मोइनी हक घ्यावयास गरज काय? याउपर हकदारीचा तह खंडिच्या आकारास हक घ्यावा.

देशमुख	देशपांडे	गावकुलकर्णी
०१	०१।	०१

एकूण अडीच मण हक वसूल घ्यावा. तैसाच नख्ताचाहि तह आहे. दर सदे देशमुख रु॥ ५ देशपांडे रु॥ २॥ कुलकर्णी ५ एणेप्रमाणे हकाचा तह आहे. त्याप्रमाणे तुह्मीं वसूल घेणें. जाजती तगादा न लावणें. छ १५ जमादिलौवल प॥ हुजूर बार सुरु सुद बार."

लेखांक ३९.

श्री.

"॥छ मा॥ अनाम देसमुख व देशपांडे ता॥ गुंजणमावल सुभाप्रांत मावळ यांसि नारो शंकर सचिव सु॥ अर्बा सलासैन मया व अलफ. तुह्मी राजपुरीचे मुकामी विनंति केली की, शामलावरी मोहीम राजश्री स्वामीनी केली. फौजा देऊन राजश्री फत्तेसिंग भोसले व राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान ऐसे अखेर वैशाखमासी रवाना केले. पदाती जमाव मावलप्रांतीचा स्वामीनीं यासमागमे जाऊन स्वामिकार्य करणे ह्मणून आज्ञा केली, व राजश्री आनंदराऊ बहिरव यासमागमे जमाव रवाना केला. त्यांसमागमे आपण स्वारीस एणे प्रमाणे आपले जमावानसी आलों. नावनिसी बितपसिलः—

प्रतापजी बिन संताजी	शंकरराऊ बिन चांदजी
हैबतराऊ सिलीवकर	हैबतराऊ देसमुख
देसमुख	१
१	

पदाजीराऊ विन विठोजी हैवतराऊ देसमुख	पुनाजी विन संताजी नाइक देसमुख
१	१
सूर्याजी विन ह्माकोजी-राऊ सिलींबकर देसमुख	जावजीराऊ विन त्रिंबक-रांऊ सिलींबकर देशमुख
१	१

एणेप्रमाणे आपलाले जमाव घेऊन मोहिमेस आलों. कष्ट मेहनत जे करावयाची ते उभयतासमागमे हुकुमाप्रमाणे केली. खोकरी राजापुरी कुल देश दुर्गें राय-गडासहवर्तमान हस्तगत जाहालिया, खुशालीच्या प्रसंगी मावलप्रांतीच्या जमी-दाराचे बरे करावे, इसाफतीच्या गावास मोगलाई बसली आहे ते माफ करून सोडावी, व स्वराज्यपैकी बाबती वसूल घेतात व ऐनदस्तपैकी तिजाई घेताती, त्यास यापैकी ऐनदस्त बाबती स्वराज्याची बेरीज येक करून तिजाई मात्र घ्यावी, ह्मणून विदित केलें. त्यावरून तुमचे श्रम चित्तांत आणून तुह्मी विनंति केली त्या-प्रमाणे तह मान्य केला असे.

तुमचे इनामाचे गाव	किता इनाम गाव	
१ मौजे कुरंगवाडी	१ मौजे पाली इसा-फती	
१ मौजे तांभाड	१ मौजे बोपे	
१ मौजे चिंचले बु॥	१ मौजे करनवडी देशपांडे	
१ मौजे चिंचले खुर्द		
॥ मौजे केतकवणे		
४॥.	३	

वावेली मोकदमाची व माहाराची माहारकी गावगना सुदामत आहेत त्यास चव्हाटेचे गावीची मोगलाई माफ केली असे. स्वराज्याची आकाराची इनाम तिजाई घ्यावी कलम १

सदरहू देह ४॥ साडेच्यार येथील पाहाणी खंडीच्या पिकास साडेच्यार मण धरावी. या प्रो जो आकार होईल त्यापैकी दोनी तक्षिमा स्वराज्य एक तक्षीम मोगलाई माफ केली असे. दोनी दोनी तक्षिमा. स्वराज्यापैकी इनाम तिजाई तिसरी तक्षीम घ्यावी. कलम १

एकूण देह ३ हे मावळप्रांतीचे गांव यास मोगलाई सालाबाद नाही. पाहाणी प्रो आकार स्वराज्याचा होईल त्याची इनाम तिजाई घ्यावी. कलम १

गावगना इनाम शेते आहेत त्यास चव्हाटेच्या गावीं मोगलाई पडते त्या तह प्रमाणे माफ करून स्वराज्यासी तिजाई घ्यावी. कलम १

काराची इनाम तिजाई घ्यावी. कलम १

देसमुख व देशपांडेचे इनामगावी खंड गुन्हेगारी कमावीस होईल त्याची तिजाई दिवाणांत घ्यावी. दोनी तक्षिमा तुह्मास दिल्या असेत व निपुत्रिकाचा बैतलमाल कमावीस गैरमहसुली जमाव होईल त्यापैकी तिजाई दिवाणांत घेतली जाईल. कलम १

वणी घरटका नख्त
बाब आकार होईल त्यास
राजपटी व दाहीज बस-
ताती, ते देखील आकार
करून तिजाई घ्यावी.
दोन्ही तक्षिमा तुह्मास
दिल्या असेत. कलम १

एणेप्रमाणे साहा कलमे तह केला असे. या तह बरहुकूम तुमचे चालविले जाईल. कदाचित् माहाल सिरिस्तीयाने पाहणी होवी ते न जाली, खंडणीच जाहाली, तरी या तहाने च चालविले जाईल. याखेरीज किरकोली पटियाचा तगादा लागणार नाहीं. जाणिजे. छ १२ मोहरम."

सुरु सुद बार

लेखांक ४०.

श्री.

"म॥ मोकदम मौजे वडगाव ता॥ गुंजणमावळ यास देशमुख व देशपांडे ता॥ मजकूर सु॥ सन खमस अर्बैन मया अलफ. मौजे मजकूरी रकमदस्त खंडी १३ तेरा आहे. त्याची उगवणी करावी तो जमीन मोचट, यामुळे कुळे येऊन कीर्द करून दिवाणचा टका उगवणी नव्हे. याकरितां मोकदम याणे येऊन विनंति केली की, दस्तांत सोडी देऊन बाकी दस्त राहील त्याची मुलुक सिरस्ता उगवणी करून देईन. त्यावरून राजश्री राघो व्यंकटेश नामजाद किले राजगड याजपासी वर्तमान निवेदन केले. त्याणी राजश्री पंतसचिव स्वामी यांजपासी विनति केली. त्यावरून तुजला मौजे मजकूरच्या लावणीवर नजर देऊन, मौजे मजकुरास रकम दस्त सोडी खंडी ३ तीन देऊन पत्र मौजे मजकुरास सादर केले असे; आणि तुवा येऊन विनंति केलीस की, आपल्यास या पत्राप्रमाणे सोडीचे पत्र दिल्हे पाहिजे ह्मणऊन विनंती केली. त्यावरून तुजला हे पत्र दिल्हे असे. या सोडीस तुजपासून सेरणी दिवाणचे पत्री आहे तेणेप्रमाणे उगवणी करून आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने दस्त खंडी १० दाहाची उगवणी करून सुखरूप राहाणे. दिवाण पत्रांत सोडी खंडी तीन आहे परंतु पूर्वीची बोली चौ खंडीची होती, याकरिता मौजे मजकूरचा पाटील व भोवरगावचे पाटील याणीं बोलीचा अतिशय केला, याकरितां दिवाणातून चौथी खंडी करार करून दिल्ही जाईल.

साक्षी

१ भिकाजी लेकवळा पाटील मौजे माहरी बु॥   १ कावजी भगत प॥ मौजे सोनवडी
१ तुकाजी इंगुलकर मो॥ मौजे आडाली   १ बरवाजी दिघा प॥ मौजे कतकवणे
१ सकराजी सरजाम प॥ मोजे साडे   १ सूर्याजी वेणुडिर खोत मौजे सांगवी बु॥
१ दिमजी त॥ आबवण"

लेखांक ४१.

श्री.

"श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब याणीं र॥ सिलीमकर त॥ गुंजनमावळ यांसी आज्ञा केली ऐसी जे, राजश्री यमाजी शिवदेव यांणी जावली प्रांते फौज पाठऊन दंगा केला आहे, त्याचें पारपत्य करणें हें साहेबांस अवश्यक जाणून तुह्मास आज्ञापत्र सादर असे. तर तुह्मी व कंक व मालुसरे व खोपडे व जेधे ऐस एकत्र होऊन राजश्री मोरो धोंडदेव सुभेदार व आपाजी पारठे समस्त सरदार यास सामील होऊन, गनीम पारचे ठाणियास गेला आहे त्याजवरी जाऊन धुडाऊन देणे. आणि आपले शेवेचा हुजूर मजरा होऊन साहेब संतोसी होत ते गोष्ट करणें. आणि स्वामिसेवा एकनिष्ठेने केलिया साहेब तुमचे उर्जित करितील ऐसें जाणून गनीमांचे पारपत्य बरे रवेसीने करणे. जाणिजे. छ ५ रबिलाखर सु॥ अर्बा खमसैन मया व अलफ."

लेखांक ४२.

श्री.

"राजश्री हैबतराव मायाजी सिलमकर देशमुख
ता॥ गुंजणमावळ गोसावी यांसीः—

॥छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्नो॥ माधवराव तुकदेव रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणौन स्वकीय कुशल लिहित जावें. विशेषः—आपण पत्र पाठविले ते पावोन लेखनार्थे संतोष जाला. ऐसेच सदैव पत्र पाठऊन संतोषविले पाहिजे. स्नेहास उचित आहे.

दोहरा.

कज्जल तजे न शामता, मोति तजे न सेत ॥
दुर्जन तजे न कुटिळता, सज्जन तजे न हेत ॥ १ ॥

श्लोक.

गिरीर्मयोरे गगने पयोधरे ॥ लक्षांतरे भानुजले सुपद्मं ॥
द्विलक्ष सोमो कुमुदोत्पलानि ॥ स्नेहेशु मैत्रिर्न कदापि दूरः ॥१॥

आह्माकडील वर्तमान यथास्थित असे. वाघाचे कातडे लौकर मिळऊन पाठवणे. जधाद्या मांजराचा आंड कोणकोणास सांगत जाणे. मिळाला तर तुह्मी लोभास न येणे. आह्मास पाठऊन देणे. लोभ कीजे हे विनती."

लेखांक ४३.

श्रीरोहिडमल.

श्री.

"करीना बाबाजी कोंढालकर यास चांदजी कोंढालकर यानें भुतें लाऊन घर बुडविलें. गुणाजी कोंढालकर दसरियाचा घट उठविला, ते दिवसी मुखवंटा व रुमाल भगताने श्री यांस वाईला होता. तो गुणाजी घेऊन जाऊ लागला. त्यावर चांदजी बोलिला की, गुणाजी पा॥ हा रुमाल माझे तरवास बांधावयास देणे. गुणाजी बोलिला कीं, चांदजी, हा देवाचा रुमाल देवास असों दे, तुलाहि देत नाहीं, मीहि घेत नाहीं, आल्या दसरियास देवाचा देवास पांघरून. ह्मणून गुणाजी बोलिला. त्यावर गुणाजीची व चांदजीची बोली जाली, ह्मणऊन कटकटले. तेच दिवसी गुणाजी घरास गेला. घरीं गेल्यावर त्याला हींव येऊन डोई दुखूं लागली, ह्मणून बाळोजी देवास अंगारियास आला. देवास प्रसाद लाविले. देवानें प्रसाद दिले कीं, चांदजीनें देव व भुतें पेंसली. ह्मणून बाळोजी चांदजीस ह्मणूं लागला कीं, तूं माझ्या बाला अंगारा दे. तो अंगारा देईना. मग च्यार दिवसांनीं गुणाजी मेला. त्यावर मूठमाती द्यावयास श्रीजननीजवळ नेला. तेथें बाळोजी चांदजीस बोलिला कीं, तूं रगताचा टिळा लाविलास. चांदजी सारे गांवकरियादेखत बोलिला कीं, मी टिळा लाविला, अझून काय जालें? त्यावर गुरें वासरें कितीक मेले. बैल मेले. मी कोठें गेलों नाहीं. त्या देवास पुढें तो ह्मणे कीं, माझी लाग मीच मारितों. त्यास माझे लेक दो. थोरला लेक भुतांनीं मारिला. धाकला लेक याचे डोळे गेले. आंधळा जाला. याउपर सन खमस खमसैनात एकच ह्मस दोन महिने चारापाणी खाईना. देवास पुसे. तो ह्मणे माझी लाग. त्यावर चापजीस ह्मणे की तू माझी ह्मस वाचव. तो काही आंगारा नेदी. मग मी श्रीराजजाईस गेलो. तेथे मनास आणील. तिनें सांगितले की, चापजीने तुजवर देव भुतें घालून, तुझे घर व तुझा बाप लेक मारिला हे खरे; तू त्याच्या गला पड. ह्मणऊन गावास आलो. श्रीराणजाईचा भगत राणोजी गोलाहि आणीला. देवळी पाच जण भले लोक मेलऊन राणोजी

गोली याने श्री रोहिडमलास प्रसाद लाविले. त्याणेहि प्रसाद दिले की, चापजीने भुते लाऊन याचे घर मारिले हे खरे. तो हुबर घालू लागला की, माझी भुते नव्हत. त्यावर राणो गोला चापजीस बोलिला की, तूहि भगत आहेस. तूच आपले हते प्रसाद लाव. आणि देवास पूस, हे खरे की काय? मग चापजीने आपल्या हाते प्रसाद लाविले. मी भुते लाऊन बालोजीचे घर बुडविले हे खरे की काय? देवाने प्रसाद दिला की, चापजी तूच भुते लाऊन बालोजीचे घर बुडविले हे खरे. ऐसे पडतालियानेंसी सांगितले. मग चापाजी बोलिले की खरे, तुझे अंगी कलंक लागिले, आतां ते ह्मस पाय पसरून मरते. तिला निकालसपण अंगारा लाव. ते उठली ह्मणजे हे खरे. नाही तर देव भगत सांगतात हे अगदी लटके. त्यास चापाजीने त्याचे ह्मसीस अंगारा लाविला. दोन महिने ह्मस पडली होती ते उठोन गुरांत जाऊन चरू लागली. मग पाचांना साक्ष आली की चापजीने भुते लाविली हे खरे. मग पाच जण बोलिले की बालोजी चापजीची भुते खरी परंतु तू आमचे ऐक. याची डगडग करू नको. यास दिवाणांत नेलीयाने तुझा बाप लेक उठेनात. मागे जाले ते जाले. आता पुढ तुझे माणूस अगर गुरूं काबड याच्या भुताने मारिले ह्मणजे गोताचा खोटा दिवाणाचा गुन्हेगार ह्मणून बोलोन, याचे अंगी पाचाचे साक्षी न सिकले येणे प्रमाणे लाविली."

मूल मारिला कलम १	गुणाजी कोढालकर भुते लाऊन
गुर व बैल मारिले कलम १	मारिला कलम १

ऐसी देव व खेलोजी व कालकाई व चेडे २ ऐसी भुते लाऊन माझे घर बुडविले. यासी साक्ष ऐणेप्रमाणे

सूर्याजी खोपडे व साबाजी	तुलाजी काटे चा॥
खोपडे देशमुख	विचित्रगड
ता॥ उत्रोली	तान्हाजी कंक चाकर किले
एसजी प॥ कुसले मौजे करजी	विचित्रगड
	तुकोजी जाधव किले
येसजी लोकरा	विचित्रगड
माहार मौजे पानवाहल	सटवाजी माडरा चा॥
१ खंडा बिन धाकनाक	विचित्रगड १
१ सिवनाक बिन धाका	
२	

लेखांक ४४.

श्री. नकल.

"करीणा गुणाजी कोंढालकर पाटील मौजे पानवाहल ता॥ भोर जबानी राजश्री कान्होजी नाईक जेधे देशमुख ता॥ मजकूर हे कासारखिंडीच्या जुंझास गेले. ते समई जुंझ जाले. खिंडीहून मोड होऊन तुबकियाच्या वडापावेतों मागे सारिले. ते वेळेस राजश्री नरस प्रभु देसकुलकर्णी यास जखमा लागल्या. त्याचा आंगठा हाताचा पडिला. तेवेळेस पोसजी कोढालकर बहुत कामास आला ह्मणऊन देशमुख व देशपांडे मेहरवान होऊन पाटिलकी मौजे पानवाहालची पाटिलकीचा इनाम टके २ दोन पैकी रुके ।॥ चोविसाची पाटिलकी दिली. देसमुखानी आपले कानची मोत्याची जोडीहि त्याच्या कानांत घातली. हे तिघे भाऊ तपसिलः—

१ वडिल पोसजी कोढालकर
१ धाकला कावजी कोढालकर
१ या धाकला बापूजी या दोघाचे नकल जाले

३

ता॥

१ पोसजीचा लेक
१ वाघोजी कोढालकर याचा लेक
१ कृष्णाजी याचा लेक गुणाजी

गुणाजीचे लेक ५

१ वडील बालकोजी
१ बापूजी
१ मालजी
१ सटवाजी
१ राणोजी

५

हे पांढरीमुळे देसमुखाचा व दिवाणचा कर्ज व टका पडिला आपल्यापासोन घेतले.

दुरगाई कोढालकरीण इचे कर्ज रा॥ सर्जराव यानी नागली खंडी ३ घेऊन गलीयास जामीन येणेप्रमाणे दिल्हे

१ बापूजी कोढालकर
१ मालोजी कोढालकर
१ कृष्णाजी कोढालकर

३

या तिघानीं दुर्गावास कतबा लेहून देऊन गल्ला नेला. त्यावर सराईस उगऊन घ्यावे तो सराईस मुलकाचा तगाजा, मोगल आला, मुलुक आगदी पळोन वाताहूत जाली. बापूजी व मालजी पळोन गेले. त्याचे मागे गुणाजीहि पळोन कोरली पलीकडे आपली माणसे गुरे घेऊन पळोन जात होता. यास बरवाजी कोढालकर याने कर्जाबद्दल धरून नेऊन येणेप्रमाणें नागवला. रुपये १२०० बाराशाची बेरीज जाली ती यादी आलाहिदा आहे."

समाप्त.

[इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेलीं]

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

खंड १८ वा.

[शिवकालीन घराणीं]

पुणें—देशपांडे.

हें प्रकरण

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, बी. ए.

ह्यांनीं संशोधून तयार केलें.

तें

मुंबई येथें,

तुकाराम जावजी ह्यांनीं

'निर्णयसागर' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

इ. स. १९१४.

Published by Tukaram Javaji, Proprietor, N. S. Press,
23, Kolbhat Lane, Bombay.

Printed by R. Y. Shedge, at the N. S. Press,
23, Kolbhat Lane, Bombay.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

खंड १८ वा.

लेखांक १.

श्री.

यादि बिंदाणे सिवेची मौजे पिसोई त॥ कन्हेपठार व मालसिरस दोही गावीची बिंदाणे बित॥

वोढियाचे खालील काठापासून उभा बांद दगडाचा पठारी तिवधा

दक्षेणेस पिसोई १ उत्तरेसी टेकवडी १ पूर्वेस मालसिरस १ तेथून खालता उभा बांद सेंधी ४ खिला १ खलवडे १ खिला खलवडिया खालता सेंधे दगडाचे १ फणी खालता उभा बांद दगडाचा त्याचे खालते लवण त्याजखालती ती दगडाची रुरो त्याजखाले पूर्वामुख धोरड माचाडास अडसरावेरी आला तेथे वाटे वरता अडसरी खिला तेथून पुढे वाट वाटेवरी गची खडक वेहलालीची जाली वाटे खालता लवण तेथे धोरड पूर्वामुख गेला आहे तेथून खालता अडसर तेथून पुढे दक्षणेस अडसर त्याच्या माथियाने धोरड दक्षेणेस गेला असे माथा खिला बोरीचे झाड त्याजखालते अडसरी खलवडे १ त्याजपुढे खलवडी सुमार ७ सात त्याजखालती वाट वाटेखालता माथाचा खिला तेथे पांढरजाळीचे झाड खालती धोंडी तेथून पुढे रुरो थोरली पेडालापासून पस्छमेसी पुढे दक्षेणेस सेधी * *
वारुळ पुढे बारी * * * सुमार ३ *
* * * * पुढे सेधे १ पुढे * * *
* * * * सेवटीच्या सेधे * * *
रुती दगडाची पुढला धाकटा १ पुढे तिवधा गांव ४ पूर्वेसी नायगाऊ १ पस्छेमेसी पिसोई १ उत्तरेसी मालसिरस १ दक्षेणेस माविडी १ एकूण गाऊ च्यारी.

लेखांक २. १५२४ आषाढ शुद्ध ३.

५ अज रख्तखाने खोदायवंद खान अलीशान ख॥ हैवतखान साहेब खुलीदयाम दौलतहू तं॥ कारकुनानि प॥ पुण्हे बिदानद की ह॥ सु॥ सन सलास अलफ जमीन एक चावर ५१ दर सवाद मौजे परवती ब॥ बाती इनाम अजरामऱ्हामती बे॥ तानाजीराम देसकुलकर्णी प॥ मजकूर जमीन दे॥ माहासूल व नख्तयाती दिल्हे आहे दुबाला कीजे. तालीक लीहून घेउनु असली

परतेतु दीजे. बाबती सेत बादुनु दुबाला कीजे औलीयाद वा अफवाद चालवीजे.
तेरीख १ माहे मोहरम

तानाजी वलद रामाजी वलद होनाजी देशपांडे प्रांत पुणें—होनप.

लेखांक ३.

श्री. १५३० आषाढ शुद्ध २

नकल

महजर बतारीख १ माहे रबिलाखर बिहजूर हकीमशरा व नैब गैबत व हाजीर मजालसी प्रा। पुणें

काजी आबन हकीमशरा व काजी इसमाईल शरा
सेख नूरमहमद मुतवली
रोजा मखदूम सेख सला
कृष्णोजी त्रिमल मुश्रीफ
मालोजी नरसिंगराऊ
सितोले देसमुख प्रा। मजकूर
* * बिन * *
सेट सेटिया क॥ पुणे
व गोपालबा वेव्हारा माहाजन
रंगसेट सेटिया पेंठ मूर्तजाबाद

मीर सैद इसीफ नैब गैबत किले कोंढाणा व हवाले प्रा। पुणे
विठल कोनेर मजूमदार
हिरोजी पंडित नाजीर
तुकपाटिल बिन चितपाटिल क॥ पुणे
बापसेट बिन जोमसेट सेटिया व कृष्णाजी मुदगल व विष्णूबा माहाजन पेटा शाहापूर
तानसेट सेटिया पेठ मलकापूर

इसम नाईकवाडी

कान्होजी बाबर
एलबोजी कानडा
नरसपाटिल बिन हेमपाटिल मोकदम मौजे धायरी
× × व बाबाजी मोकदम मौजे आंबेगाऊ बु॥

धाऊजी जाघला
नामाजी सितोला हाली मोकदम मौजे हडपसर
देऊजी पाटिल मोकदम मौजे नऱ्हे
गोमाजी मोकदम व गुंडाजी मोकदम मौजे मांजरी बु॥

काऊ पाटिल मोकदम
मौजे उरली बु॥

लखमोजी मोकदम मौजे
लोणी काळभोर

बाऊजी मोकदम मौजे भिवरी

बाजी मोकदम मौजे चांबिळी

बाजी दरेकर मोकदम
मौजे आंबिले

बाजी मोकदम मौजे पिसार्वे

सुलतानजी मोकदम
मौजे साकुर्डे

नाईकजी मोकदम
मौजे सोनोरी

राघपाटिल मोकदम
मौजे हिंगणे बु॥

एस पाटिल मोकदम
मौजे पर्वती

दतजी व परसोजी
मोकदम मौजे गराडे

संताजी व बोपाजी
मोकदम मौजे पारगाऊ
नजीक पिसार्वे

तुकपाटिल मोकदम
मौजे राजेवाडी

नरसोजी मोकदम
मौजे जेजूरी

कुमाजी मोकदम
मौजे वाल्हे

मोकदम मौजे खानवड
हिरोजी मेहत्रिया लोहार

सु॥ सन तिसा अलफ कारणे महजर ऐसा जे वणपुरीचा पाटिलकीचा वेव्हार

अग्रवादी तान पाटिल बिन अचलपाटिल
कुंभारकर तकरीर केली ऐसी जे मौजे
मजकूरची पाटिलकी मिरासी
आपले वडील खात असता
जावजी पा॥ खांडगे यांचा
वडील कोतनाक
खालिले देसीहून वरता जात
होता तो माहारी आपले
सेतामधें सरकती दिघली
कोतनाक सरकती करून गावी
राहिला सेतांत लावला यावरी
माहारासी सेताबदल भांडो लागला

पस्वमवादी जाव पाटिल बिन बाद
पाटिल खांडगे तकरीर केली
ऐसी जे मौजे मजकुरी कुल खराब
होते यावरी आपला पणजा कोत
पाटिल खालिलेकडून एतां गावी
राहिला होता गोवीचे मोकासाई
आपला पणजा यास बोलिले जे गांव
खोर पडिला खदाब पडिला आहे
तुह्मास पाटिलकी मिरास करून
देऊं गांव मामूर करणे ह्मणऊन
आपलिया पणज्यास आणून ठाणाचा
व आपला कौल दिल्हा पाटिलकी

यावरी आपलिया वडिली ह्याकिलें ह्याकितां त्यांसीं बोलो लागले जे पाटिलकी आपली मिरासी ह्मणउनु आपलिया वडिलासी करकशा करू लागले यावर आपले वडील व जाऊ पाटिलाचे वडील भांडत भांडत ठाणियास आले. ठाणा मनास आणून हरएक मनसुफी निवाडा करून खांडगे खोटे जाले आपलिया वडिलांस महजर दिधला गांवास आले गांवातून खांडगे बाहेर पडोन आपला वडील पाटिलकी नागोजी करीत होता तो मारिला व गाव मारून घेऊन गेले निवाडा करून आपल्या वडिला महजर करून दिल्हा होता तो वण + जीचे कारकीर्दीस गेला एक दोन निवाडे होऊन मागती खांडगे करकशा करिताती तर पाटिलकी मिरासी आपली पिढी दर पिढी आपले वडील वडील खात आली ऐसा रवा करीन खरां जालों तर खाईन खोटा जालों तर लेकुराचे लेकुरि तुटलों

मिरासी करून दिधली आपलिया पणजा याणे गाव मामूर केला यावर कुंभारकर कुंभारवलणीहून आपल्या पणज्यासी कुंभारकर करकशा करूं लागले आपल्या वडिलास ठाणा घालून नागविले आपण तुटलों मोडलों परागंदा जालों मागें नागोजी कुंभारकर मारिला ते तागाईत आपणासी कुंभारकरांस भांडण लागले आहे आपण व अचल पाटिल कुंभारकर भांडतां भांडतां गोतामधें मौजे खलदास गेलों अचलपाटिल बोलिला खरा होईल तो खाईल खोटा होईल तो जाईल ह्मणऊन नेम केला आहे हाली तान पाटिलानें रवा करीन ह्मणोन नेम केला आहे तर तानपाटिल रवा करील आपण साउली करीन खरा जालों तर खाईन खोटा जालों तर लेकुराचे लेकुरी तुटलों हे तकदीर सही

हरदोजणा नफरांच्या तकरीरा मनास आणून मौजेमजकूर बलूते कोनेखुटे यांसि तलब करून आणिले

मोकदम मौजे खानवड
सोनोरी भिला बिन साऊ व लाला
वर्तीकार मोजै मजकूर

त्यांचे डोईवर सुकुरत घालून गोही पुसिली तिही × × × उभयवर्गी साठी सत्तर वरसे भांडताती यांचे निवाडे जाले नाहींत कुंभारकर पाटीलकी

चालवित होतां तो खांडगियानी मारा करून भांडण बहुत दिवस आहे आतां हरदोजण दिव्यास राजी जाले आहेत दिव्य करितील खरा होईल तो खाईल खोटा होईल तो तुटला जाईल. ऐसी गोही जालियावर जाऊ पाटील व अंचल पाटिल खलदास गोतामधें गेला होता × × × जे अंचलपाटिलानें रवा करणे साधून खाणे म्हणऊन खलदच्या × × × त्यावर तान पाटील कुंभारकर दिव्यास राजी जाला यावर ठाणाहून पांढरीवर दिव्य करावे ऐसा तह करून पाठविले आधले दिवसी हत घोऊन हाती पिसवीया घातलिया एरे दिवसी श्रीशके १५३० कीलक नाम संवछरे जेस्ट वद्य एकादशी रविवार छ २४ माहे सफर

विठल तानदेऊ अजहत
कृष्णाजी त्रिमल मुश्रीफ

× × × पाटिल मोकदम
का। पुणे

उमाजी मोकदम
मौजे वाल्हे

बाऊजी मोकदम
मौजे भिवरी

जाऊ पाटिल मोकदम
मौजे वाघापूर

सताजी व बोपाजी
मोकदम मौजे पारगाऊ

बाद पाटिल मोकदम
मौजे भिवडी

× × × पाटील मोकदम
मौजे एकवडी

बाल माली चौगुला
मौजे सानवडी

बाबाजी नेलेकर व
जानोजी खैरा
मौजे कोढित खुर्द

लिंगो पंडित ठाणेदार
कर्याती सासवड

मालोजी नरसिंगराऊ सितोले
देशमुख यांचे अजहत त्रिंबक
पिलदेव व एकोजी सितोले
व कृष्णाजी चौधरी व देश-
कुलकर्णी यांचा यारेदी
रंगो श्रीपति

कसबे सासवड
गणाजी व बालोजी व
हिरोजी मोकदम लखोजी
बाबाजी दाणी
देऊजी कासार
रूपाजी सेटिया व
मालजी सेटिया माहाजन
दमसेट रंगारा

का। जेजूरी
बालसेट सेटिया
भिका सुतार
बालोजी बुरुंजा
हशम नाईक
जथे कान्होजी बाबर

या हुजूर तान पाटिल बिन अंचलपाटील सुश्नात होऊन पत्र भाखा बांधोन मौजे मजकुरीचे बहिरवाचे देवलापुढें तपत माहादिव्य तानपाटिलें सात हि मंडलें चालोन रवा काढिला व पाटिल खांडगे याने साउली केली होती हाती पिसविया घालून तेथून स्वार होऊन छ. २६ माहे सफरी सीसंबेचे रोजी हातीच्या पिसविया काढिल्या बिहुजूर मजालस मौजे वाल्हे

विठल तानदेऊ अजहत
कृष्णाजी त्रिमल मुश्रीफ
त्रिंबक पीलदेव व एकोजी
सितोले व कृष्णाजी चौधरी
अजहत मालोजी सितोले
देसमुख व रंगो श्रीपत
यारीदी देशकुलकर्णी

पाटिल मोकदम
मौजे वडगाऊ
सुलतानजी मोकदम
मौजे साकुर्डे
रुद्राजी जाधव व
जनाजी खैरा मौजे काडीत खुर्द

सांगो माऊजी सरसंमत कऱ्हेपठार
खंडो मुरारी भगत
खंडेराऊ मुकाम जेजूरी
मालपाटिल आंबिला
मोकदम मौजे ठेकवडी
कुमाजी मोकदम
मौजे वाल्हे
आटोला व पाटील
मौजे × × × ×

× × × हात पाहिला चोखट निघाला तानपाटिल कुंभारकर खरा जाला यावर ठाणियास तानपाटिल व जाऊपाटिल आणिले हाजीर मजालसीस तानपाटिलाचा हात पाहिला तानपाटील खरा जाला तानपाटिल कुंभारकर आपली औलियाद व अफलादी लेकराचे लेकुरी आपली पाटिलकी खाणे

लेखांक ४. (नकल)

श्रीशंकर. १५५० श्रावण वद्य १३.

महजर बतेरीख २६ जिल्हेज हाजीर मजालसी

हाकीम शरा

काजी चांदबिन

काजी इसाख

काजी मनसूर प्र॥ प्र॥ इंदापूर
सुपे
काजी————
प्र॥ चाकण

दिवाण लोक

शाहाजी अली
दतो लिगरस
सितोळे देशमुख
कान्हो सुपे
बिरादर सोमाजी मोकदम मौजे दौंड
+ + रीदेऊ व माहादो लखमदेऊ कुलकरणी
चितपाटिल बिन दाद पाटिल
अजहती मलजी भगत मौजे राजेवाडी
तुकपाटिल बिन विठपाटिल मोकदम मौजे कोरगाऊ
मल्हारजी मोकदम मौजे लोणी
तिमाजी बिन माहाद प॥ मौजे खोर
दादप॥ बिन देऊप॥ मोकदम मौजे भिउंडी
अमाजी गायकवाड चौगुला मौजे कायवाडी लंबाची
खंडप॥ बिन लिंगप॥ मोकदम मौजे पिपरी
लिलोजी अजहत देसमुख क॥ सासवड

हैबतराऊ हवालदार व
मालो दतो मजमूदार प॥ सुपे
मकुंद नरसिह हरकारे
नागोजी जगदेराऊ
रघोजी बिन जाऊजी मोकदम मौजे खडकी व नरो
बाबदेभट बिन लक्षमणभट जोसी
काउजी बिन हरजी मोकदम व नाईकजी कोलता मौजे पिसारवे
बाजि बिन साउजी मोकदम मौजे पांडवेस्वर
कान्होजी बिन एकोजी सिताळे मौजे खडवी
सूर्याजी बिन जाउजी प॥ मोकदम व दाद प॥ चौगला मौजे नाहीगाऊ
+ + + बिन मालजी प॥ मोकदम मौजे एकवडी
सूर्याजी बिन बाजी मोकदम मौजे अबिले
साहाजी देसमुख मौजे चाकण
साउजी प॥ मोकदम मौजे पिसे

प॥ इंदापूर		त॥ खेडेबारें
देशमुख प॥ म॥	रखमाजी कान्हो देशकुलकर्णी	आपोजी निगडे व श्रीपाजी कुलकर्णी अ॥ जाउजी कोडे देशमुख
गोदजी दुवले अ॥ अपाजी बिन मल्हारजी देशमुख	दतो मानाजी देशकुलकर्णी	बि॥ श्रीपाजी नरसिंह

सु॥ तिसा आश्रैन अलफ श्रीशके १५४० कालयुक्त सवंछरे मार्गेस्वरवद्य द्वादसी ब्रहस्पतवार ते दिवसी महजर ऐसा जे देहाय प्र॥ पुणे व देहाय प्र॥ सुपे यां दोही विलायतीमध्ये सिवेचा करकसा लागला होता पेशजी कारकीर्दीस खूनखणबिया जालिया तरी दों माहालीचे देशमुख हुजूर हजरती साहेबाचे बंदगीस आणून बदल निवाडा सीव मुनसफीदार पाठविले बित॥

शाहाजी अह्ली दतो लिगरस लग

मकुंद नरसिंह हरकारे

माहालास आले कसबा सुपां मुकाम केला कसबे मजकुरीं व मौजे वढाणें प्र॥ पुणा यां दोही गावास सिवेचा करकशा होता मुनसफीदार कसबे सुपां एऊन मुकाम केलियावर मौजे वढाणे प्र॥ पुणे तेथील काऊजी पाटिल बिन आपाजी चौधरी यांचे सेतांत सुपेकराची गुरे निघाली ते त्याणे हरदो गावीचा करकसे-याची जमीन दोही खाले होती तेथे भोवडिली यावरी कारकीर्दी एसाजी दिवाकर ठाणेदार प्र॥ सुपे तेहीं ठाणाहून सांगाते तोपची देऊन पाठविला त्या तुबकियाने बार करून काऊजी बिन आपाजी चौधरी आपले सेतांत वढाणे नजीक होता तेथे तुबकियाने गोळीने हाटिला तो मयत जाला हा अमल मुनसफीदारास मोकदम मौजे वढाणे मालूम केला मुनसुफीदारी खबर घेतां सदरहू खून इतबारखान सांगातें तुबकी गेला होता त्याने केला हें लाजिम जाले यावरी एसाजी दिवाकर हवालदार प्र॥ सुपे यासि शाहाजी साहेबी सांगितले जे इतबारखान तुबकी हाजीर करा खून जाहाला आहे हजरती मलिकसाहेबाची अदल इनसाफ दूखल असतां खून जाहाला आहे तो इतबारखान होता तुबकी हाजीर जाला नाहीं गैरहाजीर जाला मोकदम मौजे वढाणे रजा देऊन बहुडाविला यावरी विलातीचे सीव निवाडा करावया मुनसिफदारी गस्ती केली निवाडा करितां कसबे सुपे व मौजे वढाणे यासि सिवेच्या निवाडियाबदल सिवेसी आले खातिरेसी आणितां पहिले वढाणे—मोकदमे आपली हाद दाखविली कदीम पश्चिमे-

कडे चौ गावीचा चौधा दक्षेण सुपे कसबेकरीची चोळी मोडोन कसबियाखाले कमाविश होते पश्चमे रिशापिशा उत्तरे वढाणे त्या चौधियापासून बिंदाणेकडे तळई सोनार खिळा पुढें उत्तरें तिवधां तीन गाव सुपे वढाणे पडवी पश्चमे वढाणे पूर्वे सुपे उत्तरे पडवी एणेप्रमाणे हाद दाखविली यावरी सुपेकरी कागद दाखविला तेथे मजमून की स्वस्ति श्री शके १४४६ तारण सवछरे मार्गेश्वर वद्य रवौ तदिनी दसकत कान्हो लुखो पेधो लुखो मलो कोंडो माहार विर्तीकार मौजे वढाणे आत्मसुखें पेधो मालोस व पेधोई मालीस लेहोन दिधले ऐसे जे मौजे चिचोली मजरा सुपाचा तेथील सिवेची सेते वढाणेयाखाली पडिली होती तें दिव करून साधिली तें लेकुराचे लेकुरी औलादी अफलादीनसी खाइजे ए बाबे मी उभा राहे माझीए वंसीचा उभा राहे तरी दिवाणी खंड सिसे २ टके ५००० देणे अन्यथा नाही हदमहदूद वरिलीकडील तरडा देवीचा त्रिसूळ तिवधा पिशाची चोळी वढाणे तेथून चिचेवरील राजोखाट तेथून बिंदाणे पाढरजुळीचा खिळा तेथे तिवधां चिचोळी सुपे वढाणे हा तिवधां तेथून हद एकतलईची पाली तेथून खाईल वड देऊळगावीची वाट तेथून तिवधां पडवी वढाणे सुपे हे सीव तुवा खाइजे या बोलास अन्यथा नाही याचे गोही लिहिले आहेत बित॥

मुलाने मसीद प्रा॥ सुपे

विठल बिन वामन प॥ मौजे अनजून प॥ सिरवळ

हिरपाटील मायापाटिल सो कारखेल प॥ सुपे

माया सुधो वृत्तीकार सो रासीन

गोदा कान्हो विर्तीकार सो कोथरूड प्रा॥ पुणे

माया काळो विर्तीकार सो सुपे खुर्द

मेहतर दादू प्रा॥ सुपे

मेहतर अबान प्रा॥ सुपे

नाई पाटिल धांगदे प॥ सो अनजून

भिलो बको विर्तीकार मौजे खांबगाऊ प्रा॥ पुणे

गंगो बसो विर्तीकार सो पिपरी प्रा॥ पुणे

तुको चांगो विर्तीकार मौजे विखल प्रा॥ वाई

सदरहू कागद हाजीर मजालसी दाखविला यावरी मुनसुफीदारी खातिरेस आणितां दिव करून जमीन साधिली ह्मणून सदरहू कागद लिहिला आहे तरी जे वख्ती दिव होते ते वख्ती हरदो महालीचे कारकून व देशमुख व देशक व जवार व कोनेकुए मेळऊन दिवाण होते तेथे महजर त्यांची नावे निशाणे करून

महजर करितातीं ए कागदी तैसा अमल नाही यासि तो कागद रुजू न पडे बातील करून दूर केला यावरी सुपेकरास पुसिले धाउजी बिन वाल पाटिल खैरा कसबे सुपे याणे मालूम केले जे मौजे वढाणे सुपे याचे सिवेवरी वसिले ते जमीन माझी मजरे मौजे खोरास सीव आहे तैसीच हद दाखवीन ह्मणून सांगाते अजुराण देऊन हद पाहिली तो समुदे वढाण सुपियाखाले सापडोन तिवधां पूर्वे त्याजखालील देऊळगाव व खोर सुपे बिदाण थोट वड तरडादेवीचा त्रिशूळ दाखविला सदरहू हद दाखविली हाली वर्तणूक लेहोन दिधली पहिला तिवधां थोट वड तेथून तळयावरील पालीस ईस्वराचे पाटीने तहद पांढरविहीरपावेतो यावरी सदरहूने हदचे कतबे घेतले सदरहू अमल हाजीर मजालसी खातिरेस आणितां वढाणे कदीम मौजा पुणियाखाले दिवाणचे दफ्तरी आहे तो सुपियाचे सिवेवरी कैसा हे माकुळ नव्हे ऐसे जाहालेयावरी मनसुफीदार व हाकीमशरा व देशमुख व देशक हाजीर मजालसी खातिरेस आणितां कसबे मजकुरीचा मजरा चिचोळी मोडोन कसबियाखाले कमाविश होते पांढरी देवस्थान आहे तेथील मिरासदार बारकर पश्चमेस वाडा वसवितातीं मौजे वढाणे दोन्ही पांढरिया कदीम अमले सामले आहेत या दोही दरम्यान दोरिया धरून मधेमध साधून तेथे दिव घातले यावरी सुपाचा देशमुख व मोकदम व कारकीर्दी अमानत पुणाचा ठाणेदार लखमाजी मुद्गल व सुपाचा ठाणेदार रामाजी विरणु निवाडा करावयास आले ते वख्ती हद नेमून कतबे वढाणाचे मोकदमाचे बिदस्तूर मोरो तानदेऊ देशकुलकरणी प्र॥ पुणे तेथे मजमून जे हाली आपले गावीची जमीन आपले वेळेस नेली ते हद दाखविली पेडवळाची गडधो त्या पुढे आपलिया अजियाचे कारकिर्दीस पेषजी सेतें नेली आहेत तेही सांगितली त्यावरी हाजीर मजालसी साहेबी करारती केली गडधो चिंचा हदनामा आहे तेथे दिव करणे कीं हद कारकिर्दी दर कारकिर्दी सीव आपली सेतें तागाईत वणगोजी आपली सेतें तेथे गडधो आहेत तेथे दिव करील खरा जालों तरी माझी हद आहे तेथून खाणे खोटा जालों तरी सुपेकरी हद दाखविलियाप्रमाणे खाणे ह्मणोन तह करून येणेप्रमाणे कतबा सुपेकरापासीं होता तो दाखविला दोहि हदा दरम्यान मध्ये मध्य साधून दोरिया घालून कतब्यांत बिदार्णे तिवधे घालणे ह्मणून सुपेकर बोलिले यावरी मनसुफीदार व हाकीमशरा पुढिले कतबा जाला तेथे माहारे दिव करावे धैरणीचे बने ना आणि तेथे धैरणी दिव जाले नाही यावरी वढाणाचा खून झाला आहे तरी हा कतबा मसमू आहे कीं काय हाकीमशरा बोलिले जे खुनाचा मुबदला खून दिधला तर कतबा मसमू धरावा तरी धैरणी दिव साहेबी

मोडिले आहे करकसियाची जमीन दोघा मोकदमाचे दिव तेल ८८५ व तूप ८८५ ऐसे तपेलियात घालून ताऊन दोघा मोकदमाचे हात एकवट बांधोन घालावे ऐसी रजा—मलिकसाहेबाची बांची आहे यावरी हाजीर मजालसीस सदरहू कतबे दूर करून धाऊजी बिन दाद पा॥ हद दाखविली वढाणें सुपियाचें वाडी समुदा सीवार सुपियाखाले सापडऊन पांढरी देखील खोर व देऊलगाव यासि सीव केली ते दिवाणीची पांढरी कदीम मौजा तोडावा कोयरे वगैरे माकूल दूर केले आणि चिचोळी कसबे मजकुरीचा मजरा व वढाणें दोन्ही पांढरिया दरम्यान मजून कबूल केले तेथे बा॥ रजा मलिकसाहेब ते ८८५ व तूप ८८५ एकूण दाहा सेर तपेलियात ताऊन दोही गावीचे पाटिलाचे हातीची नखे काढून निंबू साबण लाऊन हात पाख करऊन आंघोलिया करविलिया त॥

धाउ पा॥ बिन वाल	बावाजी बिन रामजी
पा॥ खैरा क॥ सुपे	भावकर मौजे वढाणें

दोघाचे हात एकवट बांधोन दिव करावया उभे राहिले यावरी गोत देशमूख महालानिहाय बित॥

आपाजि नायकर व श्रीपाजि	साहाजी देशमुख
कुळकरणी अ॥ जाकोजी कोडे	पा॥ चाकण
देशमुख त॥ खेडबारे	गोंदजी व दतो नामाजी अजहती
लिलोजी अजहत देशमुख क॥ सासवड	आपाजी निगडे पा॥ सिरवळ

एही अर्जदास्त केली जे आह्मी गोत आहो यां दोघास पुसोन तरी आपणात आपण समजले तर समजावून यावर सदरहू देशमुख दोघापासी जाऊन पुसिलेयावरी दोघे राजी होऊन आत्मसुखे भाका दिधलिया जे गोत हद घालील तेणेप्रमाणे दोही गावी वर्तणें ह्मणून गोवर जोंधले सिवोन भाका ठेविलिया देशमुख सदरहू एऊन हाजीर मजालसीस सांगितलेयावरी मुनसुफिदारी दोघापासी कतबे मागितले गोत सिवेची हद घालील त्यासि जो तकरार करील त्याने दिवाणी होन ५००० व सिसे ५ देणे ह्मणून कतबे लेहोन दिधले यावरी हाजीर मजालसी तिवधियावरता पश्चमे तिंवधा तेथे गेले तो मजरा चिचोली कसबे मजकुरीचा सुपियाखाले कमाविष आहे तेथील मिरासी निंब पाटिल बिन माया पाटिल बोरकर हाजीर मजालसीस होता त्यासि पुसिले त्यावरी इमान घातला जे असत्य वदसील तरी तुझिया पूर्वजाचे तोंडी मांगीमाहारीचे असुद तेणे आपले पूर्वज स्मरोन हद दाखविली पश्चमे दिसे ओहळाखालील काठी

दक्षिणे चिचोळी सुपाचा मंजरा उत्तरे वढाणें हे हद दाखविलियावरी मुनसुफिदार व गोत खातिरेस आणोन तेणे दाखविलीयापैकी वढाणाची जमीन सुपेचिचोळियांकडे टाकून अज बिघे ४ च्यार अलीकडे हद सिवेची घातली तिवधा वोहळास पूर्वे काठी वोहळा पैलाडि पश्चिमे दिशा वोहळा ऐलाडि दक्षणे चिचोळि सुपे उत्तरेदक्षणे हा तिवधा करून पुढे हद घातली पुढे पुणेदेशीचे सुपेदेशीचे मोकदम चालिले पुढे दगड थोडे घातले त्याप्रमाणे मुनसुफीदार व हाकीमशरा व देशमुख माहालानिहाय व देशक व देशमुख हरदो महाल या दो गावीचे मोकदम सिवेस बांध घालून दगडाचे खिळे केले बित॥

पश्चमे तिवधा तीन गाव

वोहळा वरता पश्चमेस कांठपासून पिशा

वोहळा खालते पूर्व काठापासून

दक्षणे सुपे उत्तरे वढाणें

खिळा वोहळाचे कांठ नजीक मुरबी
या तिवधियापासून बिदाणे क॥ सुपे

दिवाचा खिळा थोर केला असे तेथवरी सदरहू अर्जे बिघे ४ च्यार टाकून वढाणाची जमीन पैकी सुपियाकडे टाकून तेथवर आले दिवाच्या खिळियापासून तहद तिवधां डोंगराचे माथांपासून मार्ग बहुळगावास जातो तेथे केला सुपे वढाणे व पडवी या दोही तिवधियामध्ये बिदाणे बित॥

दिवाच्या खिळियापासून ईशाने दिशेने पुढे तीटाऊन खालून नेम मुईन करून हद घालून तिवधियासि नेले तलई वढाणेचे थास उत्तरेपासून मार्ग वडवडास व देऊळगावास जातो तेथे डोंगरीमाथां तिंवधा केला

पूर्वे सुपे पश्चमे वढाणे उत्तरे पडवी

सदरहू सिवेची हद घालून गडधो सिवेसि घातले बित॥

येणेप्रमाणे हद सिवेची घातली येणेप्रमाणे सालाबाद दोही गावी वर्तणे यासि जो पेस्तर हद मोडून कुसूर करील तेणे दिवाणी होन ५००० पांच हजार व सिसे ५ पाच देणे

हा महजर सही

हा करार कर्दे नाऊजी बिन बावजी खैरा व धाऊजी बिन वाल पा॥ मोकदम क॥ सुपे

बिदस्तूर माहादो लखमदेऊ कुलकरणी

लेखांक ५.

(बाजू १ अर्धे पान)

शके १५५४ अंगिरा सवछर.

जेष्टमासी महमदखाने वेढा घालून दौलताबाद घेतली १.

भाद्रपदमासी शाहाजीराजे यानी पेमगिरीस निजामशाहावरी छत्र धरिले १.

शके १५५७ युवा सवछरी शाहाजीराजे माहोलीस गेले. तेथे रणदुलाखान इदलशाही व खान जमा मोगलाचा सुभा जाऊन वेढा घालून निजामशाहा हाती घेतला. शाहाजीराजे इदलशाही चाकर जाले १.

(बाजू २ अर्धें पान शक वरील अर्धांत गहाळ)

वैशाखमासी सिवाजी राजेयानी रायरी घेतली आस्विन वद्य राज्यानी सुपे घेतले संभाजी मोहिता धरिला.

मार्गेश्वरमासी सुलतान महमूद इदलशाह मृत्य पावला. माघ सुध ६ शनवारी गायकवाडासी सोयरीक केली सकवारबा (इसी सोयरीक केली) ईचे लग्न जाले १.

(बाजू १ अर्धे पान वरचें)

शके १५८६ क्रोधी संवछर.

जेष्ट शुध १४ सोमवारी जसवंत सिंगें कोंढानियाचा वेढा काढिला त्याचा सुबा तगीर होऊन जयसिंगास ज़ाला १.

मार्गेश्वरमासी खुदावदपुर राजियानी लुटिले १.

पौष वद्य ३० माभलेश्वरी जिजाई आऊची तुला जाली ग्रहण सूर्य होते १.

कार्तिकमासी इदलशाहीचा व राज्याचा बिघाड होऊन खवासखान कुडास जाऊन घोरपडे मारिले. खवासखानासी झगडा केला तो पलोन घाटावर गेला १.

माघमासी राजश्री जाहाजांत बैसोन बसनुरास गेले ते शहर मारले १.

(बाजू २ अर्धे पान वरचें)

सोनाजीपंती हि तुला केली १.

माघ वद्य ५ स सोनाजीपंत परलोकास गेले १.

शके १५८७ विस्वावसू संवछर.

' चैत्र वद्य १० सुक्रवारी राजश्री पुरंदरास आले.

वैशाखमासी जयसिंग व दलेलखान येऊन पुरंधरास वेढा घातला. (आषाढ सुध १० राजे येऊन जयसिंगास भेटोन सला जाला राजश्री संभाजी

इदलशाहा व मोगलाचा सला तोडून जयसिंग व राजश्री राजे व दिलेलखान विजापुरावरी मार्गेस्वरमासी चालोन गेले. तेथे इदलशाही फौज सर्जाखान वगैरे लढाईचा सला

(बाजू १ अर्धे पान खालचें)

(कार्तिक) वद्य १२ (१३) सोमवारी स्वार होऊन दुसरे दिवसी औरंगाबादेहून राजगडास आले.

जाला. कार्तिक वद्य ५ संभाजी राजे शाहजादा शाअलम यास भेटावयास औरंगाबादेस गेले. मोगलासी सला जाला. जसवंतसिंगाची भेट कार्तिक वद्य ६ राजपुत्राचे दर्शन

शके १५९० कीलक संवछर श्रावण सुध ८ बुधवारी प्रतापराऊ व श्रावण सुध ५ रविवारी नीराजी राहूजी स्वार होऊन औरंगाबादेस फौजेनसी गेले १.)

(बाजू २ अर्धे पान खालचें)

शके १५९१ सौम्य संवछर.

भाद्रपदमासी औरंगजेबे कासीस उपद्रव केला देवालये पाडिली १.

पौष मास मोगलाचा व सिवाजी राजे याचा सला तुटला. प्रतापराऊ व आनंदराऊ फौजेनसी औरंगाबादेस शाहाजादीजवळ होते ते राजगडास आले १.

माघ वद्य ९ सुक्रवारी कोंढाणा घेतला. उदेभान किलेदार मारिला. तान्हाजी मालुसरा राज्याकडील हशमाचा सुभेदार पडिला.

फाल्गुण सुध १५ राजगडी राजाराम उपजला.

फाल्गुण वद्य १२ भोमवारी निळोपंत मजूमदार * *

* * * * * * *

(सबंध पान)

७ (पृष्ठांक)

सके १५९२ आषाढ सुध ९ गुरुवारी माहुली घेतली.

शके १५९३ विरोधी संवछर.

वैशाखमासी मोहबतखानाने वेढा घालून अहिवंत व मारकंडा व जवळा व अंचळागिरिहि घेतले. माघमासी मोरोपंतीं हशम घेऊन सालेरीचे माचीचा वेढा मारिला. उपराळा केला. प्रतापराऊ आनंदराऊ फौजेनसी जाऊन बलोलखान धरिला. मोहकमसिंग व दारकोजी भोसले धरिले. हात्ती ११ व घोडी सतरासे पाडाऊ केली.

जेष्टमासी बाहादूरखान व दलेलखान सालेरीस वेढा घातला. आस्विन मासी वेढा काढून औरंगाबादेस आले आणि तेथे फौज ठेविली.

माघमासी सुलतान शाअलम औरंगाबादेहून दिलीस गेले.

शके १५९४ परिधावी संवछर.

जेष्ट वद्य ५ मोरोपंत जाऊन जवारी घेतली तेथील राजा विक्रमशा पळाला मोगलाईत आला १.

जेष्ट सुध ७ कल्याणपंती
चिंचवडी परलोकवास केला
मार्गेश्वरमासी * * * *
अदलशा परलोकास गेला. त्याचा पुत्र
सुलतान शिकंदर
तखती बैसविला. खवासखान कारभारी जाला. राज्याचा व इदलशाचा सला तुटला. बाबाजी नाईक पुंडे विजापुरी वकील होते त्यास बोलाऊन आणिले.

फाल्गुण वद्य १३ पनाळा गड अनाजीपंती भेद करून कोंडाजी फर्जंद याज बा। लोक देऊन घेतला. पाठी लोक रवाना केले.

आषाढमासी रामनगर घेतले तेथील राजा पळोन दवनसेस गेला १.

जेष्ट सुध ५ भागानगरीचा पातशा सुलतान अबदुला कुतुबशा मेला त्याचा जावाई तानाशा तखती बैसविला. नाव सुलतान अबदुल हसन ठेविला. राज्याचे हेजीब नीराजीपंत भागानगरास जाऊन एक लक्ष होनाचा तह करून भागानगराहून ६६ हजार होन घेऊन राज्यापासी आले.

शके १५९५ प्रमादी संवछर.

चैत्र शुद्ध १ राजे रायरीहून पनाळियास गेले ते च मासी बहलोलखानासी व प्रतापराऊ व आनंदराऊ यासी लढाई जाली, विजापुराजवळ फते जाली, एक हाती पाडाऊ आला

चैत्र वद्य १० भोमवार किले परली घेतली विजयादसमीच्या मुहुर्ते राजे जाऊन बंकापूर लुटिले.

श्रावण वद्य ९ रविवारी सातारा घेतला. कार्तिकमासी सर्जाखान * * व विठोजी सिंदियासी झगडा जाला. विठोजी पडिला.

(बाजू १ अर्धे पान खालचें)

व्यानी केलंजा घेतला. वद्य नवमी बुधवारी दो प्रहरा रात्री जिजाई आऊ पाचोडींत निर्वग वास केला १.

माघमासी मोरोबाची मुंजी जाली जैतपडी माघ वद्य ६.

गंगाबाई निवर्तली फाल्गुण वद्य ५

फाल्गुण वद्य ५ राजे + + डि यास ले + + + + + + + + + पंचमी गुरुवारी संभाजी राजे यांची मुंजी जाली

चैत्र सुध १३ चिपोळणांत लस्करची पाहाणी केली आणि बहिरराऊ मोहिते यासी सरनोबती दिधली १

जेष्ट सुध + + घटी ५ राज्याची मौंजी

जेष्ट सुध ६ शनिवारी समंत्रिक विवाह केला १

जेष्ट शुध १२ शुक्रवार ५१।३४ वी ३८।४२ + +।४५ तीन घटिका रात्री उरली तेव्हा सीवाजी राजे सिंहासनी बैसले छ १० रबिलावल सु॥ सन खमस सबैन अलफ

लेखांक ६.

१५६० माघवद्य ७.

[तालीक]

+ + + + बहुधान्य संवछरे माघवद्य सप्तमी ब्रहस्पतिवार सुहुरसन तिसां सीसन अलफ छ २० माहे सवाल बिहुजूर

ठाणे कर्याती सासवड

त्रिंबक मलनाथ हवालदार राजश्री नागोजी दादो मुजुमदार

शिक्का

बाजी व ताऊजी देशमुख होनाजी व हिराजी मोकदम का। मजकूर

शिक्का

गोविंद त्रिमळ देशकुळकरणी संतसेटी व तुकसेटी सेटिये व संतसेटी महाजन

प्रा। पुणे

मौजे गराडे

धाक मोरोजी

पाटिल मोकदम

काऊ पा। घारा चौगुला

मौजे चांबली

चाऊ पाटिल मोकदम

मौजे हिवरे

दसपा। सोनाजी

मोकदम गोमाजी निभोरा चौगुला

मौजे भिवंडी

जयंतपा। मोकदम

रावजी व राघोजी चौगुला

चांदजी चौधरी

मौजें काढीत कर्यातीं मजकूर

बावाजी राजिवडा तुक पाटिल फंड

सोमाजी दादो कुलकर्णी व जोसी

लुख माहाला न्हावी व कान्हो माहाला न्हावी

बहिरो कुंभार भिका बिन काळा

भाऊ परिट

सोम ठाकूर

भिकाजी राजिवडा चौगुला

हरजी दिघा

राम दरणा गुरव

नाऊ सुतार

महार विर्तीकार

भिका बिन काळा बंका

सदरहू काळी व पांढरी दो ठाईं केली असे. बापदेवाचे उजवीकडे गाधा या दुतर्फा जमीन मौजे कोढीत कर्यात मजकूर केले. तमाम मौजे मजकूरचे भूमगणे थळे सखर निखर पाहून, मनास आणून मौजा अज कास रुके ·।= दो ठाईं काळी व बरड बरहक केले. तपसील

तरफ सूर्याजी बिन दाद
पा। बुधा मोकदम निमे मौजे
मजकूर कास रुके ७७
काळी रुके ७३ बरड रुके ७४

तरफ सूर्याजी बिन माहाद
पा। जरंडा मोकदम निमे मौजे
मजकूर कास रुके ७७
काळी रुके ७३ बरड रुके ७४

८॥ हरिया प॥	८॥ नंदखिळा	८॥ तलेसेत	८॥ कटकमाळ चांभारटिके
८॥ कोळनाक	८॥ कोलटिके	८॥ वऱ्हाडसेत	
	वणजार टिके		
८॥ भोकर प॥	८॥ सागला दलवी	८॥ गाडेसेत	८॥ तांबेसेत
८। खालसा	८॥ पिंपळपाटी	८॥ सेत टेंभी	८॥ जांवला
८। इनाम	८॥ अडदरे रुका	८। इनाम	८॥ वडियापुढील पातळी
८॥		८। खालसा	८॥ अडदरे
		८॥	
८॥ वडसेत	८१ वाडा	८॥ गावर्णी	८१ पैकी
८॥ किन्हईपटी	८॥ रांजणा प॥	८॥ चिचपटी	८॥ चोभे सेत
८॥ पळस टिके	८१ पे॥		८॥ कोडप॥
८। बागाईत	७४	७३	७३॥
८। जिराईत			८॥ रांजणा प॥
८॥			रुका ८१ पै॥
७३			७४

सदरहूप्रमाणें बारहक वाटून दिल्हे असे. एणेप्रमाणें वर्तावयास जो हरकत करील तो दिवाणाचा गुन्हेगार व गोताचा अन्याई. केले मोडील त्यास नवखंडी याची क्रिया मोर्तब असे.

पहिले जे कागद निवाडियाचे असतील ते रद असेती. मोर्तब असे.

तेरीख छ २० माहे.
रबिलावल

लेखांक ७. १५६१.

"तेरीख ६ माहे जमादिलावल बिहुजूर हाजीर मजालस

राजश्री दादाजी कोंडदेऊ
सुबेदार नामजाद किले कोंडाणा
व महालानिहाय

सेख फेरीद मुजावर + +
राजा क॥ पुणे

बालाजी पासलकर
देसमुख त॥ मोसे खोरे

बापूजी व कानजी
देसमुख त॥ खेडेबारे

मालजी बिन हिरोजी
चौगुला लोणीकालभोर

वाद पाटिल मोकदम
मौजे खडकवासले

माहाद पाटिल मोकदम
मौजे अंजनगाव

बापूजी कुलकरणी
मौजे माण

सु॥ अर्बैन अलफ सके १५६१ प्रमाथी नाम संवछरे + + + + महजर केला ऐसा जे + + + + + साहेबांची रजा सादर जाली जे मालजी भोईटा मौजे रावेत पा॥ पुणा हुजूर एउनु मालूम केले जेः—मौजे म॥ पाटिलकी आपली मिरासी घडिल घर आपले आहे, आणि आपला दाइज भिलोजी पाटिलकी करितो; तरी त्याची व आपली बरहक मनुसफी करून निवाडा केला पाहिजे. दरीं बाब सरंजाम होए मालूम जाले तरी पा॥ मजकुरीचे दाहा गांवीचे मोख्तेसर पाटील व गावीचे कुणबी व बलुते आणून, बरहक मुनसफी करून निवाडा करणे, गोताच्या माथां सत्या घालून ज्याची पाटिलकी होईल त्यास देवणे, ह्मणउनु रजा सादर जालियावरी यास व याचा वाद्या भिलोजीस आणुनु हरदोजणास मनुसफीबदल आदबखान राखिले. यावरी हरदोजणी कतबे दिधले जे हेबी हमशाही गांवीचे मोकदम व आपले दाइज बापभाऊ व बलुते ऐसे बोलाउनु साहेबी त्यांस पुसोन निवाडा केला पाहिजे. स्वगोताच्या निवाड्यास आपण राजी आहे. यास हिलाहरकती करील तो गोताचा अन्याई व दिवाणीचा गुन्हेगार ह्मणउनु हरदोजणी कतबे देउनु निवाडियाबदल हरदोजणी गोही नेमिले. बित॥ हमशाही गांवीचे मोकदम.

सिस पाटिल मोकदम मौजे धामण १

बावजी बिन राघा पाटिल भोडवे मौजे मजकूर १

मोकदम मौजे किवळे १

वासभट बिन रामभट जोसी कुलकर्णी मौजे मजकूर १

तान पाटिल मोकदम मौजे चिंचवड १

कोंड पाटिल मोकदम मौजे गहू १

तान पाटिल मोकदम मौजे किन्हई १

गोंदजी भोडवा मौजे मजकूर १

तान पाटिल मोकदम मौजे पुनवले १

एम सुतार बि॥ चांगा सुतार मौजे मजकूर १

ताऊ पाटिल मोकदग मौजै ताथवडे १

हिरा माहार मौजे मजकूर १

एणेप्रमाणें गोही नेमिले ते बोलाउनु त्यांस चांभाकुंड काढून, जितके पृथ्वीवरी पाप होते तितके तुमचे माथा ह्मणउनु ऐसी आण घालून पुसिलयावरी सदरहू जिणी गोही दिल्ही जेः—याचा मूलपुरुष ह्माऊ पाटिल तो पाटिलकी करीत होता. त्यास दोन फर्जंद २

वडील राम पाटिल धाकटा साक पाटिल

यासि ह्माऊ पाटिल मेलियावरी वडील लेक रामपाटिल तो मोकदमी करू निघाला. धाकटा साक पाटिल त्याण मोकदमी केली नाही यावरी रामपाटिल पडिलियावरी.

रामपाटिलाचा लेक बालपाटिल त्याणें मोकदमी केली. धाकटें घर साकपाटिल. त्याच कोन्हे पाटिलकी केली नाहीं. बालपाटिल मेलियावरी त्याचा लेक सीऊपाटिल मोकदमी केली. तै साकपाटिलाचे घरीं कोन्हे मोकदमी केली नाहीं. मग सीऊपाटिलाचे लेक जाऊपाटिल त्याणें मोकदमी केली. दुसरे धाकटे घरे कोन्हे केली नाहीं. यावरी जाऊपाटिल तुटकपणें पोट भरेना ह्मणउनु खालता गेला. यावरी जाऊपाटिलाचे कोन्ही गावावरी नव्हते, यावरी हरिया पाटिल धाकटे घरिचा त्यास हि कधी भोगवटा नव्हता चालिला, व कधी कोन्हे मोकदमी केली नव्हती. हऱ्या पाटिल मोकदमी करू निघाला यावरी जाऊ पाटिल गांवास आला.यावरी मोकदमी हरिया पाटिल याची यास दिधली नाहीं,आपणच करीत असे. यावरी जाऊ पाटिल मेलियावरी जाऊपाटिलाचा लेक सीऊपाटिल होता त्यास हि दिधली नाहीं. यावरी जाऊ पाटिलाचा धाकटा भाऊ नाऊ पाटिल त्याचे नातू २ दोघेजण हिरोजी व मालजी ह्मणों निघाले जेः—सीऊजीचा मोकदमी हिसेबी होए ते तूं काय बदल खातोस, ते खाऊं नको ह्मणउनु हिरोजीचा व मालजीचा +++ डबोजी सांगत गेला जे सीऊजीची मोकदमी हिसेबी होए तुझ्या घरीं कोन्ही खादली नाहीं. तूं खाऊं नको ह्मणउनु ह्मणत गेला, परी त्याचे ह्मटलें नाइकेंच. मोकदमी बलेच खात असे. यावरी हिरोजी व मालजी ह्मणत असेत जे, तूं खाऊं नको. त्याचेहि ह्मटले नाइकेच. मग हिरोजीनें व मालजीनें हऱ्या पाटिल व हऱ्या पाटलाचा फर्जंद ऐसे दों मारिले, आणि मारून मालजी हुजूर जाउनु सदरहूप्रमाणें हुजरून कागद आणिला. तरी हऱ्या पाटिलाचे घरे कोन्ही मोकदमी खादली नाहीं. आणि हऱ्या पाटिल मोकदमी करूं निघाला ह्मणौउनु सीऊजीच्या घराणांतील हिरोजी व मालजी तिहीं हऱ्या पाटिल व हऱ्या पाटिलाचा लेक मारिला आतां हऱ्या पाटिलाच्या फर्जंदासी मोकदमीसी कांहीं समंध नाहीं. तिही आपलें सेत कुळवाडी करून असावे. मोकदमीची नांव गोष्ट करील तरी गोताचा हा अन्याई व साहेबांचा गुन्हेगार. हिरोजी व मालजी हे सीऊजीच्या घराणांतील, पण मोकदमीचा धणी सीऊजी. सीऊजीनें आपली मोकदमी करावी नांव नांगर व टिळा विडा व मान माणुसकी व इनामती जें असेल तें साऊजीचें साऊजीनें खाणें. हिरोजीनें व मालजीनें सेत कुळवाडी करून सुखें असावे. हिरोजी व मालजी इही पाटिलकिची नांव गोस्ट करितील तरी गोताचे अन्याई व दिवाणीचे गुन्हेगार हा महजर सही.”

लेखांक ८.

(नकल) श्री. १५६४ ज्येष्ठ शुद्ध ११.

"महजरनामा बतारीख ९ माहे रबिलावल वहजूर हाजीर मज्यालस

काजी अबदुला बिन काजी महमद हाकीमशरा व काजी सदर बिन काजी ईस्माईल नेब काजी प्रगणें पुणें	मसुरुल हजरती राजश्री दादाजी कोंडदेऊ सुभेदार व नामजाद किले कोंढाणा व माहालानिहाय
बापूजी मुद्गल हवालदार प्रा॥ पुणें	सुंदर हरी मजमूदार प्रा॥ पुणा
मालोजी नरसिंगराऊ व विठोजी सितोळे देशमुख प्रा॥ पुणें	रामाजी सितोळे मोकदम मौजे कुरकुंब
मोकदम मौजे वढाणें	बाबाजी मोकदम मौजे वडवड
मोकदम मौजे राजेगाऊ	

सु॥ सलास अर्बैन अलफ कारणें महजर केला ऐसा जेः—बाजी बिन बानजी व कृष्णाजी बिन सिदोजी रणनोवरे हे दोघे जण मौजे मलेद प्रा॥ पुणा येथील मोकदमी बदल आपणामधें आपण भांडत होते. या निवाडियाबदल बाजी बिन बानजी व व कृष्णाजी बिन सिदोजीची माय पुताई हे हुजूर आलियावरी साहेब व देशमुख व सदरहू हाजीर मजालसी बैसोन दोघाजणांचे बोल मनास आणितां एणेप्रमाणें तकरिरा केलिया. बित॥

तकरीरकर्दे बे॥ बाजी बिन बानजी रणनोवरे तकरीर ऐसी जे, सिदोजी बिन बाकोजी हा आपल्या बापाचा वडील भाऊ तो आपला चुलता, सिदोजीचा धाकटा भाऊ बानजी तो आपला बाप, हे दोघेजण भाऊ एकवट असतां सिदोजी आपला चुलता एणे आपला बाप बानजीस एणेप्रमाणें मोकदमीचें मान दिल्हे. कागदीपत्रीं नांव व नांगर व दिवाणांतील हरएक ठाईचीं लुगडीं व पाने व दिवाळीचें हरएक वाजंत्र व दिवाळीचें हरएक वोवाळणें व होलीची पोली व वोवालणी व पोलीयाचे बैल व माहार व बाजे मान जितुके मोकदमीचे निसबतीनें असतील ते तमाम असकेच आपला बाप बानजीस सिदोजीनें दिल्हे. याखेरीज काळीस पांढरीस मोक-

दमीचे निसबतीनें जे हक व उत्पन्न होईल तें दोघांनीं दो ठाई बराबरी वाटून खावें. निमें आपला बाप बानजी, निमें सिदोजी. एणेप्रमाणें खावें. एणेप्रमाणें दिल्हें. ए बाबेचे गोही वरघोजी अजहातीदार मोकदमीवरी ठेविला आहे तो व गांवांतील मोख्तसर लोक व बलुते साक्षी आहेती. त्यांचे माथा सुकृत घालून गोही पुसणें. ते आपले सत्य स्मरोन गोही देतील. तेणेंप्रमाणें आपण वर्ते, ना तरी आपण दिवाणीचे गुन्हेगार व गोताचे अन्याई व आपणास मोकदमीस समंधु नाहीं; व सिदोजी आपला चुलता व बानजी आपला बाप हे दोघेजण मयेती जालियावरी सिदोजीचे पोटीचा मूल एसोजी होता तो असतांच आपली चुलती पुताईनें कृष्णाजी उडतरा याचें मूल तान्हें घेऊन त्याचें नांव कृष्णाजी ठेऊन त्याचें प्रतिपाळन केलें. एसाजी व कृष्णाजी हे दोघेजण असती, तथीहि सदरहूप्रमाणें आपण मानमाननूक घेऊन हक उत्पन दों ठाई बराबरी करून आपण व एसाजी खात असो. एसाजी मेलियावरी पुताई आपली चुलती ह्मणते जेः—कृष्णाजी आपला पालक पुत्र आहे तो वाटा खाईल, ऐसें ह्मणतें. तरी आपला चुलता सिदोजी हायात असता त्या देखतां कृष्णाजीस पुताईनें घेतलें नाहीं. सिदोजीस मेलियावरी याचा पुत्र पोटीचा एसाजी त्यास असतां कृष्णाजीस पुताईनें घेतले आहे. तरी कृष्णाजीस वाटा होत नाहीं. तरी ए बाबें विदन्यानेस्वरीं जैसें असेल त्याप्रमाणें सभानाईक थोरथोर सांगतील तेणेप्रमाणें आपण वर्तोन ए दोहीं बाबें आपण तकरीरा लेहून दिल्हे आहे, ती एणेप्रमाणें आपण वर्तउनु जरी वर्तऊ ना, तरी आपण दिवाणीचे गुन्हेगार व गोताचे अन्याई. हे आपली तकरीर सही.

तकरीरकर्दे बे॥ पुताई कोम सिदोजी बिन बाकोजी रणनोवरे. तकरीर केली ऐसी जेः—आपला दादला व आपला दीर बानजी हे दोघेजण असतां मोकदमीचें काम चालवावयास वरघोजीस ठेऊन मोकदमी दो ठाई खात असेती. यावरी आपला दादला मेलियावरी आपले पोटीचा मूल एसाजी होता व आणीकहि कृष्णाजी उतडरा याचे पांचा दिवसाचा मूल आपण घेऊन त्यास पुत्रपणें वाढविलें. तथीं आपले पोटीचा पुत्र व पालक पुत्र असतां वरघोजीस अजहातीदार ठेऊन मोकदमी दों ठाई करून खात असो. ए बाबेचे गोही वरघोजी अजहातीदार व गांवीचे लोक मोख्तसर व बलुते साक्ष आहेती. त्यांचे माथा सुकृत घालून गोही पुसणें. ते आपलें सत्य स्मरोनु जैसी गोही देतील तेणेप्रमाणें आपण वर्तोन. जरी वर्तो ना, तरी दिवाणचे गुन्हेगार व गोताचे अन्याई; मोकदमीस समंधु नाहीं. एसाजी मेला, आतां बाजी आपणास ह्मणतो जेः—कृष्णाजी पालकपुत्र आहे त्यास वाटा होत नाहीं. आपणच खाईन. ऐसें ह्मणतो. तरी ए बाबें विदन्यानेस्वरीं जैसे असेल तेणें-

प्रमाणें व समस्त सभानाईक थोरथोर जैसे सांगतील तेणेप्रमाणें आपण वर्तउनु. ए दोहीं बाबें तकरीर लेहून दिल्हिया आहेती. एणेप्रमाणें आपण वर्तोन जरी वर्ते ना तरी दिवाणीचे गुन्हेगारीण व गोताचे अन्याईण. हे आपली तकरीर सही.

एणेप्रमाणें हरदोजणी तकरीरा केलिया. यावरी गोही करणें. मोकदमीचा अजहातीदार मोकदमीवरी ठेविला आहे तो व गांवांतील मोख्तसर लोक व बलुते यांची नांवें वित॥

वरघोजी अजहाती मोकदमी
मौजे मजकूर

मोख्तसर लोक
चांगोजी चोरघडा
नागोजी दोरगा
सोमाजी दोरगा
सोनजी जेधा

बलुते
नानावा जोसी व कुलकर्णी
लखमा चांभार
महार मांया

सदरहूजणांसी चांभारकुंड काडुनु, मांगीमाहारीचे वस्त्राची आण घालून, सभानाईकीं ह्मणटिले जेः—बाजी व पुताई मौजे मजकुरीचे मोकदमीबद्दल भांडत आली आहेती, तरी पहिलेपासून यांचे मोकदमीचे बावें कैसें चालत आलें आहे हें आपलें सत्य खरोनु सांगणें. यावरी सदरहूजणी आपलें सत्य खरोनु गोही दिल्ही जेः—सिदोजी बिन बाकोजी व बानजी बिन बाकोजी हे दोघेजण सखे भाऊ. वडील सिदोजी, धाकुटा बानजी. यावरी सिदोजीनें धाकटेया भावास बानजीस मोकदमीचे असकेच मान आपले खुसीनें एणेप्रमाणें दिल्हे. कागदीपत्रीं नावनांगर व दिवाणांतील व हरएक ठाईचीं लुगडीं व पानें व दिवाळीचे व हरएक वाजंत्र व दिवाळीचे व हरएक वोवाळणें व होळीची पोळी व वोवाळणी व पोळियाचे बैल व महार व बाजे मान जितुके मोकदमीचे निसबतीचे असतील तितुके तमाम सिदोजीनें बानजीस दिल्हे. याखेरीज काळीस व पांढरीस मोकदमीच्या हाकाचे जें उत्पन होईल तें दो ठाईं बराबरी वाटून खावें. त॥

निमें बानजी — निमें सिदोजी

एणेप्रमाणें चालत असें. ते दोघेजण मेलियावरीहि बाजी व एसाजी हेहि सरहूप्रमाणें खात असेती. हा आपला इमान सत्य. एणेप्रमाणें गोही गुदरली व कृष्णाजी पालकपुत्र याचेविशीं बानजी व सिदोजी वरी लिहिलें आहे तेणेप्रमाणें

वर्तत होते यावरी उभे वर्ग निवर्तले. त्या उपेरी पुताईचे पोटीचा पुत्र एसाजी असतां पुताईनें पाळकपुत्र कृष्णाजी घेतला, तथीहि बाजी व एसाजी हे दोघे वरी लिहिलेप्रमाणें वर्तत होते. यावरी एसाजी निवर्तलियाउपरीं बाजी ह्मणतो जेः— कृष्णाजी पाळकपुत्र आहे. यास विभाग नेदीं. तरी जऱ्ही सिदोजी निवर्तलिया-उपेरी त्याचे पोटीचा पुत्र असतां पुताईनें पाळकपुत्र कृष्णाजी घेतला. या उपेरी आपला विभाग भक्षीत असतां पोटीचा पुत्र निवर्तला, तऱ्ही बानजीचे संततीस सिदोजीचे विभागास संमंधु नाहीं. बानजीचे व सिदोजीचे विभाग पूर्वींच जाहाले आहेती. विभाग जालियाउपेरी विभागाची धणीन सिदोजीची पत्नी पुताई, ते तो त्रिभाग आपण भक्षूं अथवा पालकपुत्रास देऊं, अथवा आणिकास देऊं. ए अर्थी बानजीचे संततीस समंध नाहीं. एदर्थी वचने याज्ञवल्क्यः ॥

पत्नी दुहितरश्चैव पितरौ भ्रातरस्तथा ॥
तत्सुतो गोत्रजो बंधु शिष्य सब्रह्मचारिणः ॥ १ ॥
पिंडदोंशहरश्चैषां पूर्वाभावे परःपर इति ॥

वृद्धमनुरपि ॥

पत्न्याः समग्रधनसंबंधं वक्ति ॥
अपुत्रा शयनं भर्तुः पालयंती व्रते स्थिता ॥
पत्न्येव दद्यात्तपिंडं कृत्स्नमंशं लभेत च ॥

बृहत्मनुरपि ॥

कुल्येषु विद्यमानेषु पितृभातृसनाभिषु ॥
असुतस्य प्रमीतस्य पत्नी तद्भागभागिनी ॥
अस्मिन्नेवार्थे विज्ञानेश्वरस्य उपसंहारफक्किकापि ॥

तस्मादपुत्रस्य स्वर्यातस्य विभक्तस्यासंसृष्टिनोधनं परिणीता स्त्री सकळमेव गृण्हातीति स्थितमिति ॥

ऐसीं वचनें शास्त्रीचीं असेती. तरी शास्त्र व साक्षीप्रमाणें उभे वर्गीं वर्तावें. बित॥

बाजी बिन बानजी रणनोवरे मोकदम यांसि कागदीपत्रीं मोकदमीचे नांव एकच याचेच लिहित जावें व नागर एकच इहींच करावा व दिवाणांतील व हरएक ठाईचीं लुगडीं व पानें व दिवाळीचे व हरएक वाजंत्र व वोवालणें व वोवालणी व पोळियाचे बैल व बाजे मान जे असतील ते तमाम आधीं यास. यामागून कृष्णाजी बिन सिदोजी रणनोवरे यासी. एणेप्रमाणें मानमाननूक घेणें. व हक जो मोकदमीस काळीस व पांढरीस उत्पन जें होईल तें दो ठाईं बराबरी

करून निमे इहीं खावा व मोकदमास राबता माहार आहे तोहि दो ठाई असे. होळीस पोळी एकींच इहीच बांधावी.

कृष्णाजी बिन सिदोजी रणनोवरे यासी बाजी बिन बानजी मोकदम मागे मान-माननूक कृष्णाजीनें घेणें. मोकदमीचे निसबतीनें हक उत्पन काळीस व पांढरीस होईल त्याची निमे एणें घेणें, वं राबणूक माहाराची तेहि निमे यास असे.

एणेप्रमाणें निवाडा केला आहे व याखेरीज यांच्या वडिलाचें सेत मोकदमीचें मिरासीचें असेल तेंहि निमे बाजी बिन बानजीनें घेणें, निमें कृष्णाजी बिन सिदोजीनें घेऊन लेकुराचे लेकुरीं खाऊन सुखें असणें. यासि जो हिलाहरकती करून निवडिलेप्रमाणे वर्ते ना तेणें दिवाणातु होन ५०० व सिसे पांच देणे, व गोताचे अन्याई. हा महजर सही."

लेखांक ९.

श्री. १५६४ ज्येष्ठ वद्य ६

"महजर बतेरीख छ २० माहे रबिलोवल बहजूर हाजीर मजालसी मुकाम का॥ खेडबारें

काजी अबदुला बिन काजी महमूद हाकीमशरा व काजी सदर बिन काजी इस्माईल काजी नेब प॥ पुणें	मसुरल हजरती राजश्री दादाजी कोंडदेऊ सुभेदार नामजाद किले कोंडाणा व माहालानिहाय
बापूजी मुद्गल हवालदार प॥ पुणें	सुंदर हरी मजमूदार प॥ पुणें
मालोजी नरसिंगराऊ व विठोजी सितोले देशमुख प॥ पुणें	चाहू पाटिल मोकदम मौजे चिकिली
कमाजी मोकदम मौजे अतीत प॥ पुणें	लाखोजी व कभाजी मोकदम मौजे मिर्जे

सु॥ सलास अरबैन अलफ कारणें महजर केला ऐसा जे. मिराजी बिन मियाजी व अमन बिन चांद मोकदम मौजे कातरज प॥ पुणें हे हरदोजण मौजेमजकुरीचे मोकदमीबदल आपणामधें आपण भांडत हुजूर आलेयावरी, साहेब व देसमुख व गोत बैसोनु हरदोजणाचे बोल मनास आणितां, मिराजी बिन

मियाजी एणें तकरीर केली ऐसी जे, आपलें घर वडील नांव व नांगर व मानमाननूक आपले वडिलपणाचे आपले वडील खात होते वरकड हक्क उत्पन्न निम्में आपले वडील खात असेती व निमें अमनाचे वडील, एणेप्रमाणें चालत होतें. यावरी आपले वडिलामधें व अमनाचे वडिलामधें मारे जाले. तधीपासुनु आपलें व अमनाचें सुरळीत चालत नाहीं. हे आपली तकरीर; सही. एणेप्रमाणें एणें तकरीर केली. यावरी अमनास पुसतां एणें तकरीर केली जे, मिराजीचे घर वडील होए. यावरी मिराजीचे वडील हिसेबी आपल्या वडिलासी वर्तती च ना ह्मणौउनु मिराजीच्या वडिलांत व आपले वडिलांत मारे जाले. तधीपासुनु आपलें व मिराजीचें सुरळीत चालत नाहीं. हे आपली तकरीर; सही. एणेप्रमाणें हरदोजणीं तकरीरा केल्या. यावरी अमनपाटिल बोलिला जे, मिराजीचें घर वडील आहे. मिराजीस नांगर देणें व कागदीपत्रीं आधीं नांव मिराचें व हरएक मानमाननूक व पानें व लुगडीं व वाजंतर व उवालणी टिला व बाजे मान जे मोकदमीचे निसबतीचे असतील ते तमाम आधीं मिराजीस देणें. त्यामागून आपलें नांव व टिलाविडा व पानें व लुगडीं व बाजे जे मान असतील ते तमामी आपणास घेईन व मोकदमीचे निमाचे मौजे मजकुरीं जे काळी व पांढरीस हक उत्पन होईल तें दो ठाईं बराबरी वाटुनु मिराजी व आपण खाउनु. ऐसे बोलौनु आपले पूर्वजाची भाक ठेविली. यावरी सभानाइकी हरदोजणाचा एणेप्रमाणें निवाडा केला. बित॥

मिराजी बिन मियाजी याचें नांव कागदीपत्रीं मोकदमीचे आधीं लिहीत जाणें व नांगर एकच याणें करावा व दिवाणांतील लुगडीं व पानें व टिला विडा व वाजंत्र व उवालणी व दिवालीचे व हरएक उवालणें व हरएक मानमाननूक आधीं यासी व होलीची पोली आधी एणें बांधावी व कालीस व पांढरीस जो हक एईल तो निमे एणें खावा व माहारहि यासि निमे असे.

अमन बिन चांद याचें नांव कागदीपत्रीं मोकदमीचे मिराजी मागें लिहीत जाणें व लुगडीं व पानें दिवाणांतील व हरएक ठाईची व वाजंत्र व उवालणी व दिवाळीचें उवालणें व हरएक मानमाननूक हे मिराजीनें आधीं घेणें त्यामागून याणें घेणें व होळीस पोळी मिराजी आधी बांधेल त्यामागून एणे बांधावी. काळीस व पांढरीस जो हक एईल तो व माहार ऐसे निमे एणें खावे.

एणेप्रमाणें निवाडा केला आहे. एणेप्रमाणें आपलाले लेकुराचे लेकुरीं खाउनु सुखें असणें. यास जो हिलाहरकत करुनु सदरहू निवडिलेप्रमाणें जो वर्ते ना त्याणें दिवाणांत सिसे पांच व होनु पांचसे देणें. हा महजर सही''

लेखांक १०.

नकल १५७३ वैशाख वद्य १

श्रीसके १५७३ खर नाम सवछरे वैशाख वदि १ प्रतिपदा ते दिवसीं हाजीर मजालसी त्रितपसील

काजी अब्रदुला बिन काजी महमुद हाकीमशरा प्र॥ पुणें

सिद्दी अंबर हवालदार प्र॥ पुणें

आमाजी नरहरि मजुमदार प्र॥ पुणें

मालोजी नरसिंगराव व विठोजी नाईक सितोले देशमुख प्र॥ पुणें

विठल मोरदेव देशकुलकर्णी प्र॥ पुणें

ह्माकोजी पाटिल मोकदम क॥ पुणें

नाईकवडी चाकर ठाणें प्र॥ मजकूर

कृष्णाजी काळभोरे मोकदम मौजे लोणी काळभोर

राऊतराव जाचक नाईकवडी चाकर ठाणा १

सिवाजी नाईकवडी चाकर ठाणां १

रामजी पाटिल मोकदम मौजे खराडी

मल पाटिल मोकदम मौजे मांजरी बु॥

राहूजी बाबर नाईकवडी चाकर ठाणा १

माऊजी सोरटे नाईकवडी चाकर ठाणा १

कोंड पाटिल मोकदम मौजे वडगाव सेरी

जैत पाटिल मोकदम मौजे घोरपडी

बेणोजी खंडागळा मोकदम मौजे वानवडी

माल पाटिल मोकदम मौजे कोंढवे बु॥

कृष्णाजी पाटिल मोकदम मौजे कोंढवे खुर्द

सेटे महाजन का। पुणें

तानसेट व मणिकसेट	बाबजी महाजन	जाव पाटिल मोकदम मौजे महमदवाडी
सेटिये का। म॥	का। म॥	बापोजी व बालोजी मोकदम मौजे उरोळी बु॥
गणसेट सेटिया पेठ शहापूर		मोकदम मौजे वऱ्होडें

सतपाटिल मोकदम व सकराजी मुंढवेकर

बावाजी जोसी कुलकर्णी मौजे हडपसर	नागोजी हजारा चौगुला १	माहादो नारायण जोसी कुलकर्णी १
भिकाजी मोकदम मौजे फुरसंगी	रायाजी व मोत्याजी लोणकर १	चिंतो बल्लाल जोसी कुलकर्णी १
बापूजी मोकदम	बाके सुतार १	कानकोळी १
मौजे सांगवडे	गोंद माहला	दसनाक महार १
गणोजी व कनकोजी मोकदम मौजे नेरे	बिन मेंग माहाला न्हावी १	
	बाला गावडा राविंजकर धनगर १	

सु॥ सन इहिदे खमसैन अलफ कारणें कृष्णाजी बिन सताजी पा॥ लोणकर मोकदम मौजे मुंढवे प्रा॥ पुणें यासि गोविंद राम देशकुळकर्णी प्रा॥ मजकूर लिहून दिले ऐसे जेः—तुमचा भाऊ वालपाटिल बिन दादपाटिल लोणकर हा मौजेमजकूरची मोकदमी पेशर्जी करीत होता, यावरी पेशर्जी दुकोळ कहर पडला होता, ते वख्तीं वाल पाटिल दुकाळाकरितां उपवासी मरो लागला ह्मणौन मौजे नेरे प्रा। मा।र एथें

आपला बाप रामाजी होनदेऊ होता, त्याजपासीं एऊन निमे मोकदमी पैके घेऊन विकत दिल्ही आणि वालपाटिलें कागद लिहून दिघला त्या कागदाचा इद्रजः—

'श्रीसके १५५३ प्रजापति संवछरे आशाड वद्य १ प्रतिपदा ते दिवसीं राजश्री रामाजी होनदेऊ होनप देशपांडे प्रा पुणें यासि वालपाटिल बिन दाद पाटिल लोणकर मोकदम मौजे मुंढवे ता हवेली प्रा मार सन सलासन अलफ कारणें लिहून दिल्हें ऐसाजेः—मोजे मारची मोकदमी आपली मिरासी आपला बाप दाद पाटिल यानें संचणी उगवणी बदल लाहूजी पाटिल लोणकर त्यासी निमे मोकदमी दिधली होती. खासा आपणाखाले नांगर टिळा विडा लुगडी दिवाणांतील शवधार व खोबरेयाची वाटी व बाजे उत्पन्न व लाजिमेस समाकुल असे आपणाखालें ठेऊन, लाहुजीस निमे इनामती मात्र देऊन निमे मोकदमी दिल्हे. त्याखेरीज त्यास कांहीं नाहीं. असें कित्येक दिवस चालिलें. याहि काल दुकोल प्रजा कुल बेमवसर जाली. गांवचीं कुळें मिरासी गांवीं नाहींत. गांव लागत नाहीं. त्यावर इदिलशाई नामजादी पुणा एऊन बसली. पुणें लुटून जाळून तलक केलें, कोट पाडिला. यावर काळ दुकोळ कहर पडला. दर मणी होन दीड जाला. आपले दाईज व गोत्रीज होते ते सुजोन मेले, व आपलीं माणसें व आपण पोटाविण सुजों लागलों. मग तुह्मापासीं मौजे नेरे प्रा मा तेथें आलों आणि तुह्मासीं बोललों जेः—मौजे मुंढवे ता मा येथील मिरास मोकदमी आहे दुकलाकरिता आपला हाल कांहीं उरला नाहीं. माणसें व आपण सुजलों आहे. पोटाकारणें बहुत मशागत केली परंतु कोणी हातीं धरीत नाहीं. तर तुह्मी मिरासदार आहां. पेशजीचें तुमचें कर्ज व गहू आहेत व हालीं आपण तुह्मास मोकदमी विकीत होतों तर तुह्माकडून गोत देविले तें आपणास देणें. मोकदमी मौजे मजकूरची तुह्मी करणें. ऐसें तुह्मासि बोललेयावर तुह्मीं बोलिलेत जेः—ए वख्तीं आपणाजवळ कांहीं नाहीं. तुझी मोकदमी मजला काय करावी? कांहीं गरज नाहीं. ऐसें तुह्मी बोलिलेत. मग आपण बोललों जेः—तुह्मी जर न घ्याल तर तुमचें कर्ज व जमानतीचे पैके आपणावर असतां आणखास मोकदमी देतां न ये. जर तुह्मी कबूल न करा तर आणखास देईन ह्मणून बोललों. यावर तुह्मी कबूल केलें. मग दहाजण गोत बसोन आपणास खुसी करून मोकदमीचा निरख केला. बितपसील हाली रोख देविले होन

६०

ता

गला खंडी	४ ह्मैस १	गहू पेरावयास पेशजी घेतले कैली
१॥ दर	५ बइल २	८१॥ खासा आपले निा

खंडी होन तीस ३०	६ गहू पो-टाबो	·।।।· अर्ज पा। बिन लाहुजी पा। लोणकर ·।।· महादजी पा। लोणकर यासी जमान आपण व अर्ज पा। आहो.
प्रा। होन ४५	१५	
६०		

रामाजीपंत हवालदार कोट प्रा। मा। मोकासा होता; त्यांहीं आपणास जामीन मागितला, ते वख्तीं जामीन कोणी न होए. मग आपण तुह्मास जमान देऊन गांवास गेलों. तों आपण तक्षीमदार अर्ज पा। व गोत्रज गांव टाकूण गेला व आपण हि गेलों ते जमाणत तुह्मावर पडली. होन २५ पंचवीस त्यास दाहा पांच वर्शे जालीं ह्मणून याची दूण गोते देविले होन ५० पन्नास पैकीं आले निसबतीस होन २५

१।·१। यासी गोतें बहुत दिवस जाले ह्मणून दाम दुसार कण तिसार या हिशवी दुगुणी प्रा। देविले. २।।३ अडीच खंडी तीन मण दर खंडीस होन ३० एकूण होन ७९।। साडे एकुण ऐसी पैकी आपली निसबती बि।।

ऐनखासा	जमान माहू
होन ४।।	पा। होन १५

एकूण बेरीज होन १०४।। एकसे साडेच्यार तुह्मापासून आपणास देविले, ते आपणास पा। सदरहु होन एकसेसाडेच्यार पैकियावर आपण आपली मोकदमी तवरीकबाद तुह्मास दिल्हे असे; आत्मसुखे तुमसी खरेदी दिल्हे असे. तुह्मी सुखे मौजे मजकूरची मोकदमी आपले निंसबतीची निमे करणें. नांगर व टिळा व विडा पानमान माणनूक हक्क उत्पन्न लेकराचे लेकरीं खाऊन सुखे निमे मोकदमी करणें आपणास निमे मोकदमीसी समंध नाहीं. पेस्तर आपला दाइज व गोत्रिज कोणी उभा राहील तर आपण त्यास वारू व तुह्मास घर सेतवाडा दिल्हा असे. हे आपले लिहिले सही.'

लेखांक ११.

*   १५८७ माघ शुद्ध ६

[पुणें देशपांडे दप्तर]

"म।। अनाम राजश्री बावाजीराम देशकुलकर्णी प्र।। पुणें राजश्री जिजाबाई सु।।

* श्रीकार नाहीं.

तिसा सितैन अलफ म॥ मकुंद कान्हो देशकुलकरणी प्रा॥ मा॥र त्याचे तकसिमेस तुह्मी खलेल करून मा॥लेसीं घसघस करितां ह्मणउनु हुजूर मालूम जालें. तरी तुमची तकसीम तुह्मी चालऊन हालखुद वर्तनूक करणें. सालाबाद चालिलें आहे त्यास घसघस केल्या कांहीं उज राहे ने. जेणेकरितां आपले भाउबंद एक नेट करून गहदम सालाबाद चालिले आहे तैसी वर्तनूक करणें. नशते कथळे केल्या, चिरंजीव कांहीं कोन्हाचा मुलहाजा करणार नाहींत. ऐसें समजोन मा॥ मुकुंद कान्होसी घसघस न करणें. पेस्तर बोभाट आला ह्मणजे बोल नाहीं छ ४ साबान."

लेखांक १२.

१५८७ फाल्गुन शुद्ध ३

"द॥ बे॥ मोकदम व समस्त रया मौजे मांजिरी बु॥ ता॥ हवेली पा॥ पुणा सु॥ सीत सन १०७५ साहेबाचे बंदगीस कतबा लेहून दिधला ऐसा जे, साहेबीं हुजूर बोलाउनु साल मजकुरीची जमाबंधी फर्माविली तरी साल गु॥ पा॥ मा॥ नामजादी बा॥ चा साहेब सुभा आले. ते वख्तीं रयतीवरी कही होउनु लुटिली, गांव जाळिला. यावरी गाऊ कुल खराब होउनु प्रजा पोट भरावयासि देसावरी गेलिया. यावरी गणीमाचा तह होउनु भेटला. तव मौजे मजकुर खराब पडिलेयावरी जागीरदारी आपला तपवास घेउनु खंडिला. कौल रुपये ५००देउनु गांवावरी आणिले. आपण एका दोनीस गितीस मेलउनु जुजवी कीर्दी केली. यासि जुजवी पीक जालें. एणेप्रमाणें आपला हालअहवाल खातिरेसी आणितां साल गु॥ जमाबंदी रुपये ९०० यासीं गऊ लुटिला, जाळिला, खराब पडिला होता. यावरी खंडिला कौल देउनु गांवावरी आणिले आहेती. अमल खातिरेसी आणुउनु बेमारुफाती मागुस्ते जागीरदार रजावंदी करारती बमय माळव सायेर तमाम सालउगवणी करणे रुपये ८००

तेरीख	ह॥ राघोजी
रमजान	कुलकर्णी पे + +

लेखांक १३.

फारसी सिक्का. १५८८ आषाढ

"दा॥ बो॥ गुमास्ते सरदेसमुख व देसमुख व देसपांडिये पा॥ पुणें सा॥ जुन्नर सुबे अवरंगाबाद उरुफ दक्षण सन १०७७ कबूलेती लेहोनु दिल्ही ऐसी जे, पा॥ मा॥ची जमाबंदी बा॥ फसल खरीफ होईल व रबी पेंचील सन इले हैबतखान गुमास्ते जागीरदार बरजावंदी रायां आपल्या सल्यानें जमाबंदी मुशकस केली, तें आपण

माफीक तपसील कबूल असों. जमा अज बा। आं देह् वदेह् अज देहे२९०वजा तश्रीफा रा। सीवाजी राजे भोंसले ता। मावळ वगैरे देहे ५६ ता। हवेली पुणें २० ता। मावळ ३६ बाकि देहे २३४

आबाद वैरान

मोकरा हाल हासील साल तमाम दे। माल व सायरे

रुपये १२८२९०ऽ

रुजूगुदस्ता रुपये १०६४०६॥=।

बाद कमी रुपये ७०६।·

बाकी गु। रुपये १०५७००।≡।

इ। सालमजकूर रुपये २२५८९॥·।

राघो बलाल गुमास्ते

सरदेसमुख

लेखांक १४.

फारसी सिका. १५८९ श्रावण वद्य २

तुमार वासलाती अज ता। गुमास्ते मुगुटमनी करोडी पायबाकी प। पुणे सु। समानं सन हजार १०७७ अज बा। मुतालबा एकबालपन्हा खेळोजी भोसले देहाय ता। पाठस इ। छ १६ माहे सफर तागाईत छ माहे अखेर माहे मोकरा रु। बटा कमी वजन रुपये ५२४|||≡||

ता।

मौजे खोरवडी ३६४॥|- मौजे कडेगाऊ रु। ९६ऽ≡॥

मौजे नानगाऊ ६३॥|≡ लग ०

बाबूजी नरसिंगराऊ व विठोजी नाईक सितोळे देशमुख प्रा। पुणें

दा। बे। मोरो विश्वनाथ व बाबाजीराम देशपांडे प्रा। पुणें

तेरीख माहे

पांचसें चोवीस रुपये साडे पंधरा आनें रास"

लेखांक १५.

१५९० पौष शुद्ध ५

"मशरुल अनाम बाबाजी राम देसपांडे प्र॥ पुणें यासि राजश्री शिवाजी राजे सुहुरसन तिसा सितैन अलफ हुजूर खबर मालूम जाली की, मुकुंद कान्हो

देशपांडियो प्र॥ मजकूर याचे तक़सिमेचा कारबार यांसि नं देवा आणि अवघा कारबार आपण च + + + + आहे तरी हे कोण गोस्टी + + पहिलेपासून सालाबाद हैबतखान व मलिक अंबर व माहाराज साहेबाचे कारकीर्दीस व हालीचे कारकीर्दीस जैसे चालिले तेणेप्रमाणें वर्तनूक करणे नवे कचाट करून कारबारास खलेल करणे हे गैरमाकुल गोस्टी आहे. नवे कारबार कांहीं चालनार नाही तरी तुह्मी आपले तकसिमेचा कारबार करीत जाणे. मुकुंद कान्होचे तकसिमेचा कारबार मुकुंद कान्हो करीत जाईल + + मुकुंद कान्होच्या त॥ कारबारासि बजबज घालावयासि गरज नाहीं. हे समजोन वर्तनूक करणे. नवे खलेल सर्वथा न करणें + + तें काहीं चालणार नाही. सालाबादप्रमाणे दुरूस वर्तनूक करणे नवे खलेल केले ह्मणजे साहेबास बोल नाही ऐसे समजोन वर्तणूक करणे छ ३ साबान."

लेखांक १६.

१५९०.

सेटिये क॥ पुणे व माहाजन ह्मालोजी कदम
त्रिंबक सेटी माधसेटी सेव्या मुजेरी क॥ वाळदूर
सेटिये कसबा पेठ मूर्तजाबाद

"सन हजार१०७८कारणे महजरनामा केला ऐसा जे गोंदसेटी हुलवला प्रज पेठ शापूर क॥ पुणे यामधे व गणसेटि + + शेटे शाहार यामधे घराचे भांडण होते ऐसियासि घराची + + णास आजीत॥ अमल शाहाजी राजे वीस तीस वरसे गेली + + + नांदत होता त्यावरी दादाजी कोंडदेऊ सुभेदार त्याचे वख्तीं गोदजीने गणोजी मजकुरासि दाही दिधली हरदोजण भांडत दादाजी कोंडदेऊ सुभेदार त्याजपासी गेले त्यानी मुनसिफी केली + + + दिधले व महजर करुनु दिधला त्यावरी गोंदसेटी घरी + + लागला त्यावरी अमीरलउमराऊ श्यास्ताखान सुभा सिवाजी भोसले + + जाती आले त्याचे दहशतीने कुल मुलूक आप + + + टाकुनु परागंदा जाला त्यावेळेस गोंदजी हुलवलियाचे + + करितां घर जळाले त्यामधे किती वस्ता जळाल्या महजर दादाजी कोंडदेऊ त्यानी करुनु दिधला तो हि जळाला ऐसे + + आह्मास ठाउके आहे. त्यावरी गोंदजी मजकूर राजीकाने तीन च्यार वरसे पळोन गेला त्यावरी कुल मुलुकास आबादानी कौल दिधला त्या बराबरी गोंदजीमजकूर एउनु + + राहिला आनी गणसेटी सेटियाने दाही दिधली आनी + + + सवेचि मेला त्यामागे दुसरे वरसी गणसेटीचा

लेकाने दोही दिधली हरदोजनाचे मागत्याने गोहीमुदाई पाहोनु घर गोंदसेटी हुलवलियाचे हिसेबी जाले मग हाजीरमज्यालसीने घरठाणे गोंदसेटीचा लेक दुलबा हुलवला त्यास दिधले गणसेटीच्या लेकास काही निसबत नाही नाहक गळा पडिला होता हाली दुलबाजी हुलवला याचे घर याचे हवाला केले असे."

लेखांक १७.

१५९१ भाद्रपद वद्य १२.

ता

"कौलनामा अज दिवाणा खासा बजानेबू कडतोजी बिन हिरोजी माहाजन व सेटिया मुकाम पेठ मूर्तजाबाद पा किले पुरंधर बिदानद सुहुरसन सबैन अलफ बाद कौलनामा ऐसा जे तुवा हुजूर एऊन बंदगीस हजरती मालूम केले जे पेठमजकुरी पूर्वी प्रजा दिवेलाविणी वस्ती यावेरी शाहाजी भोसले परमुलकी एऊन पेठ जाळिली फितरिताकरिता रोडीदुबळिया प्रजा होत्या त्या परागंदा होऊन एकएक जागा गेलिया शक धरून पेठेवरी एत नाही याचा मुदा आहे की आपणास पेशजी रायाराराव याचे तसविसेकरिता खरावा होऊन आपली जितरबे बुडाली दो वरीस बाहेर होतो यावरी तुह्मी एऊन आपली खातीरनिशा करून पेठेवरी आणिले आपण कर्जवाम घेऊन मागती घरे दुकाने केली ते वेळे शाहाजीचे फितरीत जाली घरे जाळिली मागती परागंदा होऊन एकएक जागा राहिलो कोनाचा आसिरा देखो न याजवरी आपणास हुजरून सा सालांचा कौल मन्हामत जालिया पेठेवरी एऊन कीर्दी मामुरी करून ह्मणौन प्रजांचा मुदा घेतला आहे तरी साहेबी नजर अनायत फर्माऊन सा सालांचा कौल मन्हामती जालिया आपण कौल सिरी धरून प्रजासमजावीस करून पेठ कीर्दीमामुरी करून सदरहूप्रमाणे आपण हक लाजिमा आहे सवे पसकई आहे ते कौल पुरलियावरी घेईन कौल मन्हामत होए ह्मणऊन मालूम केले तरी बराय मालुमाती खातिरेस आणून सदरहूप्रमाणे बदल मामुरी कौल दिल्हा असे तरी पेठमजकुरी प्रजा आणून मामुरी कीजे. कोन्हे बाबे तालीक अंदेशा न कीजे इस्तावा साले सा पुरलियावरी बरहुकूम कानू कदीम कमावीस होईल. मोर्तब सूद छ २५ रबिलाखर."

लेखांक १८.

१५९३ श्रावण शुद्ध ७.

अज दिवाण ठाणे ता॥ कन्हेपठार पा॥ पुणें ता॥ मोकदमानी देहाय ता॥ कन्हेपठार

१ सासवड	१ पारगौऊ
१ गुल्हेरी	१ सोनारी
१ आंबवडी	१ वाघापूर
३	३

सु॥ इसन्ने सबैन अलफ जानोजी कुभारकर व एमाजी कुभारकर मोकदम मौजे वणपुरी ता॥ मजकूर यामध्ये बापभाउवीचे भांडण आहे ऐसियास जानोजी. राजश्री साहेबापासी गेला होता ऐसियास राजश्री साहेबी हुकूम केला की मागे मा॥इले दादाजी कोंडदेऊ सुबेदार याचे कारकीर्दीस ऐस चालिले असेली राजश्री साहेबाचे कारकीर्दीस चालिले असेली तेणेप्रमाणे हाली वर्तवणे. जो न वरते त्यास ताकीद करणे ह्मणौनु रजा फर्माविली तरी तुह्मी हमशाही गोत आहे जैस पेसजी चालविले असेली तेणेप्रमाणे मनास आणोन विल्हे लावणे हरएक मनास आणोन निवाडा करणे सदरहू गोत वणपुरीस राहोन हरएक निवाडा करणे छ २६ रबिलावल

एणेप्रमाणे गोतास हुकूम जालियावरी गोत मौजेमजकूर एऊन दोघांचे राजीनामे लेहोनु घेतले वित॥ + + + + + + + + + + श्रीसके १५९३ विरोधकृत नाम संवत्सरे स्रावण सुध सपतमी हजर मजालसी मौजे म॥ मोकदम देहाय सु॥ इहिदे सबाईन

१ पारगौ	१ सासवड
१ उन्हेरी	१ सोनारी
१ वाघापूर	१ आंबवडी

एणेप्रमाणे गोतहुजूर तकरीरकर्दे

अगरवादी रतन पा॥ बिन जान पा॥ मौजे वणपुरी ता॥ कन्हेपठार राजी होऊन राजीनामा लेहौनु दिधला ऐसा जे एसाजी कुंभारकरामधे व आपणामधे मोकदमीबदल भांडत होते त्यास माहाराज साहेबी फर्माविले की मौजे म॥ बारा हि बलुते सांगतील त्याप्रमाणे वर्तवणे बलुते गोही देतील त्यास आपण राजी आहे गोहीदाराचे जरी मोडून तरी साहेबास गुन्हेगारी होनु १०० एकसे देऊन व गोताचा खोटा राजीनामा सही

पछमवादी एमाजी कुभारकर मौजे वणपुरी ता॥ कन्हेपठार ता॥ म॥ राजीनामा लेहौनु दिधला ऐसा जे जाणोजी बिन रतनोजी कुभारकर व आपणामधें मौजे म॥ मोकदमीचे भांडण आहे त्यास माहाराज राजश्री साहेबाचा हुकूम की गावीचे बलुते + + गाही देतील तेणेप्रमाणे वर्तन जरी बलुते सांगतील ते नाईको तरी दिवानाची गुन्हेगारी होनु १०० एकसे देऊन हे तकरीर सही

एणेप्रमाणे राजीनामा लेहोनु देऊन मग गोताने गावीचे बलुते बोलाऊन त्यास पुसिले बित॥

१ साजाजी सुतार	१ कुंभरवा
१ बहीर माहाला	१ रंभाजी मावली
१ नूल माहार चांभार	१ बहरिजी जाचक
१ खंडनाईक माहार	विल्हराऊतराऊ
४	३

हे सातजण यास बलाऊन हकीकती लिहिली जे पेसजी माहाराज राजश्रीचे व दादाजी खंडदेऊ व मुधोजी भोसले मुकासी ते वेळेसी मोकदमी कोने केली तरी ते वेळेसी रतनजी बिन तान्हाजी यानी मोकदमी केली असे हे सदरहू प्रमाणे मोकदमीचे खावंद जानोजी बिन रतनोजीची मोकदमी खरी यास जो हिलाहरकती करी तो दिवानीचे गुन्हेगार होनु ५०० पाचसे देईल व गोताचा दंड देईल हे लिहिले सही

लेखांक १९.

श्रीशंकर. १५९४ श्रावण शुद्ध ४.

जाबिता मखलासी सुभा राजश्री राघो बलाल सुभेदार व कारकून नामजाद स॥ जुनर व मा॥हाय सु॥ सलास सबैन अलफ मौजे चिंखली त॥ हवेली प॥ पुणें एथील माली माऊमाली वगैरे नि॥ मोकदम इही सुभा एउनु फिर्याद तलेगांवीचे मुकामी केली कीं विसाजी बाबजी कुलकर्णी मौजे मजकूर हा कुलकर्ण चालवीत असतां आपणास हिसोब गावगतीचा समजाविला नाहीं लोकांचे देणेघेणे आहे ते मागत आहेत. विसाजी मुठेखोरियात जाउनु राहिला आहे तरी साहेबी यास तलब करूनु आणून त्याचा आपला हिसोब गावगतीचा साहेबी आपणा देखता मनास आणून विल्हे केली पाहिजे ह्मणऊनु फिर्याद केली त्यावरुनु सुभाहून विसाजी बाबजी मुठेखोरियामधे रहात होता तेथें सुभाऊन चौघजण रजपूत पाठउनु यास मसाला खुद्द नि॥ विसाजी टके २० वीस

सोनजी न॥ खासा टके ५	एसू काकडा टके ५ त॥
का॥ सरद २॥	का॥ सरद २॥
का॥ सरद २॥	का॥ सरद २॥
केरोजी टके ५	सोनजी लोहारी टके ५
का॥ सरद २॥	का॥ २॥
का॥ सरद २॥	का॥ २॥

एणेप्रमाणे चौगजण रजपूत सुभाहून माळियाचे मालुमातीवरून पाठविले त्यास विसाजी गावी नव्हता याकरिता विसाजीची बाईल दस्त करुनु सुभ्यास आणिली. यावरी मागून विसाजीस हि आणिलेयावरी म॥ दादाजी कोंडदेउ मजमूदार सुभेमजकूर व कासीराम हावालदार प॥ चाकण व निळो वामन अजहती र॥ त्रिंबक हरी देसपांडे स॥ जुनर यास बैसउनु मोजेमजकुरीचा हिसोब अवघा कथला मालियाचा व विसाजी बाबजीचा मनास आणून कलमाची मखलासी केली बित॥

कि॥ कलम सन तिसामधे अनूपराउ करोडी पुण्यामधे होता त्याचे मागणे लागले त्यास माळी व मोकदमी दादावा गोडसे याचे कर्ज घेउनु अनूपराऊ त्यासी दिधले कि॥ त्यापैकी त्याची बाकी आहे नि॥ माळी व नि॥ मोकदम

नख्त रुपये	गला खंडी गहू
९१ऽ	१॥

एकूण रुपये एक्याणव व गला खंडी १॥ दीड याची पटी घेऊनु दादोवाचे देणें राहिले आहे त्याचा जागा कुलारग आहे कुलारगाचा बाकीचा कागद मुकाम कोट गऊ तेथे कुलाकर्णीयाने नि॥ माऊ माळी व नि॥ मोकदम दिधला आहे तेणेप्रमाणे त्याकुळानी मुदल व कलोत्तर जो हिसोब दादावा नाइकाचा खतप्रमाणे होईल तो दादावास नि॥ माळी व मोकदम देऊन खत फाडावे नि॥ माळी व मोकदम कलम १

कि॥ कलम सन सबैनामधे गलबला जाला ते वख्ती मोगलाचे ठाणे उठिले र॥ साहेबाचे लोक आले त्यास र॥ संताजी जगथाप व राजश्री खंडोजी जगथाप तिहीं गावामध्ये पैकियाबदल स्वार पाठविले त्या स्वारानी गावामधे बहुत मारामारी केली त्यास पैके कर्ज घेउनु दिल्हे त्या कर्जाची पटी जाली नाही. कर्जदाराची नावे ए॥ बेरीज

नख्त होनु १२

ऐन जिन्नस.

गलाखंडी	गूळखंडी
गहू ७	४
जानसेटी बतीर क॥ पुणा याजपासून घेतले होनु १६। त्याचा काढा त्यास देउ केला	गणसेटी वाहकरी क॥ पुणा याजपासून घेतले होनु १५ घेउनु दिवाणात दिल्हे त्याचा काण त्यास देऊ केला

बि॥		बि॥	
गलाखंडी	गूळखंडी	गलाखंडी	गूळखंडी
गहू ५	२	२	२

कि॥ कलम सिवाजी बाबाजी यास हुजरातीस सबनिसीची पारिखी होती त्यास सिवाजी बाबाजी पुण्यास आला होता याणे आपल्या मुशाहिऱ्यात होनु १२ संताजीपाशी वरात मागितली त्याणी मौजेमजकुरीचे होनु १२ सुभा जमा धरून सिवाजी बाबाजीस गावावरीच देविले गावास खंडणीमधे मजुरा पडिले सिवाजी बाबाजीस पावले नाहींत होनु १२

एकूण होनु १२ बारा व गला व गहू खंडी ७ व गूळ खंडी च्यार ए॥ कलमे २ याची पटी करूनु सदरहु देणेदार वारावे तो तिघे भाऊ माळी आपणामधे आपण भांडो लागले त्याकरिता पटी ठेउनु देणेदार वारावे ते वारिले नाहींत ए सालीचे कुलकर्ण पिलाजीने चालविले आहे त्याची पटी नी॥ माळी मोकदम करावी आणि कर्जदार वारावे व वरातीचे होनु बारा घ्यावे नि॥ मोकदम व माळी वारावे कलम १ कि॥ कलम मोकदम व कुलकर्णी औरंगाबादेस देसका ब॥ गेले होते तेथे मोकदम व कुलकर्णी यास-खर्च जाला आहे त्याचा हिसोब गु॥ पदाजी मोकदम मौजे पोचे गु॥ माळी निमे मोकदम यास समजाविला आहे बि॥ खर्च रुपये

४॥ नि॥ मोर मोकदमं
२१॥ नि॥ माळी निमे मो
८॥ नि॥ कुलकर्णी
३४॥

एकूण रुपये साडेचवतीस याचा जागा णावनि॥ ने करुनु देसपांडिये त्याचे कर्ज फेडावे नि॥ मोकदम व निमे मोकदम माळी

कलम सन सबैन

कि॥ कलम सन समानामधे विस्णु बनायक डांगरा सेकीन पुणे याचे कर्ज पेसजीचा हवाला घेतला आहे त्याचे कर्ज पटीस घालून जागा तोडिला आहे नि॥ माळी कर्ज बेरीज होनु

२७ मुदल
७॥ कलोत्तर
३४॥

एकूण होनु साडेचवतीस विस्णूवाचे वहीस आहेत हे कर्जदाराचे कर्ज फेडावे नि॥ माळी मोकदम जागा हि लिहिला आहे कलम १

सदरहूप्रमाणे जागा विस्णूबाचे वहीस तोडिला आहे

कि॥ कलम सन तिसा शंकरभट ढेकणा सेकीन पुणे याजपासून कर्ज देउनु मोकदमी व नि॥ माळी जैतू फर्जंद माऊ माळी याचा याणे घेतले होनु १० दाहा याचा जागा कुळारग तुटला आहे तो जागा या कुळापासुनु मोकदमी घेउनु कर्ज भटमजकुराचे वाटावेणी कलम १

कि॥ कलम विसाजी बाबाजी सन समान सन तिसा दोनी साले कुलकर्ण केले त्यास नख्त पावले गला आता मु॥ राहिला आहे तो गला लागले ढेपप्रमाणे विसाजीचा मुशाहिराचा घ्यावा ए॥ कलम

नि॥ बित॥

तेरीज

अ	कलम	ए॥	होनुरु॥	गला	गूळ
कि॥ कलम सन तिसा	१	०	९१	१॥	०
कि॥ सन सबैन	३	१२	०	७	४
कि॥ कलम सन सबैन	१	०	३४॥	०	०
कि॥ कलम सन समान	१	३४॥	०	०	०
कि॥ सन तिसा	१	१०	०	०	०
कि॥ मु॥ कुलकर्णी	१	०	०	०	०

८

८

५६॥

१२५॥

८॥

४

एकूण कलमे आठ बराबेरीज होनु ५६॥ साडे छपन रुपये १२५॥ एकसे साडेपंचवीस व गला गहू साडे आठ खंडी ८॥ व गूळ खंडी ४ च्यार याची मखलासी विसाजी कुलकर्णी याचे कागद मनास आणून मखलासी माळियाचे विद्माने केली आहे बि॥ सन समान त॥ सन तिसा दोनी साले हिसोब निर्गमिला असे. सदरहू कलमामधे विसाजीसी कांहीं समंधु नाही. कलम मनास आणून केला असे त्याप्रमाणे माळी यानी वर्तोन देणे वारावे ऐसा तह करुनु माळियासी व विसाजीस निरोप दिल्हा पुढें विसाजीसी घसघस जो करील तो दिवाणीचा गुन्हेगार छ २ रविलाखर

लेखांक २०.

श्रीशंकर. १५९७ ज्येष्ठ शुद्ध १.

राजश्री राघो बलाल सुभेदार माहालानिहाय त॥ जुनर गोसावी यासि

७ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री सेवक मोरो त्रिमल नमस्कार विनंति सु॥ खमस सबैन अलफ देसकुलकर्णी पा॥ पुर्णे इही एउनु वर्तमान सांगितलें की देसमुखास व आपणास पेसजी र॥ दादाजी कोंडदेऊ सुबेदार तिही इनामती खंडणीचा तह दरसाल दिधला बेरीज होनु प॥ ४००/

देसमुख होनु	देशकुलकर्णी होनु
३०५	९५

एणेप्रमाणे खंडणीचा तह दिधला त्याप्रमाणे गलबलिया आधी उसूल होत आला आहे हाली सात पाच साले माहाल खराब पडिला जुजवी गाववसाहत थोडीबहुत आहे त्यास आपणास व देसमुखांस हकाचें दस्त थोडेसे होतें व त्यास दस्तमाफीक देसमुखास व आपणास पोटास देउनु वरकड दिवाणांत घेत आहेत ऐसियासि स्वामिने एक कागद आपला माहालास दिधला पाहिजे की पेसजी यासि राजश्री दादाजीपंती इनामती खंडणी होनु ४०० च्यारसे दर साल खंडणी केली आहे ते बेरीज जोवर प॥ म॥ वसाहत होती तोवर सारी बेरीज उसूल होत होती हाली गलबलियाकरिता सारी बेरीज उसुल होत नाही तरी जे हकाचे दस्त होईल ते बेरीज मसमू धरून पेसजी माहाल मामूर असता च्यारसें होनु उसूल होत होता ते वख्ती यासि दस्त होते होतें ते मनास आणून त्यांत दिवाणांत च्यारसें होनु देत होते ते वजा करून यांस काय पावत होतें त्या हिसेबें हाली दस्त होईल त्यासि च्यारसें होनुपैकी घ्यावयाची बेरीज होईल ते दिवाणांत दस्तमाफीक घेत जाणे वरकड यासि देत जाणे दिवाणांत घ्यावयासि

बेरीज जे साधेल ते चौं श्यां होनावर वाटून देसमुखाचे निसबतीने जे तकसीम एईल ते त्यापासून घेत जाणे व देसकुलकर्णि याचे निसबतीने दस्तमाफीक जे जे तकसीम एईल ते देसकुलकर्णि याजपासून घेत जाणे पेस्तर प॥ म॥ मामूर जालियावर सारी बेरीज च्यारसे होनु नि॥वार घेत जाणे ऐसा एक कागद दिघला पाहिजे ह्मणौउनु त॥ समाचार सांगितला तरी तुह्मी आपला कागद परगणे मजकूरच्या कारकुनास सदरहूप्रमाणे इही समाचार सांगितला आहे तेणेप्रमाणे वर्तणूक करणे ह्मणौउनु आपली सनद करून देणे आणि जे हकार्चे दस्त होत जाईल ते चौ श्या होनावर वाटून देसमुखाकडे घेत जाणे देसकुलकर्णियाकडे एईल ते देसकुलकर्णि यापासून घेत जाणे तालीक लेहोनु घेउनु असल देसकुलकर्णियापासि फिराउनु देणे छ २९ सफर प॥ हुजूर

सुरू सूद

लेखांक २१.

(नकल)

श्री.

१५९७ कार्तिक शुद्ध २.

श्रीसके १५९७ राक्षस नाम संवत्सरे कार्तिक शुद्ध २ द्वितीया वार आदितवार ते दिवसी लिखिते हाजर मजालसी सभासद

राजश्री माहादाजी सामराज सुभेदार प्र॥ मावळ

राजश्री माहादाजी नरसिंह प्रभु मजमदार कर्यात मावळ

+ + + नाईक बिन मल्हारजी नाईक करजवणे देशमुख कर्यात मावळ

+ ईकजी बिन चापाजी शाहाडा मोकदम मौजे वडघर कर्याती मावळ

(फाटलें आहे)

राजश्री उधोराम सरमजमदार त॥ मावळ

राजश्री सोमाजी तमाजी प्रभु मजमदार कर्यात मावळ

लिहिलेप्रमाणें साक्ष सोमाजी तमाजी कुलकर्णी तकसीमदार बहीरजी प्रभु देशकुलकर्णी तर्फ नाणे मावळ हाली मजमू त॥ मा॥र

आपाजी नामदेव वाकडे देशकुलकर्णी कर्यात मावळ

जावजी बिन अर्जाजी सुरवा व हावजी बिन विठोजी जोखरे मौजे मावळ खेडे

रायाजीनाईक पायगुडे मोकदम मौजे मांडवी बु॥

रामजी करजवणे मोकदम मौजे किरकटवाडी

तान्हाजी पोकला मोकदम मौजे घाइरी

+ + जी फर्जंद व मोराजी घुला मोकदम मौजे नांदेड

+ + ++ + + नल्हवडा मोकदम मौजे + + + कर्यात मावळ

+ + काजी बागटे मोकदम मौजे सी + + +

+ + वोजी नलगा मोकदम मौजे + + + गाव खुर्द

+ + जी मुसलमान मोकदम मौजे + + + +

+ + + + + मोकदम मौजे कोंढ बु॥

+ + + कानडा व सिवाजी घुला मोकदम मौजे उडरी

+ + + जी चोंधा व परसोजी इंगवळा मोकदम मौजे भूगांव

+ + + जी नरसिंगराव व यशवंत + + सितोळे मोकदम मौजे लवळे + + + मजकूर

+ + राजी बोराटा मोकदम मौजे को + + +

+ + + पाटिल व जावजी पाटिल मोकदम मौजे आंहिरे व भिवजी पा॥ मा॥र

+ + + बापूजी ससार मोकदम मौजे सारणे

बाजी पाटिल पायगुडे मोकदम मौजे आगलबे

मल्हारजी खपरीड मोकदम मौजे गोव्हे बु॥

गिरजोजी बिन सुर्याजी मते मोकदम मौजे खडकवासले

चिमणाजी बापूजी मोकदम मौजे नांदूसी

मालजी राजवडा मोकदम मौजे नव्हे देहाय प्र॥

रखोजी चोंधा मोकदम मौजे आंबेगाव खुर्द

सोनाजी बाहुवा मोकदम मौजे वाभरने

सीऊजी पाटिल मोकदम मौजे वडगौ बु॥

बावाजी पाटिल कोढलकर व पिलाजी पोपला व बाजी बेलदरा मोकदम आंबेगाऊ बु॥

निंबाजी पाटिल मोकदम मौजे कोढ खुर्द

चांदजी मांजरा मोकदम मौजे भूकुम क॥ म॥

रामजी दगडा मोकदम मौजे बावधण बु॥

ह्योनाजी वेडा मोकदम मौजे बावधन खुर्द

सीऊजी पाटिल बाराव मोकदम मौजे हिंगणे बु॥

हिरोजी तनपुरा मोकदम मौजे मांडवी खुर्द

रायाजी राजवडा मोकदम मौजे नांदे

+ + + + + + + + + मौजे खांबगाव + + + + + + + सु॥ सीत सबैन अलफ महुजद + + + + + + + पाटिलकी कदीम लोहुकरा यानें + पायगुडे देशमुख यासी विकली. पायगुडे याणी राजश्री साहेबांस विकत दिल्ही. राजश्री साहेबी बकाजी फर्जंद यास बक्षीस दिल्ही. कागद राजश्री साहेब छ ८ रजब सनद बयान बकाजी फर्जंद साहेबाचा कदीम इतबारी फर्जंद याचे बापानें राजश्री साहेबाचे कष्टमशागत केली व बकाजीहि साहेब कामावर कष्टमशागत बहुत करतो याकरिता साहेब यावर मेहरवान आहेत. मेहरवानीची बक्षिसें पावतो याउपरांत मेहेरवानीने साहेबाचे मर्जी आले की, यास काहीं वतन करून द्यावे ह्मणोन यावरून मौजे खांबगाव बु॥ तर्फ कर्यात मावळ ऐथील पाटिलकी साहेबाची कदीम ती बकाजी फर्जंद यास वतन करून दिल्ही असे. इ.* इ. इ.

नकल

लेखांक २२.

१६००.

पहिला बंद फाटून गेला

अज रख्तखाने राजश्री सीवाजी राजे साहेब दामदौलतहू ताो पायगुडे व करंजवणे देसमुख व मोकदम व कुलकर्णी व रयां कर्याती मावळ प्रा पुणे सुा सन तिसा सबैन अलफ मालूम दानद की मोरो विठल होनप देसकुलकर्णी कर्याती मजकूर हे हुजूर एऊन आपली हकीकत जाहीर केली की, आपली वडीलवडिलांची मिरास देसकुलकर्णी तर्फ पुणे बिताा

ताा हवेली देह ८२	ताा कर्याती मावळ देह ३६
ताा सांडस बुाा	ताा सांडस खुर्द
देह २९	देह २ एकून देह २०
ताा करेपटार देह ४१	ताा पाटस देह ४३
ताा नीरथडी देह ३७	

एणेप्रमाणे पिढी दर पिढी कारकीर्दी दर कारकीर्दी देसकुलकर्ण चालत आलें आहे. ऐसीयासि माहाराजसाहेबासी निजामशाह यानीं प्राा माा मोकासा दिधला ते वख्ती तर्फतर्फानी माहाराजसाहेबीं ठाणी ठेऊन हवालदार व कारकून तर्फतर्फास सतंतर कमावीस करीत असेती ते वख्तीं आपलेया वडिलीं गुमस्ते तर्फतर्फास कारभारी कारभारास दिधले असतां कर्याती मावळास गुपचुप पुणाहून पाठविले. याणी कितेक दिवस मुतालकी करीत असतां कागदपत्रांचा सिरस्ता आपणाजवळी

---

* ही नकल जीर्ण होऊन फार फाटली आहे.

आणानै देत असेती व हकलवाजिमा आणौन चाकरीचे रवेसीने आपल्या वडिलांसी वर्तत असतां रयतीस बदसुलूख केला. ह्मणौन त्यास दूर करून नामाजी लांडा पुणाहून गुमस्तगिरी देऊन कर्याती मावळास पाठविला. नामाजी ह्यात असतां आपला हकलाजिमा व कागदाचा सिरस्ता ऐसे आपणास देत गेला ऐसें माहाराजसाहेबांचे कारकीर्दीस चालत आले असतां निजामशाही गुदरोन गेली. एदिलशाही तर्फेने विज्यापुरीहून मुऱ्हारी जगदेव सुभा एऊन पुणे जाळून लुटून तलाख केलें ते वख्तीं दौलतमंगल उर्फ भुलेश्वर एथें मुऱ्हारीनें किल्ला साधोन शाहार वसविलें तेथे आपले वडील राहावयासि गेले. कितेक मुदती भुलेश्वरी कारभार पडिला त्याकरितां कर्यात मावळीं नामाजी लांडा कारभार करीत असेती तो आपला हकलाजीमा व कागदाचा सिरस्ता देत असे. एदिलशाहीतून माहाराजसाहेबास पुणे मोकासा जाहाले ते वख्ती साहेबांस कर्याती मावळ व राजश्री मंबाजी राजे भोसले यांसि सांडस खुर्द माहाराजसाहेबीं आपणापासून मोकासा दिल्हा. साहेबांचे तर्फेने कर्याती मावळांस हवालदार व कारकून आलाहिदे गेले त्यास जागजोरी करून नामाजीने आपणासी बेइमान होऊन नजर बदलली ऐसीयासि आपण एऊन साहेबांपासी हकीकती जाहीर केली तों निळो सोनदेऊ साहेबांचे मजमूदार त्याणी आपाजीची पाठी राखिली. आपाजीस व आपणासी रुजू होऊन देत नाहीं. तरी साहेबी मेहेरबान होऊन देसमुख व मोकदम व कुलकर्णी व रयतीस ताकीद करून खुर्दखत दिले पाहिजे ह्मणौन तुह्मी मालूम केले त्यावरून तुह्मास बोलाऊन हकीकती पुसिली तुह्मी सदहू प्रा सांगितले. हाली मोरो विठल देसकुळकर्णी यांचे देसकुलकर्णाचा व कर्याती मावळ यांचे देसकुलकर्णाचा अमल यांचे दुमाला करणे आपाजीस दखल न करणे यांचा हकलाजिमा यांसि देणे तकरार फिर्यादी एऊ न देणे तालीक घेऊन असल फिराऊन देणे.

एणेप्रमाणे हककती गुदरली तो उदयभान राठवड अज तर्फे पातशाही किलेदार किले कोंढाणा त्याणे छावणी बदल जमीदारानि व मोकदमानि व रयानि प॥ पुणा कर्याती मावळ वगैरे किलेमजकुरी जमा असतां आपाजी बिन नामाजी लांडा हाजीर होता बाबाजीराम देसपांडे ह्मणो लागला की, तुझा बाप नामाजी आपलिया वडिलाचा गुमास्ता कागदाचा सिरस्ता व हकलाजिमा आमचा आह्मास देत गेला आहे, ऐसे असोन फितरतीकरितां आमचा कागदाचा सिरस्ता तुजपासी राहोन गेला आहे तो देणे. त्यावरून हालीमवाली किलेमजकुरी जमा होते त्याहजूर पेशमान होऊन आपाजीने आपल्या बदस्तुरें करंजवणे व पायगुडे देसमुख व मोकदम कर्याती मजकूर यांचे शाहिदीनसी कागद लिहून दिल्हा एणेप्रमाणें:—

श्रीसके १५८१ कीलक नांव सवछरे वैशाख शुध प्रतिपदा तेदिवसी राजश्री बावाजी राम होनप देसपांडिये पा। पुणा यास आपाजी नामदेऊ लांडे यानी लेहोन दिधले की आपला बाप नामाजी लांडा तुमच्या वडिली तर्फ कर्याती मावळीची देसकुलकर्णाची गुमस्तगिरी देऊन ठेविला असता तुमचा हकलाजिमा व कागदाचा सिरस्ता तुमचे वडिलास देत गेला आहे. आपला बाप नामाजी मरोन गेला त्यावरी आपण तुह्मासी नजर बदलून तुमचा हकलाजिमा व कागदाचा सिरस्ता द्यावा तो दिधला नाही ह्मणऊन तुह्मी आपल्या गळा पडोन आपणास पदरी धरिले ते वख्ती किले सिंहगडीचे छावणीबदल उदेभान राठवड किलेदार त्याणी कर्याती मावळीचे देसमुख करजवणे व पायगुडे व मोकदम व कुलकर्णी किलियास बोलाविले होते त्यांस आपण दरम्यान घालून आपला अन्याय मागोन घेऊन जैसा आपला बाप नामाजी तुमच्या वडिली गुमास्ता ठेविला होता तेसे आपणास संतोशे ठेवाल तर राहोन दूर कराल तेवख्ती दूर होऊं हे आपले लिहिले सही.

जैतजी करजवणे देसमुख का। मजकूर

कन्होजी धावडा मौजे कोंढ ता। का। मा।र

रामजी ससर व पिलाजी चायरा मोकदम मौजे वासर

खेवजी व रेखोजी चौधे मोकदम मौजे आंबेगाव

विठोजी पिंजण मोकदम मौजे किन्हई

दुर्गाजी पायगुडे देशमुख का। मजकूर

विसोजी मोझेरा मोकदम मौजे भूकुम ता। मा।र

तावजी विंगळा व माणकोजी चौधा मोकदम मौजे भूगाव

सुभानजी व संभाजी पायगुडे मोकदम मौजे वतळबाव कुडीस

सदर्हूप्रमाणे निविस्ते आपाजी की पिदर मन ब इस नामाजी नोकर शुमा बूद मुकिता होऊन गेला तो छावणीचा कारभार दुणावला कर्याती मावळ पडिला त्याचा हि सरबरा बाबाजी राम देसपांडे पा। पुणे यानी करून दिधला. पातशाही अंमलफैला मोरोजी व बाबाजी राम देसपांडेगिरी खुद पुणाची व कर्याती मावळची काबीज मुतसरूफ असतां बाजद फितूर मुलुक बदस्त सीवाजी राजे भोसले रयती बैरान पेरोशानी परागंदा मुलुक वैरान बेचिराख सबब पातशाही फौजा दौड एऊन मुलुक ताराज

(पुढें एक बंद गहाळ)

लेखांक २३.

*

अखंडित–लक्ष्मी–आळंकृत राजमान्य राजश्री मोरो त्रिमल गोसावियांसि

पोष्य राघो बलाल नमस्कार विनंति उपेरी गोसावि पाठविले तें पाऊन अभिप्राय कळों आला श्री स्वामीचे आज्ञेवरुनु लिहिले की मौजे चिखली तेथील पाटिल व कुणबी व कुलकर्णी हिसेबाबदल भांडत आहेती त्यास दाहा वरसे जाळी आहेती. कुणबी ह्मणताती कीं निवाडा राजश्री पंतीं सन सलासांत केला आहे, तो निवाडियांचे कागद हारपले ऐसे कुणबी ह्मणताती. तरी हा निस्चय तुमच्या पत्रावरी आला आहे तरी हा निवाडा जाला ऐसे आपणास कळले असिले तरी उतर तैसेच लिहिले पाहिजे. तेणेप्रमाणे यांस वर्तउनु जरी आपणास ठावके नसेल तरी सिवाजी कुलकर्णी व कुणबी आणुन हिसेब पाहाता कुणबियाचे हिसेबे सिवाजीवरी पैके निघो लागले. इतकियामधे कुलकर्णी पलौनु गेला तो हा कालपर्यंत आपण देखिला नाही. परतु कुलकर्णी खोटा आहे विदित असावे हे विनंति लक्ष एक

लेखांक २४.

श्री.

(पुणे देशपांडे–दफ्तर)

ताळेबंद झाडा एणेप्रमार्णेः—

अबदुलखान मारिले सन सितैन अलफ सवत्सर विकारी शालिवानशके १५८१ सन हजार १०६९ कलम मार्गेश्वरवद्य पंचमी इंदुवासरे कलम १

सन सबा समानीन अलफ सवछर क्षयनाम सके १६०८ सन हजार १०९६ मधें इदलशां सुलतान शिकंद दस्त केला अमल पादशा अवरंगशाचा जाहाला कलम १

राजश्री कासी घानतराव मृत्य पावले सन सबा सबैन अलफ नल नाम संवछरे सके १५९८ सन हजार १०८६ मधें कलम १

सन समान समानीन मधें प्रभव सवछरे सके १६०९ सन हजार १०९१ मधें भागानगर घेतलें तानाशा दस्त केला कलम १

---

* श्रीकार नाहीं.

तुळापुरीं तेच वर्षी मुकाम जाहला मग सन तिसा समानीन अलफ सवछर विभव सके १६१० सन हजार १०९८ मधे राजश्री संबाजीराजे दस्त गत केले ते सवछर जालें (कलम १)

पादशाह अवरंगजेब तुलापुरीहून स्वार जाले ते मोकाम गलगल येथें मोकाम येणेंप्रों

१०९९ सन तिसैन सवछर शुक्ल सके १६११ मधे

११०० इहिदे तिसैन प्रमोदी सवछर सके १६१२

११०१ इसन्ने सवछर प्रजापति सके १६१३

एकूण वरसें ३

सलास संवछर अंगिरा गलगले येथून स्वारी + + + + + + विज्यापुरी + + + से मोकाम केले एणेप्रों

११०२ सलास तिसैन संवछर अंगिरा सके १६१४

११०३ अर्बा तिसैन सवछर श्रीमुखा सके १६१५

११०४ खमस तिसैन सवछर भावा सके १६१६

एकूण वरसे ३

विज्यापुरीहून स्वार जाले ते बरमपुरीस मोकाम केले वरसे ४ एणेप्रों

सन सीत तिसैन अलफ सवछर युवा सके १६१७ सन हजार ११०५

सन सबा तिसैन अलफ सवछर ध्याता सके १६१८ सन हजार ११०६

सन समान तिसैन सवछर ईश्वरा सके १६१९ सन हजार ११०७

सन तिसा तिसैन सवछर बहुधान्य सके १६२० सन हजार ११०८

ए॥ वरसे ४ (कलम १)

शाहूराजे पातशाहीतून सुटून आले सन सबा मया सवछर शालिवान सके १६२८ सन हजार १११६ मध्यें राज्यास आले हे चाळीस वरसें राज्य केलें सन खमसैन मया मधें सन हजार ११५९ सवछर शुक्ल शके १६७१ मार्गेश्वर वद्य तृतीयेस मृत्यु पावले (कलम १)

सन मया अलफ संवछर प्रमाथी शके १६२१ सन हजार ११०९ मधे सातारा फते केला

सन इहिदे मया अलफ संवछर विक्रम सके १६२२ सन हजार १११० मधें पनाळा घेतला

सन इसन्ने मया अलफ संवछर वृशा शके १६२३ सन हजार ११११ मधें विशाळगड घेतला

सन सलास मया अलफ संवछर चित्रभान शके १६२४ सन हजार १११२ मधें कोंढाणा घेतला

सन अर्बा मया अलफ संवछर सुभान शके १६२५ सन हजार १११३ मधें वाघिनगिरा पाल घेतले (कलम)

नगरी येऊन मुकाम

१ खमस

१ सीत

१ सबा मधें मृत्य पावले

३

लेखांक २५.

श्री. १६०५ कार्तिक शुद्ध १०.

राजश्री विनायक उमाजी शुबेदार व कारकून सुभा प्रा। पुणे गोसावी यासि

छ अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक केसो त्रिमळ नमस्कार सु॥ अर्बा समानैन अलफ प॥ मजकुरीचे देशकुलकर्णी संनिध एउनु विनंति केली की देशमुखास व देशकुलकर्णियांस पेशजी राजश्री दादाजी कोंडदेऊ सुबेदार तिही इनामती खंडणी दर सालास दिधली होनु पातशाही ४००

देसमुख होनु ३०५ देसकुलकर्णी होनु ९५

एकूण च्यारसे होनु खंडणीचा तह दिधला त्याप्रमाणे गलबलिया आधी उसूल होत आला आहे हाली दाहा पाच साले गलबला जाला आहे. माहाल खराब पडला जुजवी गाऊ वसाहत थोडेबहुत आहेत त्यास आपणास व देसमुखास हकाचे दस्त बहुत थोडे होते त्यास दस्त माफीक देशमुखास व आपणास पोटास देउनु वरकड दिवाणांत घेत आहेत. एणेकरून आपला अवकात चालत नाही स्वामीची सेवा करावी लागत आहे. त्याहिमधें आपण वृतिवंत आहो आणि स्वामीची सेवा एकनिष्ठपणे करीत आहों तरी स्वामीने कृपाळु होउनु राजश्री दादाजीपंती इनामती खंडणी होनु ४०० च्यारसे केली आहे ते जे वेळेस सारा परगणा कीर्दी होता तेव्हा च्यारसे होनु खंडणी ध्यावी ऐसा तह केला होता. हाली परगणा कूली खराब जुजवी थोडेबहुत वसाहती आहेती आपणास- हि हकउसूल होत नाही तरी स्वामीने कृपाळ होउनु च्यारसे होनु सारा परगणा कीर्दी होता त्या समई दस्तरकमप्रमाणे होते होते. त्या हिसेबे हाली दस्तमवाफीक

चौ इया होनाची तकसीम बसेल ते देसमुखापासुनु व आपणापासुनु जे तकसीम असेल ते घेतलियाने आपलाहि अवकात चालेल व स्वामिसेवेस वृत्तिसंमधें एकनिष्ठ सेवा करून तरी स्वामीने कृपाळू होउनु सदरहू विनंति मनास आणून इनामती खंडणीचा तह विनंतिप्रमाणे करून दिल्हा पाहिजे म्हणउनु देशकुलकर्णियानी विनंति केली. ऐसियास याच्या हकाचाहि हिसेबु पाहातां हाली मुलुक खराब जुजवी वसाहत आहे हक पुरा उसूल होत नाही या निमित्य च्यारसे होनु इनामती खंडणी आहे ते पेशजी प्रमाणे घेतां इनामदार मा। दिलगीर होताती व त्याच्याहि अवकात चालत नाही याबद्दल हाली यांचा इनामती खंडणीचा तह केला ऐन दस्त साल ब साल होईल त्यास दस्तमाफीक चौऱ्यां होनाची बेरीज दस्तांप्रमाणे बसेल तें यापासुनु घेत जाणे हाली दस्तहि कमी आहे याबद्दल एणेप्रमाणे तह केला आहे तरी लिहिले प्रमाणे इनामती खंडणी दस्तमाफीक घेत जाणे. जे दिवाणबेरीज इनामती खंडणीची घ्यावयाची असेल ते देसमुखाचे तकसिमेस जे बेरीज बसेल ते त्यापासुनु घेणे. जे देशकुलकर्णियाकडे बेरीज बसेल ते देशकुलकर्णियापासुनु घेणे याहून विषेष तोसिस नेदणे. एविसी राजश्री स्वामी कैलासवासी व राजश्री पंत वैकुंठवासी यांचीहि पत्रे माहालीच्या कारकुनास आहेती तरी तुह्मी लिहिलेप्रमाणे इनामती खंडणी घेणे तालिक लिहून घेउनु असल देसकुलकर्णियापासी देणे र॥ छ ८ जिलकाद आज्ञा प्रमाण सुरू सूद

लेखांक २६. १६०७ वैशाख शुद्ध ९.

दोरागे बीदर

दर्या बे॥ मोकदम मौजे जेजूरी ता। करेपटार प्रा। पुणे सु॥ सन ११०७ कारणे कतबा लेहोन दिधला जे साहेबी हुजूर बोलाउनु रजा फर्माविली की सा। मा। कारणे मौजे मा। जमा बेरजी मुशकस करणे ह्मणउनु रजा फर्माविली यावरी आपले बाबे देसमुख व देसपांडिये पा। मा। इही हालहवाल जाहीर केला की धामधुमेने गाव वैरान जाला व करारवाके कीर्दी जाली नाही ह्मणउनु मालूम केले बराये मालुमाती खातिरेस आणुनु आबादानीवरी नजर देउनु मौजेमजकूरची जमा-बंदी मोकरर केली कुळ बाब कुल कानू साल तमाम दिले ह्मणौन नाहीसीं केली व कबूल असो उगणा करून रु॥ ३७५

मे॥ तीनसे पंच्याहातरी रुपये रासि तेरीख ७ माहे सौवाल
दर्या मालोजी नरसिंवराऊ व गोविंदराऊ सितोले देसमुख पा। पुणे
दर्या होनप देसपांडिये पा। मा। प्रा। पुणे रयानीस रु॥ रासि

लेखांक २७.

श्री. १६०८ वैशाख शुद्ध १.

तालीक

श्रीशके १६०८ क्षयेनाम संवत्सरे वैशाख शुद्ध पाडवा दिनी धनको नाम धर्मोजी कासार कसबे तळेगाउ रिणकोनाम मोकदम व समस्त दाहीजण मौजे वाघोली ता। हवेली तुह्मांपासून घेतले कर्ज रु॥ ३५० साडे तीनशे रुपये घेतले हे पैके देऊन यासि व्याज दर माहे दर रुपये ५ प्रमाणें देऊन हे लि॥ सही यासि उगवणीस दत्ताजी पा॥ व जावजी स॥ व कृष्णाजी स॥ लालजी स॥ यांसि गहांण आपली मोक + + + + + +

लेखांक २८.

१६०८ वैशाख शुद्ध १२.

(फारसी सिक्का)

इजती असार देसमुखानि व देसपांडियानि व मो। सेटियानि माहाजनानि प्र॥ पुणे सु॥ सीत १०९५ इनहाये आंकी आमची स्वारी प्र॥ मजकुरी एउनि तुह्मी भेटावयासि न आलेती ऐसे सुस्त आणि प॥ म॥ करारवाके अमल होत नाही खालसे फैल टाकीत नाही तरी हे खूब नाही प॥ म॥ तहसील महलग राहौनि तुह्मी तगाफली करिता तरी पैसे खु॥ नि॥ तुह्मास देणे लागतील आता इजती दस्तगाह सीपदतमाहा सैद सुलतान पुढे पाठविले आहेती तरी तुह्मी सामानसीर राहाणे आह्मी प॥ म॥स स्वारी करुनि एतो तो पौतो तयार करुनि ठेवणे तगाफली केलिया आपले केले पावाल खबर + + असे

तेरीख १० जमादिलाखर सन २९ जुलूसवाला

लेखांक २९.

१६०९ ज्येष्ठ.

बाद जालीक जागीर तुलोजी सींदे जागीरदार पा। पुणे सु॥ सन १०९७ बमी साल गुदस्त सन हजार १०९६ बा। तुमार रु॥ २१७॥= दोनीसे सतरा रु॥ चउदा आणे रास पैकी वजा साल गु॥ मारुफाते विठल गंगाधर सेखदार व कारकून गुमास्ते मा। इले बा। साल देहे बाद ई रु॥ १०८॥≡ एकसे आठ रुपये पंधरा आणे रास बा। गा + + + करार रुपये १०८॥≡

दर्या अंताजीराम गु॥ रामचंद्र बाबाजी देसपांडिये पा। मा। एकसे आठ रु॥ पंधरा आणे रास

लेखांक ३०.

१६०९ ज्येष्ठ.

"तुमार जमा बेशकसी मुतालब बार जमे देसमुख व रामचंद्र बाबाजी देसपांडिये पा पुणे सा जुनर सुभे अवरंगाबाद सुा सन हजार १०९७ अज बा रसूल बइतफाक शंकराजी कृष्ण गुमास्ते आऊजी कान्हो नाईक रकूयतपन्हा मिर्जा सुकुरुलाबेग बा परवाना पो इा अवल साल ता अखेर साल अज देह २९०

पैकी वइरान मुतलख देह	बाकी
आबाद देह	जमा
मोकरा साल तमाम जमा	बेरीज
	रुपये
	३६२॥

मो तीनसे साडबासटी रुपये रास बो अंतोजी राम गुमास्ता रामचंद्र बाबाजी देसपांडिये पा मा महलग तीनसे साडेबासटी रुा रासि."

लेखांक ३१.

१६०९ माघ शुद्ध ७.

महजरनामा बतारीख ५ शहर रबिलाखर सन
१०९९ बहजूर शर + + + + + + + + + +
देसमुख व देसपांडिये ता + + + + + + + + +
पुणा हालिमवाली मु॥ तुळापूर लस्कर + + + + + + +
गवरोजी बिन बाबजी लोहकरा मोकदम मौजे + + + + + +
अज कदीमलया पुस्त दर पुस्त + + + + + + + +
दमीस काबीज मुतसरीफ आहे + + + + + + + +
रोहूमकहुराचे तर्फेने बनाम बकाजी फर्जंद याने जाहालनापुरावरी दौड केली आणि खानज्याहा बाहादूर यासी लडाई केली आणि तेथून सीकस्ते मकहुरापासी बकाजी म॥ आला मकहुराने बकाजी म॥ सरफराजी करिता बकाजी म॥ वख्त पाहोन मौजेमजकुरीची मोकदमी मागोन घेतली त्या तागाईत गवरोजीमजकूर परागंदा जाला होता हाली किबिले ज्यांहाज्याहानी यानी जिलसुभानजीने मयुरक कतल करून मुलकास कौल दिधला त्यावरून गवरोजी लोहकरा दरबारीं बहजूरपुरनूर दरगाह हजीर होऊन मदारुलमहामी दिवाण दक्षण यासि हकीकत जाहीर करून बाहालीचा परवाना हासील केला सिरपाऊ बयरका देऊन कीर्दीचा हुकूम फर्माविला त्यावरून हजीरमज्यालसीने करारवाकई हकीकत मनास आणून गवरोजीमजकुरास मौजेमजकुरीची मोकदमीचा महजर करून दिधला असे लेकराचे

लेकरी पिढी दर पिढी मोकदमीचा कारभार करणे हकलाजिमा व इनाम खात जाणे यासि कोण्ही हिलाहरकती करील तो दिवाणीचा गुन्हेगार व गोताचा खोटा अन्याई हा महजर सही.

कृष्णाजी बिन पिलाजी
चांधेरे मोकदम मौजे
सूस ता॥ म॥

खेउजी बिन सोमाजी
माझेरा मोकदम मौजे
भूकुम ता॥ म॥

भिकाजी जवळकर मोकदम
मौजे खानापूर

नाईकजी शाहाडा मोकदम
मौजे वडदर ता॥ म॥

साऊजी सुरवा मोकदम
मौजे मालखेड

जाखोजी पायगुडे मोकदम
मौजे मांडवी बु॥

पिलाजी वाजळा मोकदम
मौजे आईरे ता॥ म॥

जानोजी पायगुडे मोकदम
मौजे आगळंबे

भिवजी व बाळोजी पाटिल
मोकदम मौजे भूगाऊ ता॥ म॥

सीवाजी व बहिरजी
पायगुडे मोकदम मौजे
कुडीज

कृष्णा जीवडा मोकदम
मौजे बुधन ता॥ म॥

हिरोजी मऱ्हाटा मोकदम
मौजे मांडवी खुर्द

जनाजी बिन काउजी
चावट मौजे हिंगणे खुर्द

गिरजोजी मते मोकदम
मौजे खडकवासले ता॥ म॥

तान्हाजी पाटिल मोकदम
मौजे घाईरी ता॥ म॥

संभाजी पाटिल आगठे
मोकदम मौजे वडिगाऊ

एल्होजी रानवडा मोकदम
मौजे नऱ्हे ता॥ म॥

एसजी पायगुडे मोकदम
मौजे डोणीजे ता॥ म॥

लेखांक ३२. १६०९.

हकीकत देहझाडा देहाय पा॥ पुणे सु॥ १०९७ अज देह २९० पैकी फौजदार याचे तालुक
तर्फ

४३	ता॥	पाटस
३७	ता॥	नीरथडी
८०		

देहे २१० पैकी आबाद
जुजजुजी देहे

४०	ता॥	हवेली
५		सांडस
१३		कऱ्हेपटार
१२		मावळ
७०		+ + + +

रा	देहे	१४०
साबीक	वइरान	६३
		ता॥

लेखांक ३३.

१६१० माघ शुद्ध ३.

(फारसी शिक्का)

द॥ बे॥ मोकदमानि मौजे चिचवड ता॥ हवेली प्रा॥ पुणे सु॥ सन १०९८ कारणे साहेबाचे बांदगीस कतबा लेहोन दिधला ऐसा जे साहेबी हुजूर बोलाऊन खंडणीची रजा फर्माविली की जमाबंदी मुशकस करणे म्हणऊन रजा सादर केली तरी आपले बाबे अंताजीराम गु॥ रामचंद्र बाबाजी देसपांडे प्रा॥ पुणे याणी दुकळे रयतीचा हालहवाल जाहीर केला जे सन हजार १०९६ चे अखेर साली दुकळ पडिला याकरिता रयती कुल मेली काही परागंदा जाली मिरासदार कुळ कोण्ही नाही उख्ती पाख्ती रोड दुबळी कुळे मेळऊन कीर्दी केलियास उंदिरानीं कुली सेते खादली व लस्कर पायमालीने रयतीचा हाल राहिला नाही जरी जीवनमाफिक खंडणी केलिया सालमजकुरीची उगवणी करितील म्हणऊन मालूम केले बराय मालुमाती खातिरेसी आणून कुलबाब कुलकानू माल व सायर साल तमाम कुलबाब बिलमख्ता खंडणी केली ते कबूल असोन उगवणी करून मोकरा

बेरीज रुपये १२५१

म॥ बारासे एकावन रास

तेरीख १ माहे रबिलाखर

रबिलाखर

लेखांक ३४. १६११ चैत्र वद्य १०.

तुमार वासिलाती जागीर खानवालाशान फखरुदीखान जागीरदार पा। पुणें सु॥ सन हजार १०९८ इ॥ छ माहे त॥ छ २३ माहे जमादिलाखर तहसील तहवेली ब॥ जैल मो। वसुल रु॥ ७००१ वजा तहसील व तह्वेल माहादाजी निंबाळकर रुपये २८४८= बाकी वसूल मो। रु॥ ६७१६॥।=

त॥

तहसील काकडखान दर सरकार खानवालाशान फखरुदीखान गिरीफतन रुपये ७६०

तहसील गुमास्ते खान ता। इा। तहवेली माहादाजी रंगनाथ सेखदार रुपये ५६६९॥।=

तहसील करोडी दर सरकार खानवालाशान फखरुदीखान गिरीफतन रुपये २९७०

ता।

का। पुणे रु॥ १२०१ वजा ता। माहादाजी रु॥ १५ बाकी ११८५

ता। काकडखान दर सरकार खान मा। इा। रु॥ १८५

ता। करवडी दर सरकार खान मा। इा। ४५

ता। तहवेली माहादाजी रंगनाथ ९५६०

का। लोहगाऊ ६०१ वजा ता। माहादाजी ५२ बाकी ५४९

ता। काकडखान दर सरकार खान मा। इा। ६५

ता। माहादजी रंगनाथ रु॥ ४८४

मौजे हडपसर रु॥ ८६४

ता। काकडखान दर सरकार खान मा। इा। १३५

ता। कवरडी दर सा। खान मा। इा। ३३॥

माहादाजी रंगनाथ ६९५॥

मौजे लोणी काळभर रु॥ १००१ वजा ता। माहादाजी निंबाळकर १८६०= बाकी सा। खान मा। इा। ८१४॥।=

ता। काकडखा १५०

ता। माहादाजी रंगनाथ ६६४॥।=

मौजे फुरसुंगी रुा ५०१		मौजे बाणेरे रुा १३०१	
ताा करवडी दर	ताा माहादाजी	ताा काकडखान	ताा करवडी
सरकार खान	रंगनाथ	दर साा खान	दर सरकार
माा इाा रुा	३८५॥	माा इाा	खान माा इाा
११५॥		१३५	४५
		ताा माहादाजी	
		रंगनाथ ११२१	
मौजे चिंचवड रुा १२५१		मौजे दापोडी रुा २८१	
वजा माहादाजी निंबाळकर		वजा ताा माहादाजी निंबाळकर	
१५ बाकी १२३६		रुा १६ बाकी २६५	
ताा काकडखान	ताा करवडी	ताा काकडखान	ताा करवड
दर साा खान	दर साा खान	दर साा खान	दर सरकार खान
वालाशान ७५	माा इाा रुा	माा इाा	माा इाा
	४४	१५	१४
ताा माहादाजी		ताा माहादाजी	
रंगनाथ रुा		रंगनाथ	
१११७		२३६	

लेखांक ३५.

श्री. १६११ आषाढ वद्य ९.

श्रीसके १६११ शुक्ल नाम सवछरे आशाढ वदि नवमी रविवार ते दिवसी राजश्री मुकुंद कान्हो देशपांडे प्राा पुणे यासी रामचंद्र बावाजी देशपांडे प्राा मजकूर लेहोन दिधले ऐसे जे इाा दवलतकाहिरेमधे मुलूक आला त्या ताा तुम्ही तिकडे होतेस आम्ही पातशाही खिजमत करीत आलो वतनाचे कस्ट मशागत बहुत करून वतनाचे संरक्षण केलेयावर तुम्ही एऊन हाजीर जालेत आणि तुम्ही आपणास आपली तकसीम मागितली तर तुम्हास आम्ही तुमची तकसीम कदीम दिधली असे तुम्ही आपली कदीम तकसीम कदीम खाणे तुमचा विभाग तुम्हास दिधला असे व तुमचे गावीच्या खंडणीकतबियावर आम्ही आधी आपलिया हाते × × × करून मग आमच्या दसखता खालते तुम्ही आपले दसखत करीत जाणे तुम्ही आपली तकसीम खाणे समाईक गावीचे एईल ते कदीमेप्रमाणे खाणे व आपले गावीचा कारभार करीत जाणे फिरमानाची दिकत आम्ही करणार नाही.

लेखांक ३६. १६१४ आषाढ वद्य १.

महजर अज करार बतारीख छ १५ शहर सौवाल सुा सन हजार ११०२ सन ३६ जुलूसवाला बिहजूर शर्यतपन्हा काजी महमद वलद काजी इभराईम व शायादत सरफायत मवालीपन्हा सैद महमद ज्याफर नैब खान वालाशान ज्याहांबाजखान फौजदार पा पुणे व देसमुख देसपांडिये व हाली मवाली का मा या हुजूर कान माली पासरा याणे एऊन जाहीर केले की आपण आपलें घर बांधत होतो त्यास नरहरि बावाजी वेव्हारा माहाजन का मा याणे एऊन दोही दिल्ही की घर मिरासी आपली आहे इ. इ. इ.

लेखांक ३७. १६१८ चैत्र.

तहनामा जमाबंदी जागीर तहवर दस्तगाह बालाजीराऊ जमीदार बारा मावळ जागीरदार का पुणे सा जुनर सुबे खुज्यस्तेबुनियाद सुा सन ११०५ फसली मताबीक सन ३९ जलूसवाला जमा मुशकस कर्दे केसो गोविंद अमीन व लक्ष्मण कोंडदेऊ सेखदार व त्रिंबकराम कारकून गुमास्ते माइले जमा कुलबाब कुलकानू माल व जाबती व सायेर कुल मख्ता साल तमाम रुपये ९५०८

ता

निा मुजेरी रुपये	निा सेरी रुपये
७१६८	२३४८

तेरीख रमजान

लेखांक ३८. १६१९ श्रावण शुद्ध ७.

श्रीशके १६१९ ईस्वर नाम सवछरे स्रावण सुध सप्तमी ते दिवसी बतारीख छ ५ माहे सफर सुा सन समान तिसैन अलफ हाजीर मजालसी समस्त गोत ता कर्याती मावल

देसमुख ता मजकूर

पायगुडे रविराऊ	कर्जवणे भालेराऊ
दीपाजी बिन दुर्गाजी	खंडोजी बिन जैतजी
बिन कान्होजी बिन	बिन बावाजी बिन
लुखजी रविराऊ	जैतजी भालेराऊ
कान्होजी बिन जाखोजी	दादजी बिन रामजी
बिन बाजी बिन	भालेराऊ
रायाजी रविराऊ	

मोकदम कुलकर्णी

व चौगुले व बाजे मुा

मौजे भूगाऊ

बालोजी	भीउजी
इंगवला	चोधा
मो	मोकदम
विठल	माणकोजी
बयाजी	सेटगा
कुलकर्णी	चौगुला

मौजे कोढ

कमलोजी धावडा
मोकदम बहुजूर
बालोजी बिन बाजी
पाटिल धावडा

मौजे अहिरे

पिलाजी	भिवजी
बिन	बिन
कोंडाजी	कुमाजी
वांजला	वांजला
मोकदम	मोकदम
होनाजी	
खैरा	
चौगुला	

मौजे नांदे

रायाजी	बायाजी
बिन	धनवडा
बापूजी	चौगुला
राजवडा	
मोकदम	

मौजे चांदे

सिदोजी बिन नरसोजी
ससार मोकदम

मौजे भूकुम

खेऊजी	सोनजी
बिन	
विसाजी	माझेरा
माझेरा	मोकदम
मोकदम	
रामजी	
माझेरा	

मौजे बावधण खुर्द

संताजी	कृष्णाजी
बिन	बिन

मौजे वडद्रे

नाइकजी शाहाडा
मोकदम

दावजी
वेडा
मोकदम

मौजे डोणिजे
एसजी बिन तान्हाजी
पायगुडे मोकदम

मौजे सूस
सताजी बिन रामजी ससार मोकदम
कृष्णाजी बिन पिलाजी चौधरा

मौजे आगलबे
जमाजी बिन साबाजी
पायगुडे

मौजे मांडवी खुर्द
बावाजी बिन कान्होजी मोकदम
चाऊजी बिन बापूजी मराठा मोकदम

मौजे मांडवी बुा
अनसोजी बिन रुद्राजी
पायगुडे मो

मौजे मालखेडे
सावजी सुरवा मोकदम
जावजी जोटी मोकदम

मौजे खांबगाऊ
शंकराजी बिन बकाजी फर्जंद
रायाजी नागनाथ मुतालीक मोकदम

सदरहू जणानी राजश्री यादो नामदेव देसकुलकर्णी ताा कर्याती मावल यास पत्र लेहोन दिधले ऐसे जे तुम्ही आपणास पुसिले की हजरती पातशा तुलापुरीचे मुकामी सन तिसैन अलफ मधे मुा होते त्या प्रसंगीं आपण मऱ्हास्ट राजा या मधे होतो त्यास तुलापुरी कुल अवघे देसक लस्करांत जमा जाहाले होते ते समई तुम्ही हि अवघे तुलापुरास गेले होतेस तेथे तुम्ही होनप देसकुलकर्णी पाा पुणे यास राजीनामा व महजर लेहून दिधला आहे की काा मावलचे देसकुलकरणी कडे नव्हत देसपांडे होनप होत ऐसा राजीनामा. होनपास लेहोन दिधला आहे

याचे वर्तमान कैसे काय आहे त्याच निर्वाह करणे आपण पुरातन व्रीतिवंत देसकुलकर्णी होऊ किंवा न हो तुम्ही त्यास राजीनामा काय निमित्य करून दिधला आहे त्याचा निर्व्हा दिवाणांत व तुम्ही समस्त गोत ता। मा। निर्व्हा करून देणे म्हणौनु सदरहू जणास पुसिले तरी आपण काही होनपास राजीनामा लेहोन दिला नाही त्याचा करीना ऐसा जाहाला आहे आपण उभयता देसमुख ता। मजकूर सितोले देसमुख प्रा। पुणे तिसैन अलफ मधे तुलापुरास गेलो होतो तेथे आपणास नातवान देखोन सितोलियानी आपणासी कथला केला की ता। माचे देसमुखी वतन आपले आहे ऐसा कथला केला त्यावरी आपण दिवाणामधे उभे राहोन गोतमुखें देसमुखी आपली खरी करून घेतली सितोलेयासी समंध नाही ऐसे जाले आपण नातवान दिवाणांत दरबारखर्चास टकापैका पडिला त्यास आपणास नातवानीमुळे कर्जवाम मिले ना याबदल होनप देसकुलकर्णी पुणेकर यापासी उभयता देसमुख मिलोन घेतले रुपये ३२०० कर्जवणे रु॥ १६०० पायगुडे रु॥ १६०० एणेप्रमाणे कर्ज घ्यावयाचा निर्वाह करून चौघ पाटिल जमान दिधले

कृष्णाजी पाटिल चौधरा मौजे सूस १		खेवजी पाटिल माझेरा भुकुम १
मोकदम मौजे भूगौ		कान्होजी पाटिल कोलेकर
बालोजी पाटिल गवला	भीवजी पाटिल चौधा	मौजे माहाळंगे

एणेप्रमाणे जमान दिधले पैकियास ऐवज देसमुख व देसकुलकर्णी यांचा हक जो उत्पन्न होईल तो पाचा वरसामधे फेडून घ्यावा आदिकरून फाटियाची मोली व पत्रावलीचे पान कर्जात घ्यावे ऐसा तह करून घेतला आणि सेवटीं पैके दिल्हे नाहीत पैके देईनासारिखे जाले आपणास तरी पैकियाचा तगादा बहुत लाविला त्यास होनपानी मकसूद घातला की कडे देसकुलकर्णी गैरहाजीर आहेत त्याचा देसकुलकर्णियाचा महजर करून देणे म्हणिजे तुम्हास सितोलेयाच्या भांडणास ढका लागेल तो कर्ज देऊन म्हणऊन अडऊन रात्री बोलाऊन दुर्गोजी रविराऊ व परसोजी करजवणे यासी नेऊन कोरे कागदावेरी सिके करून घेतले आणि मग आपणास सिके करून दिल्हे ते समई देसमुखाचा बापभाऊ व मोकदम कोन्ही जवली नव्हे ते दुसरे दिवसी दुर्गोजी पायगुडे याणे कृष्णाजी पाटिल मौजे सूस याजवली सांगितले की रात्री होनपानी आपणास आडऊन डोलावरी सिके करून

घेतले परंतु त्या डौलावरी पाटिलाचे नांगर व गोही कोन्हाची नाही कोरे कागदावरी सिके मात्र करून घेतले त्या कागदावरी होनपानी काय लिहिले असेल ते दखल नाही आपणास जरूर जिवावरी एऊ लागले याकरिता डौलावरी सिका मात्र करून दिल्हा आहे आपण राजीनामा करून दिल्हा नाही आपणास कडे देसकुलकर्णी खरे आहेत दुसरा देसकुलकर्णी आपणास दखल नाही पुरातन कारकीर्दी कडियाचे देसकुलकरण हे आपले वडिलवडिलानी सांगितले आहे. होनप देसकुलकर्णी पुणियाचे यास कर्याती मावलाच्या देसकुलकर्णास समंध नाही देसकुलकर्णी कडे खरे पुरातन पिढी दर पिढी आहेत होनपास समंध नाही आम्हास आडऊन डौलावरी सिके करून घेतले तेथे मनास मानेल तैसे लिहिले असेल ते खोटे असे. ए जातीचा करीना जाला असे सदरहूप्रमाणे तुम्हास पत्र लेहोन दिधले असे यास काही अंतर होईल तरी आपण दिवाणीचे गुन्हेगार व गोताचे खोटे तुमच्या वतनाचा जाब करून देऊन.

लेखांक ३९.

[नकल] श्री. १६१९ श्रावण वद्य ६.

दे॥ बै॥ देशमुख व मोकदम क॥ सासवड मावजी नाईक देशमुख मालजी पाटिल मोकदम सु॥ समान तिसैन अलफ कारणे साहेबाचे सेवेसी लेहून दिल्हा कतबा ऐसा जे आपण गोमाजी विश्वनाथ व चिंतो माहादेऊ व सिवाजी मुदगल पुरंधरे यांसी आपण कोरे कागदावरी सिके करून आपण दिल्हे आहेत हे वर्तमान साहेबांस विदित जाले त्यावरि साहेबीं आपणास हुजूर आणून सदरहू गोष्टीची तहकीकात लाविली आणि सदरहू कागद आणून देणे ह्मणून तगादा लाविला तरी इ॥ छ १९ माहे मोहरम ता॥ छ १९ माहे रबिलावली दोहों महिनियाने सदरहू कागद आणून देऊन जर मुदतीस कागद नेदूं तरी दिवाणचे गुन्हेगार हा कतबा सही छ १९ माहे मोहरम सदरहू कोरे कागद च्यार त्यावरी सिके करून दिल्हे आहेत मुदतीस आणून देऊन हा कतबा सही

गोही

विसाजी नीलकंठ देशकुलकर्णी प्र॥ वाई १
बलवंतराव नारायण कुलकर्णी मौजे बेलसर १
रायसेटी व गोपालसेटी क॥ सिरवल १
अंताजी नरसिंह कुलकर्णी मौजे बुध १
गोंदमाली मेहत्रा क॥ म॥ १
मलसेटी पांढरकामा क॥ म॥ १

लेखांक ४०. १६१९ माघ वद्य ११.

फारसी सिक्का

इजत असार मालोजी ना॥ व गोविंदराऊ देसमुख व देसपांडिये प॥ पुणे सु॥ सन हजार ११०७ मालूम दानद की कोटवाडीस होतो तीन महिने जाले आणि तुह्मी एऊन कोटाची सरबराई केली नाही यावरून अजब वाटले याउपेर देखत परवाना तुह्मी तमाम एथे एणे आणि कोटाची तजवीज करणे तुह्मी ह्मणाल की करेपटार आहे मोरो विश्वनाथ हि तेथे आहेती तर आजि तीन महिने करेपटाराने काम चालविले तुह्मी काही आगोधर सूचना करून बेगारी अगर टके पाठऊन एक देसपांडिया एऊन सरबराई केली नाही यावरून काय ह्मणावे आता देखत परवाना सिताब हुजूर एणे काम बंद जाले आहे उपेर आलस जालिया मसाला पंचवीस रु॥ होईल ऐसे बरे समजणे छ २४ रजबु.

लेखांक ४१.

श्री. १६२२ आश्विन वद्य १०.

पातशाह रामराम

छ श्रीमंत प्रौढप्रतापदिनकर खंडेस्वरी सदायशवंत गोत्राह्मणप्रतिपालक निराधारियासि आधार माहाराज राजमान्य राजश्री नरसिंगराउळ त॥ र॥ गोविंदराऊ राउळ देसमुख व त॥ राजश्री होनप देशपांडिये प्र॥ पुणे व मोकदम सेटिये व माहाजन माहाप्रस्णिक माहास्थल क॥ मजकूर स्वामिगोसावियासि सेवेसी सेवक मोकदम व सेटिये व माहाजन माहाप्रस्णिक माहास्थल क॥ रांजणगौऊ स॥ जुनर विनंति उपेरी ऐथील क्षेम जाणौनु माहाराजे आपुले* लिहिती आज्ञा केली पाहिजे या नंतर विनंति की राउळी स्थळमजकुरास गवरसेटी व मानाजी बांधा या हरदोजणामधे सेटियेपणाचे भाडण व करकसा आहे ह्मणौनु राउळी आपली चिरपत्रें देऊन स्थलमजकुरास पाठविले यासि नेमाप्रे॥ उभे वर्गे स्थळी हाजीर होऊन पत्र देऊन आपलाली हकीकती निवेदन केली त्याजवरून यांची उत्तरे मनास आणिली शोधी पाहिली यासि हे हरदोजण साहेबाच्या सडीस राजी जाले की सडी आपले विशई लेहोनु पाठविजे ते सडीचे प्रतिउत्तर जाबू एईल तेणेप्रमाणे हरदोजण वर्तोन ऐसे राजी होऊन राजीनामे लेहोन दिधले ते स्थळी ठेवून सडीची पद्धती जैसी आहे त्या प्रकारे लेहौनु सडी मलारि गुरव याजबराबरी पाठविली त्यासि ते सडीचे प्रतिउत्तर राउळी लेहोन पाठविले त्यासि ते सडीमधे उधार करून तुह्मी लिहिले की या हरदोजणास क्रिया देणे क्रिया दिधलियाने या हरदोजणाचा

मामला चुकत नाही ऐसे प्रतिउत्तर पाठविले सबब की गवरसेटीने क्रिया करावी की आपण बाजीसेटियांच्या घरातील होए सेटपण आपले ह्मणौनु क्रिया करावी. व मानाजी बांधा याने क्रिया करावी की गवरसेटी बाजी सेटियाचे घरातील नव्हे सेटियेपण आपले. ह्मणौनु क्रिया करावी, एणेप्रमाणे लेहोन सडीचा जाबु पाठविला त्याजवरून यां हरदोजणास क्रिया दिधली क्रिया हरदोजणानी केलियां सबब की गवरसेटीनें न्हाऊन धुऊन देवळांत उभे राहोन क्रिया केली की आपण बाजीसेटियाच्या घरातील होए त्याच्या दुखमाचा अगर त्यांचें बादीचा परंतु बाजीच्या घरातील खरा ऐसी क्रिया केली जरी यासि काही असते असेल तरी श्रीदेवमसीद आपणास क्रियां लावील ऐसी क्रिया गवरसेटिनें केली त्याजवरी मानाजी बांधा यानें क्रियां केली की बाजीसेटिया कदीम खरा परंतु त्याचे बुडाले आपणास देणे सेटियेपण हजरती

जीचे देणे आपणास आहे ऐसी क्रिया केली हे खरे. यांसि असत्य असेल श्रीदेवमसीद आपणास क्रिया लावील ऐसी क्रिया एणेप्रमाणे मानाजीने केली त्यासि क्रियेचा सिरस्ताप्रमाणे रोज पंधरा १५ मुदती करून दसरत पंचरत लेहोन ठेऊन तेणेप्रमाणे राजीनामे लेहोन ठेऊन देवळात दोन्ही बाजून दोघे बैसले इ॥ छ ९ माहे राखर अधिकवदि ११ वार सुक्रवार त॥ छ २४ माहे मिनहू रोजा पंधराची सीमा केली रोजा पंधरामधे ज्यासी देव क्रिया एथे अगर आपले घरी गावी ज्यासी लागेल त्याने त्यांच्या अपमानाचा जाबु करावा आणि वतन जो खरा होईल त्याने खावे ऐसा करार करून क्रियेस बैसले त्याजवरी क्रिया केलियावरी रोज ५ पांचा वार मंगळवारी दो पहरां रात्री मानाजी बांधा निजेला होता त्यासि मानाजीबावा उसणावला की माझ्या उरावरून उठ उठ ऐसे दोनदा उसणावला त्यासि यांचा चुलता सिऊसेटी बांधा याने जागा केला की मानाजी ऊठ एका आंगावरी नीज ऐसें बोलिला आणि मानाजीस जागे केले त्याजवरी रोज पंधरा नेमा श्रो जाले मग पारी बैसोन मुजावरी सैद मकदूम मुलाणे यासि बोलाऊन जाली हकीकती जे जाली ते त्यानी मुखजबानी सांगितले त्याजवरून वर्तमान जाले ते लेहोन पाठविले आहे आपले गांवी तो मजकूर ऐसा या हरदोजणाचे गावी यांचे घरी काय जाले असेल तरी आह्मासि कळले नाही. स्वामि मानाजी याचे गावी काय वर्तमान त्याचे घरीचा काय वर्तमान घेतला पाहिजे या पंधरा रोजामधे इ॥ छ ९ माहे रा॥ खर तं॥ छ २४ माहे मिनहू या दिवसामधे खबर घेऊन यांची निल्ले *** आपण लाविली पाहिजे जाले वर्तमान लेहोनु पाठविले आहे यांमधे साहेब वडील आहेत जैसा कळेल तैसा निल्हे लाविला पाहिजे हे हरदोजण

गवरसेटी व मानाजी बांधे हे उभे वर्ग साहेबापासी पाठविले आहेत बहुत काय लिहिणे कृपा निरंतर असो दीजे हे विनंति सके १६२२ विक्रम संवछरे आस्विन वदि १० वार शेणवारी लि॥ असे पत्री वोळी सुमार ६७ सदुसस्टी रास.

लेखांक ४२.

१६२३ आषाढ वद्य १४.

श्री चिंतामण गोसावी यासिः—

फारखती राजश्री बालाजीपंत व मोरोपंत देसपांडे प॥ खेडबारे यांसि रामचंद्र बाबाजी व विसाजी त्रिंबक व कृष्णाजी बाबाजी देसपांडे प॥ पुणे नमस्कार सु॥ सन हजार ११११ कारणे फारखत लेहोन दिधली जे आमचे कर्ज र॥ चिमणाजी बापूजी आमचे भाऊ यावरी होते त्याची खते बजिनस आह्मापासी आहेत यास तुह्मी लिगाड वारावयास दरमियान श्री श्रीदेऊ स्वामीचे पुत्र यास दरमियान घालून + + केला रु॥ २००० दोनहजार सदरहू रुपये आपण तुह्मापासून घेतले आणि लिगाड वारिले सालीन हाल र॥ चिमणाजीपंताची खते जे असतील ते रद असेत त्याचे लिगाड तुह्मासी लावणार नाही. हे फारखती लिहिली सही छ २७ सफर आसाड वदि चतुरदसी.

लेखांक ४३.

१६२३ । १६२४.

हिसे फसली मौजे थेरवाडी प॥ रासीन स॥ अहमदनगर सुभे खुदस्तेबुनियाद

सन हजार ११११ सन ४६

जलूसवाला जमाबंदी रुपये २०१

हिसे विसाजी त्रिमळ	हिसे खालसा त॥ विसाजी
दाम १२००००	त्रिमळ निस्रा रबीयुतवल
मोकरा जमाबंदी रु॥	सु॥ ३ माहे पाय दाम
२०१ तगीर निस्रा रबी-	बमोजिब जमाबंदी रु॥ ५०
युतवल सु॥ ९ माहे	
हिसे जागीरदार ए॥ रु॥ १५१	बरदास्त मजमूदार

सन ११११ सन ४७

मोकरा दाम १२००००

जमाबंदी म॥ रुपये २५९।÷॥·

हिसे विसाजी त्रिमळ	हिसे खालसा तगीर
इ॥ सु॥ ७ रबीयुतवल	इ॥ सु॥ ७ रबी

सु॥ ५ माहे ब॥ जमाबंदी दर माहे रु॥ २१॥= ए॥ रु॥ १०८ सु॥ ७ माहे दर माहे रु॥ २१॥= ए॥ रु॥ १५१॥=

बरदास्त करोडी बाजगीर्दनचा परवाणा व जागीरीचा परवाणा करोडियास अवरंगाबादेहून एईल तेव्हां मागोन घेतले जाईल.

लेखांक ४४.

श्री १६२८ वैशाख शुद्ध ७.

माहाराज राजश्री पंत
स्वामीचे सेवेसीः–

अर्जदास सेवेसी सेरीकर नारायणजी देसमुख जगथाप कसबा व कर्यात सासवड दोनहि कर जोडून साष्टांग दंडवत विनंति सुा सीत मया अलफ साहेबाचे नेक नजरेकरून सेरीकराचे वर्तमान ताा छ ५ माहे मोहरम पावेतो यथास्तित असे हकीकत आपण व राहूजी पाटिल व मालजी पाा ऐसे पुरंधरास वसूल रुजू करावयास गेलो तेथे चिंतो महादेऊ इही किलेदाराची निशा करून आह्मावरी तुफान केले की पहिली खंडणी केली ते रद आहे आपला तनखा आठ हजार भरून घेणे ऐसे किलेदारास सांगोन आह्मा अवघियास कैदेत घातले आणि आम्हास राजकारण लाविले की तुह्मी ऐसे सांगणे की आपले वडिल पूर्वी कुलकर्णी होते ऐसे देवलांत सिरोन बोला त्यास आह्मी विचार केला की हा घरे बुडवावयास गावावरी उठला आहे ए समई गाव वाचववायाच्या मतलबा सारिखे बोलोन गावास जावे त्यास देवलात सिरोन राहूजी पाटलाने माल घेऊन बोलिला की आत्रिया आधी आमचे वडिल ह्मणत होते की पुरंधेरे गावांत होते त्यास मागती चिंतो महादेऊ याणी देउलातून निघालिया उपरि अह्मास पनास तोपची मोकल देऊन गडावरी नेऊन मागती हुनरवंदी करून आमचे माथा तीन हजार रुा खंडणी ठेविली त्यास चिंतोपंतास ह्मटले की आजी गैरहंगाम पहिलेच खंडणी होऊन गेली मागती खंडणी बोलिली नाही तथापि तुह्मी आह्मास कुलकर्णाबदल आडवून गोही करवितोस ते हि केली मागती आमचे सिरी टका ठेविता हे बरे नव्हे त्यास आह्मी बल धरिले की आमच्या गरदाना मारूत बंदीखाना कबूल करून कतबा केला मालजी पाटिल भेला टका कबूल केला कतबा लेहून दिल्हा त्यास चिंतोपती हुनरवंदी केली की गावात टका वसूल होईना आपण हजार रुपये गांवीचे हातीचे देऊन त्यास आह्मास तश्रीफा देऊ लागला त्यास आह्मी कबूल केल्या × × × त तेव्हा गावात एऊन तश्रीफा × × × ला ते समई तश्रीफा द्यावयास ×××

केला त्या तो होडगे तीन हजार रुा खंडणी तुह्मी केली ते रुा देणे किलेदार जमान आहे माझी जमानत उगवा ऐसे बोलो लागला मग तश्रीफा घेतल्यावरी महजर त्याणे आपल्या चौघा × × × महजर केला त्यास सिका करावया लागला तेव्हा निदान मांडिले सिका × × × स आपण माघारे घेतले की हुजूरापासी पुरंधरे खोटे जाले असता × × सिका केलिया आपले गर्दनेवर एईल त्यास ह्मटले की तुह्मास कोठ पाहाव × × अवघिया भावानी व आपण विचार केला की याणे आमचे सिरी हडोगे × × × रुा ठेविले त्यामधे हजार वसूल × × दोन हजार रुपयाचे दिवाणात अवघे भाऊ देऊन मुदती फुरसती घेऊन तेव्हा आठा दिवसा × × प्रा मुदती केली आणि दोन हजार रुा × × लिहून दिल्हे की चौघे भाऊ आह्मी देऊ त्यावरी सिका करावयास फडास आपला धाकटा भाऊ सुलतानजी पाठविला त्यास सुलतानजीपासून खतावरी × × × घेतली आणि आपला भाऊ याजपासून घरी महजर केला होता त्यावरी सिका तेच समई करून घेतला हे आपणास कांहीं ठावके नाही त्यास चिंतोपंत गडास जाता रा नारो त्रिमळ सभासद यांसि भेटीस बोलाऊन सांगितले की आपण महजरावर सिका घेतला तुह्मी आमचे हातीचे राजश्री पंतास निर्णूक करून लेहा तेव्हां नारोपंती चिंतोपंत गेलियावरी आपणाजवळी पुसिले की तुह्मी दोन हजार रुा मुदतीवार लिखत लेहून दिल्हे आणि महजरावरी सिका काय बदल केला त्यास हे आपणास ठावके नाही व आपण ते समई फडास हि गेलो नाही झाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे यामधे आमचा गुन्हा काही नाही साहेबी आपली वर्तणूक जे आहे ते राजश्री नारोपंतास पुसिले पाहिजे या कुचिद्यामधे जे असतील त्यास साहेब इनसाफ करून ज्याचा गुन्हा असेल त्यास नतीजा द्यावयास साहेब धणी आहेत वरकड आमचे वाडवडील सांगत गेले आहेत की आत्रे पाच सात पिढिया वतन खात आहेत हे वतन खात आहेत या पूर्वी गिधवे कुलकर्णी होता तो निपुत्रिक जाला ते समई त्यापासून कुलकर्ण हे करितात हे गोष्टीस आह्मी चुकून तरी गुन्हेगार चिंतो माहादेऊ किलेदारापासी चाकरी करून आह्मास नाना प्रकारी आटितो पिटितो हे साहेबीस आमचा इलाज नाही जाल्हे वर्तमान सेवेसी लिहिले आहे यात साहेब धणी मायबाप आहेत सेवेसी श्रुत होए हे अर्जदास.

लेखांक ४५.

श्री. १६२८ अधिकज्येष्ठ वद्य ८

दा। बे॥ राहूजी पाटिल जगथाप मोकदम कसबे सासवड सुहुरसन सीत मया अलफ कारणे साहेबाचे सेवेसी लेहून दिल्हा कतबा ऐसा. जे आपण व नारायणजी

देसमुख व मालजी पाटिल ऐसे तिघजण चिंतो माहादेऊ याचे भेटीस हिसेवा-बद्दल पुरंधरास गेलो होतो त्यास चिंतो माहादेऊ याणे गडावरी च्यार रोज आंधारीमधे अटकेत ठेविले आणि कसबा जाहागीर आहे तनखा भरून देणे ऐसे दबाऊन साहा हजार रुपयाचा कतबा लेहून घेतला व आपली कुलकर्णाची गोही द्याल तरी सदरहू पैकियाची सोडी मोकल करीन ऐसे बोलिला त्यावरून मालजी पाटिल आपणास बोलिला की प्रसंगावरी नजर देऊन गोही देणे ऐसे बोलिला त्यावरून आपण मालजीच्या बोले चिंतोपंताची कुलकर्णाची गोही दिल्ही आहे *त्यापण राजीपणे त्याची गोही दिल्ही असेल तरी गुन्हेगार असो मालजी पाटिलाच्या बोले गोही दिल्ही व त्याच्या कागदावरी सिका नारायणजी देसमुख करीत नव्हता परंतु मालजीच्याच बोले कागदावरी सिकाहि करून दिल्हा आहे हा कतबा सही

साक्ष

गोविंद माहादेऊ देसकुलकर्णी
प्रा। वाई १
अर्जोजी घोडा मोकदम
मौजे चिखलगाऊ ता। खेड १

चिंतो माहादेऊ देसकुलकर्णी
प्रा। सिरवल १
नारो त्रिमल देसकुलकर्णी
ता। गुंजण मावल १
बापूजी माली मोकदम मौजे
नायगाऊ प्रा। सिरवल १

तेरीख २१ माहे सफर

लेखांक ४६.

श्रीशंकर. १६२९ कार्तिक वद्य ३.

स्वस्ति श्री शिवराज्याभिषेक शके ३४ सर्वजित नाम सवछरे कार्तिक बहुल तृतीया मंदवासरे क्षेत्रिय कुलावतस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामि यांनिं म॥ मेघ-शाम विसाजी देसपांडे व म॥ मुकुंद कान्हो देशपांडे प्र॥ पुणें यांसि आज्ञा केली ऐसी जें तुमचे विशई राजश्री रखमाजी यसवंतराऊ अत्रे तुमचे गुमास्ते यानिं अह-मदनगरचे मुकामी विनंति केली प्रा मजकूरचे देशपांडिये पुरातन स्वामीचे सेवक आहेत हाली हि सेवेसी यावयाचे उमेदवार आहेत यांसि अभयपत्र सादर केले पाहिजे ह्मणउनु कितेक प्रकारें विनंति केली त्यावरून स्वामिं तुह्मावर कृपाळ होउनु अभयपत्र सादर केले असे तर तुह्मी कोण्हेविशई शकअंदेशा न धरिता बेशक

* त्या+आपण=त्यापण.

होउनु सुखरूप राहणें स्वामी मजली दर मजली पुढें येतात तर तुह्मीं भीमातीरास अगोधर दर्शनास येणें दर्शन जालियावर तुमचें वर्तमान मनास आणून पारपत्य तुमचे मुद्देमाफीक करून देणें ते दिल्हे जाईल अभय असे छ १६ साबान.

लेखांक ४७.

श्री. १६३२।१६३३.

तकरीरकर्ते तान्हाजी बिन माऊजी जगथाप मोकदम मौजे बेलसर प॥ सासवड सु॥ इहिदे असर मया अलफ. साहेबाचे सेवेसी तकरीर लेहोन दिल्हा ऐसा जे साहेबी हुजूर बोलाऊन हुकूम फर्माविला की गरुडाचा व तुझा मोकदमीचा कथळा लागला आहे तर तू आपला करीना लेहोन देणे ह्मणोन रजा फर्माविली तर आपण पिढी दर पिढी सात पुरुशपावेतो मोकदमी करीत आलो आहो. त्यास आपला मूळपुरुश होनाजी जगथाप त्याचा लेक माऊजी त्याचा लेक मालजी त्याचा लेक नासोजी त्याचा लेक बालोजी त्याचा लेक भाऊजी त्याचा लेक आपण तान्हाजी. एणेप्रमाणे मोकदमी मौजे मजकुरीसी करीत असता नरसोजी आपला पणजा मोकदमी करीत असता संभाजी गरूड याणे पुणियामधे मिरासाहेब होता त्यापासी जाऊन फिर्याद जाला की, मौजे बेलसरची मोकदमी आपली आहें. नरसोजी बळेंच खातो त्याजवरून नरसोजीस तलब करून पुणियास नेले आणि संभाजी गरूड यास हुकूम फर्माविला की तुझा इनसाफ गोतावर टाकिला आहे; गोतात जाणे. त्यावर संभाजी बोलिला की आपण गोतास रजावंद नाही, साहेबी आपणास दिव्य दिल्हे पाहिजे. त्यावरून प॥ सासवड येथील देशमुखदेशपांडियास हुकूम केला की मौजेमजकुरास जाऊन पांढरीवर संभाजी गरूड यापासून दिव्य घेणे. त्यावरून देखमुखदेशपांडे प॥ मजकूर पांढरीस एऊन श्री सिधेस्वर देव यासंनिध संभाजी गरूड यापासून दिव्य करविले. संभाजी खोटा जाला. त्याउपरि आपण मोकदमी चालवीत असता माहाराज राजश्री छत्रपति स्वामी थोरले कैलासवासी याजपासी हरवाजी गरूड जाऊन ह्याळ जाला. त्यावरून माहाराजस्वामीनी बाजी घोलप हवालदार किले पुरंधर यास हुकूम केला की हरवाजी गरूड याचा इनसाफ करणे त्यावरून बाजी घोलप यांणी आपला बाप माऊजी प॥ यास किलेमजकुरास बोलाऊन भोंवर गावीच्या सडी व समाकुल पांढरीस गोही मनास आणून मनसुफी केली हरवाजी गरूड खोटा जाला ते मनसुफीचे कागद आपणापासी होते ते माधवराउ किलेदार अजमगड तांब्राच्या निसबतीने आला त्याणे

गाव लुटिला ते समई कागदपत्र होते ते गेले अलीकडे गोंदजी गरूड राजश्री जाधवराऊ सेनापती याकडे लस्करांत चाकर राहुन जोरावारीने इनसाफ न करिता कागदपत्र करून घेऊन आले, निमे मोकदमी खात आहे. एणेप्रमाणे आपला करीना आहे साहेबी सेरीकरासी बरहक इनसाफ करावया हुकूम फर्माविला पाहिजे. हा "करीना लेहोन दिल्हा सही

लेखांक ४८.

श्री. १६३६ फाल्गुन वद्य ११.

॥छ म॥ अनाम देशमुख व देशकुलकर्णी प्र॥ पुणे यांसि नारो शंकर सचिव सु॥ खमस अशर मया अलफ. ठाणेमजकुरीची स्वारी मौजे भावली त॥ मुठेखोरे एथे आली त्याणी गाव गाव हि लुटिला व फलटणकर वाणी मार्गे एत होते ते-हि लुटिले व गडीच्या घेराची गुरें ४० चाळी गाऱ्हाचे रानातून नेली आहेत ऐसियासि ठाणाचा कारबार नेहमी असोन त्याणी ऐसी धामधूम करावी हे गोष्टी बरी नाही भावलीकडे बाकी होती तरी घेत घेत घ्यावी होती आजी गैरहंगामी स्वारी पाठऊन गाव लुटिला वरकड मुलकास दहशत घालून कुल गाव उठविले हे गोष्टी कोण केली आहे याउपरि तुह्मी त्यांस सांगोन भावलीची वस्तभाव परतोन देवणे व घेराची गुरे नेली आहेत ते आणावयास शंकराजी पायगुडे पाठविले आहेत तरी गडकरियाची गुरे देवणे व बकाल लुटिले आहेत त्यामुळे मार्ग पडिला याकरिता त्यांची बिशाद देवणे एविसी अंतर पडो न देणे. छ २४ रबिलोवल पै॥ छ २६ रबिलोवल

लेखांक ४९.

१६३८ आश्विन वद्य १३.

तकरीरकर्दे मल्हारभट काळे ग्राम रुगवेदी ब्राह्मण का॥ पुणे सु॥ सन हजार ११२५ कारणे जे राजग्रहीचे व देशमुख व देशपांडिये व व्यापारी व रुगवेदी व भिक्षुक व उदमी रुगवेदीयांचे घरीचे उपाधेपण व जोतिष व अस्टाधिकार + + + + + जो ज्याचा उपाध्या त्याचे आहेत ज्याचा उपाध्या हाजीर नसेल त्याचे उपाधेपण व जोतिष व अस्टाधिकार धर्माधिकारी व अस्टघरीयाचे आहे आपण खात आलो आहो ए गोस्टीस अन्यथा असेल तरी दिवाणचे अन्याई असो हे तकरीर लिहिली सही.

तेरीख २६ सवाल

लेखांक ५०.

श्री. १६४१ माघवद्य ८.

६९ म॥ अनाम देशमुख व देशपांडे प्र॥ पुणे यांसि बालाजी विश्वनाथ प्रधान सु॥ अशरैन मया अलफ राघो बाबाजी व माहादाजी बाबाजी काले यानी मौजे वालकी त॥ सांडस प्र॥ मार येथील कुलकर्ण व जोतिश विकत घेतले आणि हुजूर सेरणीचा निर्वाह करून दुमालेपत्र करून घेतले नाही ह्मणऊन हुजूर विदित जाले त्यावरून मौजेमजकूरचे मोकदम व राघो बाबाजी काले यांस तलब करून मनास आणितां गुणाजी बिन कृष्णाजी व भिवजी बिन जावजी पाटिल मोकदम याने विदित केले की आपणावरी तान्हाजी व नेवाजी घवे एजुर्वेदी कुलकर्णी याचे जमानती बाबती आठसे रुपये आपणावरी पडिले त्यास तान्हाजीचे बुडाले पैके द्यावयासि कोणी त्याचे नाही ह्मणऊन आपण राघो बाबाजी काले यासि कुलकर्ण व जोतिश विकत देऊन पैकियाचे लिगाड वारिले आहे. साहेबी मनासि आणून सेरणीचा निर्वाह करून कुलकर्ण-व-जोतिष-वतनाचा महजर व दुमालेपत्र करून द्यावयासि आज्ञा केली पाहिजे ह्मणऊन विदित केले. त्यावरून राघो बाबाजी काले याकडे सेरणीची खंडणी रुपये ४५२ च्यारीसे बावन रुपये निर्वाह केला आहे गोताचा महजर जाला पाहिजे याकरितां हे पत्र तुह्मास सादर केले असे तरी चौकसीने मनासि आणून गोताचा महजर करून देणे आणि महजर व राघो बाबाजी काले यास हुजूर पाठऊन देणे मनासि आणून दुमालेपत्र करून दिल्हे जाईल सदरहू सेरणीची बेरीज स्वराज्य व मोगलाई व सरदेशमुखी साहोत्रा देखील करार केली असे छ २१ रबिलाखर प॥ हुजूर सुरू सूद

लेखांक ५१.

वीटल. १६४२.

दर्यो बै॥ मोकदम मौजे देहू त॥ हवेली प्र॥ पुने स॥ ११३० साहेबाचे बांदगीस कतबा लेहून दिधला ऐसा जे सटवोजी व बालोजी व॥ चापसेट सेटे यास आपण हाजीरजमान असो सबब मौजे म॥र श्री आहे त्यास इनाम सेटे मजकुराच्या मिरासीच्या सेतात कास मन ।॥ साडे सात मो बिघे १५ पंधरा आहेत त्याची कीर्द श्री नारोबा गोसावी करऊन भोगवटा श्रीच्या खर्चास करीत आले असतां दरमियान सेटिया गोसावियासी भांडो लागला की आपल्या थलांत सेत इनाम नाही त्यावरून साहेबी मौजेमजकुरी मुकाम करून समाकुल पांढरीच्या मुखे करीना मनास आनिला श्रीचे इनाम खरेखुरे जालेयाउपरि सेटियास भांडा-

वयास दरकार नाही. गावामधे कीर्द करून सुखरूप असावे ह्मनऊन जमान मागितला त्यांवरून आपन हाजीरजमान जालो असो जाए पले तर सेटीमजकुरास हाजीर करून नाही तर याचा जाब करून ह्या कतबा सही

नि॥ नागर वि॥ कुलकर्नी मौजे म॥र

लेखांक ५२.

श्री. १६५० आश्विन वद्य ३.

श्रीमत् माहाराज राजश्री नाना स्वामींचे सेवेसी

विनती सेवक तान्हाजी सोमनाथ साष्टांग नमस्कार स्वामीचे कृपेकरून ता॥ छ १७ माहे रबिलावलपर्यंत सेवकाचें वर्तमान यथास्तित असे. विशेष–राजश्री आपास पत्र पाठविले तें उभयतास निवेदन करून उत्तर पाठविलें आहे. सांप्रत दरबारचें वर्तमान तरी रा॥ आपाची स्वारीस पूर्वी जावयाची बोली होती प्रस्तुत घालमेल जाली आहे खासा राव जाणार आहेत एक बोली की गुजरातप्रातें जावें एक बोली की कर्नाटकप्रांतें जावें असे दोन विचार आहेत अद्यापि सिद्धांत जाहाला नाहीं. राजश्री आंबाजीपंत तात्या पूर्वीं बागनीस राजदर्शनास घेऊन गेले होते त्याचे राजदर्शन करून आले. मागती छ १५ रोजी मंगळवारीं दीड प्रहर रात्रीं रायाचा राजश्रीपासी निरोप घ्यावयास सातारियास रवाना केले आहेत तेथोन निरोप घेऊन आलियाउपरी दोही विचारांतून एक विचार होईल. उदाजी पवार मंगळवारी बागणीस आले त्यास हि कर्नाटकप्रांतें बराबरी नेणार आहेत आश्विनबहुल सप्तमीचा मुहुर्त पाहिला आहे. परंतु सप्तमीचें जाणें होता दिसत नाहीं कदाचित् डेरे मात्र बाहेर देतील तर स्वामीनीं शुक्रवारी आलें पा॥ सेवेसी श्रुत जालें पा॥ सेवेसी विनंति बहुतेक प्रधानपंताचें प्रतिपदेपावेतों राहणें जालें हे विनंति

अपत्य सदाशिवानें चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार राजश्री तान्हाजीपंत यानीं वर्तमान लिहिलें आहे त्याजवरून सेवेसी निवेदन होईल हे विज्ञापना.

लेखांक ५३. तारीख १६५४ कार्तिक शुद्ध १३

खरीदीखत श्रीशके १६५४ परिधावी नाम संवत्सरे कार्तिक सुध त्रयोदसी सुक्रवार त दीनी खरीदी खत लिखीते खरीदकर्दे राणोजी बीन जनकोजी पाटील सींदे साकीन कन्हेरखेड समत कोरेगाऊ प्रांत वाई यासी फरोक्तकर्दे सूर्याजी बीन कोडाजीये बीन रखमाजी व त्रीबकजी बीन रखमाजी पाटील राजवडे मोकदम मौजे आऊध तर्फ हवेली प्रांत पुणे सु॥ सन सलास सलासैन मया व

अलफ सन हजार ११४२ कारणे खरीदखत लेहोन दिल्हे ऐसेजे आपणावर कर्ज बेमोबलग जाले फेडावयास ऐवज नाहीं व पेसजी वतनामुले कित्येक खाले पडिले यामुले आपली नातवानी बहुत झाली याकरितां आपण तुमच्या गला पडोन तुह्मास भाऊ केले आणि आपली मोकदमी मौजे मजकुरीची दरोबस्त आहे त्यापैकी निमे मोकदमीचे वतन खुष रजावंदीने विकत दिल्हे किमत रुपये करार करून सदरहु रुपये घेऊन निमे मोकदमीचे वतन तुह्मास विकत दिल्हे असे. याउपरी पांढरीची लावणीसंचणी तुह्मी व आपण करून सदरहु वृत्तीच्या मानापानाची वांटणी तुमची आमची एणेप्रमाणे बि॥

नाव नागर

राणोजी बिन जनकोजी पा॥ सिंदे निमे मोकदम	सूर्याजी बिन कोंडाजी एबिन रखमाजी व त्र्यंबकजी बिन रखमाजी पा॥ राजवडे निमे मोकदम

नि॥ नांगर

सीरपाउ दिवाणीचे पागोटी दोघानी बराबर घ्यावी व विडे बरोबर १

गावात कुळास कउल देणे अगर गावातील टिळा विडा आधी सिंदे मग राजवडे. १

अर्जदास व कागद हरकोण्हास लि॥ तो सिंदे व मागून राजवडे या पघतीने ल्याहावा १

नागपंचमीस वारुळाची पूजा आधी सिंदियाच्या बाइकानी करावी, मग राजवडीयाच्या बाइकानी करावी १

सिरलसेटी आधी राजवडे याचा पुढे चालावा, मागे सिंदियाचा चालऊन नदीत टाकावा १

गणेशचौथीचा गणेश पुढे राजवडीयाचा मागून सिंदियाचा १

जोसियाचे पातडेः—दसरा व गुडियाचा पाडिवा आधी सिंदे मग राजवडे दिवाळी व संक्रांती आधी राजवडे मग सिंदे.

दसरियाचे आपट पूजन दोघानी बराबर करावे १

संवत्सर प्रतिपदेस आढियाचे पूजन दोघानी बरोबर करावे १

घरठाणा वाडा. आपला मोकदमीचा आहे तो निमा उजवीकडे आपला आपले डावीकडे निमे तुह्मास दिल्हा १

पोलियाचे बैल बरोबर दोघाचे चालावे उजवीकडे सिंदे डावीकडे राजवडे १

दिवाळीचे ओवाळणे वाजंतर आधी सिंदे मग राजवडे १

दरनागराची पूजा दोघानी बरोबर करावी १
कुंभारानें मातीचे बैल पोलियाचे दिवसी दोघास दोनी बरोबर आणून द्यावे १
दसरियाचे वाजंतर आधी राजवडे मग सिंदे १
दसरियाचा घट श्रीचे देऊली बसेल त्याची पूजा दोघानी बरोबर करावी १

लेखांक ५४.

श्री.

यादी

शनवारपेठ उर्फ मूर्तजाबाद
१ सेटया तोडकर
१ माहाजन वेव्हारे
१ कुलकर्णी देशपांडे
३

रविवारपेठ उर्फ मलकापूर
१ सेटे
१ माहाजन वेव्हारे
१ कुलकर्णी मेडजोगी
३

पेठ शनवार उर्फ शाहापूर
० सेटे गणसेट याचे नकल
१ आउब कलवाडा माहाजन
कुळकर्णी माळी
२

मंगळवार ऊर्फ अस्तलपूर

पेठ बुधवार उर्फ मोहियाबाद
१ सेटे झांबरे पाटिल
१ कुलकर्णी राजरुष
१ माहाजन वेव्हारे
३

नि॥ मुजेरी
१ पाटील बिरादर
१ सुलतानजी
१ माहदजी
२

नि॥ माळी
४ मेहत्रे
१ ढोले
१ पांढरे
१ पारखी
१ लुकन
४

१ कुलकर्णी राजरुष

२ चौगुले

१ सेळके

१ बिबवे

२

३

नि॥ मोहतर्फा

१ सेटे होनप गोलक

१ कुलकर्णी ठकार

१ माहाजन वेव्हारे

१ ढवळी राणाई

४

१ भिकाजी ढवळा

१ कुलकर्णी माळी

६

बलुते

२ सुतार

१ भाबूड

१ डोरले

२

१ लोहार लागम

१ कुंभार

(१)—

(१)—

२

४

३ न्हावी

१ मगर

१ आढाव

१ अडके

३

१ गुरव

१ परीट घोलप

१ खंडू

१—

२

२ माहार व

१ चव्हाण

१ जावळे

१ दतोरे

३

१ चांभार
१ मांग शिवा व गंगराऊत
२ मुलाणे
  १ इमाम
  १—
  २
१ जोसी वेव्हारे

लेखांक ५५.

ताराज मुलुक होता ते वख्ती मुकासी साहेब मलिक नेबं व शाहाभाई खोजे सदरेस बैसोन देसमुख व देसपांडे मोख्तसर बारा गावीचे बोलाऊन पातशाही हुकूम वाचिला ते वख्ती बोलिले जे जागा जागा चारणकरू वाडे घालून बैसले आहेत त्यास बोलाऊन आणने. त्यावरून जे चारणकरू वाडे घालून होतें ते हाजीर जाले त्यास हुकूमप्रमाणे दिवाण बोलिले जे त्यास हुकुमाप्रमाणे वतन करून देऊन कीर्दी अबादानी करणे. ते वेळेस विठोजी व माहादजी गरूड उभे राहिले. अर्ज केला की आपणास वतन करून दिल्हे पाहिजे ह्मणौन अर्ज केला. त्यास देसमुख व देशकुलकर्णी यानी दिवाणास अर्ज करून बेलसर कर्यात सासवड येथील मोकदमीची सनद करून दिली. सिवधरा पेडोला घालून दिल्हा बारा बलुते मेळऊन गाव आबाद करून हकलाजिमा खाऊ लागले. यावर बहिरजी गरूड मोकदमी करीत होता तो ह्मातारा जाला. कसाला उरकेनासा जाला. याबदल माउजी माली व काउजी माली हे दोघे भाऊ मुतालीक ठेविले. बावाजी गरूड याचे लेक मलिक अंबर साहेबापासी चाकरी करीत होते ते जुंजी पडिले. खबर गावास आली ह्मणौन मालियानी दुखवटियाचे जेवण केले. ते वेळेस ४२ बेतालीस माणूस मारिले. आपण पळोन गेले. दरोडा पडिला ह्मणौन नाव केले. मारा जाला ह्मणौन गाव वोस जाला तेव्हा देसमुख व देसकुलकर्णी याणी कौल देऊन गावास आणिले. त्यावर विज्यापुरी संभाजी गरूड होता त्यास खबर कळली. तो तेथून गावास आला त्याणे पुसिले जे तुह्मी मुतालीक गावात असता मारा काय बदल जाला?, त्यास त्याणी फिरोन जाब दिल्हा की तुझा मुतालीक कोण? आपण खावंद आह्मो. त्या दिवसापासून वेव्हार लागला. मग त्यावर्त देसमुखापासी ठाणा गेले. तेथून मिरासाहेब पुणा होता त्याजवळी उभे राहिले. तेथून खुर्द खत घेऊन मौजे बेलसरचे पांढरीवर श्रीसिधेश्वरापुढे दिव्य केले. खरा जाला. हाती

पिसविया घालून श्रीच्या दरशनास जेजोरीस गेले. तेथून साकुर्डियावरून सिवरीस गेले. तेथे एक माहार व दोघे कुणबी घेतले व सदूभाई व मिराभाई बराबरी होते ऐसे सासवडास जाता वाटेस खलद्न्या रानांत चिचलियाजवळी मालियानी दबा धरून संभाजी गरूड यास मारिले. यावर कितेक दिवस वेव्हार राहिला. त्यावर विज्यापुरी याकूदखान होते त्याजवळी खंडोजी व काउजी गरूड उभे राहिले. त्यास माली गैरहाजीर जाला. यावर बाजी नाईक देसमुख व रामाजी त्रिमल देसपांडे कर्यात सासवड याणी हाती धरून गावास आणिले. त्यावर विल्हे करावी ती केली नाही त्यावर मौजे गाधडी उर्फ सिकारपूर तेथे गरूड उभे राहिले वेव्हार केला तेथे हि माली गैरहाजीर जाला. त्याजवर राजश्री छत्रपती स्वामी थोरले कैलासवासीचे कारकीर्दीस राजश्री बाजी घोलप व हवालदार किले पुरंधर व त्रिंबक गोपाल सुभेदार प्रा। पुणे यासनिध वेव्हार केला परंतु निवाडा जाला नाहीं. त्यावर कारकीर्दी मोगलाई जाली. तुलापुरास हजरत पातशाहा होते त्याचा हुकूम अमीन कर्डे व सासवड या दो माहालास एक होता त्यास आणून दिल्हा त्याणी जावजी माली जगथाप यास आणून करीना मनास आणावा तो जावजी माली गैरहाजीर जाला. त्यावर राजश्री संताजी घोरपडे सेनापती त्यापासी आपण जाऊन उभे राहिलो. सेनापतीनी रामाजी माली व मैसा माहार व देसमुख देसपांडे व पाटील कर्यात सासवड हे बोलाऊन आणून जमानती घेऊन गोत दिल्हे तेथून गैरहाजीर जाला त्यावर माउजी नाईक देसमुख व भगवंत कासी देशकुलकर्णी व फिरगोजी पाटील क॥ सासवड याणी हाती धरून आपणास क॥ मजकुरास आणिले परंतु विल्हे केली नाही. यावर राजश्री नरहर आपदेऊ सुभेदार प्रा। पुणे यापासी उभे राहिलो. परंतु निवाडा जाला नाही. त्यावर राजश्री राजाराम छत्रपती स्वामी यापासी जाऊन उभे राहिलो. त्याणी राजश्री संकराजी पंडित सचिव यास आज्ञा केली जे याचा निवाडा करणे. त्यास राजश्री सचिवपंतीं देसमुख-देशपांडे यांस हुजूर आणून करीना पुसिला आणि राजश्री बालाजी विश्वनाथ सुभेदार प्रा। पुणे यास आज्ञा केली. त्याणी समस्त गोत मेलऊन मनसुफी करीत होते. त्यावर तान्हाजी माली राजश्री पंतसचिव यापासी जाऊन फिर्याद जाला की साहेबी आपणापासी निवाडा करावा त्यावरून राजश्री सचिवपंती हुजूर बोलाऊन नेले देसमुखदेशपांडे व राजश्री जाधवराऊ सेनापती व राजश्री मल्हारराऊ बाबाजी व बजाजी नाईक निंबालकर व गोत ऐसे बैसोन गोताच्या गला बेलाच्या माला व भंडार व तुलसी माथा ठेऊन पुसिले. त्यास गोताने दोघापासून राजीनामे व तकरीरा घेऊन जमान घेऊन मनास आणून गोताने सांगितले की गरूड खरा

आहे यापासी मलिक अंबर याची कारकीर्दीस मुलुक वैरान जाला होता त्या समईची सनद आहे व मारा हि खरा जाला आहे व झगडा हि साथत आला आहे ह्मणौन सांगितले. त्यावरून पांढरी व काली दो ठाई करून तश्रीफ देऊन गावास पाठविले. त्यावर अजमगडी खान सैद किलेदार याणे बोलाऊन नेऊन नारायणपेठेस करीना मनास आणून निवाडा केला. देसमुखदेशपांडे व गोत मेलऊन हकीकत मनास आणिली तेथें खरे जालो. त्याणी पांढरी व काली दो ठाई करून दिली आणि कौल देऊन सिरपाव दोघास देऊन मौजेमजकुरास पाठविले. त्यावर राजश्री पंतअमात्यास जिल्हे जाली ते समई हरदोजणास बोलाऊन नेऊन निवाडपत्र मनास आणिले व त्याचे तर्फेने रामाजी बावाजी सुभेदार प्रा। पुणे होते त्याणी मनास आणून राजश्री अमात्यपंताचें पत्र व सिरपाव देऊन रवाना केले. यावर प्रतापगडीचे मुकामी महाराज राजश्री शिवाजी राजे छत्रपती याजपासी माली जाऊन उभे राहिले त्यावरून आपणास तलब करून हुजूर नेले मग राजश्री स्वामीनी तान्हाजी माली यास हुजूर नेऊन आपला व मालियाचा करीना मनास आणून माली खोटा जाला, आपली पत्रे मनास आणून मनसुफी करून आपणास पत्र करून दिल्हे. तश्रीफ देऊन गावास रवाना केले. मग राजश्री बाळाजी विश्वनाथ व खंडेराऊ दाभाडे यास आज्ञा केली की काली पांढरी दो ठाई वाटून देणे. त्यावरून देसमुख व देशपांडे व गोत व खानचंद किलेदार याचा अमीन मेलऊन राजीनामे तकरीरा घेऊन गाव दो ठाई वाटून दिल्हा. यावर महाराज राजश्री शाहूराजे छत्रपती स्वामी याणी करीना मनास आणून पुर्वील पत्रे मनास आणून आपले पत्र करून दिल्हे. आपला करीना ऐसा आहे हे तकरीर केली सही.

लेखांक ५६.

+ + + + + + + + + सिरपावं काजकीर्द माहाराज छत्रपति व बाजीराव व चिमाजीआपा ता।

मौजे वरवड ता। पाटस गाव स। मोकासा मातुश्री राधाबाई यास यांचे तरफेनें कमावीस रा। नारो बाबाजी ते वेळेस फिरंगोजी पा। व बाबाजी पा। देईकर यांस सिरपावं.

मौजे खडकी ता। पाटस रा। बापूजीपंत नाना दि। पेशवे याच्या वेळेस खंडणीस मकाजी पा। काके यानीं यावें सिरपावं द्यावा.

मौजे सोनवडी हा गांवहि मोकासा मातुश्री राधाबाई पेशवी यास ते कमावीस नारो बाबाजी तेव्हां बाबाजी देईकर कारभार करीत होता हाली जयापा सिंदे मोकासा दरोबस्त हरबाजी पा। पोवार कुळकर्णी गटाणे मौजे दउंड

मौजे दहीठणे ता। पाटस माहाराज छत्रपति याणी दरोबस्त गांव मोकासा फतेसिंगबावास दिल्हा.

मौजे आठगांव तरफ पाठस निमे पाटिलकी वडीलपण माहाराज छत्रपति निमे दरेकर चौगुले च्यार होरे मोरे बाराते आगस्ते ए। सिरपावं ६ कुलकर्णी राज्यउपाध्ये.

मौजे सिरापूर पाटिलकी निमे रा। रघूजी भोसले आधीं सिरपावं या मागें सिरपावं माहाराज राजश्री छत्रपति माहाराज त्यांचे तरफेनें राजजी पा। ठोंबरा कारभार करीत होता रघूजी भोसले यांचे तरफेनें बापुजी भोसला होता व कुलकर्णी राज्योपाध्ये.

लेखांक ५७.

(श्री.

याद्री पेठ नारायणपूर किले पुरंधर एथील सेटियापासी कागद साधनाचे आहेत एणेप्रमाणें.).

वराता व पावत्या आहेत एणेप्रमाणें.

१ बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार यांची पावती माणकोजी बिन दतसेट सेट्यां याचे नावे सु। मया व अलफ ११०० या सालची रु। ५० पैकी रु। ४९ पोता जमा छ ५ जिल्हेजची सिक्यानसी आहे सेटेपणाचे सेरणीब। पावती आहे.

(५ राजद्वारचीं पत्रें.

१ राज्याभिषेक शके १० रुधिरोद्गारी संवत्सरे आश्विनबहुल द्वितीया गुरुवार दतसेटी सेटया याचे नावें कौल रयत जमा करून पेठेची आबादी करणें यांविसी वगैरे.

१ नबाब इमाम बिरदीखान किलेदार याचा गोपाळसेट व जाऊजी चौधरी यांचे नावें + + + या सालाचा यास वर्षें सन ११८५ पावेतों ११७.

१ कडतोजी बीन हिरोजी माहाजन व सेटिया याचे नावे ठाणेदाराचा सन सबैन अलफ १०७० या सालचा यास सन खमस समानीन मया व अलफ ११८५ या साल पावेतों वर्षें ११६

हिरोजी इंदलकर याचे कर्ज ब॥ बाकी वोढत आहे त्यापे॥ कोंडाजी दामोदर सबनीस दि॥ फुटनाईक यास ब॥ मु॥ चे ऐवजीं होन पातशाही १७ देविले असेत आदा करून जाब घेणे ह्मणौन सन अर्बा समानीन अलफ १०८४ छ १५ सवालची वरात सदरहू अन्वये.)

२ राज्याभिषेक शके १३ क्षयनाम संवत्सरे सन सबा समानीन अलफ १०८७ या सालच्या दतसेट सेटिया याचे नावे हिरोजी इंडलकर याचे कर्ज व॥ हमी गोपाळ सेट सेटिया हुजूरदफ्तरी वोढत आहे त्यापै॥ ह्मणोन.)

१ वैशाख शुद्ध द्वितीया भानुवासर ब॥ मु॥ मोरो भास्कर कारखाननीस किले सिहगड तकदमा होन प॥ १५ देविले असत आदा करणे पावल्याचा जाब घेणे या अन्वयें छ ३० जमादिलोवलची वरात.

१ वैशाख शुद्ध ६ गुरुवासरे यांत व्याजती तुझा चुलता गोपाळसेट असे लिहिले आहे ब॥ देणे वर्षासन त्र्यंबकदेव गोसांवी किले राजगड यांस तकदमा होन प॥ ७५ देविले ते आदा करून जाब घेणे याअन्वये छ ४ ज॥ खर्ची वरात.

२

३

(१ दामाजी रघुनाथ सरसुभेदार याचा दतसेटी बीन एलसेटीयाचे नावाचा सन समान समानैन अलफ १०८८ छ १६ जमादिलावलचा हकाविसी आहे यास सन खमस समानीन (मया व अलफ) पावेतों वर्षें ९७.

१ नारो यादव यांचा मोघम सेटे माहजन यांचे नावें सन तिसैन अलफ १०९० छ ९ साबानचा त्यांत अन्वय की मानाजी बांधा याचे सेटेपण नसतां त्याणें कागद व तश्रीफ मोगलाचे तर्फेने घेतली या निमित्य त्याजला गुन्हेगारीचा खंड रु॥ ३०० केला आणि हुजूर सालगु॥ वसूल घेतला असे त्यास तुह्मी एक रुका न देणे सुखरूप पेठेवरी राहुन उदीमव्यवसाय करीत जाणे या अन्वये त्यास खमस समानीन मया व अलफ या साल पावेतों वर्षें ९५.)

रू १ मोघम कौल बावाजी बिन गोपाळसेट याचें नावें सन जलूसवाला सन १० दाहा यांतील इस्तावियाचा आहे त्यास सन फसली सन ११९४ पावेतों जलुसवाला सन १३८ एकसे अडतीस होतात त्याची वर्षें ९५ याजवरून सदरहू कागदास जलुसी सनानें वर्षें ११९.

(२ राज्याभिषेक शके १३ क्षयनाम संवत्सरे सन सबा समानीन अलफ १०८७ या सालची गोपाळसेट सेटया याचे नावें वराता त्यांत अन्वय कीं हिरोजी इंडलकर याज बा॥ कर्ज बा॥ हमी तुजकडे हुजूर दफ्तरी वोढत आहे त्यापै॥ या अन्वये.

१ माघ वद्य ६ भानुवासरे लोक दि॥ दंडपाणी सेवक याजकडील तकदमा होन पा॥ १०० देविले असेत सदरहू ऐवज हुजूर पोहचऊन देणे या कामा बा॥ नफर दि॥ दंडपाणी होत.

२ तुकोजी सिंदा जथे संक्राजी नाईक पवार.

२ लंखमाजी आउध जथे हरवाजी नाईक सिवदडा.

—
४

एकून होन ४ देविले असेत सदप्राो आदा करणे या अन्वये छ ४ रबिलावलची वरात.

१ माघ बहुल ११ मंदवासर बदल देणें रदकर्ज नरससेट उधाप्पा बकाल पेठ पांचाड कर्ज जमा पेठा हाय नजीक रायगड बा॥ बखैर कारकून पेठ मार छ २२ जमादिलावल तकदमा होन पा॥ ६० देविले असेत आदा करणे पावलियाचे जाब घेणे या अन्वये छ २४ जमादिलावलची वरात.

—
५

(२ कौलनामा ह्मणोन मोघम जनकोजी पा॥ व दतसेट यांचे नावें सन फसली १०९९ व सन जलुसी सन ३३ छ १२ जिल्हेजचा आहे त्यास सन हाली फसली ११९४ पावेतों वर्षें ९५ व यावरून फसली सन ११९४ पावेतों जलुसी सन ९५ होतात.

१ मोघम कौल दतसेट सेटिया याचें नावें सन 1101 यांतील आहे त्यांत अन्वय कीं तुझे बाबे मोरो पंडित गुमास्ते मालोजी नरसिंगराव व गोविंदराव सितोळे देशमुख प्रा॥ पुणें एऊन विदित केलें कीं पेठ मजकूरचा कदीम सेटिया दतसेटी आहे ऐसियास दरम्यान सिवसेटी व कृष्णाजी बांधा माहजन पेठमारी सेटेपणास भांडत आहे ह्मणोन बराये मालुमाती खातेरेस आणून कौल दिल्हा असे तरी तूं आपली खातरजमा राखोन हुजूर एऊन मुलाजमाती करणे हक असेल तेणेप्राो विल्हे लाऊन या अन्वयें छ २१ साबानचा आहे त्यास सन ११९४ पावेतो वर्षें ९३.

१ बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार याचा सन मया व आलफ या सालचा गौरोजी सेटिया याचे नावें त्यांत अन्वय कीं तुवा भेटीस

३ पेशवे यांच्या वराता व पावत्या.

१ मोरो त्रिमळ व नारो नीळकंठ याचा गोपाळसेट सेट्या याच्या नावे सन खमस सबैन १०७४ या सालचा त्यांत अन्वय कीं तुझा सेटेपणाचा निवाडा सेटेपण तुज करार करून सहजर तुजला दिल्हा याबद्दल संभाजीराजे साहेबास भेटी ठेविली होन ५ ठेविली ते मुकाम रायगडचे मोता जमा छ २५ जिल्हेज या अन्वये.

१ मोरो त्रिमळ व मोरो नीळकंठ यांचे गोपाळसेट सेटया याच्या नावे त्यांत अन्वय कीं तुझा सेटे-पणाचा निवाडा करून सेटेपण पेठमजकूर हे तुझें तुज दुमाला महजर करून दिल्हा त्याजबा। सेरणी होन पा। १५० तुज खंड केला त्यापै। पेस्तर साली द्यावे ह्मणऊन तहकूब केले होन ५० पन्नास बाकी साल मजकुरी वसूल द्यावे होन १०० हुजूर दिल्हे ते जमा पोते

होन पा।	रु।
५०	१८७।

एकूण पन्नास होन व एकसे साडे सत्याइसी रु। जमा पोते छ २५ जिल्हेज या अन्वये पावती सन खमस अलफ १०७४ या सालची.

यावयास मनांत दहशत धरिली ह्मणोन गोविंद कुलकर्णी एथे एऊन सांगितले तरी तूं कोणें बाबें शक न धरितां भेटीस येणें तुझा मुद्दा असेल तेणेंप्रों पारपत्य होईल एविसी कौल असे या अन्वये छ ९ जमादिलावलचा आहे त्यास हाली सन खमस समानीन मया व अलफ या साल-पावेतों वर्षें ८५.

रू सिवाजी माहाराज यांचा गोपाळ-सेट सेटी यांच्या नावें सन खमस सबैन अलफ १०७५ या सालचा यांत अन्वय कीं जाऊसेटी बिन कडतसेटी माहाजन पेठ मार फिर्यादी जाला जे सेटेपण पेशजी बाजी बिन मावसेटी चालवीत होता तो मयत जाला आपण चालऊं लागलों व मलिकअंबरी सनद आपणापासी आहे आणि हाली + + + + + ला आहे तरी निवाडा केला पाहिजे ह्मणोन त्यावरून मनास आणितां मावसेटी सेटेपण करीत होता तो तुझा चुलता त्याणे कमावीस केली मग तुझा पुतन्या तुकसेटी बिन रूपसेटी यानें सेटेपण केले त्यावर तूं सेटेपण करतोस जावसेटीस सेटेपणास निसबती नाही चाकरी करीत आला + + + + पणाची केली व मलिकअंबराची

१ नीळकंठ मोरेश्वर याचे दतसेट सेटया याचे नावें त्यांत अन्वय की तुजकडे हरकी बा। इमारती किले पुरंधर बा। सेरणी बाकी वोढत आहे त्यापै। देणे बा। मु। शामजी केशव दफ्तरदार किले अहिवंत-गड होन पा। २० वीस आदा करणे पावलियाचा कागद घेणे छ ९ जिलकाद सन सीत समानीन अलफ १०८६ या सालची सद-रहू अन्वये बरात.

३

१ पावती दतसेट सेट्या याच्या नावे कोंडाजी भोले सरहवालदार इमा-रती किले पुरंधर याणे लेहून दिल्ही आहे ते सन सबा समानीन अलफ १०८७ या सालची त्यांत अन्वय.

१ छ २९ रबिलावलची आहे त्यांत अन्वय की तुझें व जावसेटी बाधा याचें सेटेपणाचें भांडण होतें त्याची मनसुबी रा नेतोजी राजे पालकर हवालदार किले मजकूर याणी केली सेटेपण तुझें तुज देऊन सेरणी होन पन्नास बांधिली ते जमा धरून कारखाननिसीकडे बाकी वोढत होती त्यावर सन अर्बामध्यें किला मोगलास दिल्हा त्यावरी राजश्री कैलासवासी स्वामीनी किला मोगलापासून सनद ह्मणतोस तेहि नाहीं मालु-माती + + राह जाली ते मामुरी करावयास आणिला आहे तेथें आपण सेटे व माहाजन लाविला आहे ते काही मनुसुबी नव्हे पेशजी नेतोजी पालकर यांपासी जाऊन उभा राहिलास तेव्हां निवाडा ऐसाच जाहाला आहे व इमाम बिर्दी किलेदार मोगलाचे कारकीर्दीस आला होता ते वख्तीं हि जाऊसेटी उभा राहिला तेव्हां हि ऐसाच + + + + हम-शाही गोत व भले लोकाचे मतें तैसेंच निवडलें की जावसेटीस निसबती नाहीं त्यावरून तुझे सेटेपण मिरास तुज मोकरार असे व तू व तुझी अवलाद मिरास सेटेपण पेठमजकूर देखील हक-लाजिमा बरहुकूम भोगवटा व कमावीस करून खाऊन सेटेपणाची चाकरी व पेठमजकुरीची मामुरी करून असणे जावसेटीस काहीं निसबती नाही व तुज हाली सेरणी एकसाला होन दीडसे करार केले सालमजकुरी एकसे होन पेस्तर सालीं होन पन्नास ऐसें पोता दाखल करणें पेस्तर सेरणीस निसबती नाहीं कौल असे ह्मणोन या अन्वये यास वर्षें सन खमस समानीन मया व अलफ या सालपावेतों. ११०

९

घेतला त्यावर अनाजी दतो सुरनीस यानी बाकी मनास आणून छ १९ जिल्हेज सन खमसामध्यें सनद बाकीची चालती केली ते पन्नास होन बाकीस होते त्यावरी सन सीतामध्यें हुजूर दफ्तरीहून वरात चालविली बिता। होन.

३० बा। सनद राजाज्ञा बा। मु॥ नारो केशव दफ्तरदार फिलेहाय बा। सनद रा। पंतप्रधान.

२० शामजी केशव दफ्तरदार किले अहिवंतगड.

५०

एकूण पन्नास होन तुजकडे त्याचा वसून साल मजकुरी.

होन	रुपये	टके खुर्दा
१३	७७॥	१५४८६

सदर्हूप्रमाणें इमारत मजकुरी जमा जाले असत याअन्वये

० लग

१

१ दतसेट सेटया याच्या नावें बहिरो बाबाजी हवाले मोकदमी मौजे दौंडज ता॥ नीरथडी प्रा॥ पुर्णे याणें सन इहिदे समानीन अलफ १०८१ छ १० जमादिलावलची दिल्ही आहे त्यांत अन्वय की तुह्मांकडे राजश्री हिरोजी इंदलकर सुभेदार यांचे कर्ज आहे त्यानीं

१ कित्ता पावती राज्याभिषेक शक १३ प्रभव नाम संवत्सरे चैत्रशुद्ध प्रतिपदा गुरुवासर सन सबा समानीन अलफ १०८७ यास सन खमस समानीस मया व अलफ ११८५ या सालपावेतों वर्षे ९८ यांत अन्वय कीं दतसेट सेटिया यास आज्ञा ऐसी जे तुझा गोपाळसेट सेटिया याजवर हिरोजी इंदलकर याचें कर्ज होतें सबब की गोपाळसेट सेटिया व जाऊजी बांधा माहाजन पेठमजकूर या हरदोजणां मध्यें सेटेपणाबद्दल करकशा लागला होता ह्मणोन राजश्री स्वामीपासी मनसुभी होऊन सेटेपणास दूर जाला आपले सेटेपण आपले संभाळीं केले गोपाळजी सेटियास हरकी होन पा। १५० माथा ठेविले त्याचा वसूल द्यावयास हिरोजी इंदलकर सुभेदार माजी इमारती किले रायगड याचें कर्ज घेतलें होन पा। १५५ ते देणे राहिले त्यास हिरोजी इंदलकरास दस्त केलें ते समई त्याचे कागद सांपडले त्यामध्यें आपले नावें बनाय गोपाळसेट सेटिया ह्मणोन कर्ज होन पा।.

ब॥ खत	खेरीज कतबा
छ २२ जिल्हेज	छ २२ जिल्हेज
सन खमस	सन खमस
सबैन होन	सबैन
पा॥ १००	५५

आह्मास पैके देविले आहेत त्यास तुह्मी आह्मास होन ¶॥ ३५ पसतीस व रु॥ ५ पांच दिल्हे ते पावले आह्मी अखेरसालीं रायगडास जाऊन कर्जपैकीं मजुरा देऊ या अन्वये.

११

सदर्हू होन मुदल त्यास व्याज दर होनास दर माहे रुके ·॥· प्रो त्यावर चौ महिनियानी छ २६ रबिलाखर सन सीत सबैनामध्यें हिरोजीस दिल्हे होन ५०॥ पुढें द्यावयास अवकात नाही सबब सन तिसा त॥ इहिदे वसूल दिल्हे होन ४२ दिल्हे त्यावरी हिरोजी दस्त जाला कर्ज दिवाणांत लागले ह्मणौन हुजूर विनंति केली की आपली विल्हे केली पाहिजे. त्यावरून स्वामी कृपाळु होऊन तुझा हिसेब मनास आणून विल्हे केली बित॥ ऐन मुदल व व्याज मिळोन १००६॥–।≈ याचा वसूल तुझ्यानें देववेना ह्मणौन चौघांनीं मनास आणून मख्ता केला होन ३५० पैकी वसूल हिरोजीस दिल्हे होन ९२॥ व सन अर्बा समानीन होन ३६॥।·÷ व सन खमस समानीन होन १० व सबा समानीन २१०॥।≡८÷ ए॥ होन २५० सदर्हु प्रो ३५० होन तुजपासून घेतले असत हिरोजीचे कर्ज तुवा फारीख केल तुवा पेठेची सेटेपणाची चाकरी करून सुखरूप राहाणें या अन्वये छ २९ रबिलाखरची पावती सिक्की निळकंठ मोरेश्वर यांची १

कागद २१

किता कागद

सन खमस सबैन अलफ १०७५ सालचें यास सन खमस समानीन मया व अलफ ११८५ पावेतो वर्षे ११० यांत अन्वय छ २५ जिल्हेजचीं पत्रें.

बाजी घोलप हवालदार व कारकून किले पुरंधर यास मोरो त्रिमळ व नारो नीळकंठ याचा आहे त्यांत अन्वय कीं गोपाळसेट बिन नामसेट सेटिया याचा व जावसेटी महाजन याचा सेटेपणाबा। कजिया होता त्यास राजश्री साहेब किलेमजकूरचे मुकामी होते तेव्हां जावसेटी फिर्याद जाला की सेटेपण आपलें यावरी गोपाळसेटीस आणून गोत मेळऊन मनसुवी करितां सेटेपण गोपाळसेटीचें जालें जावसेटी उगाच लायेनी सेटेपणास झोंबतो त्याजला समंध नाहीं ऐसें जालें त्यावरून राजश्री साहेबी सेटेपण गोपाळसेटीचें गोपाळसेटीच्या दुमाला करून कौल दिल्हा असे तरी तुह्मी पेठमजकुरीचे सेटेपण गोपाळसेटीचे दुमाला सालाबाद चालत आलें आहे तेणेप्रमाणें दुमाला करणें जावसेटीस निसबती नाहीं त्यास दखल होऊं न देणें कौलप्रमाणें गोपाळसेटीस महजर करून देणें हकलाजिमा सालाबादप्रमाणें दुमाला करणें तालीक लेहून घेऊन असल गोपाळसेटीस परतोन देणें या अन्वयें. १

गौरोजी गायकवाड हवालदार व कारकून इमारती किले पुरंधर यांस मोरो त्रिमळ व नारो नीळकंठ यांचे बाजी घोलप हवालदार यास पत्र आहे तें बाद केलें आहे त्याप्रमाणेंच आहे दोन्ही पत्रांचा मजकूर एक आहे पत्र १.

बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार त्यांचा सिक्का गोल आहे त्यांत अक्षरें एणे प्रमाणें.

श्रीउमाकांत पदांभोजभजनास-समुन्नतेः॥ बाळाजीविश्वनाथस्य मुद्रा भद्रा विराजते ॥

मोर्तबांत अक्षरें

मोर्तब सूद

२

छ २५ जिल्हेजचें संभाजी राजे यांचें नांवें गौरोजी गायकवाड हवालदार व कारकून इमारती किलें पुरंधर यास आहे इ. इ. इ.

कित्ता कागद सन मया व अलफ ११०० यास सन खमस समानीन मया व अलफ या साला पावेतों वर्षें ८५ त्यांत अन्वय.

रामचंद्र नीळकंठ अमात्य याणी छ १५ जिलकादी बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार यास पत्र लिहिलें त्यांत अन्वय कीं बाबसेटी सेटिये बिन गोपाळसेटी सेटिये इ. इ. इ.

बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार व कारकून प्रा। पुणें व माहालानिहाय यांचें पत्र माणकोजी बिन दतसेटी सेटिया पेठ नारायणपूर ता। करेपटार यास आहे. त्यांत अन्वय कीं सालगुदस्ता सन तिसामध्यें राजश्री पंतसचीव यांचें आज्ञापत्र सुभाच्या नांवें सादर आहे तेथें आज्ञा कीं इ. इ. इ. छ ५ जिल्हेज, सन मया व अलफ.

लेखांक ५८.

श्री.

कुलकट कसबे सासवड येथील देशमुख व पाटिल जगथाप व कुलकर्णी व देशकुलकर्णी आत्रे निजामशाही कारकीर्दीस मलिक दादर हवालदार किले पुरंधर याचे बापास आवशाचा हवाला होता त्यांचे कारभारी लाखोपंत आत्रे व रायबेल पातशाहा बेदरचा त्याजपासी ज्यामत पाटिल बिन हऱ्या पाटिल चाकर होते तेव्हां शाहाची दाई होती तिला बारा गांव मोकासा होते तिणे ज्यामतपाटलास व लाखोपंताचे पुत्र विठलपंत यांस मलिक दादराबरोबर देऊन बारा गांवचा अंमल करावयास सांगितला त्याणी एक साल अंमल केला दुसरे सालीं दाईजवळ अर्ज करून वतन मागितलें तेव्हां दाई बोलिली कीं नजरेसिवाय वतन कसें होतें मग या दोघानीं दाईजवळ नजर अडीचशें होन करार करून देशमुखी व देशकुलकर्ण हीं दोघांनीं दोन वतनें करून घेऊन पातशाही फर्मान करून घेतलें आणि स्वार ठेऊन जबरदस्तीनें गांवावर चढाई केली गांव बितपसील.

मौजे खलद प्रांत पुणें १	मौजे कोढीत बुद्रुक प्रांत पुणें १
मौजे दियें प्रांत पुणें १	मौजे सासवड प्रांत पुणें १

मौजे बेलसर पो सुपें १	मौजे बाबुर्डी पो सुपें १
मौजे कारखेल पो सुपें १	मौजे माढवें पो सुपें १
मौजे काळोली पो सिरवळ १	मौजे रांक पो सिरवळ १
मौजे मोरवें पो सिरवळ १	मौजे पिंबुर्टी पो सिरवळ १

एकूण बारा गांवावर चढाई केली पैकीं मौजे मारवें व मौजे पिंबुर्टी हे दोन गांव हस्तगत जाले नाहींत बाकी दाहा गांव हस्तगत करून देशमुखीचा व देशकुलकर्णाचा अमल बसऊन मौजे संवत्सर प्रांत पुणें एथें आले तेव्हां उभयतांनीं विचार केला कीं या दाहा गांवांत एक कसबा असला पाहिजे तेव्हां पुणेंप्रांतींचे गांव मोडिले बितपसील.

मौजे संवत्सर १	मौजे हिंगणें १
मौजे सरंडी १	मौजे सासवड १
मौजे तरंडी १	लग ०
मौजे पिंपळगाव १	लग ०

एकूण साहा गांवची जमीन एक करून एक सासवड कसबा व पेंठ सोमवार ऐसें केलें त्याचा संवत्सर शके १४०१ विकारी नाम संवत्सरीं कसबा केला सदरहू साहा गांव मोडिले तेथील पाटिलकी कुंटे यांची व कुलकर्णी गिधवे व ज्योतिषी राखे असे होते पैकीं जगथापाचे कुंटे मावसभाऊ होते ते जगथापानीं बाहेर घालून पाटिलकी व देशमुखी करूं लागले गिधव्यांचें संतान नाहींसें जालें एकच म्हातारा निपुत्रिक होता त्यांचे वतनाचे गांव आठ होते त्यांपैकीं सदरहू गांव पुणेंप्रांतींचे मोडले ते सहा व सोनोरी व दिये हेही पुणेंप्रांतींचेच दोन एकूण आठ त्या पै॥ गिधव्यांनीं आपली कन्या पानसियांसी दिल्ही होती तिजला आंदण दिल्हे गांव सोनोरी व दिये हे दोन गांव दिल्हे बाकी साहा गांव मोडले सबब कुलकर्ण मौजे सासवडचे करीतच होता कितेक दिवस त्याणें कुलकर्ण केलें मग त्याजला बुद्धि काशीयात्रेस जावें असी जाली तेव्हां विठलपंत आत्रे याजपासून कांहीं द्रव्य घेऊन कुलकर्ण त्याचे स्वाधीन केलें आणि काशीयात्रेस गेला तेव्हांपासून आत्रे याचें कुलकर्ण कसब्याचें जालें राखियाचें ज्योतिष कसबे मजकूरचें त्यास राखियाचा हि वंश बहुत नव्हता परंतु राखियांनीं जगथापाची देशमुखी पाटिलकी व आत्र्याचें, कुलकर्ण देशकुलकर्ण जालीयावर बहुत दिवस त्याची ज्योतिस केलें त्यांत एकच पुरुष राहिला तो काळादुकाळामुळें उठोन गेला तेव्हां गांवाचे ज्योतिषपणाचें वतन चालवावयास कोणी नाहीं तेव्हां देशमुखांनीं व देशकुलकर्णियानीं विचार करून पुरंधरे यांचे हवाला केलें जे समई

जगथापानीं देशमुखी व आत्रे यानीं देशकुलकर्णीपण साधिलें ते समई बरोबर जे जे कामाकाजास आले त्यांस वतनें करून दिल्हीं वितपसील.

लेखांक ५९.

श्री.

हकीकती मोकदमी मौजे वडिगांव ता। नीरथड प्रा। पुणें मोकदम कदीम चोथे होते मचालियानी मारून काढिले मग मचाले करीत होते त्यावरी मचाले निंबाळकर वणंगपाळ यांनी मारून काढिले मग त्या निंबाळकरानी राजाळेकर निंबाळकर आले त्या घरास विठोजीस पाटिलकी दिधली त्यास विठोजीस पांच जण लेक वडील कान्होजी.

वडील कान्होजी	संताजी	मालोजी	निंबोजी	खंडोजी
१	२	३	४	५

यामधें कान्होजीचें बुडालें व निंबोजी व खंडोजीचें बुडालें यांमधें विठोजीचा चुलतभाऊ डाकोजी याचा लेक सिदोजी धाकटा त्याचे लेक मानाजी व सुभानजी हे दोघे जण हैबतरायाबराबर असती यांचा परामृश करणे सिदोजी निंबाळकर सदरहू संताजीचा लेक त्याचा यमाजी हाली असे.

लेखांक ६०.

(प्रारंभ गहाळ)

कागद तान्हाजीराम देसपांडिये पिसरानि मोरो तानदेऊ देसपांडिये यांसि देत गेलों नजरबाद लिहिली नाहीं तान्हाजीराम व मोरो तानदेऊ होनप देस-पांडिये व नामाजी लांडा गुमास्ता ह्यातहकजा इंलाही फौत गुदरोन गेला बादज चंद रोज फर्जंदानी नामाजी गुमास्ते बइसीम आपाजी व तुकावा व अंतावा व यादव व रंगावा यैसे सदरहू दर सरकार सीवाजी भोसले नवकर सुद यादो नामदेऊ ममलकतमदारुलमाहामीं दिवाण संभाजी राजे भोसले दीगर बिराजरानी आपाजी व अंताजी दर कार मुलिकगिरी व लस्करगै मामले करून बख्तावार होऊन आपलें वतन ह्मणौनि जोरावारी करूं लागले दीगर हिमाती निळो सोनदेऊ अज दिवाण सीवाजी राजे भोसले यांचे सगे खेश सोइरे सदरहू अंमल फैला असतां दिलीहून पातशाही फौजा दक्षणेवरी मोहीमदारी कामा नबाब उमदतुलमुलुक अमीरलउमराये दर कसबे पुणे दाखल (जाले) सा तरीके बाबाजीराम देसपांडिये असतां तमाम मोकदम व रयां कर्याती मावळ

एऊन रुजू होऊन मुलाअजमती व कौल सिरपाव सरफराजी जाली हक व लाजिमे सिरस्ते कागद तरफ मजकूर मुतसरफ असतां आपाजी व तुकावा पिसर नामाजी लांडियास मोकदम व पटवारी ह्मणत असेती कीं हक लाजिमा सिरस्ता कागद बाबाजीराम देसपांडिया कर्याती मजकूरीचा घेत असतां तुह्मी आह्मांसि नाहक घसघस करितां तरी हे गोष्टी वाजिब दिसोन येत नाहीं तों नवाब अमीरउलउमराये बमै सुबे मुलाजमत हजरती देहली कुच होऊन दिलीस गेले तो सुभे मिर्जा राजा पाईन केले पुरंधर बमै लस्कर घेरा घालून सिकिंदा केला ते वख्ती सिवाजी राजे भोसले मुलाअजमतीस एऊन किले व मुलूक दौलतकाहिरे मुबारख दाखल जाला तमाम जमीदारानी व देसमुखानी व देशपांडियानी व मोकदमानी प्रगणे पुणा व कर्याती मावळ व बारा मावळे ते वख्ती बहुजूर मिर्जा राजा व सिवाजी राजे अर्जदास बुलईल तमासा करून वतन होन ३००००० तीन लाख बर करार जाले पैकी अज दुमाले वतन कर्याती मावळ दाखल केले ते वख्तीं मोरो विठल व बाबाजीराम देसपांडिये याणी सिवाजी राजे साहेबांस अर्ज केला कीं तरफ कर्याती मावळ देसपांडेगिरी अहद (पुढें फाटलें आहे) हमेशा होत गेला बाद अज सिवाजी राजे फौत होऊन कैलासवास केला तो यादव पिसर नामाजी नोकर संभा भोसले बमै लस्कर चंदी व करनाटक मुलूक ताख्त ताराज करून जमीदार व पुंड पाळेगार यांचे सिरी तोफ ठेवितां दरमियान यादो नामदेऊ बखतवार होऊन मुदमगीम मबलग नजरबांदके लागली तो आपले करमबंदगेस मुखताले ए जिल्हे अज लस्कर मनसूर ज्याफर असरके अवलियाये दौलतकाहेर मुकाम फर्मूद होउनी यादी अवरंगाबाद असतां सुबे गाजुद्दीखान बहादूर फेरोजंग दर पुणे आमदरफ्त सा तरीके बाबाजीराम देसपांडे तमाम मोकदमानी पा। पुणे व कर्याती मावळ मुलाजमत बंदगानी नवाबसाहेब कौल सिरपाव व सरफराजी बवख्त हक व लाजिमा व सिरस्त कागद दस्तूर साबीक बाबाजीराम देशपांडिये अमल दखल करून मुतसरफ असतां विजापूर व भागानगर फते करून सन १०९९ रायात अलियात बंदगान हजरती दिलसुभानी दर मौजे तुळापुर मुकाम जाला तमाम जमीदारानी व देसमुखान व देसपांडियानी व मोकदमानी व रयानी पा। पुणे व बारा मावळे वगैरे दर कचेरीवाला रुजू होऊन अरबाब अदालती बादरगाह अस्मान ज्यांह्मा दिलसुभानी बाहदूर करामतगदूर मुलाजमती होऊन सिरपाव व कौल सरफराजी जाली ते वख्ती हमराह देसमुखानी करजवणे व पायगुडे क॥ मावळ वगैरा विठल व रामचंद्र बावाजी देसपांडिये होनप त॥ मजकूर सिरपाव

व कौलसरफराजी जाली ते वख्ती आपाजी पिसर नामाजी हाजीर होता त्यास कर्याती मावळीचे देसमुख व मोकदम पटवारी ह्मणो लागले की (पुढें गहाळ)

लेखांक ६१.

श्रीगणेशाय नमः

श्रीभोवानी प्रसन्न.

यादीदास्ती जागीर माहादाजी निंबाळकर पैकी खालिसा. दाम
३३१४०००

यासि तनखा अलाहिदा जागीर चालिली. दाम
१९२००००

ता

६३१००० तुळाजी सिंदा

९९९००० बाहादूरखान

४७००० सैद गजफर

२४३००० सैद लाड

१९०००० बा॥ चिखली

५३००० बा॥ रावेर खालिसा

२४३०००

१९२००००

पैकी खालिसा. दाम
१४५४०००

यासि जफा खालिसाखाले आहेत. दाम
२५९००००
२८१०००
२८१००००

यासि देह बिदेही आबाद व वइरान सन १०९७ कारणे ता। जैल.

आबाद		वैरान	
१५००००	आउध	३००००	कोंढवे
४५०००	बावधन	७००००	हिंगणें
५००००	महमदवाडी	६००००	न्हावी
६५०००	ताथवडे	७००००	कुसेगाव
६००००	हिंगणे	३००००	पाडळी
९००००	वाघोली	१०००००	
१०००००	धाईरी	९००००	देहू
९००००	नऱ्हे	१०००००	साई
१६००००	चिचोली	४७५००	भीउडी
४५०००	परवती	१५००००	बोरी आंबे
१९००००	खडकी	३५०००	वारजे
१२००००	बोरी	१३००००	मोसी
१५४५०००		२१००००	भोसदी
		१७००००	उरळी बु॥
		७५००	निऊर्डी बु॥
		१३३००००	

यासि हाली तह

खालिसा

१४५४०००

आबाद		वैरान	
१५००००	आऊध	७००००	कुसेगाऊ
४५०००	बावधन	१००००	साई
५००००	महमदवाडी	४७५००	भीउडी
६००००	ताथवडे	३५०००	वारज
६००००	हिंगणे	१५००००	बोरी
४५०००	परवती	३१२५००	

१६०००० चिचोली
१९०००० खडकी
७६००००
१७०००० उरळी
९३००००
७५०० निगडी
९३७५००

१०००० खुन्हव
३२२५००

१२६००००
१०००० वडवे
१२७००००

४२५७५०

लेखांक ६२.

श्रीराम.

यादिदास्त कानू मलिकअंबर व तनखा मोगलाई प्रा पुणे सरकार जुनर मो होन पा। ९०६३२॥।=। वजा सोडीपायपोसी खर्चपटी.

· सोडीपायपोसी खर्चपटी — वा। मोईन पा।
७०००ᴊ — ८३६३२॥।=।

दर होनास रुपये ३॥। प्रमाणें तनखा दिवाण मोगलाई रुपये
३३९८७६॥।·।।

देह बदेही देहे २९० मो कानू होन पा।

(पुढें गहाळ)

लेखांक ६३.

[पहिला बंद गहाळ]

होता ते वेळेस नागोजी बिन हिरोजी बदअमल वर्तला त्याजवरून पठाणमजकूर याणे अर्जी लेहून बेदरास पाठविली तेथून नागोजीस धरणी आली. तो गावातून

पलोन आलंयास बांदलाची पाठ निघावयास जात होता तेव्हां गुंजवणी अलीकडे श्वारीस सापडला तेथेंच डोसके मारिले मग गोजावा त्याची बायको अग्नि घ्यावयास लागली ते वेळेस आपले वडील हारजी व गोमाजी मौजे मजकुरी नांदत होते त्यास हारजी साहाजी माहाराजाकडेस चाकरीस गेला होता व गोमाजी गावावर नांदत होता ते वेळेस गोजावाचे समाधान केले की तू आग निघू नको. मूल जतन करून गावचा कारभार करून राहणे त्याजवरून ती राहिली त्याजवर हारजी व गोमाजी बावास देवआज्ञा जाली. त्यावर दादो कोंडदेव या प्रांती आले मुलकास कौल दिल्हा त्यांचा चाकर नावडकर मौजे धागवडीस कमाविसीस ठेविला त्याने आपली सीव मनाईची पहिली होती ती अलीकडे रेटून घातली त्यावर दादो कोंडदेव सावरदरियाचे मुक्कामी आले तेव्हां गोजावा जाऊन सावरदरकर पाटिल याच्या हाते भेटली तेथे पाटिलमजकुराचा कांहीं कजिया होता तो विल्हेस लाविला त्याजवर दादो कोंडदेव बोलिला जे, गोजावा कर्ती माणूस आहे. तेव्हा गोजावाने अर्ज केला जें आमची सीव धागवडकर याणी रेटिली मग सावरदरकर पाटिल बोलिले की इची समजावीस कांहीं देऊन करावी मग दादो कोंडदेव कृपाळ होऊन गावची वाहातीची जमीन बारा रुके दील्ही अगोदरचे इनामती रुका होता तो गोजावाने व अवघ्यानी टाकला त्या ता आपला भोगवटा राहिला त्यावर सिवाजी माहाराज या प्रांतास आले त्याजबरोबर आपले आजे त्रिंबकजी व मलकोजी रायगडास आले तेव्हां त्रिंबकजी माहाराजा जवळ राहिला व मलकोजी पुरंधरास सरनोबती करावयास माहाराजानी पाठविला. मग बापोजी व चापाजी व भानजी गावावर आले तेव्हां मलकोजीस सरनोबती पुरंधरची जाली ह्मणून वर्तमान कळले मग भेटावयास पुरंधरास गेले जाऊन भेटले तेव्हां यास वस्त्रें देऊन गावास पाठविले यावर वरसाभरा मलकोजी गावावर गाव पाहावयास आले तेव्हां चापाजीस पुसिले की होळीस पोळी कोण लावितो त्याजवर चापाजी बोलिला की गोमाजी बावानें गोजावास कामकारभार सांगितला आहे त्यावरून हाली बापोजी होळीस पोळी लावितो त्याजवर बापोजीची व मलकोजीची कटकट जाली. मग बापोजी बोलिला की तुह्मी वडील आहात गोमाजीबावानी आपल्यास गावचे कामकाज सोपले ह्मणून आपण होळीस पोळी लावीत होतो त्यास तुम्ही गावावर एऊन राहणे मग काय तुम्ही सांगाल त्याप्रों वर्तू. त्याजवर मलकोजीने मोकदमीचे वाडे व सेतपव्या सुमार ८ पैकी निमे ४ बापूजीकडे व च्यार आपणाकडे व वाडा सुमार हात १०० शंभर पैकी निमे आपणाकडे निमे त्याजकडे ग्रेणेप्रमाणे वाटून

घेतले यावर तान्हाजी भालेघरे यास होन साठ देऊन दगड धोंडा आणविला त्याजवर धोंडे घेऊन आले विहीर पडित पाडिली आणि गोठा हि तेथे बांधिला पुढें इनाम पासोडी हक्क लाजिमा याचा बंदोवस्त करून घ्यावा तो रायगडचे बोलावणे माहाराजाचे आले त्याजवर ते चाकरीस गेले ते तिकडेस वरीस साहा महिने राहिले पुढे पातशाही गर्दी जाली. मुलूक उज्याड जाला त्यावर त्रिंबकजी व मलकोजी यांस देवआज्ञा जाली पुढें न्याहारखान या प्रांतास आला त्याणें मुलकास कौल दिल्हा त्याचा अंमल दोन च्यार वरसें चालिला पुढें हायबतराव निंबाळकर याचा दंगा जाला ते वेळेस अर्जाजी हाटे याणी बहिरजीस होळीच्या पोळीस दोही दिल्ही कजिया मातबर जाहाला पुढें विल्हेस लागावा तो मुलूक उज्याड जाहाला तेव्हां तैसेच राहिले त्याजअलीकडे विठोजीची व आपली कटकट जाहाली त्याजवर मोरोपंत देशमुख गावास आले उपरांतीक विंगास गेले इ. इ. इ.

लेखांक ६४.

राजीनामा बे॥ देसमुखान व देसपांडियानी व मोकदमानी व माहाजनानि व सेटिये व रयानि पा॥ पुणें स॥ जुनर आं की सेख जाफर++ई ज्यांहानखान फौजदार पा॥ मा॥र आ++ता आदी व सीतम लुटून घेतले महलग मुतसरफ होउनु बेहती न्यायायत केले प॥ वैरान जाला. व कसबेमजकुरीची रयत कैद केले कितेक जमीदारांचे तर्फेने किले अ++डी व कोंढाणा कैद होते जे वख्ती ++ खानजी पोहचले ते वख्ती खलासी जाली आ++आपण बखिजमती जिल्हे मुस्तताह फेरोजजंग एउनु पोहचलो की फौजदार दीगर होए व इलाने एक आदमी बपरगणे नमेमानद दरीविंला बनजर आबादानी व मामुरी पाहाडखान फौजदार प॥ मजकुरी मोकरर जाले यासि आपण तमाम रयानि बादशाही राजी व शामीर असो.

Digitized with financial assistance from
Dr. Devangana J. Desai
on 14 February, 2019